# ख्रिस्तायन

नाताळ ई-अंक ◆ वर्ष: आठवे ◆ २५ डिसेंबर २०१८ ◆ संपादक : ख्रिस्तोफर रिबेलो




CELEBRATING
1918 2018
YEARS OF SUCCESS
ESTD.1918
BASSEIN CATHOLIC
CO-OPERATIVE BANK LTD
(SCHEDULED BANK)
Merry Christmas
&
Happy New Year
Corporate Office: Catholic Bank Building, Papdy Naka, P.O. Papdy, Vasai - 401 207
Contact No.: 0250-2322053 / 0250-2322449 | Toll-free: 1800 233 6000 | www.bccb.co.in

# ख्रिस्तायन

## नाताळ ई-अंक वर्ष आठवे

## २५ डिसेंबर २०१८


## संपादक : ख्रिस्तोफर रिबेलो

**सहसंपादक – एडवर्ड डिसोजा**

### संपादन साहाय्य

**स्वप्निल रिबेलो** | **स्मिता ख्रिस्तोफर रिबेलो**
**सचिन सिल्वेस्टर रॉड्रिग्ज** | **सुनिल बा. डिमेलो**

### तांत्रिक सहकार्य

**वनवसई टिम**



© सर्व हक्क लेखक व कवींच्या स्वाधीन



### संपर्क / अभिप्राय

आमच्याशी संपर्क साधावयाचा असल्यास आणि आपल्याला काय आवडलं, काय नाही ते आम्हाला कळवण्यासाठी खालील पत्त्यांवर ई-मेल करा वा फोन करा

ख्रिस्तोफर रिबेलो :- chrisrebello25@gmail.com (9819436078)        १वसई :- admin@onevasai.com



### आभार

आमचे सर्व लेखक, कवी, हितचिंतक व प्रसिद्धी देणारे सर्व प्रसार माध्यमे यांचे “ ख्रिस्तायन” तर्फे मन:पूर्वक आभार व नाताळ आणि नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.



या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही

# अंतरंग


संपादकीय...

## कथा / ललित लेख :-

नाताळ □जीवनाचा महोत्सव – फा. फ्रान्सिस दिब्रिटो

वसईतील हिंदू-ख्रिस्ती ऐक्याचे - अनिलराज रोकडे

याद राखा --- वर्जेश ईश्वरलाल सोलंकी

मोबाइलधारी पिढी - जॉन कोलासो

माणसाच्या अभ्युदयाची आशा- सायमन मार्टिन

बाबु मावशाय - प्रा. नेहा सावंत

## परिसंवाद - वसई ख्रिस्ती समाजातील प्रशासकीय सेवेबद्दलची उदासिनता.

सहभाग - ॲड अतुल आल्मेडा, फ्रान्सिस आल्मेडा (सर), अनिशा सुनिल डिमेलो, रुबिना डिमेलो, बेन्सन कोरिया, जेम्सन अंतोन डिमेलो

मृत्युनंतर दागिने जाळू नका - पुरूषोत्तम पवार

सिंगापूर (प्रवास वर्णन) - सायमन रॉड्रिग्ज

द्वंद – बेर्नादेत रुमाव, गास

धर्म आणि विज्ञान - फ्रान्सिस आल्मेडा(सर)

वेगळा अर्थ - जेजू परेरा

टाइमबँकेच्या निमित्ताने. . . . - सॅबी परेरा

वसईचे नाताळ संगीत - विजय मच्याडो

महात्मा गांधीजी □बापूजी - मोहन पाटील

तू क्रोध की मशाल बन - डॉ .नेन्सी विन्सेंट डिमेलो

तोत्तोचान -- पुस्तक परीक्षण - सुनिता बर्नड परेरा

जिंदगीका सफर - - सिरिल मिनेझीस

सत्य हाच परमेश्वर - मॅक्सवेल ॲण्ड्र्यु लोपीस

"मोल" करीन - रॉबर्ट फर्नांडिस

कन्यादान - रेश्मा सुनिल परेरा

डिजीटल युगासाठी पालकांना टिप्स. - सुनील सायमन डिमेलो

इम्म्यानुएल - रे. फा. एलायस रॉड्रिग्ज

आभासी जगात हरवलेलं - सुहास बिऱ्हाडे

नैतिकता - प्रा. ट्रिजा परेरा, आगाशी

कलियुगातील 'मेरी - जोसेफ' - सोनल डिकुन्हा

होकार - बॅप्टीस्ट एम . वाझ

ख्रिश्चन विवाह नोंदणी – आशिष लोपीस

बदलते पावसाचे स्वरूप - सचिन मर्ती

परिपूर्ण भेट - फा. आसिसि रॉड्रिग्ज

कोकरू - राकेश परेरा, आगाशी

देवमाणूस - सचिन मेंडिस

ऋतूबद्ध - डॉ. रिबेका दोडती

जतन - पेट्रेशिया गोन्सालवीस

आपण कोण - आलेक्स डाबरे

एक शिवार - फ्रँक मिरांडा

## कविता / चारोळया :-

सायमन मार्टिन, जोसेफ तुस्कानो, इग्नेशियस डायस, फेलिक्स डिसोजा, महेश लीलापंडित, फा. वेन्सी डिमेलो, आयवन क्रास्टो, फ्रँक मिरांडा, संगीता वाझ, जिम (फिलिप) रॉड्रिग्ज, मेल्सीना तुस्कानो, नीलम दळवी, ग्रिनल फरगोज, रेश्मा सुनिल परेरा, एडवर्ड डिसोझा, सुनिल सोकाळकर

**कलाकुसर** :- पॉल डिमेलो, रॉजर सेरेजो, केल्विन लोपीस, जोनस पांबूजा

# जीवन विकास नागरी सहकारी पतपेढी (मर्यादित), वाघोली.

रजि.नं.टीएनए /व्हीएस्आय /आरएस्आर / सीआर / 429 / 88-89 दिनांक 9-12-1988

## *कोकण विभागातील अग्रेसर पतपेढी*

आपल्या व्यावसायीक व कौटुंबिक विकास योजनेसाठी पतपेढीच्या सेवा

*१२ महिन्यापेक्षा जास्त ते १८ महिन्यापर्यंत*

**ज्येष्ठ नागरीकांच्या ठेवीवर**

द.सा.द.शे. ७.७५% व्याजदर

**सर्वसाधारण सभासदांस द.सा.द.शे. ७.५०% व्याजदर**

# द.सा.द.शे. ८% सरळव्याज

८.९०% ते १२% व्याजदराच्या विविध सुलभ कर्ज योजना.

**घरबांधणी / फ्लॅट खरेदी द.सा.द.शे. ८.९०% व्याजदर**

**रू. ५ लक्ष पतकर्जाचे त्वरीत वितरण - द.सा.द.शे.**

**१२% व्याजदर**

**नियमित कर्ज भरणा करणा-यांना व्याजात २% रिबेट**

**३० नोव्हेंबर २०१८ अखेर आर्थिक प्रगतीचे बोलके आकडे**

- **भागभांडवल रू. ११.१६ कोटी**
- **कर्जे रू. ९९.७९ कोटी**
- **ठेवी रू. २२७.०३ कोटी**
- **गुंतवणूक रू. १७३.२१ कोटी**
- **एकूण व्यवसाय रू. ३२७ कोटी**
- **सभासद संख्या १३५१९**
- **ढोबळ एन. पी. ए. १.८४%**
- **दि. ३१/०३/२०१८ अखेर नफा रू. ६.९१ कोटी**

**शाखा -**

| निर्मळ | सत्पाळा | उमराळे | नानभाट | आगाशी |
|---|---|---|---|---|
| फोन :९८२२२२५३८७ | मो. ७२६१९१९०१२ | मो. ०८५५०९१०२६४ | मो. ७२६१९१९०१३ | मो. ०८५५०९१०६४३ |

**लता जे.फोस**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**मॅथ्यू ए. डिसोजा**
उपाध्यक्ष

**सिल्वेस्टर ए. दोडती**
अध्यक्ष

व

संचालक मंडळ

# संपादकाच्या लेखणीतून...

वाचक मित्र-मैत्रिणींनो, सर्वप्रथम नाताळ सणाच्या हार्दिक शुभेच्छा.

आम्हा ख्रिस्ती धर्मीयांमध्ये आनंदाचं उधाण घेवून येणारा हा सण. डिसेंबर महिन्याची सुरुवात झाली की एका बाजूने गुलाबी थंडी हळूहळू वातावरणात आपले जाळे विणत जाते आणि दुसरीकडे आगमनकाळाच्या सुरुवातीने आम्हा ख्रिस्ती लोकांची लगबग सुरू होते. वर्षभराच्या दगदग आणि कंटाळवाण्या रुटीन जीवनाला थोडा वेळ दूर सारून गुलाबी थंडीच्या गारव्यात आनंदाची रजई ओढण्याचे हे दिवस असतात. दुख, कष्ट, रोजची कामानिमित्त आणि संसाराचा गाडा हाकताना होणारी ससेहोलपट विसरून क्षितिजापल्याड लुकलुकणाऱ्या तेजस्वी ताऱ्याचे अवलोकन करत जो तो बाळ येशूच्या स्वागतासाठी तयारीला लागतो. नाताळ सणाच्या या धामधुमीत आम्हीही सामील झालो आहोत आणि आपणासाठी हा नाताळ अंक रूपी फराळ घेऊन आलो आहोत. नाताळ सणानिमित्ताने प्रकाशित होणारा "ख्रिस्तायन" हा पहिला व एकमेव ऑनलाइन नाताळ अंक आहे.

प्रत्येक वर्षी आम्ही वसईतील नव कवि-लेखकांच्या साहित्यकृतीं तसेच प्रतिभावंत चित्रकारांच्या चित्रांना प्राधान्य देत असतो. त्याचबरोबर प्रथितयश लेखक-कवींचाही या चळवळीत आम्हाला सहभाग मिळत असतो. ज्येष्ठ विचारवंत व साहित्यिक फा. फ्रान्सिस दिब्रिटो, ज्येष्ठ कवी सायमन मार्टिन, विज्ञानलेखक जोसेफ तुस्कानो, फा. एलायस रॉड्रिग्ज, पत्रकार जॉन कोलासो, अनिलराज रोकडे, सुहास बिऱ्हाडे, प्रा. नेहा सावंत, कवी वर्जेश सोलंकी, महेश लिलापंडित, इग्नेशियस डायस, फेलिक्स डिसोजा, ललित लेखिका बेर्नादेत रुमाव आणि कवियत्री सबीना फोस हे दिग्गज आमच्या या चळवळीत सहभागी झाले आहेत. कथा-कवितांचा समावेश या अंकात आहेच. पण आम्ही ज्या समाजात राहतो त्या वसईकर समाजाची प्रशासकीय सेवेबद्दल असलेली उदासिनता यावर एक परिसंवाद घेतला आहे, ज्यात ज्येष्ठ जाणकार तसेच त्या क्षेत्रात असलेले किंवा इच्छुक असलेल्या व्यक्तींचा सहभाग आहे. पुस्तक परीक्षण, प्रवास वर्णन तसेच काही विशेष विषयांवरचे लेखही समाविष्ट आहेत.

एक गोष्ट नमूद करावीशी वाटते, या वर्षी अंक प्रकाशित होईल की नाही याची शाश्वती हे संपादकीय लिहितानाही नव्हती. दोन महिन्याअगोदर अंकाच्या तयारीला सुरुवात केली आणि माझा जीवघेणा अपघात झाला, महिना त्यात गेला, त्यातून बाहेर आलो आणि थोड्याच दिवसात आईच्या आजारपणाने पुन्हा उचल खाल्ली आणि त्यातच पंधरा दिवसाअगोदर ती हे जग सोडून गेली. या सर्व कठीण परिस्थितीत स्वत:ला खंबीर ठेवावे लागले कारण मनात एकच विचार होता, आपण घेतलेला हा वसा असा अधांतरी कसा सोडून द्यायचा, कुठल्याही परिस्थितीत अंक काढायचाच, त्यामुळे हा अंक पूर्ण करून प्रकाशित होत असताना आज खूप समाधान वाटत आहे.

आम्ही हा अंक 'पीडीएफ' स्वरुपात देत आहोत, त्यामुळे आपणास अंक वाचण्यासाठी पूर्ण वेळ ऑनलाइन असण्याची गरज नाही. त्याचबरोबर या अंकाचे आता अँड्रॉईड ॲप म्हणूनही आगमन झाले आहे. प्ले स्टोअर वरुन आपण हा अंक डाऊनलोड करून नंतर आपल्या सोयीप्रमाणे अगदी मोबाईलवरही वाचू शकता. आपण हा अंक वाचल्यानंतर इतरांनाही कळवा.. आणि आपल्या सूचना आणि अभिप्रायांची देखील आम्ही वाट पाहत आहोत..

नाताळ सणाच्या व नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!!!

Merry Christmas & Happy New Year.

# नाताळ □जीवनाचा महोत्सव

– फा. फ्रान्सिस दिब्रिटो

उत्पत्तीच्या पुस्तकात सांगितले आहे – "देव बोलला आणि निर्मितीचे चक्र सुरू झाले."

आपण सोयीसाठी काळाचे वर्तमान□भूत□भविष्य असे तीन तुकडे केले आहेत.

देवासाठी एकच काळ असतो □वर्तमान.

असणे हाच देवाचा स्वभावधर्म आहे. देव 'काळ' ह्या परिणामाच्या पलीकडे आहे. तो कालतीत आहे.

देवासंबंधी केलेल्या विधानाला मर्यादा असतात.

तो शाश्वत□आपण नश्वर. तो निरंतर□आपण मर्यादित.

म्हणूनच देवाविषयी बोलताना भारतीय ब्रह्मविद्याविशारदांनी 'नेति नेति' ची भाषा वापरली.

संत पॉल सांगतो की आता आपल्याला आरशात अंधुक आणि अस्पष्ट दिसते म्हणजे आपले ज्ञान अपूर्ण आहे. त्याला स्थलकालाच्या मर्यादा आहेत.

मोशेला जळत्या झुडुपात परमेश्वराचे दर्शन घडले.

मोशेने देवाला विचारले, "तुझे नाव काय?"

"मी जो आहे तो," देवाने उत्तर दिले.

असणं हाच देवाचा स्वभाव धर्म आहे.

देव वर्तमानकाळ असल्यामुळे□तो बोलत आहे आणि निर्मिती घडत आहे.

किंबहुना□निर्मितीचे प्रत्येक कोंभ पाहून आपल्या मुखातून सहज उद्गार निघावा □देवाचा शब्द □

रानगवताचा प्रत्येक अंकुर म्हणजे परमेश्वराचा हुंकार आहे.

जुनाट पिंपळाच्या खोडावर उगवलेले□बाळाच्या जिवणीइतके पहिले लालसर कोवळे पान हा देवाचा उद्गार आहे.

मातीतून वर येणारा प्रत्येक लसलसता कोंभ देवाचा ओंकार आहे.

कवच भेटून बाहेर येणारे पक्ष्याचे प्रत्येक गोजिरवाणे पिल्लू देवाचा झंकार आहे.

नऊ महिन्यानंतर प्रकाशाचे प्रथम दर्शन घेणारे माणसाचे बालक म्हणजे देवाचा सस्वर आहे.

अवघे जीवन ईश्वरमय आहे. जिथे ईश्वर आहे तिथे सृजन आहे. नवनिर्मिती आहे, उत्साह आहे, आनंद आहे.

निर्मितीच्या नवनवोन्मेषशाली नवलाईमध्ये परमेश्वराने स्वतःला गुंतवून ठेवले आहे.

सृजनाचे पाळणे हलवीत□निर्मितीला तो अंगाई गति गात आहे.

अवघी निर्मिती देवाच्या कुशीत गर्भाप्रमाणे सुरक्षित आहे.

एके दिवशी देवाने संकल्प केला □माणूस होण्याचा □देवाला मातेच्या कुशीत गर्भवासी होण्याचे डोहाळे लागले.

जो बंधनाच्या पलीकडील आहे त्याला बंधनात गुंतून राहावेसे वाटू लागले.

जो अमर्याद आहे त्याला स्वतःवर मर्यादा घालून घ्याव्याशा वाटल्या.

जो अनंत आहे त्याला सांत व्हावेसे वाटले...

देहाच्या जडशील ओझ्याखाली चिरडलेला तरी□आत्म्याच्या अनंत क्षमा जगवणारा माणूस .

विकरांच्या डंखामुळे हतबल झालेला तरी□विवेकाच्या पंखांनी सूर्यबिंबाकडे झेपवणारा माणूस .

असत्याच्या निबीड अंधारात चाचपडणारा तरी□सत्याच्या ध्यासाने वेडापिसा झालेला माणूस .

अंधवासनाच्या चिखल लिडबिडलेला□तरी मांगल्याच्या ध्यासाने धडपडणारा माणूस .

मायावी मोहपाशात सहज अडकणारा तरी, देवदुतापेक्षा किंचित व असलेला माणूस...

देवाच्या चिरंतन चिंतनाचा विषय असलेला तरी त्याला नाकारण्याची शक्यता असलेला माणुस...

देवाला माणूस व्हायचे होते . मानवाला आपल्यासारखे करण्यासाठी□त्याला दिव्यत्वाचा वाटेकरी करण्यासाठी□ त्याला सत्□चित् आणि आनंद ह्यांचा भागीदार करण्यासाठी

देवाला हाडामांसाचा□भावभावनांचा□विचारविकारांचा माणूस व्हायचे होते .

आपलेच प्रतिरूप असलेला□तरी पापामुळे दुखावलेल्या मानवाला दैवी जीवनात सहभागी करण्यासाठी देवाला माणूस व्हायचे होते .

तिन्ही जगाचा स्वामी मातेच्या शोधाला लागला... देवदुतांनी नवखंड पृथ्वी धुंडाळली, तिन्ही लोक त्यांनी पिंजून काढले□ता□याग्रहांचा□आकाशगंगाचा त्यांनी वेध घेतला .

परमेश्वराच्या पुत्राला साजेशी जागा मिळेना . शोध□शोध शोधून शेवटी दूताला एक निर्मळ□निष्कलंक कुमारिका आढळली .

मारिया तिचे नाव . निवळ चांदण्यासारखा तिचा देह... नक्षत्राचे तेज तिच्या आत्म्यामध्ये... मांगल्याचे साक्षात माहेरघर .

ते अलौकिक पावित्र्य□ते तेजस्वी लावण्य पाहून देवदूत नतमस्तक झाला .

अमूर्त मूर्ताला सामोरे आले . परमेश्वराच्या दुताने मानवाच्या कन्येसमोर गुडघे टेकले .

तेजाच्या पुत्राने धरित्रीच्या लेकीला नमन केले ः “नमो कृपापूर्ण स्त्रिये □प्रभू आहे तुझ्या सांगाती□मरिया बावरली . क्षणात सावरली . ईश्वराला हवीय तुझी संमती...”

“मी दासी ईश्वराची, सेविका त्याच्या शब्दाची...”

तत्क्षणी ‘शब्द देह झाला आणि आम्हांमध्ये येऊन राहिला !’

स्त्रीचा देह झाला देवाचे मंदिर तिची □कूस त्याचा मंगल गाभारा मातेच्या उदराच्या उबा□यात देवाचे बालक वाढू लागले मरिया बनली शिडी याकोबाची .

तिच्या देहावरून अवतरला स्वर्ग धरतीवर नि देव मातीवर . स्त्रीच्या गर्भात राहून देव माणूस व्हायला शिकला . मरिया सृजनाची माता .

मानवी जिवाचे□देवाच्या मुलाचे संरक्षण स्त्रीच करू शकते हा देवाचा अनुभव आहे .

तिच्या हाती देवाने आपल्या बाळाला सोपविले .

नाताळच्या मंगलदिनी देव माणूस झाला . माणूस देवरूप झाला . नाताळ सोहळा . देव पुत्राच्या जन्माचा मानवाच्या आशेचा □

# मोबाइलधारी पिढी

**- जॉन कोलासो, गिरीज**

कोणाच्याही घरी आपण गेलो की, घरातील छोट्यांविषयी एक तक्रार ऐकायला मिळते... ‘हा आमचा छोटा, नेहमी मोबाइल घेऊन खेळत बसतो.... अभ्यास करीत नाही... खेळायला बाहेर जात नाही... लवकरच चष्मा लागेल की काय, अशी भीती वाटतंय...’

आणि घरात दोन छोटी मुलं असली की त्या दोघांत मोबाइलवरून नेहमी कशी भांडणं होतात, याचा पाढा वाचला जातो...

मोबाइलच्या आगमनापूर्वी कम्प्युटरबद्दलही अशीच तक्रार घरातील मुलांबाबत ऐकायला मिळत असे. संबंध दिवस कम्प्युटरसमोर बसलेला असतो... अभ्यास करीत नाही...

त्यानंतर कम्प्युटरच्या जोडीला इंटरनेट आलं आणि मग इंटरनेटवर काय काय बघत असतो... पिक्चरसह काय डाऊनलोड केलं जातं, याची यादी सांगून झाल्यावर, रात्री उशीरा झोपतो... सकाळी उशीरा उठतो... अभ्यास नाही... इत्यादी इत्यादी तक्रारींचा पाढा वाचला जात असे.

कम्प्युटरच्या पूर्वी टीव्ही बघत कशी नवी पिढी खराब होणार आहे, याविषयी जोरजोरात तक्रारी केल्या जात असत. संबंध दिवस कसे टीव्हीवर पिक्चर पाहतात, त्यांची वर्णनं ऐकविली जात असत. टीव्हीच्या जोडीला व्हीसीआर आले आणि गावागावात शनिवार-रविवार कॅसेटवर दिवसरात्र कसे पिक्चर पाहिले जातात यांची वर्णनं ऐकायला मिळत असत... शेवटी ही तरुण पिढी कशी वाईट मार्गाला लागली आहे... यांचे पुढे काय होणार समजत नाही... या भीतीनं पालक हवालदिल झालेले पाहायला मिळत.

टीव्ही-व्हीसीआर काळाच्या अगोदर संबंध दिवस पुस्तक घेऊन वाचन करीत बसणा-या काही मोजक्या मुलांची ’पुस्तकातील कीडा’ म्हणून संभावना होत असे. घरकामात, शेतीकामात मदत करीत नाही म्हणून त्यांच्याबद्दल तक्रार होत असे तर पुस्तक हातात न धरणा-या, सबंध दिवस गावभर भटकणा-या किंवा खेळणा-या मुलांची ‘उनाड’ म्हणून संभावना होत असे.

काळ जसा बदलत जातो तसे आपण लहान मुलांच्या संदर्भातील तक्रारींचे निमित्तही बदलत जाते, मात्र तक्रारी कायम असतात. एकामागून एक आपण जर तक्रारींचे विश्लेषण केले आणि त्यात्या वेळची 'तरुण पिढी' खरोखरच बिघडली आहे काय, यासंबंधी आढावा घेतला तर असे दिसून येईल की, कोणत्याही काळातील 'तरुण पिढी' कधीच बिघडलेली नाही. उलट ती काळाबरोबर आणि त्यांच्या हाती येणा-या साधनाद्वारे अधिकाधिक स्मार्ट बनत गेलेली आहे.

'मोबाइल' हातात घेऊन मोठी होणारी पिढी इतक्या सहजपणे जगाशी संपर्क साधत असते, ऑनलाइन व्यवहार करीत असते की पालकांना त्यांच्या हुशारीचं नकळत कौतुकही करावं लागत आहे.

तसंच टीव्ही पाहत मोठी झालेली आमच्यासारख्या पिढीचं आयुष्यात कोणतीही नुकसान झालेलं नाही. त्यामुळे टीव्हीमुळे 'नव्या पिढीचं कसं नुकसान होणार आहे...' याविषयी त्यावेळी होत असलेली चर्चासत्रं, परिसंवाद, वृत्तपत्रांतील मोठमोठे लेख आणि ते ऐकून वा वाचून हवालदिल झालेले आमचे पालक, हे सर्व आजही आठवतं आणि हसू येतं.

आमच्या नंतरच्या पिढीबद्दलही असंच म्हणता येईल. ही पिढी कम्प्युटर, लॅपटॉप सोबत वाढली आणि या आधुनिक तंत्रज्ञानाचे ते गुलाम होत असतानाच त्या तंत्रज्ञानावर त्यांनी हुकमत बजावून त्यांना आपल्या नोकरीचं एक साधन बनविलं. परदेशात मानानं नोकरी करू लागले.

'पुस्तकातील कीडा' आणि 'उनाड' या दोन्ही प्रकारांतील मुलांनी पुढे आपापल्या अंगातील गुणांनी आपापली सिद्धता दाखवून दिलेली आहे... वेगवेगळ्या क्षेत्रांत...!

आजची मोबाइलधारी पिढीही उद्याची स्मार्ट पिढी बनणार आहे... हे मात्र निश्चित... त्यामुळे उगाच त्यांच्या मोबाइल वेडाबाबत नाहक भीती व्यक्त करण्यात अर्थ नाही...! तुमचं काय मत आहे?

# वसईतील हिंदू-ख्रिस्ती ऐक्याचे दर्शन होते दिवाळी आणि नाताळातून !

**--- अनिलराज रोकडे**

@ सेबेस्टीयन घोन्सालवीस गेली 44 वर्षे करताहेत लक्ष्मीपूजन !!

@वसई तालुका शिवसेनेतर्फे घेतली जाते 'नाताळ गोठा स्पर्धा' !!

@ हिंदू सोसायट्यांमधून सजविले जातात 'नाताळ' गोठे !!

विविध धार्मिक सण-उत्सव, विवाह सोहळे, रूढी-परंपरा आणि सामाजिक उपक्रमातून वसईतील हिंदू-ख्रिस्ती ऐक्याचे दर्शन अनेकदा घडते. सार्वजनिक स्तरावर साजरे होणाऱ्या गणेशोत्सव आणि दिवाळीसह अन्यही सणात रमणारे ख्रिस्तधर्मीय, त्याचबरोबर  नाताळाप्रमाणे अन्यही ख्रिस्ती सणात भाग घेणारे हिंदुधर्मीय हा येथील हिंदू-ख्रिस्ती मैत्रीच्या परंपरेचा भाग बनला आहे. ख्रिस्तजन लक्ष्मीपूजन करतात, तर शिवसेनेतर्फे 'नाताळ गोठा' स्पर्धा येथे भरविल्या जाते. अशीही वसईची अनोखी परंपरा सर्वधर्मसमभावाचे वास्तववादी प्रतिक ठरली आहे.

गिरिजच्या जीवन दर्शन केंद्रात काही वर्षांपासून सर्वधर्मीय दिवाळी स्नेहमिलन आयोजित केले जाते. यंदा यात भर पडली असून भुईगांव येथील होली फॅमेली चर्चचे प्रमुख धर्मगुरू फा.बाप्टीस्ट लोपीस यांनी पुढाकार घेऊन 'दिवाळी पहाट' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते.त्यास सर्वधर्मियांनी मोठा प्रतिसाद दिल्याचे पाहायला मिळाले. नाताळ निमित्त दरवर्षी दि. 25 डिसेंबर रोजी वसईच्या 'बिशप्स हाऊस'मध्ये होणाऱ्या सर्वधर्मीय नाताळ मेळाव्यास सर्व धर्माचे प्रमुख,तसेच सर्व पक्षीय लोकप्रतिनिधी आवर्जून हजेरी लावतात. तर उमेळयाच्या अभंग भवनातील अपंग सेवा संस्थेतर्फे साजरा होणाऱ्या नाताळात साकाई गांवदेवतेच्या मंदिरातून बाळ येशूची पालखी हिंदू साधूंच्या सहभागाने टाळ-मृदूंगाच्या गजरात काढली जाते.

या परंपरेला आणखी शिखरावर नेऊन ठेवणारे,  वसईतील हिंदू-ख्रिस्ती ऐक्याचे भक्कम प्रतिक म्हणता येईल असे एक उदाहरण यंदाच्या दिवाळीत समोर आले होते. गोखिवरे येथील श्री सेबेस्टीयन जॉन घोन्सालवीस ऊर्फ भाटीया(बाठ्या)शेठ गेली 44  वर्षे अतिशय श्रद्धापूर्वक,तसेच पूर्ण हिंदु परंपरा व शास्त्रानुसार लक्ष्मीपूजन करून दिवाळी साजरी करीत आले आहेत. दिवाळीच्या दिवशी त्यांची ही उपासना 'लीलाई दिवाळी अंक ' त्यांना द्यावयास गेलो असता, अचानक समोर आली. लक्ष्मी देवतेची आराधना आता पर्यंत त्यांनी खासगीपणे जपली होती. 'सर्वधर्मियते'चा बेगडी बढेजाव आणि सवंग लोकप्रियतेच्या मोहाला आपण कधी बळी पडलो नसल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

हिंदू परंपरेतील  केशरी गंधाचा कपाळी उभा तिलक दैनंदिन लावणारे भाटीया शेठ हे एक अपवादी ख्रिस्तजन म्हणून सगळेच वसईकर  त्यांना ओळखतात. "ओम जय जगदीश हरे,स्वामी जय जगदीश हरे | भक्त जनोके संकट क्षणमे दूर करे |" हे लोकप्रिय हिंदु-भजन ज्यांनी आपल्या भ्रमणध्वनीची रिंगटोण ठेवले आहे. त्या भाटिया शेठ यांचा हिंदु मित्र-मंडळीतील वावर आणि सलोखा जरा अधिकच असल्याचे वसईकरांना फारसे नवे नसले तरी त्यांच्या लक्ष्मीपूजनाच्या वृत्ताने कुतूहल मिश्रित आश्चर्याचा सुखद धक्का वसईकराना बसला होता.

हिंदु धर्मियांनाही लाजवेल अश्या शास्त्रोक्त आणि श्रद्धापूर्ण पद्धतीने श्री भाटीया शेठ यांच्या रूपाने कुणी ख्रिस्तजन लक्ष्मीची चांदीची मुद्रा आणि प्रतिमेची विधिवत पूजा करून लक्ष्मीपूजन करतो, ही नव्याने आता उघड होत असलेली बाब वसईच्या परस्पर धर्मीय सलोख्याला आणखी मोठ्या उंचीवर नेणारी ठरणार आहे. सव्वीस वर्ष बसिन कॅथॉलिक सहकारी बँकेवर संचालक आणि एक टर्म उपाध्यक्षपद भूषवलेले भाटीया



*"अखेर ईश्वर हा एकच आहे. मी वेलंकनीच्या मरीया मातेला मानतोच, तितक्याच श्रद्धेने लक्ष्मीदेवीचीही आराधना करीत आलो. व्यवसायात बरकत आणि मेहनतीला फळ दे, दीन-दुबळ्यांच्या मदतीसाठी सामर्थ्य दे, अशी याचना लक्ष्मीदेवी कडे आपण करीत आलो आणि ती मला देत आली !"*

*--- सेबेस्टीयन घोन्सालवीस ऊर्फ भाटीया शेठ, सामाजिक कार्यकर्ते*

शेठ कार्डिनल ग्रेशर्स हॉस्पिटल आणि संत गोन्सालो गार्सिया महाविद्यालय समितीचे संचालक आहेत. एक ज्येष्ठ सामाजिक आणि दानशूर कार्यकर्ते म्हणून सर्वपरिचित असलेल्या भाटीया शेठ यांच्या नावे आता आणखी एक लौकिक जोडला गेला आहे. तामिळनाडू येथील वेलंकनीच्या मरीया मातेचे निःसीम भक्त असलेले भाटीया शेठ दरवर्षी तेथील यात्रेला न चुकता जातात. भक्तीचे मार्ग वेगवेगळे असले तरी ईश्वर मात्र अखेर एकच आहे,असे मानणाऱ्या भाटिया शेठ यांनी सन 1975 पासून आपल्या वसईरोड (प)येथील एस पी चेंबर्स इमारतीतील रांगोळी,तेलाच्या पणत्या आणि कंदील लावलेल्या कार्यालयात पंचांगात दिलेल्या मुहूर्तावर लक्ष्मीपूजन करण्याची परंपरा जोपासली आहे. आज पर्यंत जाहीर न झालेले व चार भिंतीत होणारे हे त्यांचे लक्ष्मीपूजन यंदाच्या दिवाळीत मात्र केवळ समाजात ऐक्याचा संदेश जावा या उद्देशानेच त्यांनी बातमी करायला संमत्ती दिली. आणि भाटिया शेठचे लक्ष्मीपूजन अनेक वृत्तपत्रातून छापायची मला संधी मिळाली. त्यानंतर आणखी एक उद्योजक बिट्टू (अंकल) लोबो हेही मनोभावे लक्ष्मीपूजन करीत असल्याचे समोर आले.

देशात गोव्याच्या खालोखाल नाताळाची धूम गाजते ती वसईत.... ! त्यामुळेच दसरा-दिवाळी संपताच सुरू झालेल्या हळूवार थंडीत ख्रिस्तजन वसईकरांसोबतच ख्रिस्तेतर वसईकरांना प्रतिक्षा लागते नाताळाची....! वसई धर्मप्रांतातील वाडा-भिवंडी पासून ते वसई-पालघर, मोखाडा-विक्रमगड पर्यंतच्या सुमारे 45 धर्मग्रामामधून नाताळच्या महिनाभर आधीपासूनच ख्रिस्त जन्मउत्सवाचे वेध लागतात. घरा-घरात नाताळाच्या पूर्व तयारीला प्रारंभ होऊन जातो.

नाताळ हा सण अध्यात्म, भक्ती व श्रद्धेसोबतच आनंद, हर्ष आणि एकंदर जल्लोष घेऊन येणार असल्यामुळे त्यासाठी काऊंट डाऊन सुरू झाल्याचे चित्र वसईत उमटते. वसईत घरटी प्रत्येकी एकतरी व्यक्ती नोकरी-उद्योगानिमित्त परदेशात असून, तो वर्षातून एकदा नाताळात वसईत येतोच येतो. चर्च, घरे, वाड्या, गल्ल्या व तळे सजविण्याचे काम वेगाने सुरू होऊन ठिकठिकाणी नाताळ गोठे बनविण्याच्या कामावर लक्ष केंद्रित होते. यासाठी लागणाऱ्या वस्तूंनी वसई विरार परिसरातील बाजारपेठा सजतात, सर्वत्र नाताळ तयारीच्या वस्तू खरेदीची लगीनघाई सुरू होते. घरा-घरात फराळाच्या पक्वांनांची, केक बनविण्याची लगबग सुरू असते. सांताक्लॉजचे लहान-मोठे आणि देशी-परदेशी बनावटीचे रंगीबिरंगी बाहुले, ख्रिसमस-ट्री, जिंगल बेल, कागदी व प्लास्टिकच्या आणि लाकडी स्टार (चांदण्या), विविध स्वरूपातील चॉकलेट बॅगा, नाताळासाठी खास तयार केलेले म्युझिकल लाईट, टेबल क्लॉथ, ग्रिटींग कार्डस, डोअर-मॅट, वेलकम बॅनर, लाइटिंग-ट्री, स्नो इफेक्ट, ख्रिसमस ट्री, सिगिंग

अँड डान्सिंग कॅप, रंगीबेरंगी इकोफ्रेंडली कॅंडल्स व स्टार्स अशा शेकडो नाताळाच्या चीजवस्तूंनी गजबजलेल्या बाजारपेठा चित्तकर्षुन घेतात. एक उल्लासीत करणारे चैतन्यमय वातावरण सर्वत्र निर्माण झालेले बघावयास मिळते.

हे प्रतिबिंब मग हिंदू वस्त्या आणि हिंदू धर्मियांच्या जनजीवनावरही उमटल्या वाचून राहात नाही. दीनदयाल नगर येथील आमच्या हिंदू आणि काही मुस्लिम रहिवाश्यांच्या 'राम -रहीम पार्क' या सोसायटी मध्ये 80 पैकी दोनच सदस्य ख्रिस्ती आहेत. मात्र तरीही हिंदू बच्चे कंपनीच्या पुढाकारातून युवकांच्या साहाय्याने येथे दरवर्षी नाताळ गोठा सजविला जातो. असे अनेक ठिकाणी पाहायला मिळते. त्याच प्रमाणे वसईतील शिवसेनानेते श्री निलेश तेंडोलकर हे गेली काही वर्ष लाखो रुपयांची पारितोषिके ठेऊन, 'सर्वोत्कृष्ठ नाताळ गोठा'



*मुळात शिवसेना जातीवादी नाहीच, त्यामुळे आमच्या या स्पर्धा आयोजनाचे आश्च्यर्य वाटायला नको. वसईतील ख्रिस्ती बांधव हा एकेकाळचा आमचाच धर्मबंधू असून आज तो ख्रिस्ती असला, तरी त्याची नाळ संस्कृती आणि परंपरेने आमच्याशी घट्ट बांधली आहे. त्यामुळेच दसरा-दिवाळी असो की नाताळ किंवा चर्चेसचे सण असोत आम्हाला परस्परांशिवाय ते साजरे करायला गोडी वाटत नाही. नाताळ गोठ्यातून मोठ्या प्रमाणात सामाजिक जागृतीचे दर्शन घडत असल्याने प्रोत्साहन म्हणून ही स्पर्धा सुरु केली.*

*--- निलेश तेंडोलकर. जिल्हा उपप्रमख. शिवसेना*

स्पर्धा तालुकास्तरावर भरवीत आहेत. वैयक्तिक आणि मंडळ, तथा संघटना अश्या दुहेरी स्तरावर होणारी ही स्पर्धा त्यातील वाढत्या स्पर्धक सहभागामुळे वर्षागणिक लोकप्रिय होऊ लागली आहे. हिंदुत्वाचा कडवा पुरस्कार करणाऱ्या 'शिवसेने'तर्फे ती भरविल्या जात असल्याने सर्वत्र कुतूहलाचा विषय बनली आहे. तज्ज्ञ परीक्षकांद्वारे नाताळ गोठ्याचे मूल्यमापन करण्यात येऊन शिस्तशीर पद्धतीने विजेत्यांची पहिले पाच क्रमांक



*धर्मीय सलोखा आणि एकात्मतेचे संवर्धन होणारा वसई तालुका हा अखंड भारताची एक वैशिष्ट्यपूर्ण प्रतिकृती असून, देशात काही ठिकाणी जातीयवादाचे गालबोट लागत आले असले तरी येथे कायम मानवतेचा पुरस्कार विविध धर्मियांनी केलेला आहे. आप-आपले धर्म घराच्या चौकटीत जोपासून अन्य धर्माबद्दल अनेक राजकीय पक्षीयांनीही नेहमी सौहार्दता राखली आहे. हिंदू आणि ख्रिस्तजनातील मैत्री अबाधित ठेवण्यात या उभय धर्मातील धर्मीय नेत्यांचे योगदानही नाकारून चालणार नाही.*

*--- विजय पाटील, सचिव -महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी.*

काढले जातात. जाहीर कार्यक्रमातून त्यांचे मान्यवरांच्या हस्ते वितरण केले जाते.

वसईत हिंदू आणि ख्रिस्ती परिवारात झालेल्या अनेक प्रेमविवाहामुळेही हे परस्पर धर्मीय ऐक्य अधिक मजबूत झाल्याचे दिसून येते. मालजीपाडा येथील सामाजिक कार्यकर्ते, तथा प्रदेश काँग्रेसचे सचिव विजय पाटील यांचा 35 वर्षापूर्वी वसईच्या घोन्साल्वीस परिवारातील कन्या जुली (आताच्या सौ सुनीता ) यांच्याशी प्रेम विवाह झाला. तेव्हापासून पाटील आणि घोन्साल्वीस परिवार हिंदू आणि ख्रिस्ती असे उभय धर्मातील सण एकत्रित साजरे करीत आले आहेत. दिवाळीत घोन्साल्वीस कुटुंब पाटील यांच्याकडे, तर नाताळात पाटील परिवार घोन्साल्वीस यांच्याकडे असा सिलसिला 35 वर्षे अव्याहतपणे सुरु आहे. अशी वसईत अनेक उदाहरणे असून, या प्रेमवीरांनीही दिलेल्या योगदानातून येथील धार्मिक सलोखा टिकवून ठेवण्यास हातभार लावला आहे.

# माणसाच्या अभ्युदयाची आशा □एकमेव

-- सायमन मार्टिन. 9421549666

ती संध्याकाळ होती. हवेत सुखद गारवा होता पण वातावरण कुंद झालेलं होतं. तेथे जमलेल्यापैकी कुणाचही मन था□यावर नव्हतं. गुरूजी मात्र शांत होते. नंतर ते सारे एका मेजाभोवती जमले.ते सर्व मिळून बारा जण होते. निमित्त सहभोजनाचं होतं. कित्येक दिवस आणि रात्र ते सारे एकत्र एका गावातून दुस□या गावात□एका घरातून दुस□या घरात□एका माणसाकडून दुस□या माणसाकडे दुस□या माणसाकडे जात येत होते. तो सारा प्रवास जसा दुःख आणि अश्रुंनी भरलेला होता तसाच आनंददायी देखील होता कारण दुःखाच्या दरीत शोक करीत रडत असलेल्यांना त्यांनी कायम प्रथम पसंती दिली होती. शोकग्रस्त□वेदना भोगणारे□ठेचले गेलेले□साखळदंडात बांधलेल्यांची सुटका व्हावी□आंधळयांना पुन्हा दृष्टीचा लाभ व्हावा आणि सर्वांत अभिषेक झालेला होता. देवाचा आत्मा त्यांच्यावर उतरलेला होता म्हणूनच ते कायम चैतन्याने भरलेले होते.

आता वेळ येऊन ठेपलेली होती. एका महायज्ञाची अखेरची घटका जवळ आलेली होती. प्रभूला ठाऊक होतं की□शिष्य दुबळे आहेत. अजुनही ते चाचपडत आहेत. जे महानाट्य घडणार होतं ते समजून घेण्याची त्यांची कुवत नव्हती. प्रभूने त्यांना आधीच सांगून ठेवलेल की गव्हाचा दाणा जमिनीत पडला नाही□ तो मातीत कुजला नाही□तो रूजला नाही तर त्याला शंभरपट पीक कसं येईल□त्यासाठी प्राथमिक अट होती□ दाणा मातीत रूजत घालण्याची. तीच वेळ येऊन ठेपलेली होती म्हणून प्रभूने सर्वांना एकत्र केलेलं होतं. ही संध्याकाळ आभाराची होती.

त्याच महाभोजनापूर्वी त्याने घंगाळात पाणी घेतलं आपल्या आभाळ खांद्यावर रूमाल ठेवला आणि तो खाली वाकला. त्याने एक एक शिष्यांचे पाय धुवायला सुरूवात केली. प्रभूच्या ह्या कृतीने सर्वांना जबर धक्का बसला. ज्याचं स्थान हृदयात होतं□जो जिवनाचा स्वामी होता□जो साक्षात परमेश्वर होता□देहरूपी असला म्हणून काय झालं□जो चराचर व्यापून राहिलेला होता तोचं दयानंद□शिष्यांचे पाय धूत होता. शिष्य हवकून गेले. काय करायचं हे त्यांना क्षणभर सुचले नाही. हे काय करता प्रभूजी□आमची पात्रता नसताना तुम्ही आमचा स्वीकार केलात. त्यानंतर तुम्ही आम्हाला मित्र म्हणालात. आम्हाला आभाळ उंची दिलीत तुमचे आमच्यावर डोंगराएवढे उपकार असताना पुन्हा तुम्हीच आमचे पाय धुवावेत□डोळे भरून आले होते शिष्यांचे.

स्वामी असे का वागत आहेत□झालंय काय त्यांना□मानवी बुद्धी आणि आकलनाच्या पलीकडचं होतं प्रभूचं अस्तित्व आणि प्रभूची कृती. म्हणूनच प्रभू म्हणाला ही अत्यावश्यक कृती आहे. हा मैलाचा दगड आहे. तुमच्यातील कुणाला मोठं व्हायचं असेल तर त्याची सुरूवात म्हणून तुम्ही लहान झालं पाहिजे. प्रभूचा मार्ग वेगळा होता म्हणून तो म्हणतो तुमच्यामध्ये जो मोठा तो धाकट्यासारखा व जो पुढारी तो सेवा करणा□यासारखा असावा मोठा कोण□भोजनात बसणारा कि सेवा करणारा□भोजनास बसणारा की नाही□पण मी तर तुम्हामध्ये सेवा करणा□यासारखा आहे.

हा विचार दोन हजार वर्षापूर्वीच्या अत्यंत कर्मठ अशा बंदीस्त समाजपुढे प्रभूने ठेवला म्हणुनच त्याची परिणीती □सावरील मरणामध्ये झाली. एका अर्थाने ढोंगी आणि दुतोंडी समाजाला मारलेली ती चपकारच

होती. धर्माचे ठेकेदार कायम मानाच्या पहिल्या पंक्तीला बसायचे. सभास्थानात त्यांचा रूबाब वेगळाच असायचा. अवझड ओझे दीनदुबळयांच्या खांद्यावर टाकणाऱ्या ढोंगी पुजाऱ्यांना आजुबाजुला सुकाळच होता आणि येथे खुद्द प्रभूच सांगत होता तुम्ही माझ्याकडे या, मी तुम्हाला विसावा देईन. तुमचं आझं माझ्या खांद्यावर दया मी हमाल होऊन वाहून नेईन. आजपर्यंत असं आश्वासन देणारा कुणीच भेटलेला नव्हता. हे शब्द वेगळे होते ते काळजाच्या खोल कप्प्यातून आलेले होते त्या शब्दांना आसवंची किनार होती. दुखितांचा जडभारी क्रुस आपल्या खांद्यावर घेऊन प्राण सोडले ही किमया अनाकलनीयच होती.

प्रभूने एक कथा जमावाला ऐकवली होती. कोणाला खरा शेजारी म्हणायचं, आपला सोयरा कोण, खरा धार्मिक कोण, ह्या प्रश्नांच्या उत्तरासाठी प्रभूने एक नितांतसुंदर कथा ऐकवली.

पुजारी रस्त्यावरून जात होता तेव्हा रस्त्यात घायाळ माणूस शुद्ध हरवून पडला होता पण पुजारी त्याला ओलांडून पुढे गेला कारण त्याच्या पुजेचा मुहुर्त टळला असता पण त्याचं वेळेला गावतील दलित समाजातला एक रहिवासी जात होता. त्याने त्या जखमी थांबून त्याची

चौकशी केली. तो त्याला जवळच्या उतारशाळेत घेऊन गेला. त्याने त्याच्यावर उपचार करवून घेतले. त्यानंतर तो मार्गस्थ झाला, हे देखील सांगायला तो विसरला नाही की याच्या उपचारासाठी अजुन जो काही खर्च येईल तो मी पुन्हा येऊन देईन. उत्तम शमरोनी "गुड समारीटन" म्हणुन ती कथा जगप्रसिद्ध झाली, हाच विचार आहे आमच्या सेवेमागे आमची हौस म्हणुन, छंद म्हणून केवळ व्यवसाय म्हणुन आम्ही सेवा करीत नाही तर आम्ही करीत असलेली सेवा म्हणजे आमच्या आध्यात्माची अटळ फलश्रुती असते. जर तुम्हाला येशू भेटलेला असेल तर तुम्ही दुःखीताना, वंचिताना, शोक करणाऱ्यांना कष्टी आणि भाराक्रांत जनतेला ओलांडून पुढे जाऊच शकत नाही.

ख्रिस्ती धर्माने सेवेला स्वंस्थापक रूप दिलं. सेवेला सौंदर्याच्या कोंदणात बसवलं. त्या सेवेमधली आभाळमाया ही प्रभु येशु कडुन आलेली असते म्हणुनच तो आजारी माणूस म्हणतो की तुमच्या केवळ स्पर्शाने माझं दुख बरं होते कारण तो गुणकारी स्पर्श असतो. जगभरात आमचे हजारो बंधू भगिनीण आजारी, अंध, अपंग, विकलंगाची सेवा करीत आहेत कारण ती त्यांची पॅशन आहे. अनेकदा दुर्धर आजाऱ्यांची सेवा करावी तेवढयाच ममतेने ते घेतलेलं व्रत निभावून नेत असतात. मदर तेरेजांना एकदा कुणीतरी सांगितलं, मदर मला कुणी कोट्यवधी रूपये दिले तरी मी हे काम करणार नाही, मदर तात्काळ म्हणाल्या, होय मी देखील कोट्यवधी रूपये मिळाले तरी हे काम करणार नाही. हे काम मी करते तेव्हा मला त्या माणसात माझा येशू दिसतो.

येशूचं प्रेत मांडीवर येऊन त्याची आई बसलेली आहे. मायकल आंजेलोचं पिएता हे अजरामर शील्प आपण पाहतो तेव्हा आपल्या डोळयासमोर खेड्यापाड्यात, दुर्गम भागात गोरगरिबांची सेवा करणारी मंडळी येते. ते सारे येशूलाच पाहत असतात म्हणून आयुष्यभर आनंदाने, प्रेमाने आणि अतिव वात्सल्याने सेवा करीत असतात. येशू जिवंत ठेवण्याचा तोच एकमेव मार्ग असतो. आपल्या पलिकडे जाऊन विचार करणारी माणसं जगात नसतील तर जग म्हणजे शोक आणि दुःखाची बंदिशाळा झाली असती. आपल्या संभोवताली दुःख आहे वेदना आहेत परंतु आपल्या हाती रूमाल घेऊन अश्रु पुसणारे ख्रिस्त सेवक म्हणजे माणसांच्या अभ्युदयाची आशा आहे एकमेव.

# याद राखा

--- **वर्जेश ईश्वरलाल सोलंकी**

याद राखा.मुर्ख माणसांनो.

लुख्खा भगवानदासचा आवाज एकदम मस्त रंगात आलेला. पावशेर कामाला आलेली. अख्ख्या दिवसाचि रिश्रा बुक केलेली. रिक्षा गल्ली बोळातुन फिरत निघालेली.

पुन्हा तोच टीपेचा सुर कमावलेला.

आमचे नॉर्मस ठरलेले आहेत. हा केवायसीचा फॉर्म भरा. तुमचे सगळे नॉर्म भरा.तुमच्या खात्यात किती रकम जमा आहे ते जाहीर करा. तुमच्या फोन मधून कोणाला किती कॉल केले गेले ह्याची यादी द्या. आम्हाला पारदर्शकता आणायची आहे. दिवसभरात झालेल्या संभाषणाची लिखित स्वरुपतात माहिती द्या.

मधुनच कोणीतरी अडवुन विचारपुस करायचं. काय चाल्ल आहे हे लुख्खा भगवानदासला पाठ केलेले संवाद माहित होते. आपण काय बोलतोय कशाविषयी बोलतोय कुणाविषयी बोलतोय ह्याचं काहीही त्याला सोयरसुतक नव्हतं. आपला आवाज चांगला आहे. पहाडी कबाब खावुन, मस्त करारी झालेला आहे.

तळागाळातल्या माणसांपर्यतं आवाज पोहचला पाहिजे ह्याची सुपारी त्याला हायकमांडकडुन दिली गेलेली. काही मुठभर मुद्रा फेकल्या की असे लुख्खे भगवानदास पायलीला पन्नास हे अस्मादिकांना माहित होतं. खुप कुंथुन, कोठे काड्या टाकुन सोशल मिडियाचा बनावट व एक सध्याच्या भाषेत एका वर्च्युअल जगावर अधिराज्य गाजवुन ब—याच लोकांना बोलबच्चन करुन, गंडवुन, बनवुन त्यांच सरकार आलं होतं. एक मोकळा श्वास सोडला होता. झोपाळ्यावर मस्त रेलुन पुढची मांडणी काय करायची अशा स्वपनाच्या दुनियेत रमताना त्यांना खुप मजा येत चाललेली. दुनिया बनती है बनानेवाला चाहिये असा एक फिल्मी संवाद त्यांना आठवला.अब दुनिया की कोईभी ताकत हमे रोक नही सकती.

बहुमतात आल्याचा हा फायदा असतो. त्रिशंकु सरकार आलं की विरोधक साले टोचत राहतात. धम,क्या देतात. अेरेरावी करतात. जगु व मरु देत नाही,.फोडाफोडिचं राजकारण करतात.नशिब लोकांनी भरघोस मतं दिली. आपण जी काही संडासात बसुन कुंथलेली भाषणं पाठ केली ती कामाला आली. लोकं पण सज्जन व भोळी आहेत. मतदान करुन त्यांनी मालामाल केलं. आपल्या आव्हानाला मान दिला. ह्यावेळेला सगळे योग एकदम मस्त जुळुन आलेले. आपल्या मास्टर माईंड मुलतान का सुलतान ह्याने मस्त सगळी ठिकाणी सेटिंग लावलेली. घरोघरी माल रातोरात पोचता झालेला. बॅनर व होर्डींग, टीव्ही व वृत्तपत्रातल्या माध्यमांतुन आपली रखरखीत छबी झकासपणे मांडुन आपलाच पक्ष कसा काय विकासाचा महामेरु आहे हे पटवण्यात यश मिळवलेलं.सगळी माणसं आता आपल्या हाताशी आहेत. आपला शब्द झेलणारी मोठी फौज आहे.जिथे नजर फिरवु ती जागा आता आपली आहे. ज्यावर जीभ फिरवु तो जिन्नस आता आपला आहे.  आता कोण विरोधक नाहीत ह्या जाणिवेची लहर हिरव्या गार लॉनवरुन चालताना उमटुन गेली.

बायकोला बोलु मस्त चहा बनव. फस्टक्लास. लालदिव्याची गाडी गांडीखाली असली म्हणजे ॲम्बुलंस सारखीच तिला ट्रीटमेंन्ट.मागे पुढे आता आपल्या सगळा सरकारी लवाजमा. सरकार आल्यावर अशा गमतीजमती असतात व त्या आनंदाने अनुभवयाच्या ह्या जाणीवेची एक मस्त कलरफुल कारंजी बायकोच्या हातचा गरमागरम चहा घेताना हा चहा व ही वेळ पुढे सरकुच नये असं त्यांना वाटत राहिलेलं.

एकदा सरकार आल म्हणजे कस काय फ्री ऑफ कॉस्ट असत. कार्यालय घ्यायची झंझट नाही, निवासस्थानामागे पळण्याची गरज नाही. सबसिड्या झुकुन सलाम करत असतात.इतकी वर्षे साला खिषातुनच माल जात होता. आता सहजपणे दुस-याच्या खिषात हात टाकुन दिवाळी साजरी करण्याची संधी आपल्या गुरुजींनी दिलेली आहे. आपल्या गुरुवर्यांना आणून थोडं शुर्चिभुत करुन घ्या असा त्यांच्या कुंकवाने आदेश देताच तस फर्मानही निघालं.गोमुत्राने अख्खं कार्यालय धुवून काढलं व कुलदेवतेची मूर्ती ठेवुन पन्नास ब्राम्हणांच्या हस्ते पुजा करुन घेतल्यानंतर त्यांच्या मंगलसुत्राने श्वास सोडला.

अजब तुझे सरकार हे कुठेतरी वाचल होत त्याचा असा प्रत्ययही आला.

लुख्खा भगवानदासला मात्र कंत्राट मिळालं होतं. त्याचा वारु जोरदार उधळलेला.नव्या सरकारचे नवे मनसुबे होते नवे आदेश होते. त्याची अंमलबजावणी होती. देशविदेशातुन माणसं बोलावुन येथल्या मळक्या कपड्याच्या लोकांतून, पडकी छप्पर दाखवुन, बंजर झालेल्या जमिनीची धूळ त्यांच्या नाकातोंडात घालुन हरी हरी वसुंधरा पे निला निला ये गगन असं गाणं ऐकवुन त्यांच्याकडुन ब-यापैकी फंड व लाल गाजर व टमाटर त्यांनी दाखवलेला. त्यांच्या तोंडातुन पण लाळेचा एक मस्त थेंब टपकलेला.

हे तुमचे बटाटवडे काढा येथून.

ही तुमची मिसळ शेपाटा हिला येथून

ही तुमची भेळ पळवा हिला येथून

हा तुमचा झुणका भाकर आग लावा त्याला

उद्यापासून आमचा पिझ्झा बर्गर येणार आहे

परवा पासून पोटॅटो चिप्स येणार आहे विथ कोक

आमच्या सीलबंद पॅकेटसाठी रेड कारपेट घालून ठेवा

ह्या तुमच्या चीज वस्तूचे जाहिरातीचे फलक फाडून टाका दोन दिवसात

उद्या आमच्या मालाची जाहीरात येणार आहे सगळया चॅनलमधून

ही तुमची लुगडीफुगडी धोतरबितर बुशर्ट फेटाबिटा पादुकाबिदुका चालणार नाहीत. असे घालून रस्त्यावर फिरलात तर शेंडा धरु तुमचा. दिसाल तेथे बुकलून काढू.

रोज नव्या फॅशनचे सेल लागणार आहेत तुमच्या गावगल्लीत

फुटपाथवर बसून मालाची ओरडाओरडी करुन माल विकणे बंद करा.

गाव गाव म्हणून तुणतुण वाजवू नका.

उद्यापासून भव्य सेल लागणार आहे आमच्या चीज वस्तूंचा तोही ऑनलाईन

काय असत हे ऑनलाईन  मध्येच कुणीतरी विचारलं लुख्खा भगवानभायला ते काय माहित नव्हतं. त्याने संवाद काल आरशासमोर पाठ केलेले. सकाळी शौचाला बसुन मनातल्यामनात त्याची घोकमपट्टी केलेली. लाईन त्याला माहित होती. ऑन बद्दल त्यालाही संभ्रम होता. त्याचा मतलब काय ह्याच्याशी त्याला देणघेन नव्हतं. आपला आवाज मस्त टिपेला जावुन झोपलेले बाळ पण उठलं गेलं पाहिजे एवढच त्याला माहित होतं. पुन्हा समोरच्यानं विचारल. काय हे ऑनलाईन. स्वातंत्र्याला दहा शतके उलटुन गेली तरी गाव हे गाव होतं. गावात अनेक सुविधा यायच्या बाकी होत्या. गाव गावासारखच राहायला पाहिजे. खेडुत खेडुतच असला पाहिजे. त्याला जास्त शिकवुन काही मतलब नव्हतं. त्याच्या अडाणीपणातच फायदा होता

ह्याआधी बरीच सरकार येवुन गेलेली.स्वातंत्र्य हा शब्द अगदि चावुन चोथा झालेला. जेजे गादीवर आले त्यांनी, त्यांच्या नातलग सगेसंबंधित,मित्रांनी  मिळून मस्त चमचमीत जेवण, जमीनजुमला वर ताव मारलेला.सगळे रस्ते, शाळा, संस्था, अकादम्या ह्यांना आपापल्या बापाची नावे टाकुन मोकळी झालेली.  झाडे कापुन नेलेली. डोंगर सपाट केलेला. नद्यांची कमर बारीक करुन नाल्यांचे पोट वाढवलेले.ज्याला ज्याला जसजस जमेल तसं त्याने घाईने ओरपाओरपी केलेली.

च्यामारी आपल्याला काय करायचय डोकं खाजवुन. मेंदुच्या तारा लाल करुन. आहे आहे बाबा सगळ. ऑनलाईन होणार आहे. लोकांच्या प्रश्नांना उत्तरे देवुन त्याचा जीव कातावुन जायचा. पण काय करणार गंदा है लेकिन धंदा है ये.

सगळ्यांनी घेतलं म्हणुन लुखखा भगवानदास ने पण जुजबी शिक्षण घेवुन जुजबी पोटापुरता पगार असलेली नोकरी मिळवलेली. नोकरीशिवाय गत्यंतरच नव्हतं. गावात शेतीशिवाय उत्पन्नाची साधनं नव्हती. मात्र शेतीचीही काही धडगत नव्हती. कामाला जायच म्हणजे शहर गाठावं लागायचं. शहर गाठायचं म्हणजे गांडीचे टाके ढिले व्हायचे. त्याशिवाय पर्याय नव्हता. कशाबशा लागलेल्या नोकरीत  मालाला उठाव कमी झाल्यामुळे कंपनी काही वर्षानंतर बंद पडली. उपासमारीची वेळ सुरु झाली. अशातच त्याला त्याच्या आवाजाने साथ दिला. कुठेकुठे निवेदन कर, लग्नसराईत फिल्मी सितारेंचे आवाज काढ, मय्यतमातममध्ये भजनकीर्तन झोड अस करुन उदरनिर्वाह करताना. राजकीय लोकांच्या पत्रावळी उचलण्याच काम त्याला मिळालेलं. त्यातुन ब-यापैकी कमाई व्हायची.

पुन्हा त्याने भोँगा तोंडाला लावलेला.

रेशनची  नो लाईन,

तिकिटासाठि नो लाईन,

पेन्शसाठी नो लाईन,

ॲडमिशनसाठी नो लाईन,

बसथांब्यावर नो लाईन,

देवळाच्या बाहेर, देवळाच्या आत नो लाईन,

लघवीसाठी नो लाईन

वीज बिल भरण्यासाठी नो लाईन

तहसिलदाराच्या कचेरीसमोर नो लाईन

सायबाच्या केबिन पुढ्यात नो लाईन

समजेल तुम्हाला डेबिट क्रेडिट कार्ड, इंटरनेट बॅकिंग,विजा कार्ड, रुपे कार्ड ,आयएमपीएस, कॅश कार्ड इ-वॉलेट नवे युग अवतरणार आहे.

पुन्हा कोणीतरी म्हणालं रेशन कार्ड हाय आमच्याकडे केसरी.

रेशनकार्डला कोन विचारते ते तर बंगाली लोकांकडे दोन दोन आहे. युपीवाल्याकडे चार चार आहेत.वोटींग कार्ड दोनदोन आहेत.

आता मेक इन इंडिया चालु आहे.सगळं मस्त मस्त होणार आहे. आधुनिक प्रणाली येणार आहे.

अच्छे दिन येणार आहेत.

आता बैलगाडी, औत, नांगर, जात, गावगाडा, चावड्या, चौक, गल्ृया मोहल्ले , कौलारु घरे, पडिक जमिन विसरायच. रिक्षा टमटम सगळ जुनाट विसरायचं.

गाव आता स्मार्ट सिटी होणार आहे.

लाल रंगाची बस, त्यामागुन उडणारा धुराळा, छप्पर नसलेलं स्टॅाप, पानाच्या टप-या, खाडखुड रस्ते, दुतर्फा करुन असेलेली झाड. क्षितिजापर्यंत पसरलेली शेतीभाती, आता गावात तुमच्या बुलेट ट्रेन येणार आहे. बुलेट लाईट येणार आहे.आरामदायी बस येणार आहे. गावगल्लीतून मेट्रो ट्रेन धावणार आहे. आहात कुठे तुम्ही राव. आहात कुठे तुम्ही रंगीत रंगीत टीव्हीमधुन रंगीतरंगीत जाहिराती आता पाहायच्या. मिक्सर ग्राईंडर मधुन मस्त डोसा इडलीचं पीठ बनवायचं. पीठाच्या गिरण्या बंद. आता रेडीमेड आटा येणार आहे, पाईपातून गॅस व दूध मिळणार आहे,. प्लास्टीक बंदी होणार आहे. पुन्हा खादी युग येणार आहे. ओट्याबर बसायच व मस्त सुत कातायचं. खादीला जाम डिमांड आहे. बाहेरच्या देशात जाम मागणी आहे.

लुख्खा भगवान भायला जे आठवत होत तसं तो पोपटासारखा बोलत सुटलेला. बोलताना त्याला पण मस्त वाटत होतं. काही माणसांना पटवण्यात त्याला यश येत होतं. यश येवो कि न येवो आपल्याला आपली बिदागी मिळायला हवी. गावाचा काहीही सत्यानाश होवो आपल्या खिशात दिडक्या यायला हव्या ह्या मताचा तो आता बनला होता.कधीकाळी तोही संवेदनशील होता. कुठेकाही दुखलखुपल तर काळजात चर्र व्हायचं लेकिन हालातने उसे एकदम निगरगट्ट बना दिया. काळानेच त्याला ह्या वेशीवर आणुन ठेवलेल होतं. कोणी जीवजग्या म्हटलं किंवा अस्मादिकांचा लंगोटी म्हटलं तरि त्याला काही फरक पडणार नव्हता.

नवीन सरकार एकदम जोशात होतं. काय करु व  काय नको करु असं झालेलं. दहा वेळा एकाच विषयात आपटी खाल्ल्यावर पास झालेल्या विद्यार्थ्यासारखी नव्या सरकारची अवस्था झालेली.

पास होण्याचा आनंद गगनात मावेनासा झालेला.

ह्याच आनंदाच विरजण पडलं झालं काय त्यांचं मंगळसुत्र हलवाईच्या दुकानात कंदी पेडे घ्यायला गेलं तर हलवाई शभर रुपयाची  नोट हवेत नाचवुन बोल्ला ताईसाहेब  ही तर जाली आहे. बघा ह्यावर गांधीबाबाच्या चेह-यावर चष्माच नाही. खरं होतं मंगलसुत्रानं दहावेळा नोट पाहिली पन्नास वेळा गांधीबाबाचा फोटो पाहिला चष्मा नव्हता. दुस-या एका नोटावर चष्मा होता. तिच्या मेंदुच्या तारा तणतणतल्या एकदम तारक मेहता.तातडीने घरी येवुन त्यांनी अस्मादिकांना ही बाब लक्षात आणुन दिली. ये बात है. हमारे रामराज्य मे ऐसी बात.त्वरीत त्यांनी लुख्खा भगवानदासला बोलावुन घेतल व गावगल्लीत दवंडी पिटवायला सांगितली की उद्यापासुन शंभरची नोट ही व्यवहारातुन बाद होईल म्हणुन. एक सप्ताहाच्या मुदतीत नोट बॅन्केत जमा झाली पाहिजे नाहीतर सदर व्यक्तीवर कारवाई केली जाईल असे फर्मान निघाले. बायकोच्या डोळयात आलेली आसवे अस्मादिकांना पाहवत नव्हती. ही जाली नोट आली कुठुन.

लुख्खा भगवानदासला ह्यामुळे काही फरक पडणार नव्हता. त्याने खिसे, आईने डबे झाडुन पाहिले शंभरची काय तर दहाची नोट नव्हती. त्याने नसबंदी ऐकली होती. दारुबंदी ऐकली होती. नोटबंदी हे काय रामायण आहे समजायला मार्ग नव्हता.

सगळीकडे हाहाकार उडाला. बातमी गावाच्या कान्याकोप-यात गेली. दोन दिवसात नोटा बॅन्केत जमा झाल्या पाहिजेत नाहीतर संबंधित व्यक्तींवर कार्यवाही केली जाईल. अस्मादिकांच्या मंगलसुत्राला शंभरची जाली नोट पाहुन रात्री झोप आली नाही. कुणा टवळयाने आपल्या हातात टेकवली ह्यावर विचार करुन मेंदुचा भुक्का व्हायचा बाकी होता.नोटा बॅन्केत जमा करण्यासाठी लोकांची बॅन्केसमोर मोठी लाईन लागलेली. एरवी कधी न दिसुन येणारी सामान्य माणसं नोटांची पुंडकी घेवुन उभी राहताना लुख्खा भगवानदासला मजा आली. बॅन्केत नोटाच नव्हत्या. नव्या नोटा छापण्यासाठी यंत्रणा नव्हती. कागद नव्हता, शाई नव्हती. अस्मादिकांनी घाईघाईने भावनेच्या भरात निर्णय घेतलेला.निर्णय माघारी घ्यावा तर घरात मंगलसुत्राच्या डोळयांच्या मोठ्या दहशतीचा सामना असायचा.

लुख्खाने अशा गोष्टी सिरियस घेण्याचं काहीच काम नव्हतं. अशा घटना घडल्या तरच त्याला काम मिळणार होतं. त्याच्या पोटाचं घोडं पुढे दामटणार होतं. त्याला नोटाबंदी प्रकार मस्त मस्त वाटला. आपल्या गावात एवढी माणसं राहतात पाहुन त्याला खरेच वाटेना.

खोटया नोटांचा साठा शोधणयासाठी मोठी कुमक लावली गेली. खोटया नोटा शोधताना ख-याच नोटा हातात येत होत्या. गादीखाली, पाण्याच्या टाकीत, भिंतीत, गोदड्या चादरीत, शौचालयात, विहीरीत, शेताच्या जमीनीत, नोटाच नोटा मिळाल्याच्या पाहुन लुक्काभाई एकदम घामाघुम होवुन गेलेला. दरिद्रि आटपाट नगरात मुद्रांचा इतका संचय पाहुन तो टरकुनच गेलेला.

खोटी नोट तर काही मिळालेली नव्हती मात्र ख-या नोटाचा पर्दाफाश झाला होता.

लुक्काने पुन्हा माइक तोडाला लावला.

# बाबु मावशाय

**--- प्रा. नेहा सावंत, दहिसर**

समर्थ रामदास जर आमच्या बाबूला भेटले असते तर निश्चितच त्यांना ‘जगी सर्व सुखी असा कोण आहे’ हा श्लोक किंवा हा प्रश्न सुचलाच नसता.  कारण जगातला सर्वात सुखी माणुस म्हणजे आमचा बाबू याची साक्ष त्यांना निश्चितच पटली असती. आमचा बाबू म्हटल्यावर डोळ्यासमोर एखाद्या पोरसवद्या तरूणाची किंवा अगदी आठ दहा वर्षाच्या पोराची प्रतिमा उभी राहते. पण हा बाबू आहे पार साठी गाठलेला. ‘साठी’ गाठली असली तरी त्याची बुद्धी ‘नाठी’ नाही हे त्याच्याशी बोलताक्षणी लक्षात येतं. बाबूने साठी गाठली असली तरी त्याचं राहणं, वावरणं अगदी चाळीशीच्या उमद्या तरूणाला लाजवेल असंच. आपण साठीत आहोत हे मानायला त्याचे पाय आणि मन अजिबात तयार नाहीत. तरूण मुली, बायका आपलं वय लपविण्यात जितक्या माहीर असतात त्यापेक्षा कित्येक पटीने आमचा बाबू माहीर आहे.  आज कित्येक वर्षापासून पंचक्रोशीत तो बाबू म्हणूनच परिचित आहे आणि याचा खरंतर त्याला संकोच नव्हे चीडच आहे. जुन्या काळातल्या चित्रपट अभिनेत्याचं ‘दिलीप’ असं सुंदर नाव पाळण्यात ठेवलेलं असतानाही, सगळे ‘बाबू‘ म्हणतात या गोष्टीने त्याच्या कपाळावर कायम एक आठी कोरलेली आहे. उंदरासारख्या बारीक डोळ्यातून आणि खालचा ओठ तिरप्या बाजूला मुडपून चावत राहण्यातून तो आपली नाराजी किंवा राग व्यक्त करत असतो. बाबू हा त्याच्या आईचा विशेष लाडका. म्हणून ती त्याला बाबू, बाब्या लाडाने म्हणायची. तेच नाव सर्वमुखी झालं. बाबूच्या आईला सगळेच मावशी म्हणायचे म्हणून ‘मावशीचा बाबू’ ही त्याची ओळख तयार झाली.

बाबूने साठी पार केली असली तरी मनाने आणि बाहयांगाने आपण तरूणच आहोत हे भासविण्यात तो कमालीचा यशस्वी झालाय. वयानुसार डोक्यावर पडत जाणारं टक्कल दिसू नये म्हणून डोक्यावर देव आनंद किंवा राजेश खन्ना स्टाईल टोपी घालून घरातही वावरणार. त्या टोपीने कधी साबणा, पाण्याचा स्पर्श अनुभवला की नाही कोण जाणे! तेलकट तवंगाची, मूळ रंग-रूप हरवून बसलेली टोपी जेव्हा बाबू डोक्यावर परिधान करतो, तेव्हाची ती स्टाईल पाहून देव आनंद आणि राजेश खन्नाही निश्चितच संकोचले असते. ओठांवरच्या बारीक, कोरीव तलवारकट मिशांना तितकीच रेखीव काळी पेन्सिल ओढणारा बाबू टोपीखाली झाकले गेलेले आणि मानेवर रूळणारे तुरळक केसही औषधालाही पांढरे न दिसणारे.  गळयाखालच्या सुरकुत्या झाकण्यासाठी देव आनंद छाप बंद गळ्याचे फुल हातांचे शर्ट घालणारा किंवा अलपचिनो या हिरोप्रमाणे अंगात टिशर्ट किंवा जर्सी घालून त्यावर शर्ट चढविणारा. टिशर्टवर दिसेल अशी एखादी स्टीलची चैन गळयात घालणारा किंवा गळयाबरोबरच काळया दोऱ्याचा गोफ घालणारा आमचा बाबू, रस्त्यातून चालताना आपल्याच नादात गुंग होऊन, एखाद्याा हिरोलाही लाजविल अशा आत्मविश्वासाने दमदार पावलं टाकीत जणू त्याच्या मनातलं चंदेरी विश्वच पादाक्रांत करीत असतो.

'बाबू' म्हणजे सगळयांनाच एक न उकललेलं कोडं आहे. तो कोणता कामधंदा करतो? दिवसभर नेमका कुठे जातो? उदरनिर्वाह कसा चालवतो? हे प्रश्न बाबूपेक्षा इतरांनाच कायम पडलेले असतात. नाही म्हणायला अनेक वर्षापूर्वी त्याचा रत्नागिरी एस.टी. स्टॅण्डजवळ एक पेपरस्टॉल होता म्हणे. त्यामुळे वर्तमानपत्रातल्या 'बातम्या' हेच त्याचं चुरचुरीत खाद्य होतं. 'वर्तमानपत्राचं विश्व' हेच त्याचं मनोविश्व होतं. तसा तो पूर्वीपासुनच मितभाषी. काहीसा एकटा एकटा, बुजल्यासारखा राहणारा. घरात चार बहिणी, तीन भाऊ. पण हा त्यांच्या अध्यात ना मध्यात. दिवसभर पेपरस्टॉलच्या निमित्ताने घराबाहेरच. एकटेपणातून रमण्यासाठी चित्रपट पाहणं हा त्याचा विरंगुळा होता. स्टॉलवरही वर्तमानपत्रांबरोबर मासिकं, साप्ताहिकं असायची. चित्रपटविषयक मासिकं. साप्ताहिकं वाचुन वाचून तेच विश्व आणि चंदेरी विश्वातली माणसेच त्याला आपली वाटत होती. बऱ्यापैकी पैसे कमावत होता त्यामुळे कसलीही ददात नव्हती. 'एकटा जीव सदाशिव' म्हणत आयुष्य मस्त मजेत जगत होता.

काही वर्षानी काही अपरिहार्य कारणामुळे पेपरस्टॉल बंद झाला. दुसरीकडे प्रयत्न करूनही जागा मिळाली नाही किंवा भागिदाराशी पटलं नाही म्हणा, त्याचा धंदाच बंद झाला. घरात तिघी बहिणी कमावत्या होत्या, आईला पेन्शन मिळत होती वडिलांची, त्यामुळे दोन वेळच्या जेवणाचा प्रश्न त्याला पडत नव्हता. एव्हाना फक्त जेवणापुरतं घरात येण्याचं त्याच्या अंगवळणी पडून गेलं होतं. घरातल्या विश्वात त्याचं मन कधीच रमलं नव्हतं. मनोविश्व तेच होतं 'चंदेरी दुनियेच'. काही वर्षे स्वतःचा पेपरविक्रीचा छोटासा का होईना व्यवसाय केल्यामुळे दुसऱ्याकडे चाकरी करणं त्याला जमणारं नव्हतं, त्याच्या स्वभावाला रुचणारं नव्हतं. त्यामुळे दुसरा कुठलाही किडूक-मिडूक कामधंदा त्याने केलाच नाही. नाही म्हणायला कसा, कोण जाणे पण 'ड्रायव्हिंग' मात्र शिकला. त्याच्या 'चंदेरी विश्वाचा' अपरिहार्य भाग म्हणून असेल किंवा मनातल्या मनात तो 'स्टारडम'मध्ये जगत असल्यामुळे असेल 'ड्रायव्हिंग' शिकला पण ते क्षेत्रही त्याने व्यवसाय म्हणून स्वीकारलंच नाही. आई आणि बहिणींमुळे जेवणाची भ्रांत मिटली होती. घरात तीन बायका आणि हा एकटा 'पुरुष' त्यामुळे काहीही न करताही कर्तेपणाचा मान त्याला आपसुक मिळतच होता. पोरींची लग्नं झाल्यावर हा पोरच आपल्याला बघेल म्हणून आईचीही त्याच्यावर विशेष मर्जी. शिवाय दारु, सिगारेटचं काय पण सुपारीच्या खांडाचंही व्यसन त्याला नाही या कौतुकापोटी त्याच्या सिनेमा बघण्याच्या व्यसनाला आई हातावर पैसे टेकवायची. बाबूच्या मनातल्या 'बातम्यांच्या विश्वाला' चित्रपटाच्या विश्वाची चंदेरी सोनेरी झळाळी लाभत होती. घरात अठराविश्वे अंधार होता. गावात सर्वत्र वीज आली होती पण बाबूच्या घरात अजूनही 'चिमण्यांचा' आणि कंदिलाचा मिणमिणता प्रकाश होता. वीजेवाचून त्यांचं कुणाचं काहीही अडत नव्हतं. बाबूचं तर अजिबातच नाही. कारण घरात वीज नसली, तरी तो मात्र वावरायचा चंदेरी दुनियेच्या लखलखाटात आणि झगमगाटात. घरात आईच्या थकत जाणाऱ्या प्रकृतीपेक्षा त्याला कौतुक असायचं. 'हेमामालिनी यवढी पन्नाशी उलटुन गेली तरी बांधा काय टिकवलाय तिनं ऽ?' किंवा घरात दोन तरण्याताठ्या बहिणींची लग्नं बाकी असताना ह्याला काळजी असायची चित्रपट तारका रेखाच्या लग्नाची. 'यवढी तीन तीन लग्नं करुन पण नवरा काय टिकवता आला नाय, पुन्हा लग्नं नाय केलंन नां तिनं ऽ ऽ?'. घरातल्या 'चिल्लर' प्रश्नांपेक्षा चित्रपट दुनियेतल्या 'यक्ष' प्रश्नांवर तो विचार करत बसायचा.

पुढे एका धाकट्या बहिणीचं लग्न झालं, नंतर आईचंही निधन झालं. राहता राहिली दोघंच जणं. बाबू आणि त्याची धाकटी बहीण. आईला मिळणारी पेन्शन बंद झाली होती. तरीही बाबूला कसलीच चिंता नव्हती. तो होता तसाच मस्तमौला. 'चंद्रमौळी' घरात बहीण-भाऊच एकमेकांना आधार. त्यांच्या घराला 'चंद्रमौळी' तरी म्हणावं का? असा प्रश्न बघणाऱ्याला पडावा. कधीही, कोणत्याही क्षणी कोसळून पडेल अशी त्या घराची अवस्था. मातीच्या भिंतीवर उभारलेल्या त्या घरावर चुलवणाच्या काळ्या पापुद्र्यांचा गिलावा तयार झालेल्या, तुटक्या फुटक्या कौलांवर टाकलेल्या प्लास्टिकचा रंगही उडून गेलेला. घराला जिथे तिथे 'टेकू' दिलेला. कित्येक वर्षात रंगाचा किंवा सडा सारवणाचा गिलावाही स्पर्शीलेला नव्हता त्या घरानं. तुकोबांनी म्हटलयं ना 'महापुरे झाडे जाती | तेथे लव्हाळे वाचती' तशी गत या घराची आणि घरातल्या चिवट माणसांची. रत्नागिरीत अनेकदा पुरसदृश स्थिती आली. भले मोठे वृक्ष, भली मोठी घरं कोसळली पण बाबूचं घर मात्र शाबूत. कदाचित त्या पावसालाही वाटत असावं, आधीच पडझड झालेल्या घराची मी काय पडझड करणार ? आणि केली तरी लव्हाळी कशी भर ओसरताच पुन्हा तरारुन उठतात व्हीवतपणे, तशीच घरातली ही माणसं कुणाच्याही आधाराशिवाय तरारुन उठतीलच. बाबूच्या या घरात माणसांचा वावर कमी पण उंदीर, झुरळे, पाली आणि बेडूक यांचा मात्र मुक्त संचार. बाबूला याची फिकीर नाही. त्याच्या दृष्टीने घर भरलेलं आहे आणि आम्हीही काही उपाशी नाही. मजेत आओत असा आविर्भाव. ही स्थितप्रज्ञता, ही आत्मसंतुष्टी त्याच्याकडं कुठून आली असावी? असा प्रश्न समर्थ रामदासांनाही नक्कीच पडला असता.

'बाबू'सारखा कर्ता भाऊ आपलं रक्षण करतोय, आपला सांभाळ करतोय या जाणिवेपोटी धाकटी बहीण दुकानात काम करू लागली. बहिणीच्या अंगात हुशारी यावी, चलाखी यावी म्हणून तिला काम करायला पाठवतोय हा बाबूचं आविर्भाव. नये म्हणायला 'तिला काय जमणार' असं म्हणत सकाळीच उठून सुबक अशा गोलाकार चपात्यांची दिवसभराची चवड एकदाच भाजून ठेवायचा. वाटणाधाटणाची मसालेदार भाजी करून ठेवायचा. आणि बहिणीचा डबा भरून द्यायचा. मग त्याच्या दिवसाला सुरुवात व्हायची.

सकाळीच चहा खाणं करून घरातून निघाल्यावर पायपीट करत रत्नागिरीतल्या झाडून साऱ्या लायब्ऱ्यांचे उंबरे तो झिजवायचा. त्याच्या मनातल्या विश्वाला खतपाणी घालणारं खूप काही त्याला इथे गवसायचं. त्याच्या शिडशिडीत शरीरयष्टीचं रहस्य वाचनालयाच्या पायपिटीत दडलेलं असतं. दिवसभर 'फुकटात' वाचायला मिळतं, कुणाशी बोलावं लागत नाही की कुणाकडे बघावंही लागत नाही हा त्याच्या दृष्टीने सुखाचा भाग असतो. शिवाय पार संध्याकाळपर्यंत डोक्यावर पंखे आणि ट्यूबलाईटचा लख्ख प्रकाश फुकटात त्याला मिळायचा. संध्याकाळी मग घरातलं तमोयुग. एखाद्या क्रीडा समालोचकाकडे जशी क्रीडा जगताची आणि त्यातल्या रेकोर्ड्सची इत्यंभूत माहिती असते तशी इत्यंभूत नोंद बाबूकडे चंदेरी दुनियेतिल घडामोडींची असते. त्याला एकवेळ रत्नागिरीत किंवा गावात, अगदी शेजारी पाजारी घडणाऱ्या घटनांची माहिती नसेल पण पाली हिलवर राहणाऱ्या सलमान, आमिरखानची मात्र पूर्ण खबर असते. किंबहुना मुंबईतल्या त्याच्या नातेवाईकांना चित्रतारकांची खबरबात लागण्याधीच ती बातमी बाबूकडे रवाना झालेली असते. कधीतरी सहज चौकशीसाठी म्हणून बाबू मुंबईतल्या नातेवाईकांना, तेही चित्रपटसृष्टीतच काम करणाऱ्या

माझ्यासारखीला फोन करतो. पण आपण ख्यालीखुशालीसाठी फोन केलाय हीच गोष्ट तो विसरतो आणि शिरतो त्याच्या ‘चित्रविश्वात’. खरतर नवीन खाद्य मिळवण्यासाठी तो फोन करतो.

“काय, बरायना सगळं”

“हो मज्जेत, तुम्ही ठीक आहात ना”

विचारलेल्या प्रश्नाला बगल देऊन “मग इशा देओलचं लग्न झालं ना”

“अस्सं, काही कल्पना नाही बुवा”

“काय, मुंबईत राहून यवढं पण नाय कळलं, हेमामालिनीने एकट्याने भर सांभाळलान हो लग्नाचा, आणि गम्मत म्हायताय का? धर्मेंद्राला कुणी विचारलंच नाय”

त्याचं हे बोलणं ऐकून क्षणभर विचारवसं मनात येतं, “तू गेला होतास का लग्नाला?”पण संवादाला तिथेच खीळ बसेल आणि त्याच्याकडून पुढील ‘रंगीत बातम्या’ ऐकायला मिळणार नाहीत या विचाराने मी फक्त श्रोत्याचीच भूमिका बजावते. ती क्षणाची शांतताही त्याला असहय होते आणि पुढची सविस्तर बातमी तो देतो.

”मग, आयशीनं कसा टिकवलाय बांधा अजून, डान्स पण करते ती अजून, पोरींना हे काय पण अजून जमलं नाय”

“म्हणजे, कुणाबद्दल बोलतोएस तू, बाबू?” माझ्या मनातला संभ्रम अजूनही सुटलेला नसतो.

“अगं, हेमामालिनीबद्दल बोलतोय ना मी, यवढी सासू झाली पण पोरींसारखीच तरुण दिसते नव्हे?”

“अच्छा, अच्छा”

“मग इशाला पिक्चरमध्ये घालून बगितलाव, पण तिकडे काय चालत नाय म्हटल्यावर दिलान लगीन लावून” खास रत्नागिरी हेल काढत तो बोलतो.

“बाबू, बारी तुला सगळी माहिती मिळते रे, गावी बसून”

विषयांतर करण्याच्या हेतूने तब्बेतीची व इतर विचारपूस करता त्याच्याकडे जवळ जवळ दुर्लक्ष आणि नवीन काय बातमी विचारली तर डिंपलच्या पोरीने बिझनेस खोलल्याची माहिती मिळते, जॅकी श्रोफ चांगला मराठी बोलतो, त्याला चटणीभाकरी आवडते, त्याचा मुलगा हीरो होतोय.. धर्मेंद्रची दोन्ही मुलं हीरो झाली, मोठयाने त्याची गाडी चालवली, त्याचे दोन संसार... ही सगळी माहिती देताना स्वत:चं घर, लग्न याला हेतुपूरस्पर बगल देतो. चाळीशीला आलेल्या बहिणीच्या लग्नाची त्याला तमा नसते. स्वत:चा प्रेमभंग विसरून ‘एकटा जीव सदाशिव” व्रत त्याने अंगिकारलेलं असतं.

असा हा बाबू. सगळ्यांचाच बाबू, त्याचं खरं नावही आता कुणाला आठवत नाही. प्राप्त परिस्थितीला निमूट स्वीकारणारा बाबू. घरात धुराची काजळी आणि काळोखाची छाया असूनही चंदेरी दुनियेच्या झगमगाटी श्रीमंत वातावरणातच रमणारा, चंदेरी दुंनियेची इत्यंभूत खबर ठेवणारा पण चंदेरी दुनियेला मात्र “बाबू मोशाय” माहिती. आमच्या “बाबू मावशाय”चा कुणालाच थांगपत्ता नाही. त्याची बाबूला फिकिरही नाही. आपल्या आयुष्यातले ताणतणाव विसरायचे तर या “बाबू मावशाय” चा सुखाचा मंत्र आपल्याला जगता आला पाहिजे.

# परिसंवाद

*प्रिय वाचक मित्र-मैत्रिणींनो, आमचा वसईकर ख्रिस्ती समाज सध्या शिक्षणामध्ये खूप अग्रेसर आहे पण तितकाच तो प्रशासकीय सेवेबद्दल उदासीन आहे. या समाजातून अजूनही एकही आयपीएस वा आयएएस झालेला नाही. या परिसंवादाद्वारे या मागची कारणे जाणून घेण्याचा प्रयत्न आहे. सदर परिसंवादात प्रशासकीय सेवेतील जाणकार तसेच त्या क्षेत्रात असलेले किंवा इच्छुक असलेल्या व्यक्तींचा सहभाग आहे. – संपादक*

## वसई ख्रिस्ती समाजातील प्रशासकीय सेवेबदद्लची उदासिनता.

– ॲड अतुल आल्मेडा, निर्मळ

उदासिनता म्हणण्यापेक्षा आवड नसणे उचित ठरेल. ही आवड का नाही किंवा आवडीचा अभाव का ? याची अनेक अंगे आहेत. आणि प्रत्येक अंगाशी निगडीत विविध कारणे आहेत. मी माझ्या दृष्टीकोनातून आणि अनुभवातून माझे विवेचन करत आहे. ते सर्वस्वी बरोबर असा माझा दावा नाही याव्यतिरिक्तही कारणं असू शकतात.

“जर तुम्हाला एका वर्षाची समृध्दी हवी असेल तर धान्य पेरा, जर तुम्हाला दहा वर्षाची समृध्दी हवी असेल तर झाडे लावा, पण जर तुम्हाला शंभर वर्षाची समृध्दी हवी असेल तर माणुस घडवा.”

भारतातले आपले राज्य सांभाळण्यासाठी इग्रजांनी The I.C.S. Act of 1861 हा कायदा केला. या कायदयाचा उददेश होता की भारतातील आपला प्रशासनाचा राज्यकारभार व्यवस्थित आणि सुरळीत सांभाळण्यासाठी सक्षम अधिकारी वर्ग निर्माण करणे राज्य इंग्रजाचे पण चालविणारे त्यांचे अधिकारी किंवा कारभारी म्हणजेच प्रशासकीय सेवक या कायदयानुसार १८६१ मध्ये पहिला I.C.S. परीक्षा उत्तीर्ण झालेला भारतीय अधिकारी होता, सत्येद्रनाथ टागोर (गुरुवर्य रविंद्रनाथ टागोरांचे मोठे बंधू). हे मांडण्याचे दोन हेतू आहेत. एक ही परीक्षा शासन सांभाळणा-या माणसाची तर दुस-या अर्थाने राज्य करणा-या माणसाची. शिवाय परीक्षा उत्तीर्ण होणा-या उमेदवाराची झलक लक्षात यावी. लोहपुरुष सरदार पटेल यांना भारतीय प्रशासन किंवा नोकरशाहीचे उर्फ इंडियन ब्यूरॅक्सीचे जनक मानले जाते. संविधान सभेत १९४९ मध्ये भाषण करुन ब्रिटीशकालीन I.C.S. सेवेची पुर्नबांधणी करुन भारतीय प्रशासन सेवेची निर्मीती त्यांनी केली.

हे सांगण्याचा हेतू हा की राज्यकर्ते पक्ष आणि मंत्री बदलत राहतील. पण राज्य करणारे किंवा राज्यांची व्यवस्था सांभाळणारे (मॅनेजर) हे अधिकारी कायम असतील. त्यांची बदली होईल पण ते निवृत्त होईपर्यंत या व्यवस्थेचे घटक असतील. नागरिकांच्या किंवा देशाच्या विकासाच्या सर्व योजना यांच्यामार्फत राबविल्या जातील थोडक्यात हे पडदयामागचे नट असतील यासाठी लागणारे व्यक्तिमत्व, जिदद व खडतर प्रवास करण्याची तयारी असलेला माणुस हे धाडस करु शकेल. Low Aim is Crime.

ख्रिस्ती समाजाचे मार्गदर्शन हे प्रथमतः चर्चची प्राथमिक शिकवण येथून सुरु होते. चर्चची शिकवण माणुस देवाच्या निर्मितीचा आहे त्यामुळे त्याच्या जीवनाचा कर्ता तो माणूस स्वतः नसून देव आहे. माणसाच्या इच्छेप्रमाणे, अपेक्षेप्रमाणे नव्हे तर देवाच्या योजनेप्रमाणे माणसाचे जीवन मार्गक्रमण करते हा धडा चर्च सर्व ख्रिस्तीजनांना शिकविते. माणुस म्हणून मी काहीही करु शकतो, कुणाच्याही मदतीशिवाय मी मेहनतीने कष्टाने माझ्या ध्येयापर्यंत पोहचू शकतो अशा आत्मविश्वासाची ख्रिस्तीजनांत अभाव आहे. मी जे काही आहे तो माझ्या मेहनतीमुळे कष्टामुळे मला निसर्गाने दिलेल्या बुध्दीमुळे नसून देवाच्या कृपेमुळे आहे अशी श्रध्दा ख्रिस्ती समाजात रुजविली जाते, विकसीत केली जाते. हया श्रध्देमुळे ख्रिस्ती व्यक्तीच्या आत्मविश्वासाला मर्यादा पडतात. पे. प्रे आणि ओबे ही शिकवण देताना पुढील शाश्वत (मेल्यानंतर) जीवनाची तयारी ठेव अशी चर्चची थोडक्यात शिकवण आहे. चर्चने या जीवनात ध्येय ठेवून ते ध्येय आत्मसात करण्यासाठी संघर्ष करा व ते करताना स्वर्ग सुखाचा अनुभव हया जीवनातच घ्या अशी शिकवण देण्यात चर्च कमी पडले आहे.

देवावर भरवसा ठेवणारा स्वतःचे कर्तेपण देवाला बहाल करणारा आत्मविश्वास गमावलेला माणूस किंवा व्यक्ती ध्येय नसलेले आणि ध्येय नाही म्हणून संघर्ष करण्याची कृती गमावलेली व्यक्ती जीवनाचा वेगळा-निराळा उद्देश ठरवू शकत नाही अशी माणसं संघर्षमय किंवा कष्टाचे जीवन जगण्यास तयार नसतात. “ठेविले अनंते तैसेची राहावे” अशा वृत्तीची ही माणसं जगतात. मी इतरापेक्षा काही तरी वेगळं करु शकतो ही धमक असलेल्या व्यक्ती भारतीय प्रशासकीय सेवेत जाऊ शकतात.

पुर्वी आपल्याकडील शिक्षण किंवा शिक्षणाचा उद्देश शिक्षक होणे, कारकून होणे, नोकरी करणे आणि शांततेचं जीवन जगणे असा मर्यादित होता. आजही तसाच आहे असे म्हटलं तर चुकीचं ठरणार नाही. बदललं ते फक्त नोकरी करण्याचं किंवा पैसे मिळविण्याचे साधनं पण

मुळ ढाचा किंवा श्रध्दा तीच आहे. सुखाचे जीवन जगणे वेगळ काही करुन दाखवण्याची हिम्मत नाही कारण तो आत्मविश्वास ख्रिस्ती जणानी कमावलाच नाही. अर्थात यालाही अपवाद असतील आणि आहेत.

प्रशासकीय सेवेसाठी महत्वाच्या दोन बाबी म्हणजे जीवनात ध्येय हवे आणि ते ध्येय गाठण्यासाठी संघर्ष करण्याची तयारी हवी. मी ज्या समाज व्यवस्थेत जगतो राहतो त्या व्यवस्थेचा मी भाग आहे, घटक आहे ही जाणीव निर्माण झाल्याशिवाय या समाजात जे काही न्याय आहे किंवा अन्यायकारक आहे त्याच्यांत माझा सहभाग आहे जे काही न्याय नाही किंवा अन्यायकारक आहे ते या व्यवस्थेचे फलित किंवा परिणाम आहेत. तेव्हा ही समाज व्यवस्था न्याय करण्यासाठी नागरिक म्हणूनच नव्हे तर एक क्रियाशील नागरिक होणे महत्वाचे आहे. अशी धारणा जेव्हा व्यक्तीमध्ये निर्माण होते तेव्हा ती व्यक्ती जीवनाचे ध्येय ठरविते. मी माझे जीवन जगत असता समजाला कसा उपयुक्त होऊ शकतो असा विचार होतो तेव्हा ती व्यक्ती समाजाच्या व्यवस्थेचा भाग होऊ इच्छिते आणि त्यासाठी आवश्यक असलेले मेहनत, कष्ट आणि संघर्ष करते व त्या ध्येयापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करते. शेवटी ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी जीवनभर तेच ध्येय पुढे नेण्यासाठी संघर्ष करण्याची बांधिलकी मानते. "Lack of will power has caused more failure then lack of intelligence or ability."

भारतीय प्रशायकीय सेवेत जाण्याचे दोन प्रमुख मार्ग म्हणजे MPSC एखादी परीक्षा पास होणे किंवा भारतीय प्रशासकीय सेवापरीक्षा I.A.S. उत्तीर्ण होणे गरजेचे आहे. या दोन्ही परीक्षा स्पर्धा परीक्षा असतात. या परीक्षेत भाग घेण्यासाठी प्रचंड मेहनतीची आवश्यकता आहे. भारतीय प्रशासकीय सेवेत कार्य करणारे किंवा कार्यकाळ संपवून निवृत्त झालेल्या लोकांचे अनुभव पाहिले तर या स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होणे सर्वसाधारण व्यक्तीचे काम नव्हे. या परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी इतिहास, भुगोल, विज्ञान, नागरीकशास्त्र, समाजशास्त्र आणि आरोग्य याविषयाचा भरपूर अभ्यास असावा लागतो. नागरिकशास्त्राचा अभ्यास करताना माणसाचे मुलभूत हक्क आणि जबाबदारी किंवा कर्त्यव्य याचाही अभ्यास असावा लागतो. थोडक्यात हा माणूस चौफेर अभ्यासू असणे आवश्यक असते. अभ्यास आत्मसात करण्यासाठी चौफेर वाचन आणि नुसते वाचन नाही तर वाचनातून टिपण करणे महत्वाचे असते. "जबतक उठे न पाँव तब तक उँचाई है।. वरना शिखर कौनसा हैं जो छूओ न जाये ।।

आपल्या ख्रिस्तसभेतील मुलांचे वाचन अपवाद वगळता गरजेपूरता म्हणजे नोकरी मिळविण्यापूरता आवश्यक तेवढंच असते. आपल्या समाजातील मुलांचे जनरल नॉलेज अतिषय मर्यादीत असते. एक अनुभव सांगावासा वाटतो एका शेडयूल बॅकेच्या लॉ ऑफिसरच्या तोंडी

परीक्षेकरीता मी परीक्षक होतो. एक उमेदवार सगळया परीक्षेत प्रथम वर्गात उत्तीर्ण झालेला होता. एवढंच नाही तर आत्मविश्वासी वाटत होता. त्याचे जनरल नॉलेज (सर्वसामान्य ज्ञान) पहावे म्हणून मी त्याला तुमच्या परीसरातील बॅकेवर कोण संचालक आहे ? असा प्रश्न केला असता, तो उमेदवार उत्तर देऊ शकला नाही. हा उमेदवार हुशार आहे आत्मविश्वासी आहे पण नागरिक म्हणून किती जागरुक आहे ? ख्रिस्ती मुले हुशार आहेत मेहनती आहेत पण उददेश किंवा ध्येय सुखी जीवन जगणे इतपतच मर्यादित आहे. समाजाचा घटक म्हणून संघर्षात जगण्यापेक्षा वैभवाचे जीवन जगण्यात धन्यता मानणारे आहेत. “जग बदलण्याची आंकाक्षा ठेवणा-यानी जग बदलण्याची सुरुवात स्वत:पासून करावी” असे राष्ट्रपिता महात्मा गांधी सांगतात ते याच करीता .

प्रशासकीय सेवा हे सुखी जीवनाचे ध्येय असणा-या माणसाचे ध्येय असू शकत नाही. प्रशासकीय सेवेत जाण्यासाठी जेवढा खडतर प्रवास आहे त्यापेक्षा त्यासेवेत रुजू झाल्यानंतरचा प्रवास अधिक खडतर असतो. संघर्षमय असतो. लोक नागरिकांशी व राज्यकर्त्यांशी एकाच वैळी भिन्न भिन्न बाबीसाठी भिडायचे असते. सेवा करायची जागा ही नेहमीच बदलती असते आज हा जिल्हा तर उदया तो जिल्हा शिवाय राज्यातून केंद्रात व केंद्रातून राज्यात बदली होऊ शकतात. एवढेच नाही तर परदेशातही राहावे लागते. मुंबईला कामाला गेलेला वसईकर कधी अगदी घरी पोहोचतो हे पाहत असतो. तशा प्रागणांत वाढलेली तरुण मंडळी कीतीही हुशार मेहनती व आत्मविश्वासी असली तरी असे संघर्षमय जीवनाकडे ते दुरुनच पाहतात तत्वज्ञानी प्लेटोचे एक वाक्य असे आहे “I can’t teach you anything but to think.” व्यक्तीला, माणसाला विचार करायला शिकवणे हेच उत्तम शिक्षण.

मी व्यवस्थेचा घटक बनू शकतो व अधिकारवाणीने कार्य करुन संघर्षमय जीवन जगण्याचे धाडस स्विकारु शकतो, असे ध्येय असलेलाच तरुण प्रशासकीय सेवेत आवडीने जाऊ व जगु शकतो त्याकरीता प्रयत्न करु शकतो नाहीतर प्राध्यापक, इन्जिनीअर, डॉक्टर्स, वकील व मॅनेजर हेच कार्यक्षेत्र आपल्याला भावते.

शेवटी “लहरोंसे डरके कभी नौका पार नही होती, कोशीस करनेवालोकी कभी हार नही होती.” हे ध्यानात घ्यावे.

टिप - ज्यांना वाटते या परीक्षेसाठी जावे त्यांनी “बखर भारतीय प्रशासनाची” हे लक्ष्मीकांत देखमुख या निवृत्त जिल्हाधिका-याचे आणि ज्ञानेश्वर मुळे यांचे ‘नोकरशाहीचे रंग’ ही दोन पुस्तके जरुर वाचावीत.

# वसई ख्रिस्ती समाजातील प्रशासकीय सेवेबदद्‌लची उदासिनता.

— फ्रान्सिस आल्मेडा, निर्मळ

वसईतील ख्रिस्ती समाजातच नव्हे तर या परिसरातील जवळ सर्वच समाजात अशा प्रकारची उदासीनता दिसते. त्यामुळेच मुंबईजवळच्या कोणत्याही गावातून फारसा प्रतिसाद प्रशासकीय सेवेत दिसत नाही. याचे पहिले कारण मला वाटते या समाजातील शिक्षण देणारी यंत्रणा स्वातंत्र्याच्या जवळपासच्या काळामध्ये उदयास आली. वसईतील बहुतेक शाळा देशाच्या स्वातंत्र्याच्या काळातच उदयास आल्या. तोट्यात असणाऱ्या शेती व्यवसायातून बाहेर पडण्यासाठी मिळेल ती नोकरी प्राप्त करून घेण्यास आवश्यक ते शिक्षण घेण्यावर सुरुवातीला भर असणे स्वाभाविक होते. त्यामुळे एसएससी पर्यंत किंवा त्यापेक्षा कमी शिकलेले लोक नोकरीसाठी मुंबईकडे धाव घेऊ लागले. प्रशासकीय सेवेतील स्पर्धा परीक्षांसाठी अभ्यास करायला लागणारा वेळ व मार्गदर्शन त्यांच्याकडे उपलब्ध नव्हते. त्यानंतर येणारी पिढी अधिक स्थिरस्थावर झाली. त्यांना मुंबईतील मोठ्या पगाराच्या नोकऱ्या आकर्षित करायला लागल्या. त्यामध्ये पटकन स्थिरस्थावर करणाऱ्या वकील,डॉक्टर, इंजिनिअर या व्यवसायाकडे नवीन पिढी आकर्षित होणे स्वाभाविक होते. प्रशासकीय सेवेत जाण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या स्पर्धा परीक्षा पेक्षा क्रमाक्रमाने पुढे जाऊन नेहमीच्या अभ्यासक्रमातून चांगली नोकरी मिळवणे मुंबईसारख्या मोठ्या शहराच्या सान्निद्यामुळे सहज शक्य होते. तसेच प्रशासकीय अधिकारी मग ते पोलीस इन्स्पेक्टर असोत की मामलेदार, जिल्हाधिकारी कलेक्टर यांच्याविषयी फारशी आदराची भावना येथील समाजात नाही.

प्रशासकीय सेवेत असलेल्या मोजक्या लोकांनाच या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्राची तसेच त्यांना मिळणाऱ्या सोयीसुविधांची माहिती आहे. शाळा कॉलेजातून अशा प्रकारच्या प्रशासकीय सेवेसाठी कराव्या लागणाऱ्या स्पर्धा परीक्षांच्या तयारीची सोय नाही. याउलट मोठ्या शहरापासून लांब असणाऱ्या खेडेगावात शिकणाऱ्या मुलांना पदवीधर होऊनही गावातच आपल्या शेतावर राबावे लागते. त्यांच्यासाठी प्रशासकीय सेवेतील कोणत्याही स्तरावर प्रवेश मिळवणे हा त्यांच्या दारिद्र्यातून मुक्ती मिळवण्यासाठी मोठा मार्ग असतो! त्यामुळेच पोलीस इन्स्पेक्टर होण्यासाठी किंवा ग्रामसेवक किंवा तलाठी होण्यासाठी अशा मुलांची तयारी असते. एखादा मुलगा आय एस एस किंवा आईपीएस परीक्षेत यशस्वी होणे म्हणजे अशा दारिद्र्यात पिचलेल्या लोकांच्या दृष्टीने दैव दुर्लभ गोष्ट असते! त्यामुळेच जीवन-मरणाच्या जिद्दीने ही मुले प्रशासकीय सेवेच्या स्पर्धा परीक्षेत उतरतात. विश्वास नांगरे पाटलांनी म्हटल्याप्रमाणे स्पर्धा परीक्षा पास झालो तर मोठा अधिकारी नाहीतर शेतावर जाऊन नांगर धरणे असे दोनच पर्याय त्यांच्यापुढे उपलब्ध असतात.

या उदासीनतेवर मात करण्यासाठी पालकांचे प्रबोधन व पाल्यांना प्रोत्साहनाची गरज आहे! हे काम शाळा कॉलेजे व स्वयंसेवी संस्था तसेच धार्मिक व्यासपिठावरूनही करावे लागेल! प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या हातात असलेल्या सेवेच्या संधी व त्यामुळे आपल्या समाजाला मिळणारे लाभ लोकांना समजावून देणे अतिशय आवश्यक आहे.

# वसईतील ख्रिस्ती तरुणांची प्रशासकीय सेवेबाबतची उदासीनता

--- अनिशा सुनिल डिमेलो, वटार, नंदाखाल

"इतके चांगले मार्क मिळाले आहेत, आता चांगल्या इंजिनिरिंग कॉलेजमध्ये ऍडमिशन मिळेल आणि मग कॅम्पस प्लेसमेंटमधून चांगला जॉब देखील मिळेल"

वरील संवाद आपल्या येथील घराघरात आपल्याला ऐकू येतो. आपल्या समाजात आपणास इंजिनिअर, डॉक्टर, सी.ए. वा टिचर्स सर्रास मिळतात आणि मिळायलाच हवे. ह्या वरूनच आपला समाज किती शिक्षित आहे ह्याची प्रचिती येते. एखाद्याने वरील शिक्षण जरूर करावे. पदवी, पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करावे पण त्यानंतर पुढे काय?

आपल्या समाजातील तरुणांचा शिक्षणानंतर सरळधोप मार्ग पकडून जॉब निवडण्याकडे कल असतो. वेगळया पठडीतील मार्ग कमी लोक निवडतात आणि असाच एक मार्ग म्हणजे 'प्रशासकीय सेवा'. आपण लोकशाही मार्गाने नेते मंडळी निवडून देतो जे सरकार दरबारी निर्णय प्रक्रियेत सहभागी होतात पण प्रत्यक्षात अंमलबजावणी व सरकार यंत्रणा सांभाळण्याचे काम सरकारी अधिकारी करतात. हे प्रशासकीय अधिकारी स्पर्धा परीक्षांमार्फत निवडले जातात. ही परीक्षा दरवर्षी UPSC/MPSC द्वारे घेतली जाते. ह्या परीक्षेच्या अभ्यासक्रमाचा आवाका विस्तृत आहे. 3 टप्प्यांमध्ये ही परीक्षा घेतली जाते आणि आणि समजा आपण तिसऱ्या टप्प्यापर्यंत (मुलाखत) पोहचलो आणि आपले गुण कमी पडले तरी आपल्याला पुढच्या वर्षी परत पहिल्या टप्प्यापासून सुरूवात करावी लागते. त्यासाठी भरपूर परिश्रमाची आणि संयमाची आवश्यकता असते. आपल्या समाजातील तरुणांमध्ये परिश्रमाची कमतरता नाही पण संयम जरा कमी पडतो.

आजकालच्या धकाधकीच्या जीवनात लोकांकडील संयम हरवत चालला आहे आणि प्रशासकीय स्पर्धा परीक्षा म्हणजे फक्त ज्ञानाची नाही तर संयमाची देखील परीक्षा आहे. पूर्वी आपल्या समाजात प्रशासकीय सेवा म्हणजे काय आणि त्याची तयारी कशी करावी? हे एक आव्हान होते पण आता ह्याबाबत बऱ्यापैकी जागृती झाली आहे आणि माझ्यामते जसं आपण पाण्यामध्ये पडल्यावर पोहायला शिकतो त्याप्रमाणे जर आपल्याला ती परीक्षा द्यायची आहे तर त्याबद्दल माहिती आपण गोळा करणारच.

खरे आव्हान आहे तरुणांची ह्या क्षेत्राबाबतची उदासीनता...आपण मुंबईच्याजवळ राहत असल्यामुळे आपल्याला जॉबच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत आणि ह्यामुळे आपल्याला जॉबसाठी कमी संघर्ष करावा लागतो, ह्या कारणामुळे आपली तरुण पिढी कमीतकमी 3-4 वर्षे आपला संयम पाहणाऱ्या प्रशासकीय सेवा परिक्षाकडे कमी झुकतात. आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे, ह्या सेवांमधील कामाचा ताण, सरकारी दबाव आणि सततच्या बदल्या. आपला समाज हा कुटुंबप्रिय आहे. आपण आपल्या घरात, गावात सतत गुरफटलेले असतो. ऑफिसवरून एकदा घरी कधी येतो असे आपल्या होत असते. ह्या कारणामुळे सततच्या बदल्या किंवा स्पर्धा परीक्षेच्या तयारी करता बाहेर राहणे आपल्याला नको असते.

हे सर्व अडथळे असले तरीही माणसाने नेहमी आशावादी असावे. आणि आपल्या समाजातील जास्तीतजास्त तरुणांनी प्रशासकीय स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू करावी. आपल्या समाजाला अश्या तरूण/तरुणींची गरज आहे जे प्रशासकीय सेवेमार्फत शासनाच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी होतील आणि आपल्या देशाची व समाजाची सेवा करतील. शेवटी 'देश सेवा हीच ईश्वर सेवा.'

# वसईतील ख्रिस्ती समाजाची प्रशासकीय सेवेबाबतची उदासीनता

--- रुबिना डिमेलो, नंदाखाल

आपल्या वसईची भूमी अतिशय सुपीक आहे. इतकी सुपीक की म्हातारयाची काठी जरी रोवली तरी त्याला कोंब फुटतील. अतिशयोक्तीचा भाग जरी सोडला. तरी वसईच्या सुपीक भूमीप्रमाणे वसईच्या भूमीपुत्राला निसर्गदत्त सुपीक बुद्धिमत्तेचे सुद्धा वरदान लाभले आहे. त्यामुळेच इथला भूमिपूत्र निरनिराळया क्षेत्रात यशाचे शिखर गाठीत आहे. याच भुमीमध्ये जन्मलेला वसईचा ख्रिस्ती तरुण सुद्धा आपल्या प्रगल्भ आणि विलक्षण बुद्धीमत्तेच्या जोरावर निरनिराळया क्षेत्रात, देशा परदेशात आपल्या प्रतिभेचा आविष्कार घडवीत आहे याचा आपल्याला रास्त अभिमान आहे. परंतु..........

प्रशासकीय क्षेत्रात आज वसईचा ख्रिस्ती भूमिपूत्र फारच अभावाने आढळतो. हीच आपल्या ख्रिस्ती समाजाची फार मोठी शोकांतिका आहे. आज आपल्या देशाचा राज्यकारभार हाकणारे प्रशासन म्हणजे आपल्या लोकशाही व्यवस्थेचा एक महत्त्वाचा स्तंभ. हयाच प्रशासनाद्वारे आपण सशक्त आणि बलवान राष्ट्राचे स्वप्न रंगवत असतो. त्यासाठी आपल्याला हवे आहेत हुशार, प्रामाणिक आणि मेहनती असे प्रशासकीय अधिकारी. त्यासाठी I.A.S, I.P.S, I.F.S. हया स्पर्धा परिक्षांच्या माध्यमातून मनुषयबळ निवडण्यात येते. पण कुठे आहोत आपण हया क्षेत्रात? का आपण दुर्लक्षित केली आहे प्रशासनांतील ही सुसंधी? विशेष करून आपल्यामध्ये ही सक्षमता असताना सुद्धा? जाणून घेऊया हयाची कारणे....

1. प्रशासकीय सेवेत भरती होण्यासाठी ज्या स्पर्धा परिक्षांना सामोरे जावे लागते त्याबद्दल असलेली भीती. त्या परिक्षा खूप कठीण असतात, खूप attempts द्यावे लागतात, वगैरे वगैरे...ह्या परिक्षेसाठी जिद्द, मेहनत, चिकाटी आणि वाचनाचा आवाका खूप असावा लागतो आणि ह्या गोष्टींची उणीव आजच्या तरूणात दिसून येते.

2. आपल्या समाजात प्रवाहाबरोबर वाहण्याची वृत्ती आहे. एखाद्या क्षेत्रात एखाद्याने यश संपादन केले की बहुतांशी तरूण त्याचे अनुकरण करतात.

3. पालकांची मानसिकता : आपला पाल्य एकदा पदवीधर झाला की चांगली नोकरी मिळवून तो त्याच्या जीवनात कसा स्थिरस्थावर होईल हयावर पालकांचा कल असतो. मुलांमध्ये क्षमता असून देखील पालक आपल्या पाल्यांना civil service examination साठी प्रवृत्त करीत नाहीत.

4. प्रशासकीय सेवेतील होणारया वारंवार बदल्या, राजकीय दबावामुळे येणारे कामातील limitations हे देखील एक उदासीनतेचे मोठे कारण.. विशेषतः मुलींसाठी ज्या सक्षम असूनही ह्या सेवेपासून अलिप्त आहेत.

5. अजून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे प्रशासकीय सेवेविषयी असलेली अनभिज्ञता . UPSC, MPSC ह्या विषयी जवळ जवळ सगळयांनाच माहिती झालेली आहे. परंतु ह्या परिक्षेमधून निवड झालेल्या उमेदवाराची सत्ताक्षमता, त्यांच्या भोवती असलेले वलय, त्यांना मिळणारे अधिकार व सामाजिक सुरक्षितता आणि त्यांना मिळणारी देशसेवेची आणि समाजसेवेची मोठी संधी ह्याविषयी आपला समाज आणि तरूण खूप अनभिज्ञ आहे.

वरील काही मुद्दे लक्षात घेता आपण खालील काही गोष्टी समजात घडवून आणू शकतो.....

1. शालेय जीवनापासूनच आपल्या विद्यार्थ्यांमध्ये प्रशासकीय सेवेबद्दलची माहिती आणि महती जागवणे... ह्या मुलांमध्ये वाचनसंसकृती वाढविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे..

2. पालकांची मानसिकता बदलण्याची गरज आहे

3. मुलांची विश्लेषण शक्ती ( analytical skills) वाढविण्यासाठी विचारमंथनाचे अनेक platform उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. ( जिविकाच्या विवेक मंच सारखा)

आणि वरील मुद्दे घडवून आणण्यासाठी चर्चने मुख्य भूमिका बजावयाला हवी होती असे मला प्रामाणिकपणे वाटते... जसे मुस्लिम समाजाने ह्याची दखल घेतली आहे आणि म्हणूनच त्यांच्या मदरसा मध्ये धर्मशिक्षणाबरोबरच प्रशासकीय सेवेबद्दलची जनजागृती आणि आणि त्या मुलांना प्रोत्साहन देऊन मदत केली जात आहे. आणि म्हणूनच प्रशासनात त्यांच्या समाजाचे प्रतिनिधित्व मोठया प्रमाणात दिसून येते.

But yes better late than never... आपण आता प्रयत्न करून येणारया काही वर्षात आपल्या समाजातून प्रशासकीय अधिकार्यांची फळी तयार करू शकतो...

## "वसई समाजाची प्रशासकीय सेवेबद्दल असलेली उदासीनता"

--- बेन्सन कोरिया, नंदाखाल

भारत हा एक खंडप्राय देश आहे व ह्या खंडप्राय देशाला एकसंघ ठेवणारी एक गोष्ट म्हणजे "स्वातंत्र्य भारताचे संविधान". ह्या संविधानाने भारतासाठी दिलेले संसद, न्यायपालिका व कार्यकारी मंडळ (कार्य पालिका) असे हे तीन स्तंभ. अशा ह्या ३ महत्त्वाच्या स्तंभावर संपूर्ण संसदीय लोकशाहीचा डोलारा उभा आहे. संसद ही लोकांच्या प्रश्नावर,अडचणींवर उपाय शोधत असते; त्यासाठी कायदे करत असते. संसदेने केलेले कायदे, हुकुम हे संविधानाच्या चौकटीत बसतात का? हे पारित केलेले कायदे संविधानाने दिलेल्या वेगवेगळया स्वातंत्र्यावर व अधिकारांवर घाला तर घालत नाही ना? ह्या व इतर प्रश्नांचा सांगोपांग अभ्यास करून न्यायपालिका (न्यायालय) त्या कायद्याची अंमलबजावणी करण्याचा आदेश काढते. आता तयार झालेला कायदा हा योग्य प्रकारे पाळला जातो की नाही हे पाहण्याचे काम कार्यपालिका म्हणजे प्रशासनाकडे येते. थोडक्यात,आपले प्रशासन जेवढे मजबूत तेवढा आपला देश सुदृढ असतो. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की कायदा राबविणारा जितका चांगला तितका तो कायदा चांगला.

परंतु आपला समाज हा दुर्दैवाने ह्या प्रशासकीय सेवेपासून नेहमीच दूर राहिलेला आहे. प्रशासकीय सेवा ही एक सरकारी नोकरी असली तरी ही एक समाजसेवेची उत्तम संधी आहे, मग ह्यास नोकरी असे न म्हणता संविधानाने सुद्धा ह्याला "प्रशासकीय सेवा" असे म्हटले आहे. आपण येथे प्रशासकीय सेवा म्हणतो तेव्हा प्रामुख्याने केंद्रीय लोकसेवा आयोग व राज्य लोकसेवा आयोग ह्याबद्दल बोलूया.

केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) व राज्य लोकसेवा आयोग (MPSC) हे दोन्ही आयोग अनुक्रमे केंद्रातील व राज्यातील प्रशासकीय सेवेसाठी बांधील असतात.सरळसेवा मार्फत ही भरती प्रक्रिया केली जाते.UPSC मार्फत IAS, IPS, IRS इ. अशा २० पेक्षा अधिक गट अ, गट ब,गट क ह्या वर्गातील सेवेसाठी भरती प्रक्रिया होत असते; तर MPSC तर्फे उपजिल्हाधिकारी, उप पोलिस अधीक्षक, तहसीलदार इ. अशा गट अ गट ब गट क वर्गातील विविध पदांकरिता भरती केली जाते. भरती प्रक्रिया ही पूर्व परीक्षा,परीक्षा व मुलाखत अशा स्वरूपाची असते. साधारणपणे ही भरती प्रक्रिया १ वर्षभर चालते. ह्या परीक्षेला वयाची व देण्यात येणाऱ्या प्रयत्नांची मर्यादा असते. ही परीक्षा कोणत्याही शाखेचा पदवीधर देऊ शकतो.

आपला समाज तसा ह्या प्रशासकीय सेवेपासुन दोन हात दूरच राहिला आहे. त्याची वेगवेगळी कारणे असू शकतात.

१. भरती प्रक्रियेसाठी लागणारा वेळ - केंद्रीय व राज्य आयोगातर्फे ज्या परीक्षा घेतल्या जातात त्यांची प्रक्रिया ही सर्वसाधारणपणे १ वर्षाची असते. परिणामी तेवढा वेळ थांबण्याची तयारी व जर अपयश पदरी आले तर पुन्हा जिद्दीने अभ्यास करण्याची तयारी असावी लागते.

एखाद्या प्रयत्नात कोणत्याही प्रकियेमध्ये अयशस्वी झालो तर पुढील वर्षी आपणास पुन्हा पहिल्यापासून परीक्षा द्यावी लागते. आपल्या जिद्दीची मेहनतीची व संयमाची खरी कसोटी लागते.

२. कमी होत असलेली पदसंख्या व आरक्षण - आपला समाज अल्पसंख्याक जरी असला तरी तो कोणत्याच आरक्षणात येत नाही. परिणामी आपल्याला खुल्या वर्गातून परीक्षा द्यावी लागते. म्हणजे परीक्षा जरी १०० पदांसाठी असली तरी खुल्या वर्गासाठी फक्त ५० जागा येतात व त्या ५० जागांसाठी परीक्षा अधिक तीव्र होऊन जाते. तसेच यशस्वी होण्याचे प्रमाण कमी होते म्हणून या वाटेला जाण्याचे टाळले जाते.

३. उच्च शिक्षित समाज - ह्या परीक्षेसाठी उमेदवार हा कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा ही माफक अट केंद्रीय व राज्य सेवा आयोगाने घालून दिलेली आहे.आपला समाज हा आत्ता शिक्षित किंबहुना उच्चशिक्षित होत आहे. आज आपण पाहिलं तर उच्चशिक्षणासाठी परदेशात जाणाऱ्यांची संख्या काही कमी नाही, ती दरवर्षी वाढतच आहे, परिणामी ह्या परीक्षेकडे (सेवेकडे) आपण डोळेझाक करीत असतो. आत्ता तर अनेक उच्चशिक्षित डॉक्टर, इंजिनियर, संगणक अभियंते या सेवेकडे वळत आहेत.

४.जवळ असलेले औद्योगिक केंद्र - वसई विरार हा परिसर मुंबईपासून अगदी जवळ आहे. आपल्या शिक्षणाचा फायदा करून आपण मुंबईत किंवा आपल्या जवळील औद्योगिक क्षेत्रात एखादी नोकरी थोड्या कमी अधिक प्रयत्नाने मिळते व आपण पूर्णवेळ चाकरमानी होऊन जातो.साधारणपणे गावाकडची,जिथे औद्योगिक केंद्र नाहीत व फक्त सरकारी नोकरी मिळते किंवा शेती हेच उत्पन्नाचे साधन असते किंवा उत्पन्नाची साधने ही अल्प अथवा मर्यादित असतात तेथील पदवीधर स्पर्धापरीक्षेत यशस्वी होताना दिसतात.आपण म्हणतो की उत्तर प्रदेश किंवा बिहार मधून असे सरकारी बाबू खूप होतात कारण मुळात तेथे मुबलक प्रमाणात नोकऱ्या उपलब्ध नसल्याने त्यांना ह्या स्पर्धापरीक्षेसाठी प्रयत्न करण्यावाचून उपाय नसतो.

५. परिक्षेबद्दल असलेले अज्ञान, मार्गदर्शन व क्लासेस,शिक्षण केंद्र: - अशा स्पर्धापरीक्षा ह्या सरकारी पातळीवर होतात, त्यात वशिलेबाजी चालते, पैश्याशिवाय कामे होत नाहीत असे एक ना अनेक न्यूनगंड आपल्या मनात घर करून राहिले आहेत. कारण ह्या परिक्षेसाठी लागणारी मार्गदर्शन केंद्र ,शिकवण्या ह्या आपल्या परिसरात आत्तापर्यंत उभ्या राहिल्या नाहीत. परीक्षेसाठी लागणारे मार्गदर्शन व ते देणारे संस्था/ केंद्र ह्यांचा अभाव हे देखील एक महत्त्वाचे कारण असू शकते.आपल्या समाजातील कोणीही अशा प्रशासनातील मोठ्या पदांवर UPSC / MPSC मार्फत

कार्यरत नसल्याने तशा मार्गदर्शनापासून वंचित आहोत. मुंबईत देखील अशा केंद्रांची संख्या कमी आहे. पुणे,दिल्ली अशा ठिकाणी खूप सारी मार्गदर्शन केंद्र आहेत.

प्रशासकीय सेवांतील पदाची संख्या कितीही मर्यादित असली तरी त्यांच्या जागी त्या वरचढ असतात. ते त्यांचा मानमरातब राखून असतात. कितीही मोठ्या कंपन्या आल्या व कितीही मोठ्या पदाच्या नोकऱ्या आल्या तरीही भारतामध्ये प्रशासकीय सेवा ह्याच उठून दिसतात. त्यांना मिळणार मानसन्मान,सोयीसुविधा व पगार हा इतर नोकऱ्यापेक्षा जरा वेगळाच असतो.आता ह्या सेवामध्ये उच्चशिक्षित डॉक्टर, इंजिनिअर ह्यांचा भरणा होताना दिसत आहे. सातवा वेतन आयोग देखील लागू झाला आहे. एकदा का सेवेमध्ये आलात की सेवेची हमीही आहेत जेवढे मोठे पद तेवढे जास्त अधिकार व तेवढी जास्त जबाबदारीही येतेच.आपल्या समाजातून देखील आता ह्या क्षेत्राबद्दल जनजागृती चालू आहे.तरी जास्तीतजास्त पदवीधरांनी हा मार्ग चोखाळला पाहिजे.

प्रशासकीय पदावरील व्यक्तीला त्याच्याकडे येणारी गरजू व्यक्ती ही देवासमान असते. सेवेतून जनसेवा हा अनोखा मार्ग करीयरसाठी निवडावा म्हणून प्रार्थनामय शुभेच्छा.

# *"वसई ख्रिस्ती समाजातील प्रशासकीय सेवेबद्दलची उदासीनता"

--- जेम्सन अंतोन डिमेलो, सहाय्यक लेखा अधिकारी,

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई

आपला वसईकर समाज तसा दुधामधाच्या घागरीवर जगला, केळी फुलांच्या बागेत वाढला. साधारणतः ६०-७० च्या दशकात आपली पहिली पिढी शिकली आणि कामाधंद्यासाठी मुंबईला जाऊ लागली. त्यापूर्वी १००% शेतीप्रधान असलेला समाज नोकरीमध्ये रमू लागला. शेतीवाडीच्या उत्पन्नात नोकरीचा दरमहा हमखास येणारा पगार समाज समृध्द करु लागला. पुढील वीस पंचवीस वर्षांत या समाजाने टाकलेली कात खरेच कौतुकास्पद राहिली. या समाजाने केलेली आर्थिक प्रगती डोळे दिपवणारीच होती. अनेकांनी तर थेट परदेशी प्रस्थान केले. सुरुवातीला अर्थाजन ह्या एकमेव उद्देशाने केलेले परदेशगमन पुढे शिक्षणासाठी व आता तर उद्योगधंदा व पर्यटनासाठी वारंवार परदेशवारीपर्यंत येऊन पोहोचले.

अशी प्रगतीची घोडदौड सुरू असताना एक खंत नेहमी जाचते. आपला समाज आर्थिक सामाजिक प्रगती करीत असताना अनेक क्षेत्रात सहजरित्या वावरत असताना *प्रशासनात, शासनकर्ती जमात होण्याबाबत मागास* का राहिला? आजच्या या ऑनलाईन माहितीच्या युगात आपल्या वसईतील ख्रिस्ती समाजातील तरुण वर्ग प्रशासकीय सेवेसाठीच्या स्पर्धा परीक्षेपासून लांब का आहे? परंपरागत पदवी अभ्यासक्रम सोडून वेगळा मार्ग धुंडाळण्याची तसदी न घेता सरळधोपट मार्गाने, साचेबंद क्षेत्रातच का जात आहे?

मागील सुमारे २८ वर्षांत राज्य शासकीय सेवेत काम करीत असताना आपल्या समाजाची या क्षेत्रातील उदासिनतेबाबत माझी मते याठिकाणी नमुद करावीशी वाटतात.

१. याबाबत सर्वात महत्वाचे कारण कोणते असेल तर आपल्याला मुंबई जवळ आहे किंवा आपण मुंबईच्या जवळ राहतो.. आपण दररोज मुंबईला जाऊन येऊ शकतो. मुंबई ही जरी स्वप्ननगरी असली. अनेकांची स्वप्ने पूर्ण करीत

असली तरी ती प्रथम सर्वांच्या पोटाची काळजी घेते.. आपल्या समाजातील प्रत्येक व्यक्ती मग ती सुशिक्षित असो, अर्धशिक्षित असो कि अशिक्षित..प्रत्येकाच्या पोटाची खळगी तीने भरलेली आहे. प्रत्येक क्षेत्रात मेहनत ही

करावीच लागते, परंतु आपल्या समाजाला किंवा आपल्या परिसरातील अन्य समाजाला सुद्धा मुंबईने जितक्या सहजतेने सामावून घेतले तितक्या सहजतेने महाराष्ट्रातील व देशातील अन्य समाजाला घेतले नाही..

२. आपली पहिली पिढी शिकली.. कामाधंद्याला जाऊ लागली, पुढच्या पिढीला जास्त शिक्षण द्यावे असे त्या पिढीला वाटू लागले, त्याचवेळेस म्हणजे साधारणतः ८८-९० नंतर सर्व क्षेत्रात संगणकाचा शिरकाव होऊ लागला. त्यावेळेस संगणक नवीन असल्याने व हाताळणारे कमी असल्याने यासाठी मागणी वाढली.. अर्थशास्त्राच्या नियमानुसार मागणी जास्त व पुरवठा कमी असल्याने असलेल्या संगणक तज्ज्ञांना(?) गलेलठ्ठ पगार मिळू लागले.. आणि आपली एक संपूर्ण पिढी संगणक क्षेत्रात गेली. परंतू पुढे हे प्रमाण उलट झाल्यानंतर या पिढीसमोर ज्यावेळी चांगल्या नोकरीचे पर्याय संपले तेव्हा त्यांना आता पुढे काय हा प्रश्न उपस्थित झाला. आणि त्यांना पर्याय मिळाला तो म्हणजे पुढील शिक्षणासाठी अमेरिकेत जायचे आणि तेथेच रमून जायचे. त्याचवेळी जर आईवडिलांनी व समाजातील धुरिणांनी आपल्या तरुणांना प्रशासकीय सेवेचा मार्ग दाखवला असता तर....कदाचित चित्र वेगळे दिसले असते

३. एक भाऊ अभियंता होत असताना दुसरा भाऊ शिक्षणातील कमी प्रगतीमुळे मागे पडत होता..परंतू त्यालासुध्दा दाखवायचे होते हम किसीसे कम नही, मी पण श्रीमंत होऊ शकतो.. त्याने कॅटरींगशी संबंधित लहान मोठा कोर्स करून घेतला, त्याला पर्याय मिळाला हाॅटेल व पुढे परदेशातील हाॅटेल व बोटीवरील नोकरी. त्यातून मिळणारा पैसा इतका प्रचंड होता की आपली तरुण मंडळी मोठ्या प्रमाणावर या क्षेत्रात गेली.

४. हे सर्व पाहात असताना आपल्या भगिनी कुठे कमी पडत नव्हत्या.. जशी आपली प्रगती झाली तशीच मुंबईची सुद्धा झाली. शासनाच्या उदारीकरणाच्या धोरणामुळे मुंबईत खाजगी नोकऱ्यांचे व त्यानुषंगाने संधीचे प्रमाण वाढले. मुंबईत परप्रांतीयांचे लोंढे वाढले. आणि त्यांच्या सोयीसाठी शिक्षण संस्थांची गरज वाढली. शासनाने शिक्षण क्षेत्राचे खाजगीकरण केले. D.Ed आणि B.Ed. (D.P.ed सुध्दा) करून खात्रीची नोकरी व लग्नाच्या बाजारात असलेली मागणी यामुळे अनेक मुलींनी हा पर्याय स्वीकारला.

याबरोबरच आपल्या शैक्षणिक, सहकारी संस्थांमधील भरती थेट होते. अनेकवेळा तर संस्था चालकांच्या जवळच्याच व्यक्तीला या नोक-या मिळून जातात.

स्पर्धा परिक्षातील यशस्वीतांचे किंवा शासनातील वरीष्ठ अधिकारी यांची पार्श्वभूमी पाहिली तर ते ज्या विभागातून आलेले आहेत.. त्या परिसरात, विभागात शासकीय अधिकारी होण्याची क्रेझ किंवा जिद्द आहे जिचा आपल्याकडे अभाव आहे. आपल्याला वाटते, सरकारी नोकरी म्हणजे कमी पगाराची, धुळीने भरलेली, पान तंबाखुच्या पिचकारीने मळलेली, कोंदट कार्यालये. आता परिस्थिती इतकी वाईट राहिलेली नाही नपेक्षा आपण ही परिस्थिती बदलू अशी भावना घेऊनच या क्षेत्रात येणे गरजेचे आहे.

या सर्व गोष्टींचा साकल्याने व डोळसपणे विचार केला.. आपल्या सर्व संस्थांमधील भरती स्पर्धा परिक्षांद्वारे केली. आपल्या परिसरातील सर्व शाळांमध्ये सातवी आठवीपासून स्पर्धा परीक्षांच्या धर्तीवर परिक्षा मोहीम चालवली. स्पर्धा परीक्षा आवश्यक आहेत त्याशिवाय पर्याय नाही अशी भावना जर आपल्या शालेय मुलांमध्ये वाढीस लावली तर आणि तरच आपली मुले या सेवेचा विचार करतील व या क्षेत्रात प्रवेश करतील..

# मृत्युनंतर दागिने जाळू नका

--- पुरूषोत्तम पवार ( संस्थापक महाराष्ट्र राज्य अवयवदान - देहदान महासंघ )
ppvasai@gmail.com / http://fed4organdonation.com

पृथ्वीवरील प्रत्येक कीटक, पशु पक्षी प्राणीमात्र मृत्यूनंतर ईतरांना काही ना काही कामी येतो गाय म्हैस यांची चरबी व चामडी, मोराची पिसे, हत्तीचे दात वगैरे वगैरे कामास येतात काही प्राणी तर इतरांचे भक्ष बनतात. परंतु मनुष्यप्राणी मृत्युनंतर आपल्या सजातीयाच्या शवाचे दहन किंवा दफन करून मातीमोल करून टाकतो. जसे साप दिसला की ठेच त्याचे डोके पण त्याच सापाच्या विषाचे संकलन करून त्या पासून असाध्य रोगावर जीव वाचवणारे औषध बनवू शकतो हे तारतम्य आपण बाळगत नाही. जवळची व्यक्ती गेली की लाकडे मागवून तिला अग्नी द्यावा किंवा जमिनीत गाडावे हाच आपला प्रघात आहे. सर्व जाती धर्माचे लोक साधारण पणे मृत्यू नंतर मृताच्या शरीरावरील मौल्यवान दागिने काढून घेतात. सोन्याचे दागिने किमती आहेत ते कसे वाया घालवणार ? हे सर्वांना समजते परंतु परमेश्वराने दिलेले त्याहूनही अनमोल दागिने म्हणजे डोळे, त्वचा ई. जमिनीत गाडून मातीमोल करणे किंवा जाळून टाकणे आपल्याला कितपत पटते?

आज आपल्या भारतीयांचा अवयव दानाकडे पाहण्याचा दृष्टीकोन निश्चितच बदलत आहे, परंतु तो अजूनही ठामपणे बदलायला हवा. देवाचे आभार मानू या की आम्ही दात्याच्या भूमिकेत आहोत मृत्य नंतर अवयव दान करणार आहोत, कल्पनाच करवत नाही की आम्ही याचकाच्या यादीत असलो तर काय अवस्था होईल आमची?

वैद्यक शास्त्र अतिशय प्रगत झाल्याने अवयवदान खूप सोपे व सोयीचे झाले आहे. तरी सुद्धा लोक धर्माची आड घेतात. कुराण, पुराण किंवा बायबल काळात मृताचे अवयव प्रत्यारोपण करून कोणाचा जीव वाचवता येईल इतपत वैद्यक शास्त्र प्रगत नव्हते. अन्यथा आज आपल्या सर्वांचा धार्मिक प्रघात असता. आजारी पडल्यास ईलाज आजच्या प्रगत शास्त्राचा पण अवयवदानाचा विषय आल्यावर आधार पुराण शास्त्राचा? केवढा हा विपर्यास? त्यामुळ अवयव दान हा सार्वजनिक प्रघात व्हायला हवा. प्रत्येकाने जात पात धर्म न पहाता दान करावे. एखाद्याने नाही केले तर त्याला मोठा प्रश्न पडावा की मी अवयव दान केले नाही तर लोक काय म्हणतील?






वेळोवेळी सामाजिक, धार्मिक रूढी-परंपरा, अज्ञान, अंधश्रद्धा या आडव्या येत गेल्या. आता आता कोठे अवयवदानाची माहिती व प्रसार होत चाललाय परंतु तरी देखिल लोकांची उदासीनता किंवा पारंपारिक पद्धतीच्या अंत्ययात्रा व तेच ते धर्मावर (अंधश्रद्धेवर) आधारित मृत्युनंतरचे क्रियाकर्म, कर्मकांड या सर्वांमुळे परमेश्वराने बहाल केलेला अनमोल खजिना मानव जातीच्या उपयोगात येऊन कोणाला जीवनदान मिळण्यासारखे असून सुद्धा आपल्याकडून दुर्दैवाने त्याची राखरांगोळीच केली जाते आहे.

देहदान केले आणि अग्नी दिला नाही तर मोक्ष मिळणार नाही , आत्मा भरकटत राहील, कावळा पिंडाला शिवणार नाही नेत्रदान केल्यास पुढच्या जन्मी मी आंधळा जन्माला येईन इत्यादी भ्रामक कल्पनांच्या आधारे

नकारात्मक भूमिका घेऊन अज्ञानी (?) लोक पळवाट काढतात. खरं पहाता ह्या गोष्टी कोणत्याही धर्मग्रंथात सांगितलेल्या नाहीत , देहदान अवयवदानास सर्व धर्मांनी व धर्मगुरूंनी मान्यता दिलेली आहे. मुळात ‘ दान हा प्रत्येक धर्माचा पाया आहे ’. शवाचे दहन किंवा दफन करणे म्हणजे एक प्रकारे अग्नीला किंवा भूमीला आपण ते दानच करतो असे नाही का? मग त्याप्रमाणे तो देह आपल्या म्हणजे मानवजातीच्या पुनर्जीवनासाठी कामास येण्याच्या उदात्त हेतूने अवयवदान करणे उत्तम नाही होणार का? शरीर हे क्षणभंगूर आहे, मृत्यूनंतर देह संपणार. मात्र अवयरुपी जिवंत रहायचे असेल तर ‘ अवयव दान ‘ करावे.

रक्तदाना बाबत सुद्धा समाजात असेच गैरसमज होते. आता बरीच जागरूकता आलेली आहे खरं तर रक्त हा शरीराचाच एक हिस्सा आहे तो जिवंतपणी आपण सर्वजण नियमितपणे दान करू लागलो आहोत म्हणजे तो विषय आता आपल्या चांगलाच अंगवळणी पडला आहे. मात्र अजून आपल्या समाजात अवयवदानाविषयी फारशी जागृती नसल्याने हजारो रुग्ण वर्षांनुववर्ष प्रतिक्षा करत करत मृत्यूला सामोरे जात आहेत.

कुठलाही रुग्ण मृत झाल्यानंतर त्याचे शोकाकुल नातेवाईक अवयव दानाचे महत्त्व समजून घेण्याच्या मन:स्थितीत नसतात. त्यामुळे त्या वेळच्या अवयव दानाच्या सूचनांना ते विरोध करतात. अनेक देशांत मृत व्यक्तीने मरण्याआधी जर आपले अवयव दान करू नये, असे स्पष्ट जाहीर केले असेल, तरच त्या व्यक्तीचे अवयव दान केले जात नाही. अन्यथा प्रत्येक व्यक्तीची या अवयव दानाला मान्यता आहे, असेच मानून त्वरित कार्यवाही केली जाते. आपल्या देशात अशी व्यवस्था नाही. प्रतीक्षा यादी व नेत्रदाते यात फार मोठे अंतर आहे. श्रीलंके सारखा छोटासा देश तर जगात नेत्र निर्यातीत जगात नंबर एक आहे. मात्र सव्वाशे कोटी लोकसंख्या असलेल्या भारताला मात्र त्यांच्या कडून नेत्र आयात करावे लागतात हि किती लाजिरवाणी गोष्ट आहे ? नेत्रदान त्वचादान अवयवदान देहदान याला प्रघाताने अवयवदान म्हटले आहे. ते प्रत्यक्ष करायचे असल्यास काय करावे हे आत्ताच नीट समजून घ्यावे व यापुढे आपल्या माहीतीत कोणाचा मृत्यू झाल्यास त्याच्या नातेवाईकांना सांत्वना देऊन नेत्रदान ई. साठी प्रोत्साहीत करावे. लक्षात असू द्या, आपलं एक सकारात्मक पाऊल आजच्या काळाची पायाभूत गरज आहे. आपल्या आयुष्यात एक तरी अवयवदान घडवून आणा.



मृत्युच्या वेळेपासून तीन ते चार तासात नेत्रदान / त्वचादान होणे उत्तम. काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये सहा तासाच्या आत नेत्र स्वीकारले जातात. त्या नंतर क्षमस्व.

· सर्वप्रथम नजदिकच्या नेत्रपेढीस बोलवावे किंवा जवळच्या नेत्रदान व त्वचादान समन्वयक (Organ Donation Coordinator) / संस्था यांना फोन करून त्यांचे मार्गदर्शन घ्यावे. असे महत्वाचे फोन नंबर कुटुंबातील सर्वांना सहज सापडतील अशा ठिकाणी लिहून ठेवलेले असावेत.

· नेत्रदानासाठी दात्याच्या शवावरील सर्व पंखे बंद करावे, A/C (उपलब्ध असल्यास) चालू करावा. [ज्यामुळे डोळे सुकणार नाहीत.]

· डोक्याखाली किमान दोन ऊशा (2 Pillows 6” high) ठेवाव्यात.

· बंद डोळयांवर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवाव्यात (शक्यतो बर्फाच्या) [ ज्यामुळे नेत्रपटल ओले राहतील].

· डॉक्टर कडून मृत्यूचे कारण, (Cause of Death) वय, वेळ नमूद केलेले मृत्यू सर्टिफिकेट (Death Certificate) प्राप्त करून आय बॅंकेस पाठवावे (WhatsApp/ Scan). [आय बॅंकेस निर्णय घेणे सोपे जाते] शक्य असल्यास त्याच वेळेस दहा सीसी रक्ताचा नमुना घेऊन ठेवल्यास उत्तम.

· नेत्रपेढीचे व त्वचापेढीचे तज्ञ किंवा डॉक्टर घरी येऊन (मृतदेह दवाखान्यात असल्यास तेथे येऊन) नेत्रपटल / त्वचा काढून नेतात (या प्रक्रियेस प्रत्येकी सुमारे अर्धा तास लागतो).

· नेत्रदान / त्वचादान नंतर चेहरा किंवा देह अज्जिबात विद्रूप होत नाही. (कदाचित नेत्रदान झाले आहे किंवा नाही हे समजतही नाही).

· ज्या दात्याला मृत्युसमयी कावीळ, हिपॅटायटिस बी/ सी , एड्स, कॅन्सर, शरीरभर सेप्टिक पसरणारे इन्फेक्शन इ. आजार असल्यास, अशा परिस्थितीत नेत्रदान त्वचादान होऊ शकत नाही. याव्यतिरिक्त सर्व माणसे नेत्रदान करू शकतात. हे संपूर्ण अनामिक दान आहे. घेणाऱ्याला अथवा देणाऱ्याला त्याची माहिती दिली जात नाही.

· डोळयाच्या काळया बाहुलीवर घड्याळाच्या काचे सारखा भाग आहे. या काचेला 'कॉर्निआ' ( Cornea / पारपटल ) असे म्हणतात. फक्त या इतक्याच भागाचे रोपण करता येते. संपूर्ण बुबुळ / डोळा वापरला जात नाही. कॉर्निया मधे रक्तवाहिन्या नाहीत त्यामुळे कोणतेही क्रॉसमॅचिंग न करता कॉर्निया यशस्वीपणे कलम करून कोणालाही बसवता येतो.

· विशेष बाब म्हणजे; नेत्रदानात फक्त कॉर्निया रोपण केले जात असल्यामुळे, कॉर्निया व्यवस्थित असून अन्य कारणामुळे अंधत्व आलेली अंध व्यक्ती देखील नेत्रदान दान करू शकते !

· डायबेटीस असलेली, जाड भिंगाचा चष्मा असलेली, मोतीबिंदूचे ऑपरेशन झालेली व्यक्ती सुद्धा नेत्रदान करू शकते.

· नेत्रदान, त्वचादाना साठी वय, लिंग, रक्तगट यांची कोणतीही मर्यादा नाही. नेत्रदान, त्वचादान, देहदान या सर्वांसाठी ‘सहा तासांच्या आत’ ही वेळेची मर्यादा फार फार महत्वाची आहे.

आपल्या नेत्रदानामुळे किमान दोन (नवीन तंत्रज्ञानामुळे यापुढे चार ) दृष्टीहिनांना आपण ज्योती प्रदान करू शकतो ज्यामुळे त्यांचे जीवन नुसते बदलतच नाही तर ते कायमचे एका शापातून मुक्त होतात.

यापुर्वी रजिस्ट्रेशनचा फॉर्म भरलेला असला किंवा नसला तरी प्रत्यक्ष अवयवदाचे वेळी नातेवाईकांच्या संमत्तीने अवयवदान करता येते.

रक्तदान जिवंतपणी करता येते परंतु नेत्रदान मृत्यूनंतर करावयाचे असते,जगातलं एकमेव दान, जे मी करूनही माझ्या हाताने होऊ शकत नाही. माझी दानाची इच्छा माझे जवळचे नातेवाईकच पूर्ण करू शकतील, म्हणून आपण नुसते इच्छापत्र donor’s card भरून न ठेवता आपल्या जवळच्या जास्तीत जास्त नातेवाईकांना आपल्या इच्छेबाबत सांगून ठेवावे. आपले नेत्रदान केले जाऊन त्या डोळयाचे रोपण होऊन कुणाला तरी दिसू लागेल, आपली अंतिम इच्छा नक्की पूर्ण होईल अशी खात्री झाल्या नंतर जगण्याचे एक अलौकिक समाधान व आनंद आपण अनभवू शकतो. तेंव्हा महत्वाचे म्हणजे तुमच्यासोबत तुमच्या जिवलगांनाही हे वाचायला देऊन आनंदाच्या क्षणी आठवण करून द्या. बहुदा वाढदिवस किवा लग्न इत्यादी कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये आपली इच्छा जाहीर केल्यास दुहेरी लाभ होऊ शकतो जेणेकरून इतर आप्तजनांना आपल्या इछेची माहिती होईल व ते देखील देहदान अवयव दानास प्रवृत्त होतील. स्वतःच्या प्रयत्नाने एकाचे तरी नेत्रदान घडवून आणा.

नेत्रदान खूप सोपे आहे ! रक्तदानापेक्षाही सोप्पं आहे !!

त्वचादान : शरीरावर त्वचेचे एकंदर सात थर असतात त्या पैकी सर्वात वरची त्वचा डरमोटोम नावाच्या ब्याटरी वर चालणार्या छोट्याशा मशीनने घेतली जाते. कांद्याच्या दोन पडद्यामधील दुधी रंगाचा अतिशय पातळ पापुद्रा असतो तितकी पातळ त्वचा काढली जाते. बर्याच वेळी वैद्यकीय व्यवसाय करणार्यांना सुद्धा त्वचादानाबद्दल निट माहिती नसते. लोकांमध्ये तर भयंकर गैरसमज असतात त्यांना संपूर्ण शरीर सोलून काढतात असेच वाटते. पण कोण सांगणार हे सत्य? सत्य हे आहे की दाढी करतांना तरी कधीतरी रक्त येतं पण त्वचादानामध्ये रक्ताचा एक थेंब देखील येत नाही. पायाच्या घोट्यापासून जांघेपर्यंतच्या भागाचीच त्वचा घेतली जाते. काही परिस्थितीमध्ये पाठीच्या भागाची त्वचा सुद्धा उपयोगात आणू शकतो. शरीर विद्रूप होत नाही पायाला अतिशय योग्य रीतीचे बँडेज लावले जातात. sजर कधी अपघाताने शरीर फाटले तर टाके मारून ते शिवता येते, हाडे तुटली तर कृत्रिम रॉड टाकता येतो, पण भाजण्याच्या जखमेवर कोणतेही हमखास बाह्य उपचार नाहीत. निसर्गनियमाप्रमाणे आतून येणारी त्वचाच जखम भरून काढू शकते. पण त्वचा खोलवर भाजल्यास त्या जागी जिवंत त्वचापेशीच शिल्लक राहत नाहीत त्यामुळे हवेतून होणार्या सततच्या जंतुसंसर्गामुळे जखमा भरत नाहीत व चिघळतच रहातात, रुग्ण महिनोन्महिने मरण यातना भोगतच रहातो. अशा केसेसमध्ये त्वचारोपणाचाच मार्ग उरतो. दानात मिळालेली त्वचा जखमेवर कोणत्याही विशेष ऑपरेशन शिवाय नुसती झाकल्यास काही दिवसातच हमखास जखमा भरून रुग्ण जादुप्रमाणे बरा होतो. इतके सारे माहिती होऊनसुद्धा आपण ती त्वचा मातीमोल करतो, जाळून टाकतो... कधी उघडणार माझ्या बांधवांचे डोळे?

· देहदान : शरीर विज्ञानशास्त्राच्या अभ्यासासाठी संपूर्ण देहदान करावयाचे असल्यास, विहित नमुन्यात फॉर्म (4-A) [फॉर्म 4-A नगरपालिका अथवा हॉस्पिटल्स मध्ये उपलब्ध असतो तो भरून देह किमान एक तरी जवळच्या नातेवाइका मार्फत सहा तासाचे आंत नजीकच्या सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात(Govt. Medical College) मध्ये त्यांची पूर्वपरवानगी घेऊन आपण पोहोचवावा लागतो. यातील कोणतेही फक्त एक, दोन किंवा तिन्ही दान करण्याचा निर्णय मृताच्या नातेवाइकांच्या संमतीनुसार घेता येतो. देहदान करण्यासाठी डोनर फॉर्म कोणत्याही संस्थेमार्फत कोणत्याही गावी भरला आणि मृत्यु दुसर्या ठिकाणी झाला तरी काहीही अडचण नाही. कोणत्याही प्रकारचा अवयव दानाचा फॉर्म भरलेला नसला तरी जवळचे वारस ऐन वेळी निर्णय घेऊन आपल्या इच्छेप्रमाणे दान करू शकतात.

मृत्यू थांबवून थांबत नाही, आणि मागून मिळत नाही. तो येणार तेंव्हा येवो आपण त्यानंतर सुद्धा अवयव रूपाने जिवंत रहाणार आहोत. जीवन सुंदर आहे जगून घ्या. सर्वांचे मंगल होवो ..

अवयवदान : बहुतेक लोकांचा असा समज आहे कि आपला कधीही आणि कसाही मृत्य झाला तर आपल्या मृत्युनंतर आपले सारे अवयव दान करता येतील पण ते खरे नाही ‘जिवंत अवयवच’ शरीरातून काढले जातात जिवंत म्हणजे ज्यांना रक्तपुरवठा सुरु आहे असे अवयव. अवयवदान हे प्रामुख्याने दोन प्रकारात केले जाऊ शकते.

1. जिवंतपणीचे दान ( Live Donation)

जिवंत व्यक्ती केवळ आपल्या नातेवाईकांसाठीच अवयव दान करू शकते. कुटुंबातील सदस्य म्हणजे मुलगा, मुलगी, आईवडील, भाऊबहिण अथवा पती किंवा पत्नी. नातेवाईक किंवा मित्रपरिवारातील एखाद्या व्यक्तीस जिवंतपणीच आपल्या शरीरातील एखादा अवयव दान करायचा असल्यास त्यास महाराष्ट्र शासनाची (ZTCC ही

महाराष्ट्र शासनाची अधिकृत संस्था आहे) परवानगी घेणे आवश्यक असते. अवयवदानानंतर दात्याच्या प्रकृतीवर दुष्परिणाम होणार नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतरच ही परवानगी दिली जाते. त्यामुळे जिवंतपणी किडनी व यकृताचे काही प्रमाणात दान केले जाऊ शकते.

2. मृत्यू पश्चात (कॅडेव्हर डोनेशन) : प्रत्येक व्यक्ती नेत्रदान व त्वचादान करू शकते; नव्हे प्रत्येकाने ते करायलाच हवे. तसेच आपण संपूर्ण देहदान देखील करू शकतो. मात्र प्रत्येक व्यक्तीचे अवयवदान होऊ शकेलच असे शक्य नाही. कारण अवयवांच्या प्रत्यारोपणासाठी (ORGAN TRANSPLANT ) अवयवांना रक्तपुरवठा चालू असणे आवश्यक आहे. म्हणून मेंदुमृत ( BRAIN DEAD ) व्यक्तीच अवयवदान करू शकते, जी अवस्था अतिदक्षता विभागातच ( ICU ) शक्य आहे. एखादा अपघात झाल्यानंतर रुग्णाला आय सी यु मध्ये दाखल केले जाते, विविध उपचार करून देखील रुग्णाकडून उपचारांना प्रतिसाद दिला गेला नाही तर न्यूरोसर्जन मेंदू तपासणी करतात त्या वेळेस जर मस्तिष्क स्तंभ मृत झाल्याचे निदान झाले तर तो रुग्ण ( BRAIN STEAM DEAD ) मेंदू मृत घोषित केला जाऊ शकतो. ही अवस्था कोमा सारखी असते. कोमात असलेला रुग्ण कधीतरी बरा होण्याची थोडीशी शक्यता असू शकते परंतु मेंदुमृत रुग्ण कधीही बरा किंवा जिवंत होऊ शकत नाही. (Non Reversible Death ) अशा अवस्थेत उपचार करणार्या डॉक्टरांना रुग्ण मेंदुमृत झाला आहे असे घोषित करता येत नाही. मेंदुमृत असण्याची शक्यता वर्तवल्या नंतर सरकार ने मान्यता दिलेल्या 4 तज्ञ डॉक्टरांची टीम नेमली जाते त्यातील कोणतेही दोन डॉक्टर सुरुवातीला अॅप्नेआ( APNEA )टेस्ट घेतात, त्यांन ती टेस्ट पॉझीटीव आढळल्यास आणखी तीन तासानंतर वेगळ्या दोन डॉक्टरांची टीम येऊन खात्री करते त्यात सत्य आढळल्या नंतरच रुग्णाला मेंदुमृत घोषित केले जाते.

अशा स्थितीत रुग्ण मृत झालेला असूनही कृत्रिम उपकरणांच्या आधाराने त्याच्या हृदयाची क्रिया चालू ठेवल्यामुळे मॉनिटरचा ग्राफ चालू असतांना दिसतो. हृदयाची स्पंदने उपकरणामुळे चालू ठेवल्याने संपूर्ण शरीरभर रक्तसंचार फिरता राहून प्रत्येक अवयवाला देखील रक्त मिळत रहाते. ही स्थिती अवयवदानासाठी कामास येऊ शकते. ही वेळ रुग्णाच्या नातेवाईकांनी संमती द्यावयाची निर्णायक घडी असते. नातेवाईकांनी संमती दिल्यास, अवयवदाता मृत्युच्या दारात अडखळलेल्या आठ अभागी जीवांचे प्राण वाचवून इतर अनेकांचे जीवन दुखःमुक्त करू शकतो. अवयव दान केल्यानंतर देह विकृत होत नाही. अगदी ऑपरेशन केल्यानंतर जशी असते तशीच रुग्णाची काळजी घेऊन अंत्यविधीसाठी देह नातेवाईकांच्या ताब्यात दिला जातो.

नेत्र, त्वचा, अस्ति, अस्थिमज्जा, रक्तवाहिन्या, हृदय, फुफ्फुस, यकृत, स्वादुपिंड, मुत्रपिंड इत्यादी महत्वपूर्ण अवयवांचे दान करणे हे सर्वांत श्रेष्ठदान नाही कां ? मानवाने मानवाच्या कामी यावे व ‘मरावे परि अवयवरुपी उरावे’.

देहदान अवयवदाना बाबतीत असलेल्या गैरसमजुतींवर लोक पटकन विश्वास ठेवतात पण योग्य व्यक्ती संस्था यांच्यामार्फत सत्यता समजून घेत नाहीत. एक सुज्ञ नागरिक म्हणून चला आता तरी मोघम माहिती पेक्षा सखोल माहिती मिळवून या विषयाचा पुरस्कार प्रचार व प्रसार करून प्रत्यक्ष देहदान करण्याची परंपरा सुरु करू या. महाराष्ट्र राज्य अवयवदान- देहदान महासंघ, “ देहमुक्ती मिशन ” दधिची देहदान मंडळ सारख्या कित्येक संस्था ही चळवळ अनेक वर्षांपासून निस्वार्थ भावनेने राबवत आहेत. आपल्या विभागात जागृती कार्यक्रम आयोजित करून लोकांना सखोल माहिती करून देण्यासाठी अवयवदान- देहदान महासंघ सदैव तत्पर आहे. ही माहिती वाचून जर आपण अवयव दाना साठी इच्छुक असाल किंवा काही शंका असतील किंवा या कामात मदत करू इच्छित असाल, कोठे जनजागृती व्याख्यान आयोजित करू इच्छित असाल तर प्रत्यक्ष जरूर भेटा. हाच लेख इतरांपर्यंत पोहोचवून देखील आपण सहभागी होऊ शकता. आपल्या आजूबाजूला कोणाचाही मृत्य झालेला आढळल्यास त्या कुटुंबाला

सांत्वना द्या , शांतपणे ह्या माहितीच्या आधारे त्यांना मार्गदर्शन करून प्रत्यक्ष कोणतेही अवयवदान करण्यास प्रवृत्त करा. चला या चळवळीत सहभागी होऊन संपूर्ण शरीर तंदुरुस्त असूनसुद्धा केवळ एखादाच अवयव निकामी झाल्याने डोळ्यादेखत तडफडणारा एखादातरी अभागी जीव आपल्या प्रयत्नाने वाचवण्याचा संकल्प करू या. आपला निर्णय, सर्वस्वी आपला आहे.

महाराष्ट्रातील सर्व जिल्हा प्रशासनिक रुग्णालयातून मदत वा मार्गदर्शन मिळू शकते.

**मुंबईच्या जवळपासचे काही महत्वाचे फोन नंबर :**

EYE BANK : All India Toll Free 1919

EBCRC Eye Bank Parel Opp. KEM Hospital Mumbai : 02224164342 / 4162929

Rotary Eye Bank Borivali (E), Tel: 98216 01919 / 98218 01919.

SAHIYARA EYE BANK B/305 Manas Residency, Teen Petrol pump, L.B.S. Road, Thane 022 2534 1919 93206 11919 / 93213 11919 / 93204 11919

SKIN BANK : National Burns Centre, Sector-13, Airoli, Navi-Mumbai Phone No: 022-2779 6660 /61/62/63/64 or 27643333

MASINA SKIN BANK : Sant Savta Marg near Gloria Church Byculla East. Mumbai-27 ( 9 am to 5 pm 022 61841325 and after 5 pm to 9 am 61841238 ) Mr. Charudatta vaidya +91 99301 80666 ; +912261841251 Seema 96191 44624

Skin Bank Sion Mumbai. 022 2407 6381 / 022 24063000. Helpline No: 2779 3333 * 022 24076381 Ext. 440 / 248

BODY DONATION : INFORM J.J. Hospital Mumbai’s RMO / CMO / Doctor on duty_022 23735555 ext. 2302. 23769400, 23735543, Or 2) KEM Anatomy Hospital; +91 22 2410 7447 Work : 022 2410 7605; Dr. Yuvraj Bhosle +91 92210 01002 ; +91 70210 27484; Dr. Abhijit Dhende +91 99607 80400

KEM HOSPITAL: Anatomy Dept. KEM Anatomy Hospital; +91 22 2410 7447 ,Work : 022 2410 7605; Dr. Yuvraj Bhosle +91 92210 01002 , +91 70210 27484. Dr. Abhijit Dhende +91 99607 80400 .

Rajeev Gandhi Hospital Kalwa, Thane 022 25347784. Or Any nearest Govt. Medical College prior consent.

ORGAN DONATION : ZTCC at Sion Mumbai 022 24028197. 9320063468 / 9167663469 E-mail: organtransplant@ztccmumbai.org or Contact treating hospital's intencivist.

# इम्म्यानुएल - परमेश्वर आपल्या बरोबर

**- रे. फा. एलायस रॉड्रिग्ज**

याकोबला परमेश्वराने झोपेत स्वप्नामध्ये दर्शन दिले आणि त्याला आश्वासन दिले की□मी तुझा प्रभू आहे. मी तुझ्या बरोबर असेन. तुला खायला अन्न आणि अंगावर घालायला कपडे मी पुरवीन. मी तुला वचन देत आहे ते पूर्ण करीपर्यंत मी तुझ्या बरोबर असेन. परमेश्वराने दिलेला शब्द बदलत नाही. त्याचा शब्द तो विसरत नाही. माणसाने पाप केले तरीसुद्धा तो त्याचे वचन सोडून देत नाही. परंतु जितक्या प्रमाणात मनुष्य पाप करतो व त्या पापामध्येच खितपत पडून राहातो तितक्या प्रमाणात तो परमेश्वरापासून दूर गेलेला असतो□असा अनुभव त्याला येतो. मग लोकांना वाटते परमेश्वर दूर गेलेला आहे. आपण त्याला दूर लोटतो पण परमेश्वराची प्रीती ऐवढी मोठी आहे की□तो दुरावलेल्या लोकांना□पापी लोकांना जवळ आणण्याकरिता त्याचा पुत्र पाठवतो. येशूच्या जन्माच्यावेळेला जेव्हा त्याला नाव देण्याचा विषय आला तेव्हा इम्म्यानुएल हे नाव द्यावे□इम्म्यानुएल म्हणजेच परमेश्वर आपल्या बरोबर आहे□असे देवदूताने सुचविले. म्हणजेच येशू आपल्या जवळ आहे. त्याच्या पवित्र आत्म्याच्या रूपाने येशू आपल्यामध्ये उपस्थित आहे. ज्या माणसाला परमेश्वर माझ्या जवळ आहे□परमेश्वर माझे संरक्षण करतो□परमेश्वराची शक्ती माझ्यासाठी उपलब्ध आहे□परमेश्चराचा प्रकाश□प्रेम□दया मला मिळू शकते□हा विश्वास ठेवायचा आहे□

त्याने तो विश्वास प्रभू येशूवर ठेवला पाहिजे. शुभवर्तमानामध्ये आपण बघतो, येशू म्हणतो, "मुली, तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे". जर दिवसभर हा विश्वास बाळगला तर आपल्याला येशूद्वारे परमेश्वर आपल्या जवळ आहे□हा अनुभव येतो. लोक र्व याच गोष्टींच्या मागे लागतात आणि लोकांना वाटते की□ आपण अमुक मिळवले□किंवा तमुक केले तर आपण सुखी होणार. पण ते सगळे केल्यावरसुद्धा माणसाचे जीवन पोकळ राहते□अतृप्त राहते□माणूस असमाधानी राहतो कारण संत अगस्तीन म्हणतो त्याप्रमाणे परमेश्वराने आपले ह्यदय त्याच्यासाठी घडवले आहे आणि जो पर्यंत त्या ह्यदयात परमेश्वर वस्ती करत नाही तो पर्यंत ते रिकामीच राहणार. आपल्याला वाटत असेल परमेश्वराने आपल्या ह्यदयात वस्ती करावी□तो आपल्या जवळ आहे□याचा अनुभव आपल्याला येत राहावा तर येशूवरील श्रद्धेमध्ये आपण टिकून राहिले पाहिजे.

"मी त्याच्या कपडयाच्या गोंडयाला जरी स्पर्श केला तरी बरी होईन," असा विश्वास शुभवर्तमानातील बाईने ठेवला. आपणसुद्धा प्रत्येक बाबतीत येशूवर विश्वास ठेवला पाहिजे. परमेश्वर आपल्या जवळ आहे□आपल्या बाजूचा आहे□आपला संरक्षण करणारा आहे□आपला विकास धडवून आणण्यासाठी साहाय्य करणारा आहे□ह्या शाश्वतीचा अनुभव घेत राहिले पाहिजे.

परमेश्वराच्या योजनेमध्ये आब्राहम□त्याचा मुलगा इजहाक आणि इजहाकचा मुलगा जेकब हे तीन पुरूष आपल्या श्रद्धेचे आदिपिता आहेत. आदिपिता म्हणजे पहिले वडील. असा सन्मान त्यांना देण्यात आला आहे आणि तिसरा आदिपिता जेकब किंवा याकोब. यांच्याविषयी आपण उर्त्प तीच्या पुस्तकात

वाचतो, "परमेश्वराने त्यांना वचन दिले की, मी तुला जी काही वचने दिलेली आहेत, ती पूर्ण होईपर्यंत मी तुझ्या बरोबर असेन".

आपल्यालासुद्धा प्रभू येशू खिस्त देण्यात आलेला आहे. म्हणजे परमेश्वर आपल्या बरोबर आहे, ही जाणीव आपल्याला सतत असावी. विशेष करून अडचणीमध्ये, दु:खामध्ये, संकटामध्ये हे सत्य आपण विसरू नये म्हणून आपण कृपा मागू या.

## समारोप

प्रभो येशू, तुझी प्रीती अमर्याद, कधीही न बदलणारी, निष्ठावंत अशी आहे. मनुष्य पाप करून तुझ्यापासून दूर जात असला तरी तुझ्या प्रीतीमुळे तू मात्र तुझा पुत्र पाठवून पुन्हा एकदा माणसाला आश्वासन दिले आहे, "मी तुमच्या बरोबर आहे."

तुझा शब्द आणि तुझे कृपासंस्कार या मधून तुझ्या सामर्थ्याची, तुझ्या उपस्थितीची जाणीव तू आम्हाला देत असतोस. तू आमच्या बरोबर आहेस, ह्या सत्याचा प्रत्यय प्रभू खिस्ताद्वारे तू आम्हाला देत असतोस, याबद्दल आम्ही तुला धन्यावाद देतो.

प्रभो येशू, तुझ्या पवित्र आत्म्याद्वारे, प्रभू खिस्ताद्वारे, आमच्या श्रद्धेद्वारे तू आमच्या बरोबर आहेस. तू आमचे संरक्षण करतोस, तू आम्हाला सर्वकाही पुरविणारा आहेस, याबद्दल आम्ही तुला धन्यवाद देतो. जे लोक तुझे आभार मानायला विसरतात, तुझी उपासना करायला विसरतात त्यांच्या नावानेदेखील आम्ही तुझे आभार मानतो, तुझी उपासना करतो.

तुझ्या बलिदानाच्या कृपासामर्थ्याने तुझ्यावरील आमची श्रद्धा बळकट कर. श्रद्धेद्वारेतू आम्हाच्या बरोबर आहेस, ही जाणीव आम्हाला सतत राहू दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू खिस्ताद्वारे करतो. आमेन.

# सिंगापूर (प्रवास वर्णन)

--- सायमन रॉड्रिग्ज, आगाशी

दिवाळी व्हेकेशन मीनॅ सिंगापूरला फॅमिलीबरोबर फिऱ्या गॅलतॉ, फ्लाईट सिंगापूरशा चांगी एयरपोर्टवर लॅंड होयाशा टायमामीनॅ अनाउन्समेंट जाली ... "Passengers please pay attention.. if any Drugs found with any person in Singapore, we have Death Penalty clause for this offense" एकंदरीत त्या देशाबद्दल खूप कुतुहूल वाटला .. फ्लाईटमिन्नॅ बायार पडॉन इमिग्रेशन, लगेज कलेक्शन यॅ सोपस्कार अवघ्या दहा मिंटामीनॅ पार पडलॅ. ड्यूटीफ्री शॉप मिनॅ गेल्यानंतर तडे आहा समाजाला कि तुमी लिगली प्रत्येक माहनामागॅ जी लिकर अलाऊड हाय ती घेऊ शकात्या, पन सिगारेट किंवा तंबाखू पदार्थ घॅटलॅ तॅ त्याओर खूप हेवी टॅक्स भऱ्या लागातॅ...

आमी सिंगापूरला एक आठवडॉ रेले आन खुब फिरले. तडशे टुरिस्ट प्लेसेस, युनिव्हर्सल स्टुडिओ, सेंटोसा आयलंड, मत्सालय, प्राणिसंग्रहालय, गार्डन बाय दि बे, सिटी टूर बाय बस, नाईटवॉक बाय द बे यी सगळा कॅला. तडसा लोकल फूड खाला. भोटे भोटे शॉपिंग मॉल बगिलॅ. आन यी सगळा करीत असताना सिंगापूरसॉ इतिहास, संस्कृती आन अडशी जालेली प्रगती बगीली, त्याकरता लोक आन सरकार का का उपक्रम राबवितॅ ता बगीला. सिंगापूरशा टुरिस्ट प्लेसेसबद्दल कय हांग्या नाय कारन ते आपल्या सगळ्यांना माईत हात.. तर सिंगापूरबद्दल इतर माईती द्यासॉ प्रयत्न हाय जी आपल्या करतान कदाचित नवीन अहू शकातॅ.

सिंगापूर अवघा ३५ बाय ३५ किलोमीटर ऑडा छोटा बेट हाय. पूर्वी अडे जंगल होता. १२व्या शतकात जिगाळा अडे मलाया माहनू पयल्यांदा आलॉ तिगाळा त्याला अडे सिंह दिखलॉ, तिगाळा त्यानॅ या लॅंडसा नाव सिंघापुरा ठवीला आन तास नंतर सिंगापूर जाला. आदीशॅ स्थानिक लोक मावरा धऱ्याशॅ. सिंगापूर आदी मलेशियासॉ भाग हॉतॉ आन १९६३ ला तॉ सेपरेट जालॉ. त्या आदी या प्रांतोर पयला ब्रिटिश, मंग जापनीज आन परत ब्रिटिश यायी राज्य कॅला आन १९५७ ला मलेशिया स्वतंत्र जाला.

सिंगापूरशी लोकसंख्या ५५ लाख हाय. यात ३४ लाख तडशॅ नागरीक हात, ज्यांना मतदानाव अधिकार हाय आन ७ लाख पर्मनंट रेसिडेन्स हात (यांना दर ५ वहराला आपला ऱ्यासा लायसन रिन्यू कऱ्या लागातॅ) आन १४ लाख लेबर हात.

३४ लाख नागरिकामिनशॅ ७४% चायनीज, १३% आपलॅ तामीळीयन, ९% मलेशियन आन ४% इतर अही संख्या हाय.. चायनीज अडे १६व्या शतकात आले, तमिळ लोक १८व्या आन १९व्या शतकात ब्रिटिशायी रस्ते बांधाकरता लेबर मनून हाडले. (मलेशिया मीनॅ पन खूब तामिळ ओरिजिन हात) आन मलेशियन तॅ अडशॅ ओरिजिनल हातूस.

७ लाख पर्मनंट रेसिडेन्स हात, त्यात जगातशा सगळ्या कानाकोपऱ्यातशॅ लोक हात. यात १ लाख भारतीय हात. यांना नागरिकत्व नाय पन एक मतदान आन पासपोर्ट होडलो तॅ सिंगापूरशा नागरिकांना लागू अहलॅलॅ सगळॅ नियम आन सवलती लागू हात. १४ लाख लेबर हात तॅ अडे मॉल्स, रेस्टॉरंट, शिपिंग लाईन

आन हाऊस मेड मनून कामाला हात. यात जास्ती लोक फिलिपिन्स, इंडोनेशियन्स हात. बांगलादेश, भारत आन पाकिस्तानी पन यात हात.

सिंगापूरमीनॅ सगळ्या जातीधर्माआ लोक हाय आन सगळ्या जातीधर्मायि प्रार्थनास्थळे हात. सिंगापूर इक्वेडोरशा मॅरॅ अहल्यामुळॅ १२ मयनॅ एकूस सीजन आहातॅ.. ३२/३३ डिग्री तापमान आन कतेही पडनारॉ पानी. चायना, मलेशिया, कोरिया या बरोब्बर मीनॅ अहल्यामुळॅ दक्षिण आशियाशॅ सगळे भोटे भोटे बिजनेस हेडऑफिस अडे हात आन जगाशा दक्षिणेला समुद्रमार्गे जानारॉ माल वाया सिंगापूर जातॅ.

सिंगापूर जगासा सगळ्यात भोटा ट्रान्सशिपमेंट हब हाय आन त्यामुळॅ जगातसा खूप महत्वा बिजनेस सेंटर हाय. अडे दर वहरा १६० लाख टुरिस्ट येत्यात. त्यामुळे टुरिझम वर खूप भर हाय. सिंगापूर नागरिकांना १२वी नंतर २ वहरे कंपल्सरी मिलिटरी मीनॅ जॉईन हॉवॉन काम कऱ्या लागातॅ. सिंगापूरशी राष्ट्रीय भाषा मलाया (मलेशियन) हाय. पन रॉजशा वापराशी भाषा इंग्लिश हाय. त्या खालोखाल अडे तामिळ बोयला जातॅ.

सिंगापूरला एका फॅमिलीला एकूस घर आन एकूस फोर व्हीलर घ्यादो परवानगी हाय. अडे गाड्यो आन पेट्रोल खूप माग हाय. १० वहरानंतर गाडीआ परमिट आपोआप बाद होते. आन दर वहरा जोडयो गाड्यो बाद हॉत्यात तोडयोस नवीन गाडयो घ्यादो परमिशन मिळातॅ, मनून सिंगापूरला ट्रॅफिक जाम हॉयॅ नाय. गाडी जरी नहली तरी मेट्रोश्यो ४ लाईन्स आन पब्लिक ट्रान्सपोर्ट सिस्टीम एकदम एफिशियंट हाय आन प्रत्येक लोकॅलिटीशा अगदी ५/७ मिंटोर तुमाला पब्लिक ट्रांसपोर्ट मिळातॅ.

सिंगापूर अतिशय स्वच्छ, हिरवागार आन प्रशस्त शहर हाय. प्रशस्त रस्तॅ, रस्त्याबाजूनॅ सायकल ट्रॅक, रस्त्या दोनू बाजूनॅ नीट वाडविलेले झाडे, जागोजागी गार्डन्स आन भोटे भोटे तलाव. रोज पानी पडॉनपन कडे कसरा, पालॉपासोळॉ, चिखल गा सादा कागदाव तुकडॉ पन दिख्यासॉ नाय. मेट्रो, बस, एयर पोर्ट, मॉल, सिग्नल्स.. जडे जडे शक्य हाय तडे ऑटोमेशन केलेला हाय. सिंगापूरीयन्स हाकोटशा नाष्ट्यापासून रातशा डिनरपोत सगळा बायरुस खात्यात.. त्यामुळॅ अडे गल्लोगल्ली रेस्टॉरंट्स, फूड मॉल्स अगदी फुल्ल दिखात्यात. राईस (जाडा) आन त्या बरोबर फिश किंवा मटन-चिकन यी यांसा रेग्यूलर खाना. डिनर हांसा सातलास हॉतॅ. त्यामुळॅ राती ९ नंतर अडे रेस्टोरंट मीनॅ जीव्यादो मिळॅ नाय.

सिंगापूरीयन्स खूप फिटनेस फ्रिक हात. सायकलिंग आन जॉगिंग करनारे अगदी राती ११/१२ पोत दिखात्यात. क्रॅब चिली, प्रॉन्स चिली आन त्या खालोखाल बीफ यो अडश्यो फेवरीट डिश हात. जगातसा सगळ्या प्रकारसा फूड अडे अव्हेलेबल हाय. सिंगापूर खूप माग हाय. अडसा चलन सिंगापुरी डॉलर (१ सिंगापुरी डॉलर - ५५ इंडियन रुपीज). ४ जना फॅमिलीला एव्हरेज मयन्याला ४००० ते ६००० सिंगापुरी डॉलर खर्च येतॅ (रु २ ते ३ लाख). त्यामुळॅ अडे फॅमिली मेटेंन करना खूब माग हाय. अडे चुईंगगमवर बंदी हाय. सिगारेट खूप माग हाय. मात्र प्लास्टीकसॉ वापर मुबलक हाय.

ज्यांना मॅप कॉहॉ बग्यासॉ यी मायती हायदॅ तॅ तॉ सिंगापूरमीनॅ कत्तेस घालव्यासॉ नाय, ओडे जागोजागी साइन बोर्ड आन मॅप लाविलेले हात. सिंगापूर जोडा मॉर्डन शहर हाय, तॉडास त्यायी ब्रिटिशा काळापासूनश्यो जुन्यो गोष्टी, इमारती तह्योस जतान करॉन ठोयल्यात. कडाक नियम, त्यायी अंमलबजावनी आन हायेस्ट लिविंग कॉस्ट यामुळॅ सिंगापूरनॅ आपला एक स्टेट्स आणि स्टॅंडर्ड टिकवॉन ठोयले..

# आभासी जगात हरवलेलं अस्तित्व

--- सुहास बिऱ्हाडे Twitter- @suhas_news

सहज फेसबुकवर एका मित्राच्या वॉलवर नजर गेली. त्याला अनेकांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या होत्या. त्याची वॉल शुभेच्छांनी भरली होती. अनेकानी फुलांचे, केकचे स्टीकर पाठवले होते. काहींनी त्याला बिलेटेड शुभेच्छा दिल्या होत्या. अजून खाली गेलो. अनेक जण त्याला टॅग करत होते. एकाने त्याची विचारपूस केली होती. त्याला काही जण नियमित टॅग करत होते. या सगळया शुभेच्छांना, संदेशाना माझ्या त्या मित्राने काहीच प्रतिसाद दिलेला नव्हता. का देणार? कसा देणार? कारण माझा हा मित्र दोन वर्षापुर्वीच हे जग सोडून गेलेला आहे. पण फेसबुकच्या या जगाला खरे जग मानून वावरणाऱ्यांना ते कसं कळणार. हे सारं पाहून प्रचंड झाल्या. या आभासी जगात आपण एवढे गुरफटलेलो आहोत की आपल्या मित्र यादीतील मित्र जिवंत आहे की नाही, याची देखील आपल्याला माहिती नसते.

हे तंत्रज्ञानाचं जग आहे. या तंत्रत्रानाने जग जवळ आणलेलं आहे. एका क्लिकवर, एका सेंकदात जगातील कुठल्याही माणसाशी आपण जोडले जातो. पण मानवी भावभावना या तंत्रज्ञानाच्या आणि या तंत्रज्ञानातून आलेल्या समाजमाध्यमाच्या आभासी जगात हरवलेल्या आहेत. आपण या आभासी जगात एवढे गुरफटून गेलेलो आहोत, की निर्भेळ आनदाला पारखे झालेलो आहोत, नात्यातील गोडवा हरवून बसलेलो आहोत. जे समोर दिसतं त्यालाच खरं मानून त्या समोर आपण वागत असतो.

आभासी जगाबद्दल अनेकदा या समाजमाध्यमावर विनोद येत असतात. फेसबुकवर हजारो मित्र परंतु त्याच्या अंत्ययात्रेला केवळ घरचे कुटुंबिय अशा आशयाची एक साधी पण विचार करायला लावणारी पोस्ट. काय होतं या आभासी जगात. आपण फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, मेसेंजरवर असतो. या सर्व ठिकाणी ऑनलाईनचा दिवा जळतांना दिसला की तिच आपल्या अस्तित्वाची खूण असते, आपल्या जिवंतपणाचा पुरावा असतो.

वायफायची सुविधा दिवसेंदिवस अधिक सक्षम होऊ लागली, विनामूल्य होऊ लागली तसे लोकं वास्तव जगातून आभासी जगाकडे अधिक वेगाने जाऊ लागले, गुरफटू लागले. आपल्या फेसबुकवर किती जणांना आपण जोडलेले असतं?.. किती लोकं असतात? पाचशे, हजार, दोन हजार..पाच हजार. आपण सगळ्या गोष्टी आपल्या वॉलद्वारे त्यांच्याशी शेअर करत असतो. काय खाल्लं, कोणता सिनेमा पाहिला इथपासून फिलींग सॅड असा टॅग देत आपल्या भावना कळवत असतो. या हजारोंच्या मित्र यादीत जे लाईक करतात, जे कमेंट करतात त्यांच्याशीच संवाद साधतो. या मित्र यादीतून कुणी आपल्याला सोडून गेलं तेही आपल्याला कळत नाही. अगदी जवळचा एखादा असला आणि तो अचानक यादीतून निघून गेला तरी कळत नाही. कारण विचारपूस करतो ते याच आभासी जगात. प्रत्यक्ष भेटायला ना वेळ असतो ना आभासी जगातून निघण्याची फुरसत.

हे आभासी जग किती विचित्र असतं. ज्या व्यक्तीशी नियमित फेसबुकवर संवाद साधतो, टिवटरला फॉलो करतो, ती व्यक्ती प्रत्यक्षात समोर आली तर ओळखू शकत नाही. अनेकांना हा अनुभव येत असतो. समोर असतांना न बोलणे आणि आभासी जगात गेल्यावर गप्पा मारणे, अशी ही विचित्र स्थिती निर्माण झालेली आहे. पुर्वी मित्र बरेच दिवस नाही भेटले किंवा फोन नाही आला तरी प्रत्यक्ष भेटून चौकशी केली जायची. आता तुम्ही ज्याच्याशी नियमित फेसबुकद्वारे संपर्कात असाल आणि नंतर संपर्क बंद केला तरी तो विचारणार नाही. कारण कळणार नाही.

आभासी जगातलं तुमचं अस्तित्व केवळ तुम्ही लाईक करण्यावर, कमेंट करण्यावर असतं. आपल्याला समोर जे दिसतं तेच खरे मानून चालत असतो, हेच हे आभासी जग आहे

मला नियमित टॅग करणारी एक व्यक्ती कार्यक्रमात समोर भेटली. इतका जवळचा असल्याने मी त्याला भेटायला गेलो. त्याने ओळखलच नाही. मी ओळख दिल्यावर फार बोललाही नाही. मात्र नंतर पुन्हा फेसबुकवर नियमित टॅग करणं, कमेंट करण सुरू झालं. प्रत्यक्षातील मैत्री पेक्षा आभासी जगातील मैत्री अधिक जवळची वाटू लागली आहे.  आपण सतत कुठल्या ना कुठल्या स्क्रीन समोर असतो. ही स्क्रीन टिव्हीची असते, मोबाईल लॅपटॉपची असते. हीच स्क्रीन किंवा पडदा आपल्या आभासी जगाचा प्रवेशद्वार असते.

आभासी जगात वावरतांना नात्यातील गोडवा हरवला आहे तसा नैसर्गिक निर्भेळ आनंदालाही पारखे झालो आहोत. नाक्यावर जाऊन गप्पा मारणे हा प्रकार कसा बदलला आहे. नाक्यावर जमले तर हातात मोबाईल आणि डोकं त्यात खुपसलेलं असतं. आपले हास्य, राग, दुख या भावभावना इमोजीच्या स्वरूपात दाखवत असतो. व्हॉटसअॅपच्या अनेक ग्रुपवर आपण असतो. त्यात शंभर दोनशे जण असततात. त्यातील निम्म्याहन अधिक जणांना आपण ओळखत नाही. किंवा ओळख त्याच्या नावापुरती असते. त्यातील एकाचा वाढदिवस असतो. त्याला सगळे शुभेच्छा देतात. आपण ओळखत नसतो. सगळे शुभेच्छा देतात म्हणून आपणही त्याला शुभेच्छा देतो, तो आपल्याला धन्यवादही देतो. प्रत्यक्षात आपण कुणाला शुभेच्छा दिली हे माहित नसतं आणि कुणाला आपण धन्यवाद देतो हे त्यालाही माहिती नसतं. समोर भेटल्यावर दोघे एकमेकांना अनोळखी असतात.

आभासी जगातील भावना या नकली, बनावटी असतात. फेसबुक आपल्याला कुणाचा वाढदिवस आहे, याची सकाळी सकाळी 'टुडेज बर्थडे' या नावाखाली आठवण करून देत असतो. मग आपण त्याच आभासी जगात त्याला शुभेच्छा देतो. कितीही जवळचा मित्र असला तरी फेसबुकवरून त्याचा वाढदिवस कळतो. तुम्ही तुमचा वाढदिवस फेसबुकवरून लपवून बघा. त्या दिवशी अपवाद वगळता कुणीच तुम्हाला शुभेच्छा देणार नाही. तुमच्या वाढदिवसाची आठवण आभासी जगात तंत्रज्ञानाने करून दिली तरच ती होणार असते. अन्यथा नाही. मला आठवतं. पुर्वी क्रिकेटची मॅच जिंकल्यावर सगळे नाक्यावर जमायचे आणि तो आनंद एकमेकांना टाळ्या देत, हास्य विनोदात, गप्पांद्वारे साजरा करत असत. आता हे सारं व्हॉटसॲपग्रुपवर आणि फेसबुकवर दिसत असतं. या निर्भेळ आनंदला आपण मुकत नाही का.

हे आभासी जग आपल्याला सगळं काही चांगलं, चांगलं दाखवत असते. ते स्वप्नाळू असते. आभासी जग आपल्याला स्वप्नाकडे नेते. कारण आभासी जगात दिलेली माहिती सारी चांगलीच दिलेली असते. आपला फोटोही एडीट करून सुंदर बनवून टाकलेला असतो. ज्याच्याशी आपण प्रत्यक्षात संवाद साधू शकत नाही, त्याला रिक्वेस्ट पाठवून जोडून घेतो. त्याच्याशी संवाद साधला जातो. अशाच प्रकारे आभासी जगात माणसे जोडली जातात. ही नाती निर्जिव असल्याने भावभावना नसतात. त्यामुळे प्रत्यक्षातील तो अस्तित्वात असला काय की नसला काय काही फरक पडत नाही. माणूस मेल्यावर पासवर्ड माहिती असल्याशिवाय अकाउंट डिलीट करता येत नाही. त्यामुळे तो माणून मेला तरी फेसबुकवर आहे म्हणजे जिवंतच आहे, असा समज करून घेतला जातो. त्याला मेसेज पाठवताना एका मृत व्यक्तीशी संवाद साधतो आहे, याचीही कल्पना नसते.

आभासी जगात आपल्या भावनांचा विचार केला जात नाही. सारं काही आलबेल आहे, असा समज असतो आणि आपणही सारं काही चांगलं दाखविण्याचा प्रयत्न करतो. तंत्रज्ञान हवेच आणि त्या तंत्रज्ञानाचा वापर सकारात्मक गोष्टींसाठी हवा. केवळ निर्ज  तरच माणूकसी आणि माणूस म्हणून आपण एकमेकांना पाहू शकू...खऱ्या अर्थाने जिवंत राहू शकू.

# द्वंद – बेर्नादेत रुमाव, गास

मेरीच्या मनातील द्वंद तिच्याही नकळत तिच्या चेहऱ्यावर ऊमटले होते. असा कोता विचार आपल्याला शोभत नाही आणि तोही आपल्याला बहिणीसारखं किंबहुना त्यापेक्षा कांकणभर सरस प्रेम देणाऱ्या एलिझाबाबत आणि आपल्या अंगाखांद्यावर खेळलेल्या स्विडलबाबत. रोझमेरीने मान झटकली आणि ती पुन्हा किचनच्या खिडकीतून बाहेर डोकावून पाहू लागली. किचनच्या खिडकीतून तिला तिच्या परसदारातील दृश्य स्पष्ट दिसत होते. तेथे एकच गडबड, धावपळ चालू होती. विहिरी शेजारी असलेल्या मोठ्या आंब्याच्या झाडाखाली वडे काढण्याचे काम सुरू होते. त्यात शीला, उषा दोघी सोडल्या तर बाकी तरुण मुलंमुलीच होती. दुसऱ्या कोपऱ्यात बायका मुली शेंगा सोलत बसल्या होत्या त्यात हाताने सोलण्यापेक्षा तोंडाने सोलणे अधिक होते. कुणी लसूण-आले साफ करण्यात गुंतल्या होत्या. छोट्या मुलांना तेथे वावरायला मज्जाव होता. पण अधनंमधनं येऊन ती लुडबुड करत होती. मध्येच बियरच्या बाटल्या फुटत होत्या. थम्सअप ग्लासं फिरत होती. हास्याचे फवारे उडत होते. नाचं गाण्याला उधाण आले होते.

एलिझा वधूमाय इकडे तिकडे काय हवं नको ते जातीने  पाहत होती. दागिन्यांनी मढलेल्या, नव्या कोऱ्या शालूत एलिझा अगदीच तरुण वाटत होती. नकळत रोझमेरीची नजर पुन्हा एकदा आपल्या हातापायावर  फिरली. तिचे काटकुळे हात आता अधिक कृश झाले होते. आणि सुरकुतलेल्या कातडीतून निळ्या शिरा उभारून वर आल्या होत्या. डोळ्याखालील काळी वर्तुळ पूर्वीपेक्षा अधिक गडद झाली होती. केसाच्या चार बटा उरल्या होत्या व त्यावर चंदेरी वर्ख चढला होता. रोझमेरीला आपल्या शरीराची लाज वाटू लागली. तिने आपली नजर शरीरावरून हटवली व पुन्हा ती खिडकीबाहेरच सुंदर जग पाहू लागली.

सकाळपेक्षा  एलिझा आता अधिकच सुंदर भासत होती. भावाने आणलेला मोतिया रंगाचा भरजरी शालू ती नेसली होती. त्याचा लाल मखमली काठ तिच्या गोऱ्या रंगाला आणि नाजूक सडसडीत बांध्यावर उठून दिसत होता. भावजयीने स्वतःच्या हाताने लाल गोवेकरी अबोलीची वेणी नणंदेच्या अम्बाड्यात माळली होती. त्याचे भरपूर कलाबूत एलिझाच्या नितळ पाठीवर लोळत होते. वधूमायपणाचे सुख आणि आनंद एलिझाच्या अंगाखांद्यावर ओघळत होते. एलिझाला पाहून क्षणभरपूर्वी  हटकून टाकलेल्या असूयेने पुन्हा एकदा मेरीच्या मनात उसळी घेतली. एवढ्यात सु ...सु ...करत गॅसवर ठेवलेली पेज फसफसून वरती आली आणि मेरीला भानावरही येऊ न देता तिने शेगडीला आंघोळ घातली. तिचा ओघळ शेगडी खालून ओट्यापर्यंत आला आणि त्याचा चटका हाताला बसताच मेरी भानावर आली. वाईट, अभद्र विचार गुंता वाढत नेतात. त्याला वेळीच आवरायला हवे नाहीतर काम अशी वाढत जातात, मेरीने विचाराचा गुंता बाहेर काढून फेकून दिला आणि ती गॅस शेगडी हलक्या हाताने मन एकाग्र करून पुसू लागली.

एलिझा आणि मेरीचे माहेर एकाच गावात. मेरी एलिझाची बेस्ट गर्ल बनून पहिल्यांदा या गावात आली. सेबीने तिला पहिले. दोघांनी एकमेकाला पसंत केले. मग घरच्यांनीही जास्त आढेवेढे न घेता पसंती दिली. आणि दोन वर्षानंतर मेरी एलिझाची शेजारीण बनून गावात आली. एलिझाची दुसरी मुलगी स्विडल आणि मेरीची पहिली मुलगी ब्रिनल पाच दिवसाच्या अंतराने जन्माला आल्या. आपल्या प्रमाणे दोन्ही मुली बहिणीप्रमाणे राहतील, खेळतील, वाढतील. त्यामुळे दोन्ही परिवारात आनंद झाला. एलिझाचा पहिला मुलगा जॉय आता

तीन वर्षाचा झाला होता. आणि एलिझा- सॅम खऱ्या अर्थाने सुखी चौकोनी कुटुंबाचा अनुभव घेत होते. दिवस भरत होते. मुले वाढत होती. दोन्ही कुटुंब एकत्र पिकनिकला, फिरायला जात होती.

आणि एक दिवस छोटया ब्रिनाला ताप आला. सेबी-मेरी तिला स्थानिक डॉक्टरकडे घेऊन गेले. औषध आणले. पण त्या औषधाने तापाला काही उतार पडला नाही. ती सारी रात्र त्यांनी निभावून नेली आणि दुसऱ्या दिवशी ब्रिनलला हॉस्पटलमध्ये ऍडमिट केले. पण ताप कमी होण्याऐवजी वाढत गेला. रिपोर्ट आला. मेंदूदाहचा / मेनिन्जायटिसचा. छोट्या ब्रिनलच्या मेंदूला विषाणूने पूर्णपणे घेरले होते. सलग पाच दिवस मुलगी कोमात होती. सहाव्या दिवशी छोट्या ब्रिनलने डोळे उघडले आणि पहिल्यांदा आपल्या आईकडे पहिले. आपली मुलगी जिवंत आहे. मरणाच्या दाराला हात लावून परत आली आहे याचा मेरी सेबीला आनंद वाटला. देवाचे आभार मानून सेबी कामावर जाऊ लागला. या त्याच्या संकटाच्या काळात एलिझा-सॅम त्या दोघांच्या मागे घट्टपणे उभे राहिले. त्यांना आधार आणि विश्वास दिला.

पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते. या तापाने मेरी सेबीच्या जीवनात प्रचंड वादळ निर्माण केले. ज्यातून ही दोघे पुढे स्वतःला सावरूच शकली नाहीत. त्या तापाने छोट्या ब्रिनलच्या हातापायाचे चेतातंतू पार निकामी करून टाकले. तिच्या हातापायाच्या हालचाली मंदावल्या. महिन्याभरानंतर मेरी ब्रिनलला हॉस्पिटलमधून घरी घेऊन आली तेव्हा दारात एलिझा उभी होती.. तिने छोट्या ब्रिनलला वेंगेत घेतले आणि एका हाताने तिने मेरीला जवळ घेतले आणि मागील महिनाभर हिमतीने घट्ट बांधून ठेवलेला मेरीचा बांध एलिझाला पाहून फुटला. एलीझाच्या खांद्यावर डोके ठेवून ती धाय मोकलून जोरजोराने रडू लागली. सेबीच्या चेहऱ्याकडे देखील पाहवत नव्हते. पण पुरुष माणसांना रडण्याची समाजाने परवानगी दिली नाही ना. तरी सॅम त्याला घेऊन आतल्या खोलीत गेला, एलिझालाही आतून गलबलून आले पण हिंमत राखून तिने बाळाला अंथरुणात ठेवले आणि मेरीला भरपूर रडू दिले. पहिला आवेग कमी झाल्यावर एलिझा सॅमने दोघांना जेवायला वाढले आणि मग बराच वेळ त्या दोघांची समजूत काढली, विश्वास दिला आणि आपण दिलेल्या शब्दाला ती दोघे नवरा बायको शेवटपर्यंत जागली.

एलिझाने बिछान्यात ठेवलेली ब्रिनल त्यानंतर कधी उठलीच नाही. कायम लोळागोळा होऊन ती जमिनीवर निपचित पडून राहू लागली. दिवस जात होते दोन घरात दोन धृवावर स्विडल-ब्रिनल वाढत होत्या. छोटी स्विडल आताशा शाळेत जाऊ लागली होती. अंगावर युनिफॉर्म, गळ्यात वॉटर बॉटल, पायात सॉक्स-शूज आणि दोन छोट्या छोट्या घट्ट वेण्या घातलेली स्विडल नावाप्रमाणे गोड दिसत होती. रोज एलिझा तिला बसमध्ये सोडायला आणि घ्यायला येत होती.

एलिझाचा हात पकडून दुडूदुडू उड्या मारत चालणारी स्विडल फार लाघवी आणि गोड होती. तिच्याकडे न संपणाऱ्या गोष्टीचा खजाना होता. शाळेतील गमतीजमती, मुलांच्या तक्रारी, टिचरचे कौतुक, शाळेतील कॉम्पिटेशन सारे सारे ती डोळे मोठे करून एलिझाला सांगायची. कधी एलिझा तिला उचलून घ्यायची, कधी कुरवाळायची, कधी गालगुच्चा घ्यायची, कधी दोघी एकमेकींच्या हातावर टाळी द्यायच्या. बसच्या खिडकीतून चिमुकल्या हाताने बायबाय करत स्विडल भूर शाळेत जायची. दिवाणखान्याच्या खिडकीतून रोझमेरी हे दृश्य रोज पाहायची नव्हे तिला तो नादच लागला होता.

हू.. हू. उ..ऊ.. या परिचित आवाजाने मेरी भानावर आली. ब्रिनलने बिछाना ओला केला होता. कोरड्या मनाने आणि केवळ कर्त्यवबुद्धीने मेरीने ओला बिछाना बदलला. भूक लागो, सुसु करो, तहान लागो कि आनंद होवो ब्रिनलकडे केवळ हू.. हू. उ..ऊ.. हे दोनच स्वर होते. ब्रिनलच्या या आजाराने मेरीची नोकरी सुटली. सेबी मेरीच्या मनात एका अनामिक भीतीने शिरकाव केला, कितीही प्रयत्न करूनही त्यावर ते दोघे मात करू शकले नाहीत. त्या दोघांच्या नात्यात एक अलिप्त कोरडेपणा आला. त्यानंतर ती दोघे कधी मनाने जवळ आलेच नाही. त्यांनी लोकांकडे जाणे येणं कमी केले. सार्वजनिक कार्यक्रमातून ती दोघे दूर राहू लागली. मोठ्या आशेने कॅनव्हासवर रंग भरण्याआधीच ते उडून गेले.

पण सॅम एलिझाने गाळात रुतू जाणाऱ्या मेरी सेबीला वेळोवेळी सावरायला मदत केली. एलिझाची चर्चची आवड एलिझाला माहित होती म्हणून तिने तिला ताबोर,पोट्टा आणि जेथे जेथे नोव्हेना, प्रार्थना असे तेथे तेथे पाठवायला सुरुवात केली. 'अपंग मुलीला टाकून मी कशी जाऊ? लोक काय म्हणतील ? तिचे किती करावं लागते ? एलिझा तू आमच्यासाठी काही कमी करतेस का ? तुला अजून किती त्रास देऊ ?' मेरीने असे म्हणायला सुरुवात केली की एलिझा तिच्या तोंडावर हात ठेऊन तिला अगदी गप्प राहायला सांगे. "यापुढे तुझा एक शब्द मी ऐकून घेणार नाही. बॅग भर आणि तयारी कर. ब्रिनल तुझी मुलगी मग माझी कोणचा नाही का ?आम्ही बघू तिला." एलिझा सॅमने अशी अधनं मधनं ब्रिनलची जबाबदारी घ्यायला सुरुवात केली. त्यामुळे मेरीला सुरुवातीला वाटणारी अपराधीपणाची भावना हळूहळू गाळून पडली. चार लोकात मिसळल्यामुळे तिच्या विझू पाहणाऱ्या जीवनात थोडी हिरवळ दिसू लागली.

जात्याच हुशार असलेली स्विडल एक एक पायरी यशस्वीपणे वर चढत होती.जॉयदेखील बीई होऊन M.S साठी अमेरिकेला निघून गेला. एलिझाची दोन्ही मुले अशी उत्तरोत्तर प्रगती करत होती. एलिझाचेही प्रमोशन झाले होते. सॅम कामधंद्याच्या निमित्ताने परदेशवाऱ्या करत होता. दरवर्षी चौघांपैकी कुणाचे न कुणाचे यशाचे सेलेब्रेशन एलिझा-सॅमच्या घरात चालू असायचे. वर्षाकाठी दोन तीन वेळा नातेवाईकांचा पै-पाहुण्यांचा गराडा या कुटुंबात पडायचा आणि या सगळ्या आनंदात एलिझाने मेरी सेबीला कायम सामावून घेतले. मुळात सुंदर, सुशील असलेल्या C.A. स्विडलने आपल्याला साजेसा असा कर्तबगार जीवन साथीदार निवडला.

मेरीने ब्रिनलला केसावरुन आंघोळ घातली. नवी कोरी नायटी तिच्या अंगात चढवली. नायटीच्या कोऱ्या वासाने ब्रिनल हरखून गेली. ती हातवारे करू लागली. तिच्या घशातून हू... हू... उ... ऊ... चा विचित्र आवाज येऊ लागला. परवाच न्हाव्याला बोलावून बारीक कापलेले केस मग मेरीने स्वच्छ कोरडे केले आणि नेलकटर घेऊन ती ब्रिनलची हातापायांची वाढलेली नखे कापू लागली. शेजारी लग्न असल्यावर कुणी पाहुणे येतील तेव्हा मेरीने ब्रिनलचा बिछाना स्वच्छ केला. नवी टॉम जेरीचे डिझाईन असलेली बेडशीट टाकली. ब्रिनलला अशा प्राणांच्या बेडशीट फार आवडतात हे आता इतक्या वर्षात मेरीला माहित झाले होते.

मटणाचा सूप असला की ती भरपूर जेवते. पालक भाजी असली कि ती ओठ घट्ट दाबून धरते. पापलेट, सुरमई आवडीने खाते, पण कोळंबी असली कि झोपून राहते. मासिक पाळी आली की तीन दिवस न जेवता पाय पोटात घेऊन झोपते आणि कळवळत राहते. तेवीस वर्षात मेरीला किती आणि काय काय माहित झाले होते. ब्रिनलच्या पाळीच्या तारखा आठवण ठेवण्यापासून ते पॅड किती तासांनी बदलावे इतपर्यंत... बाहेर बॅण्डचा आवाज वाढला होता.

"आंटीsss मेरी आंटीsss" स्विडलचा आवाज कानावर येताच मेरी धडपडत उठली. दारात साक्षात नवरी मुलगी स्विडल उभी होती. तिच्या त्या रुपाकडे मेरी एकटक पाहताच राहिली. डोळयावर विश्वास बसणार नाही इतकी ती गोड दिसत होती. जणू स्वर्गातील अप्सरा ! स्विडलचे आरस्पानी सौंदर्य त्या फिक्कट आकाशी रंगाच्या शराऱ्यात खुलून दिसत होते. "आंटी... आयज घाल्यासा वारणा आणि तू आडे का करता मम्मी तुला बगितोती."

"हा पोरी, म्ये हाकोटपासून तुमच्या मेरेस होती ना. आतेस आली... ब्रिनलसा कऱ्यासा होता ना.." आणि स्विडलसमोर अजिबात डोळयातून पाणी काढायचे नाही असे मनाला कितीदा समजावून देखील ते बेईमान झाले. रोझमेरीच्याही नकळत तिचे डोळे पाझरू लागले. स्विडलने मेरीआण्टीला जवळ घेतले आणि सावकाश थोपटत ती म्हणाली, "आंटी, मला कळतंय तुमच्या मनात काय चालू आहे ते पण तू काळजी करू नकोस तू आणि मम्मी इतकी वर्षे राहिलात कि नाही बहिणी बहिणी सारख्या... मी आहे ना.. तुमच्या पश्चात. आता डोळे पूस आणि ये हा लवकर. मी वाट बघते."

"पोरी, तू एलिझाई खरी पोरी सोबाता हा. आजच्या दिहा म्ये तुला हाव्यासा गा रडव्यासा ? या आजश्या काळात तू हारकी पोरी पोटात येना किती भाग्यायी गोष्ट.. म्ये आली सल."

स्विडल आमंत्रण देऊन पाठमोरी झाली, तिच्या त्या कमनीय सुंदर बांध्याकडे मेरी एकटक निरखून पाहू लागली. मरीयेच्या पोटी येशू बाळ आले आणि मरिया धन्य झाली आणि एलिझा पोटी स्विडल सारखी मुलगी देऊन परमेश्वराने एलीझाबरोबरच माझ्यावर उपकार नाही का केले ?

इतका वेळ मेरीच्या मनातील द्वंद्व आता शांत झाले होते. तिने ब्रिनाला पेज पाजली. एलिझाने दिलेल्या नव्या सिल्क साडीची घडी मोडली. कपाटातून चार नवे दागिने अंगावर चढवले. हातात चारचार सोन्याच्या बांगड्या घातल्या. चेहऱ्यावर स्विडलने दिलेला हलका मेकअप केला. ओठावर हलकीशी लिपस्टिक फिरवली. मेरीने आरशात डोकावून पहिले आणि आपण दहा वर्षांनी तरुण झाल्यासारखे तिला वाटले. तिने पायात चपला सरकवल्या. घराची चावी पर्समध्ये टाकून ती घराच्या पायऱ्या उतरली. आज तिच्या लेकीचे लग्न होते ना ! ती आणि एलिझा कधी वेगळया नव्हत्याच मुळी.

# नैतिकता

--- प्रा. ट्रिजा परेरा, आगाशी

God is Truth and Truth is God. परमेश्वर सत्य आहे आणि सत्य तेच परमेश्वर आहे असे महात्मा गांधीजीने म्हटले आहे वरील वाक्याचे विवेचन करून सत्याची कास नेहमीच धरावी असा उपदेश देण्याचा प्रयत्न ह्या विचारात आढळतो. आजच्या समाजातील सामाजिक समस्या ज्या आहेत. उदा. व्यसन स्त्रियाचा छळ वृद्धाचा छळ आरोग्य त्यापैकी सर्वात मोठी समस्या आढळते. ती म्हणजे नैतिक मूल्यांचा होत चाललेला ऱ्हास. दिवसेंदिवस नैतिकता ढासळत चालली आहे. नैतिकतेला गेलेला तडा समाजाला हानीकारक ठरत आहे. माणूस स्वतः बरोबर कुटुंबाची अन् समाजाची हानी करीत आहे.

नैतिकता म्हणजे नेमके काय असा प्रश्न सहज निर्माण होतो तेव्हा त्याला साधे सरळ उत्तर हेच की योग्य गोष्टींचा स्विकार करायचा व अयोग्य गोष्टी टाळायच्या. नैतीकता आणि सत्य एकमेकांशी संबंधित असतात. सत्या बरोबर प्रामाणिकपणा सर्वात श्रेष्ठ अशी बाब आहे ती माणसांच्या आचरणातून स्पष्ट झाली पाहीजे. नैतिकतेचे पालन करणारे महान नेते, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष अब्राहाम लिंकन नेहमी म्हणत "तुम्ही सर्व लोकांना कायमचे मूर्ख बनवले परंतु सर्व लोकांना कायमचे मूर्ख बनवू शकणार नाही. म्हणजेच मांजरीप्रमाणे डोळेझाक करून दूध पिणारे अनेक आहेत परंतु ते लोक सज्जनाच्या तावडीतून सुटू शकत नाहीत. त्यांना योग्यवेळी जाब विचारला जातो. किंबहुना ते शिक्षेसही पात्र ठरतात.

अनैतिकतेचे जीवन जगणारे हे रानटी प्राण्यासारखे जगणारे असतात. कोणाच्याही भावनेची कदर न करता आ मतेने इतरांना लुटणे इतरांच्या जमिनी आपल्या नावावर करणे जन्मदात्या आई वडिलांना घराबाहेर काढले संपत्तीची हाव धरून सहजपणे इतरांना फसविणे अनिष्टांशी संग करू करून अनैतिक वर्तन करणे जीवनसाथी संसार ह्यांच्याशी एकनिष्ठन न रहाणे इ. गोष्टीद्वारे अनैतिकतेचे प्रमाण वाढले आहे. खरे पहाता समाजाने प्रस्थापित केलेल्या नैतिकतेच्या तत्वाचा स्विकार करून त्या तत्वाद्वारे समाजात व्यवहार किंवा वापर करण्याचा अवलंब करणे म्हणजेच नितीमत्ता होय. पण ही निती भ्रष्ट होत चालली आहे माणूस मिडिआच्या आहारी गेला आहे. आधुनिकतेच्या नावाखालीतरूण वर्ग स्वैराचारी होत चालला आहे वॉट्सअॅप फेसबुकच्या आहारी गेलेला तरूण वर्ग आपली सिमारेषा ओलांडून  जात आहे. आताच्या तर Metoo सारख्या प्रवाहातून हे सारे उघडलीस येत आहे.

सामाजिक आंधिक व वैयक्तिक जीवनात नितीमूल्याची भूमिका महत्वाची आहे. नितीन वागणे हे व्यक्तीगत विकासात महत्वाचे आहेच त्या व्यतिरिक्त आत्मीक समाधान देत असते नैतिकतेचा आदर करणा यांना समाजात मान असतो प्रतिष्ठा असते. समाज त्यांचा सन्मान करतो. त्यांना योग्य स्थानावर नेऊन ठेवतो समाजात ताठ मानेने जगायचे असेल तर 'नैतिकता' हे महत्वाचे साधन आहे. समाजात शेजारी-पाजारी, मित्र-मंडळीत नेहमीच उच्च स्थानी राहणा या व्यक्तीचे वैशीष्टय हेच असते की त्यांचे वागणे नैतीक मूल्यांना धरून असते.

सत्य सदुवर्तनी न्याय समनेला अनुसरणारा औदार्याने वागणारा सहकार्याच्या भूमिकेत बावरणारा जेष्ठांचा सन्मान करणारा माणूस समाजात आदर्श ठरतो ती केवळ त्यांच्या नितीच्या जगण्यामुळे अशी माणसे समाजात नेहमीच गौरवास पात्र ठरतात कारण ते सामाजिक विकासात नेहमीच आपली भूमिका दाखवत असतात. शेवटी 'प्रिती' आणि 'निती' ह्या दोन्ही मूल्यांना सर्वच धर्मग्रंथानी उच्च स्थानावर ठेव्ले आहे. ह्या गोष्टी बाजारात विकत मिळत नाहीत किंवा कोणीही शिकवूण अंगिकार शकत नाहीत. ह्या गोष्टीचा प्रत्येक व्यक्तीच्या मनाशी संबंधित आहेत शेवटी सम्यक ज्ञानमार्ग सम्यक भक्तीमार्ग असेल तर सम्यक कर्ममागे होईल व सम्यक कर्ममार्ग जर स्विकारला तर स्वर्ग येथे अनुभवाल.              तथास्तु.........

# धर्म आणि विज्ञान – फ्रान्सिस आल्मेडा(सर), निर्मळ

धर्म आणि विज्ञान ही दोन्ही मानवी प्रज्ञेची अपत्ये आहेत. प्रज्ञेचा विकास झाल्यामुळे मानवास, भूत-भविष्याची जाणीव, अज्ञाताची भीती, मृत्यूची भीती, सभोवतालच्या निसर्गाची भयावह अभिव्यक्ती व सर्व गोष्टींचे नियमन-निर्मिती ह्याविषयीचे प्रश्न पडण्यास सुरवात झाली. परंतु ह्या प्रश्नांचे समाधानकारक उत्तर देण्याएवढे ज्ञान मात्र मानवाकडे नव्हते. त्यावेळी धर्माने बाळबोध उत्तरे पुरवत त्याची जिज्ञासा पूर्ती करण्याचा प्रयत्न केला. पुढे हळूहळू मानवी निरीक्षण शक्ती व तर्कशक्ती प्रबळ होत गेली आणि विज्ञानाचा विकास सुरु झाला. ज्या प्रश्नांची उत्तरे धर्माने कल्पनेने दिली होती ती विज्ञानाने प्रत्यक्ष पुराव्यांच्या आधारे द्यायला सुरुवात केली. परंतु धर्माने पुरवलेला मानसिक आधार देणे विज्ञानाला अजून जमलेले नाही. त्यामुळेच आजतागायत धर्म टिकून आहे. धर्म टिकून राहण्याची कारणे पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) अज्ञाताच्या भीतीवर सोपे तोडगे

२) सुखी जीवन जगण्याचे सोपे मार्ग

३) जीवनातील दुखांतून मुक्ती व मोक्षाचा मार्ग

४) मृत्यू नंतरच्या जीवनाचे व आत्म्याच्या अमरत्वाचे आश्वासन

५) मानवाच्या व विश्वाच्या निर्मितीचे हेतू व कर्ता याचे सोपे उत्तर, अशा काही कारणांसाठी धर्म मानवी मनात टिकून आहे.

वरील कारणांचे निराकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

१) विज्ञानाच्या विकासाबरोबर अज्ञाताच्या भीतीवर मात करणे शक्य झाले आहे. रोग कशामुळे होतात हे कळल्याने त्यावर उपाय योजना करता येते. परंतु अजूनही ज्या क्षेत्रांत अपघाताची किंवा अपयशाची निश्चित कारणे माहित झालेली नाहीत अशा क्षेत्रांतील लोक धार्मिक कर्मकांडाच्या आहारी गेलेले दिसतात; उदा. व्यापारी, चित्रपट निर्माते, क्रीडापटू, मच्छीमार व छोटे शेतकरी इत्यादी. विज्ञान जसे प्रगत होईल तशी भीतीची कारणे नाहीशी होतील. परंतु तोपर्यंत या लोकांना समाजाने व सरकारने पर्यायी आधार पुरवला तर कर्मकांडाला आळा बसेल.

२) सुखी जीवनासाठी पुरेसे उपाय विज्ञानाने शोधले आहेत. शरीर स्वस्थ ठेवण्यासाठी आवश्यक आहार, आचार व विचार कसे असावेत हे मानवाला अवगत झाले आहे. मनाचे आरोग्य कसे सांभाळावे ह्याविषयीचेही मनोविज्ञान प्रगत झाले आहे. परंतु ही वैज्ञानिक माहिती सामान्य जनांपर्यंत पोहोचली तर त्यांना धार्मिक तोडग्यांची गरज भासणार नाही.

३) दुःखातून मुक्ती देण्याचे काम मोठ्या प्रमाणात वैद्यकीय विज्ञानाने केलेले आहे. सर्वसामान्य आजार पूर्णपणे नियंत्रणात आलेले आहेत आणि मोठ्या दुर्धर आजारावर संशोधन सुरु आहे. हे सर्व उपाय लोकांना सहज उपलब्ध झाले तर नवस-सायास व गंडेदोरे आपोआप कमी होतील. जीवनातील दुःखातून कायमची मुक्ती किंवा मोक्ष ही कल्पना योग्य मनोवैज्ञानिक संकल्पना वापरून बदलता येईल अर्थात त्यासाठी ते मनोविज्ञान सहज उपलब्ध झाले पाहिजे.

४) मृत्यू नंतरचे जीवन आणि आत्म्याचे अस्तित्व या धर्माच्या अत्यंत लोकप्रिय कल्पना आहेत. कारण त्या माणसाला मृत्युच्या भीतीवर उपाय सुचवतात. जिवंत राहण्याची नैसर्गिक प्रेरणा सर्व प्राण्यांत असते. मानवाला मृत्यूची स्पष्ट कल्पना असल्याने ही भीती अधिक प्रबळ होते. आपल्या सर्व जाणीवा नष्ट होणे, आपण घडवलेल्या, जीव लावलेल्या गोष्टी सोडून जावे लागणे, आपले आप्त स्वकीय दुरावणे अशा सर्व गोष्टी दुःख व भीती निर्माण करणा-या आहेत. यावर उपाय धर्माने असा सुचवलेला आहे की या जीवनानंतर अधिक चांगले शाश्वत जीवन आहे आणि ते उपभोगण्यास शरीर नसले तरी आत्मा टिकून राहतो. विज्ञान यासाठी मृत्यू नंतर काय होते याचा शोध घेऊ शकते. आज जगात असे काही लोक आहेत की जे हृद्यक्रिया बंद पडून मृत्यू पावले होते परंतु योग्य उपचार केल्याने अर्ध्या तासानंतरही पुन्हा जिवंत झाले आहेत. त्यांना आलेले अनुभव या धार्मिक कल्पनांशी जुळणारे नाहीत. भविष्यात मृत माणसाला काही दिवस किंवा माहिन्यानी पुन्हा जिवंत करता येईल. त्यावेळी मृत्यू नंतरच्या जीवनावर व आत्म्याच्या कल्पनेवर कायमचा पडदा पडेल. अर्थात विज्ञान मानवाला दीर्घायू करेल हे आताच दिसायला लागलेले आहे. कालांतराने काही वर्षे मृतावस्थेत राहून मानवाला पुन्हा जिवंत करण्याची किमया विज्ञान साध्य करील. त्यामुळे मानवी जीवन अमर्याद लांबवता येईल. तसेच संपूर्ण मानवी जाणीवा कंप्युटर सारख्या यंत्रात किंवा यंत्रमानवात संक्रमित करता आल्या तर मानवी देहाशिवाय मानवाला अमर्याद जीवन जगता येईल. हेच विज्ञानाने धर्माच्या शाश्वत जीवन आणि आत्मा ह्या कल्पनांना दिलेले उत्तर असेल.

५) मानव निर्मितीचा प्रश्न वेगवेगळया धर्मांत निरनिराळ्या सोप्या पद्धतीने सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. परंतु डार्विनच्या सिद्धांताच्या रुपाने विज्ञानाने अधिक तर्कसुसंगत रितीने त्याचे उत्तर दिले आहे. आपली पृथ्वी सपाट, स्थिर व सर्व विश्वाच्या केंद्रस्थानी आहे अशी कल्पना केल्यामुळे पृथ्वी कशाच्या आधारावर आहे ह्याचे स्पष्टीकरण प्रत्येक धर्माने सोप्या पद्धतीने दिले आहे. खगोलशास्त्राच्या प्रगतीनंतर पृथ्वी गोल असून ती सुर्याभोवती फिरते ह्या निरिक्षणाशी जुळणा-या सिद्धांताचा उदय झाला. त्यामुळे पृथ्वी कशावर आधारलेली आहे हा प्रश्न निकालात निघाला. विश्व निर्मितीचा प्रश्नही, प्रत्येक गोष्ट किंवा वस्तूच्या निर्मितीसाठी एक कर्ता असतो, ह्या मानवी अनुभवाशी निगडीत आहे. भविष्यात हा प्रश्नही मानवी अनुभवाच्या पलीकडे असलेल्या एखाद्या संकल्पनेतूनच सुटेल. त्यानंतर विश्वाचा निर्मात्याविषयीची प्रश्न उरणार नाही.

वरील कारणांव्यतिरिक्त, मानवाच्या अंगवळणी पडलेली कर्मकांडेही धर्म टिकून राहण्यास कारणीभूत ठरतात. मानवी संस्कृतीत मुलांना वाढविताना सतत विशिष्ट प्रकारे तथाकथित संस्कारांच्या नावाखाली काही गोष्टी त्यांच्या अंगवळणी पाडल्या जातात (कंडिशनिंग). त्यामुळे मोठेपणीही अनाहूतपणे विशिष्ट धर्माची, विवेकाशी विसंगत अशी कर्मकांडे आचरली जातात. अधुनिक मनोविज्ञानावर आधारित आणि विवेकाशी सुसंगत अशा शिक्षणपद्धतीने मुलांना वाढविल्यास मोठेपणी तर्कविसंगत कर्मकांडांपासून त्यांना मुक्ती मिळेल.

मानवाच्या सुरवातीच्या विकासात धर्माने त्याला दिशा दिली. आता वैज्ञानिक पद्धतीचा इतका विकास झाला आहे की जीवनाच्या सर्व क्षेत्रांत तिचा वापर केला जात आहे. धर्मातील संकल्पनांचाही तपास वैज्ञानिक पद्धतीने करायला सुरवात झाली आहे. त्यामुळे भविष्यकाळात आइनस्टाइनचा प्रसिद्ध विचार "धर्म विज्ञानाशिवाय आंधळा आहे आणि विज्ञान धर्माशिवाय पांगळे आहे", प्रत्यक्षात उतरेल आणि धर्मही विज्ञानाच्या नजरेने पहायला शिकेल.

# कलियुगातील 'मेरी - जोसेफ'

- सोनल जोसेफ डिकुन्हा

तसं मेरी-जोसेफचं लग्न हे अगदी साध्य पद्धतीने, देवा-धर्मगुरूंच्या साक्षीने, मंगलमय वातावरणात झालं. वर्षा आतच त्यांच्या अंगणात स्टीफन नावाचं गोंडस बाळ खेळू लागलं. मेरी-जोसेफचा आनंद गगनात मावेनासा झाला. कष्टकरी, धार्मिक जीवनाला जगण्याचा खरा अर्थ निर्माण झाला. स्टीफनचा शाळेतला प्रवास सुरु होतो तोच त्याच्यासोबत खेळायला आणखी कुणी येणार याची चाहूल लागते. सफरचंदी गोबरे गाल, गुलाबी वर्ण, टपोरे डोळे आणि गुटगुटीत असा भाऊ, स्टिव्हमुळे तिघांच्या या कुटुंबाला एक नवीन पालवी फुटली होती. सगळं कसं सुंदर व सुरेख सुरु होतं तोच जोसेफची कंपनी बंद झाल्याने कुटुंबावर संकटाचे ढग दिसू लागले होते. चार भिंतीचं दगडामातीचं घर कर्जाच्या विळख्यात आले होते. मात्र हिम्मत व श्रद्धा या दोन्ही गोष्टी मेरी - जोसेफमध्ये होत्या. त्या सोबत घेऊन संसाराची नौका हेलकावे खात असताना ती दोघांनी मिळून व्यवस्थितपणे तरंगत ठेवली. काळ पुढे सरकत राहिला तसा दोघांचा संसार प्रौढ होत गेला. कर्जांचा डोंगरही नाहीसा झाला. पुढे स्टीफन-स्टिव्ह शिक्षण पूर्ण करून, नोकरी धरून समाज्यात रुबाबदार तरुण म्हणून लोकांच्या नजरेस पडू लागले.

आपल्या मुलांचा संसार आता उभा राहिला पाहिजे, म्हातारपणाची काठी नात-नाती आपल्या उर्वरित जीवनाचा-जगण्याचं साधन व्हावा असं मेरी - जोसेफच्या मनात होते तोच स्टीफनचा प्रेमविवाह लिझाशी झाला व त्याच्या संसाराची वेल वाढू लागली. लग्नाचा पूर्ण खर्च मेरी - जोसेफने उचलला. मेरीने आपल्याकडील असलेले अर्ध सोनं लिझाच्या अंगावर चढविलं. सर्व सुंदर होणार या आशीर्वादाला लिझाच्या माहेरच्या लोकांची नजर लागली. तिच्या संसाराची दोरी माहेरच्या लोकांच्या हातात होती. स्टीफनला ते आपल्या पालकांहून प्रिय झाले होते. काही दिवसातच भांड्याला भांड लागण्यास सुरुवात झाली. लिझाला सासू सासऱ्यांच्या संसाराची काही विशेष माहिती नाही व आपल्या पालकांनी त्याच्या संसार कसा उभारला हे सांगण्यात स्टीफनला काही रस नाही अश्या अवस्थेत सुखी घरातील वातावरण दूषित होऊ लागले. मेरी - जोसेफने सगळं केलं मात्र घरात कधी संवाद साधला नाही व त्याचीच येथे कमतरता भासत होती. मुलांवर संस्कार होते मात्र कुटुंबात कधी संवाद नव्हता. आपल्या भावना, अडचणी एक कागदावर लिहिल्या जाऊ लागल्या त्याला आपल्या मुलाकडून उपकारी भाषेत कागदावरच उत्तरं मिळत होती. "बाबांची औषधे संपत चालली आहेत" उत्तर असं "औषधांसाठी पैसे मोजावे लागतात, सोबत ठेवणे अपेक्षित होते". "बाबांची त्रैमासिक तपासणीची वेळ जवळ येत आहे" उत्तर असं "डॉक्टरांच्या फीचे पैसे सोबत ठेवणे अपेक्षित होते". प्रत्येक अडचणीचे उत्तर रुपयात होत होते. वय उतरत होते पण मेरी - जोसेफची कष्ट करण्याची सवय वाढतच होती, नाइलाजच होता त्यांचा. मेरी-जोसेफची ईच्छा औषधे आणून देण्यावर होती, पैसे तेच मोजत होते. मात्र संतान-सुनेला या वयोवृद्ध लोकांना आपल्या पैश्यांची गरज असल्याचे वाटत होते.

मेरी - जोसेफची आशा आता स्टिव्हकडे वळली होती, त्याने ती आपल्या आई-बाबांकडून पैसे घेऊन पारही पाडली मात्र ती त्याच्या लग्नापर्यंत सीमित होती. स्टिव्हचं सायलीशी अंतरजातीय प्रेमविवाह झाला मात्र त्याला मेरी - जोसेफचा कधी विरोध नव्हता. बहुदा जातीतली आपली झाली नाही परकी तरी आपली होईल हा विचार त्यांच्या मनात आला असावा. मात्र हा विचार खोटा ठरला. लग्नाचा पूर्ण खर्च पुन्हा मेरी - जोसेफने उचलला, आपल्याकडील उरलेलं अर्ध सोनं मेरीने सायलीच्या अंगावर चढविलं. स्टिव्ह-सायलीचा मधुचंद्र विदेशात अलिशान अश्या पंचतरिका हॉटेलात राहून झाला. मेरी - जोसेफने बचत करून स्टिव्हच्या नावे उघडलेल्या

खात्यातील रक्कम उधळली गेली होती. मात्र मेरी - जोसेफला यावर आक्षेप नव्हता. मधुचंद्रातून परत आल्यावर मेरी - जोसेफची सायलीशी नाळ जुळते तोवर सायली लिझाच्या प्रभावाकडे आकर्षित झाली होती. मधुचंद्रातून आणलेल्या वस्तू सायलीकडून सासूबाईस दाखविल्या जात होत्या. "पर्स कशी आहे हो?" या सायलीच्या प्रश्नावर मेरीला ती आपल्यासाठीच आणली गेली असल्याचे वाटणे स्वाभाविक होते. "या वयात अशी फॅशनेबल पर्स वापरू कशी?" या मेरीने हसत विचारलेल्या प्रश्नाला पहिला अपमानाचा स्फोट झाला. "तुझ्यासाठी थोडीच आहे ही म्हातारे?" या सायलीच्या वाक्याने मेरीच्या पायाखालची वाळू सरकली होती.

अपमानात मेरी - जोसेफचं आयुष्य पुढे सरकत होतं, हिम्मत होती पण शरीर साथ देत नव्हतं. श्रद्धा आजही कायम होती. मेरी जोसेफचा संसार आता रूममधून हॉलमध्ये आला होता. स्वतःचे कपडे घालायलाही एकांत रूम सोडून जिना नशिबात आला होता. रोज बायकांच्या कानभरणीने घर हे नरक झालं होतं. तोच एकदिवस स्टीफने जोसेफ अंघोळीला पहिला गेल्याने घरात भांडणास सुरुवात केली. स्टीफनचा रागावरचा ताबा आता सुटला होता व त्याने चक्क जोसेफच्या कानाखाली लावून दिली, जोसेफ खाली कोसळा तर स्टीफन त्याच्या छातीवर बसून त्यास मारू लागला. मेरीला हे सहन झालं नाही, पाहावलं नाही. तिने घरातील रॉकेलचा कॅन स्वतःच्या अंगावर ओतून घेतला. हे थांबवण्यासाठी ना लिझा पुढे आली ना सायली. स्टीफन-स्टिव्ह घाबरून गेले. दोघांनीही आईला वाचवण्याचा पूर्ण प्रयत्न केला, तात्काळ डॉक्टरांकडे नेण्यात आले. अंग काळं पडलं होतं, पोलीस केस नक्कीच होती मात्र मेरीकडूनच आपल्याकडून हे कृत्य चुकून झाल्याचे सांगण्यात आल्याने असं काही झालं नाही. मेरी - जोसेफचे श्रद्धावन डोळे आता नेहमी गडद पाणेरी असायचे. जोसेफच्या आरोग्याचा प्रश्न मेरीसाठी चिंतेची बाजू होती. पुढे जे घडणार होते ते नियतीला मान्य होते पण जोसेफला नाही. मेरीने जे कृत्य केले होते त्याचा तिच्या आरोग्यावर परिणाम झाला होता व काही कळण्याअगोदर मेरीने जगाचा निरोप घेतला. मेरीच्या जाण्याने कुटुंबावर काही परिणाम झाला नव्हता, झाला होता तो केवळ जोसेफवर.

जोसेफने येणाऱ्या काळाची पावलं ओळखली होती मात्र आई गेल्याने आपल्या मुलांना परिवर्तनाची जाणीव होईल असं त्याला कुठेतरी वाटत होते. जोसेफला आपली कामं आता स्वतःच करायची होती. मात्र ती करताना त्याला आपल्या मुलांकडून - सुनांकडून हेतुपुरस्कर निर्माण केल्या जाणाऱ्या त्रासदायक अडथळयांना पार करून करावी लागत होती. मेरीच्या मासिक स्मृती मिस्सा झाला व त्याच संध्याकाळी घरात भांडणाची पहिली ठिणगी उडाली. आईचं उर्वरित सोनं - बँक खात्यातील रक्कम आपल्याला देण्यात यावी यावर जोसेफवर दबाव आणला जात होता. आता घरात चार विरुद्ध एक असा संघर्ष होता. म्हाताऱ्याची सर्वांना अडचण होती, दोन वेळेचे जेवण देण्याचा त्रास सर्वांनाच होता. ही अडचण पुढे पोलीस स्टेशन पासून सुरु झाली ती कोर्ट कचेरी पर्यंत पोहचली. जोसेफवर लैंगिक छळाचे तसेच अश्लील कृत्याचे खोटे आरोप आपल्या सुनांकडून झाले होते. त्यावर घरात महायुद्ध घडत होते. जोसेफला स्वतःचा स्वयंपाक करणंही कठीण झालं होतं. पोलिसांना जोसेफच्या डोळ्यातून त्याचा निर्दोषपणा स्पष्ट दिसत होता मात्र कायदा पुराव्यावर निर्दोषपणा सिद्ध करीत असतो. जोसेफला हे सर्व त्याच्या सहनशक्तीच्या पलीकडचे होते व त्यातच त्याचीही एक दिवस प्राणज्योत मालवली. घरातील मंडळींनी सुस्कारा टाकला होता मात्र घडलेला इतिहास हा येणाऱ्या पिढीने - नातवंडांनी पहिला होता या नियतीचक्राचा विसर सर्वांनाच पडला होता. आज आपल्या वसई भागात शिक्षण प्रसार तसेच आर्थिक दृष्ट्या स्थिर झाल्याचे चित्र असले तरी आजही अनेक गावात अश्या 'मेरी - जोसेफ'च्या सत्य कथा घडत आहेत. यावर प्रबोधन होणे गरजेचे आहे तरच खऱ्या अर्थाने येशू ख्रिस्ताला जन्म देण्याऱ्या मेरी-जोसेफचा सन्मान होऊन नाताळ साजरा करता येईल.

# वेगळा अर्थ

--- जेजू परेरा, विलेपार्ले मुंबई

पुण्यात लग्नाला गेले होतो. एक दिवस आधीच गेले होतो. वेळात वेळ काढून माझ्या दहावीच्या वर्ग शिक्षिका पूर्वाश्रमीच्या कोलासो मॅडम यांना भेटायचे नक्की होते. त्यांना फोन केलाच होता. अधूनमधून जात असतो. गॅलरीत वाट बघत उभ्या होत्या, नेहमीप्रमाणे आनंदाने स्वागत झाले. यावेळी चौघे होतो, मी माधुरी, मुलगा व सुन. मुलाच्या लग्नानंतर पहिल्यांदा जात होतो. सुनेची ओळख झाली. ती साठे कॉलेजची म्हटल्यावर जास्तच मोकळेपणा आला. कोलासो मॅडमचे कॉलेजही तेच होते. खूप गप्पा झाल्या. अनेक आठवणी निघाल्या अनेकांची विचारपूसही झाली. वेळ भाग भरभर पुढे सरकत होतो. अन् गप्पा संपत संपत नव्हत्या मला निघणे भाग होते. तेव्हा इच्छा नसताना निघावं लागलं निघताना जवळ घेतले. “येत जा, खूप बरं वाटलं, पुढच्या वेळी सकाळपासून ये. जेवायला ये” असा प्रेमाचा, नेहमीचा आग्रह झाला. माधुरीला जवळ घेत म्हणाल्या ‘माधुती मस्त निभावलंस, तू जिंकलीस.’ जपून जा. काळजी घ्या, अशा सूचनाही झाल्या, शाळेत असताना माझी अशीच काळजी घेत असत, आजही तीच काळजी आमची गाडी नजरेआड होईपर्यंत गॅलरीत उभ्या होत्या हात हलवत.

नियोजित कार्यक्रम आॅटोपुन रात्री मुक्कामाला मी आणि माधुरी एका स्नेह्यांकडे गेलो. मुलं हॉटेलमध्ये उतरली होती. आमच्या स्नेह्यांसुद्धा आम्ही खूप दिवसांनी भेटणार होतो. ती दोघेच असतात. तिथेही खूप गप्पा रंगल्या रात्री दोन अडीचपर्यंत. शेवटी नाइलाजाने झोपायला गेलो. दुसऱ्या दिवशी लग्न अटेंड करायचे होते ना, दुसऱ्या दिवशी लग्नसोहळा आटोपुन पुण्याहुन लवकर निघालो. एक्सप्रेसवे वरची गर्दी टाळायची होती. मुलगा गाडी चालवित होता व सुनही पुढे बसली होती. मी व माधुरी मागील सीटवर होतो. रात्रीचे जागरण, लग्नातील धावपळीचा क्षीण यामुळे माधुरी लगेच झोपी गेली. मी ही डोळे मिटले, झोपेची प्रतिक्षा करत होतो पण झोप काही येईना, डोक्यात कोलासो मॅडमचे शब्द घुमत होते, ‘माधुरी तू जिंकलीस, मस्त निभावलास’ म्हटलं तर, किती साधे सरळ शब्द ... पण नाही. काही काही शब्दांना वेगळे अर्थ असतात. शब्दकोशातल्या अर्थापेक्षा या शब्दांनाही वेगळे अर्थ होते.

आमचा आंतरधर्मिय विवाह. माधुरी कोकणस्थ ब्राह्मण. जातीचा उल्लेख मुद्यामहुन केला. कारण जातपात, रितभात, खानपान किती वेगळे होते हे कळावे म्हणुन. सर्वकाही वेगळे होते माझ्या घरी नेहमी नॉनव्हेज अन् तिने कधी अंडेही खाल्ले नव्हते. पण तिने स्वताला लगेच अँडजस्ट केले, पटकन एक झाली. माझे कुटुंबिय गणगोत मित्रमंडळी. अगदी आसपासचे लोक सगळयात मिसळुन गेळी. सर्वांना जिंकले तिने. आज **33** वर्षे झाली लग्नाला. सुख सुख म्हणुन जे काही म्हणतात ते सर्व मिळाले आम्हाला कसलीही, काहीही कमतरता नाही आता भरून पावलो आहोत. सुखी आयुष्य नसते हे सत्य आहे पण हे सत्य तेवढेच खरे असते

का नाही□कारण प्रत्येक सत्याला दुसरी एक किनार असते . एक कथा असते व्यथेशिवाय मानवी जीवनाची कथा मुळी पूर्ण होत नाही . यालाच तर आयुष्य म्हणत असतील . आमच्या या सुखे कथेची पण व्यथा आहे . म्हटलं तर होती असे म्हणूया . अनेक आठवणी जाग्या झाल्या. त्याचा एक कोलाज तयार झाला तो कोलाज नजरे समोर सरकू लागला .

सप्टेंबर□1985 ला आमचे लग्न झाले व आमचा संसार सुरू झाला□र्षभरात आम्हाला एक मुलगा झाला . जून 1988 ला दहिसरला रहायलाही गेलो . मनासारखे ठरविल्याप्रमाणे सर्व सुरू झाले□असे वाटत असताना एके दिवशी मला घश्याचा कॅन्सर असल्याचे निदान झाले तो दिवस होता 27 जुलै 1989 . पायाखालची जमिन सरकणे म्हणजे काय असते□हे त्या दिवशी अनुभवले मुळापासुन हादरलो . काय न कसे रिॲक्ट व्हावे . हेच कळेना. माधुरी रडु लागली . विचित्र परस्थिती... सुन्नच झालो त्याही परिस्थितीत माधुरीला जवळ घेतले, रडू नकोस हे तिला रडत रडत सांगितले . त्यावेळी सोबतीला माझे मित्र हजर होते . तेही सुन्नच होते . प्रसंगच तसा होता . बायोप्सी रिपोर्ट माधुरी एक दिवस आधीच घेऊन आली होती . त्यामुळे माझ्या आजाराचे तिला आधीच कळले होते . ही गोष्ट तिने माझ्यापासुन लपवुन ठेवली होती . माझ्या काळजी व प्रेमापोटी माझ्या मित्रांना हे सर्व माहित होते म्हणुन ते सर्व हजर होते मला धीर देण्यासाठी . आम्ही एकमेकांना सावरलं . माधुरी रडायची थांबली .

त्या रात्री□मी आणि माधुरी झोपलोच नाही . फक्त विचार□विचार आणि विचार... त्यावेळी माझे वय फक्त 36 वर्षे□लग्नाला 4 वर्षे झालेली व मुलगा जेमतेम 3 वर्षाचा . . माझे काही बरे वाईट झाले तर यांचे कसे होणार□माधुरी हे सर्व कसं निभावुन नेणार□29 वर्षाअगोदरचे दिवस□त्यावेळी आजच्या सारखी ॲडव्हान्स औषधोपचार नव्हते . त्याकाळी कॅन्सर म्हणजे कॅन्सल अशी परिस्थिती होती . तेव्हा नाही म्हटले तरी टेंशन यायचे. लहाणपणापासुन तसा मी खूप डेरींगबाज . भीती माहित नव्हती . तेव्हा दोघांनी निर्धार केला. आहे त्या परिस्थितीला सामोरे जायचे. अजिबात डगमगायचे नाही . या जगात कुठलीही गोष्ट कायमस्वरूपी नसते . हे ही दिवस जातील असे एकमेकांना समजावत राहीलो . हे होईल□समोर येईल ते स्विकारूया असे एकमेकांना वचन दिले. जरा शांत झालो .

दुस□या दिवशी टाटा हॉस्पीटल गाठले . तेथील डॉ . वि□म संघवी यांच्या नावे चिठ्ठी होतीच . डॉक्टर खूप चांगले निघाले□माझा बायोप्सी रिपोर्ट. फॅमिली हिस्ट्री समजुन घेतली . माझा आजार. त्याचे स्वरूप न माझे वय हे सर्व लक्षात घेऊन डॉक्टरांनी ऑपरेशन हा उत्तम पर्याय आहे असे सुचविले व एका तपासणीकरीता हिंदूजा हॉस्पीटलला रेफर केले□तेथे टेस्ट करणा□या डॉक्टरांनीही टाटामध्येच उपचार घ्यावे असा प्रेमाचा सल्ला दिला . आम्हाला सगलीकडेच चांगले डॉक्टर लाभले अन् त्यांच्यावर आम्ही संपूर्ण विश्वास ठेवला . शेवटी 4 ऑगस्ट□1989 रोजी टाटा हॉस्पीटलमध्ये ॲडमिट झालो . सर्व प्राथमिक चाचण्या झाल्यानंतर 7 ऑगस्टला ऑपरेशन ठरले . यादिवशी माझे जवळ जवळ सगळे मित्र हॉस्पीटलमध्ये हजर होते . प्रत्येकांनी आपापल्या

परीने मदत केली□धीर दिला. **14** दिवस हॉस्पीटल मध्ये होतो अनेक मित्र आळीपाळीने रात्रीच्या सोबतीला राहिले. दिवसा माधुरी असायची. सावलीसारखी सोबत केली तिने दिवसा माझ्याबरोबर व रात्री मुलासाठी घरी जायची. आमचा तीन वर्षाचा मुलगा घरी वाट बघत असायचा. गुणी पोर ते ... कधीच त□ार नाही. हट्ट नाही□मला बरे नाही□हे त्याला समजेल या शब्दात सांगितले होते माधुरी घरी गेल्यावर माझी विचारपूस करायचा, मी घरी कधी येणार हे विचारायचा. मलाही त्याची खूप आठवण येत होती. भेटावेसे वाटत होते म्हणुन एकदा माधुरी त्याला घेऊन आली मला बघितल्याबरोबर धावत आला व गळयात पडला. टाके असल्याचे दिसल्याबरोबर जरा बावरलाही. मी त्याला जवळ घेतले□त्याच्याशी बोललो तेव्हा कुठे मोकळा झाला. हळूच तिरप्या नजरेने टाके पाहत होता. सगळे समजावून सांगितल्यावर कधीच विचारणा नाही केली. इतकी वर्षे झाली तरीही ते प्रसंग व दिवस तसेच आठवतात.

अजुन एक प्रसंग मनावर कायमचा कोरला गेला. ऑपरेशन झाल्यानंतर दुस□या दिवसापासुन मला फिरायला लावले. वरांड्यात फिरताना लहान लहान मुले दिसायची याच व्याधीने ग्रासलेली. कोणी आईच्या कडेवर तर कोणी बाबांच्या खांदयावर. काही इथे तिथे फिरत होती□फिरत होती काय□बागडत होती म्हटले तरी चालेल□त्यांच्या चेह□यावर ना भीती□ना चिंता□नॉर्मल वागताना दिसली. मग□मनात एक विचार आला□ मी तर **36** वर्षे आयुष्य जगलो आहे□ही तर आताच कुठे जगु लागली आहेत. उमळू पाहत आहेत□तरीही अगदी नॉर्मल वागत आहेत. मजेत फिरत आहेत. त्या निरागस जीवांना पाहिले□त्यांच्या वेदनेचा विचार आला. अन् माझा अर्धा आजार तिथेच पळाला. त्यांचे वागणे बरीच काही शिकवून गेले. खरे सांगतो. त्यादिवसापासून स्वतःसाठी कधी रडलो नाही पुढे ज्या ज्या वेळी ॲडमिट झालो त्या प्रत्येकवेळी सगळयांना सहज सामोरे गेलो. अगदी आनंदाने सगळे सहन केले डॉ. संघवीनाही माझे खूप कौतूक वाटू लागले.

दुःख कोणाला नसते□दुःख□वेदना तर सर्वत्र आहे□पण दुःखाचेही दुःख केले नाही. माझ्या आजारपणात मला सहानुभूती दाखविली की□मी विषय बदलायचो समोरच्याला गप करायचो कदाचित त्यांना वाईट वाटले असेल. आज आम्ही सगळयांतून सही सलामत बाहेर पडलो आहोत. आम्ही कधी परत हसायला लागलो ते आज आठवतही नाही कारण आम्ही स्वतःला लगेच सावरले होते. कुठलीही गोष्ट अशक्य नाही. तेव्हा माधुरी लगेच व छान समजावयाची□माधुरीचा विश्वास व सोबत कुटुंबिय□मित्र मैत्रीण□नातेवाईक यांची साथ न विशेष म्हणजे वेळीच व योग्य डॉक्टरी उपचार या सर्वामुळे आम्ही जिंकलो. हो माधुरी जिंकली होती. तेच ते कोलासो मॅडमचे शब्द “माधुरी तू जिंकलीस” मग आहे ना? वेगळा अर्थ या शब्दांना□

# होकार

**--- बॅप्टीस्ट एम. वाझ, दारसेंग**

ख्रिसमसशी रजा संपवून मी अमेरिकेला निघालो होतो. माझ्या कोरिअन विमानाचा हॉल्ट सेऊलला होता. माझे लगेज परस्पर दुस□या विमानात जाणार होते. त्यामुळे फक्त हॅण्डबॅग घेऊन मी सेऊल एअरपोटला उतरलो. तव्वल आठ तासांचा हॉल्ट असल्यामुळे विश्रांतीसाठी मी एकांत शोधत होतो. एके ठिकाणी कोप□यात मला सोफा दिसला त्यावर रेळून बसलो.

साऊथ कोरीयाची राजधानी असलेल्या या ठिकाणी कोणी ओळखीचा भेटेल याची शास्वती नव्हती□ त्यामुळे बाजूला असलेल्या काचेतून दर दोन मिनीटांनी आकाशात झेपावणा□यात विमानाकडे बघून मी वेळ घालवत होतो. परंतु त्याचाही कंटाळा आला. सुस्ती घालविण्यासाठी समोर असलेल्या कॉफी हाऊस मध्ये गेलो आणि मी चकीत झालो. कॉफी पिताना मला पाठमोरी दिसली. मी हळूच "कॅरल तू येथे कशी काय□" म्हणून विस्मयाने विचारले. तीने ही लगेच मागे डोकावून पाहिले□आणि चकीत होऊन म्हणाली "किंगस्टन, पण तू येथे कसा?" "What is surprise?" ती जवळ जवळ ओरडलीच. आम्ही घाईघाई ने कॉफी संपवून एकांतात कोप□यात बसलो.

कॅरल ही माझी कॉलेजची क्लासमेट. अगदी हुशार आणि चुणचुणीत मुलगी. नाकी□डोळी सुरेख□ काळेभोर डोळे□लांबसडक केस□गोरी कांती विलोभनीय हास्य व बोलका चेहरा यामुळे कॉलेजच्या मित्रमंडळीत ती सर्वांन हवीहवीशी वाटायची. आज तब्बल चार□पाच वर्षांनी ती मला भेटली अन् ते ही सेऊलला□परक्या ठिकाणी □

तीला पाहून मला वांद्रे येथील फादर ॲग्नेलो कॉलेजचे दिवस आठवले. आम्ही B.E. च्या शेवटच्या वर्षी होतो. कॉलेजने दिलेल्या एका प्रोजेक्टवर काम करत होतो. त्यामुळे बहुतेक वेळा आम्ही एकत्र असायचो तिचा स्वभाव अवखळ व मनमोकळा असल्यामुळे आम्ही सतत हसत□खिदळत असायचो. आमच्याकडे पाहून आम्ही दोघे एकमेकांच्या प्रेमात पडलो आहोत अशी मित्रांना शंका यायची. पण आमच्यात तसं काही नव्हतं फक्त निखळ मैत्री होती□आणि आम्हा दोघांनाही त्याची कल्पना होती.

पुढे कॉलेज संपले. मी एमएस करण्यासाठी USA ला गेलो व तेथेच Yahoo मध्ये कामाला लागलो. "किंगस्टन□अरे तू आहेस कुठे□आणी सद्या काय करतोस□" तिच्या प्रश्नांनी माझी तंद्री भंग पावली.

"कॅरल, मी सद्या कॅलीफोर्निया येथे Yahoo कंपनी Software Consultant म्हणुन काम करतो"

"अरे, किंगस्टन तू लग्न बिग्न केलंस की नाही?"

"अग असं काय म्हणतेस. माझे दोन वर्षापूर्वीच लग्न झाले आणी मला एक वर्षाचा मुलगा आहे."

"काय म्हणतोस काय?" असे म्हणुन मोठमोठयाने हसत तीने माझ्या पाठीवर जोरात थाप मारली. तेच ते निरागस हास्य □तेच तो अवखळपणा □तोच तो मनमोकळा स्वभाव□

"कॅरल, तू पूर्वी होती तशीच आहे. तुझ्यात काही फरक पडलेला नाही. पण तू काय म्हणतेस □ तुला कोणी राजकुमार भेटला की नाही□"

“अरे घोडयावर बसवून सासरी घेऊन जाणारा राजकुमार फक्त स्वप्नातच दिसतो. ख-या जीवनामध्ये तो भेटत नसतो.” काहीशा खेदाने ती बोलली.

“बरं ते जाऊ दे. आता तू काय करतेस?”

“मी कॅनेडाला M.S. केले व तेथे माय□सॉफ्ट कंपनीमध्ये कामाला आहे. मम्मीच्या आग्रहावरून मुलगा पाहण्यासाठी घरी गेले होते पण योग काही जुळुन आला नाही आणि मी परत निघाले.” बोलताना तीचा स्वर जड झाला होता. “अग कॅरल़ तुझ्या सारख्य सुंदर□सुस्वभावी व उच्चशिक्षित मुलीशी लग्न करण्यासाठी मुलांची लाईन लागेल.”

“अरे हे शिक्षणच माझ्या लग्नासाठी अडथळा ठरत आहे.”

“कॅरल□कसं काय□मी नाही समजलो.”

नंतर कॅरल बोलत होती. मी ऐकत होतो. मन सुन होत होतं□

M.S. ला दुस□या वर्षाला असताना कॅरलला वसईतील एका चांगल्या घराण्यातील मुलगा सांगून आला होता. तो मुलगा ऑस्ट्रेलियात स्थायिक होणार होता. कॅरललाही तो मुलगा आवडला होता. लग्नाला कॅरलची तयारी होती पण कॅरलने M.S. अर्धवट सोडून लग्न करणे हे आईला पसंत नव्हते. म्हणून तीने ते प्रयोजन नाकारले.

कॅरल ही तिच्या आई वडिलांची एकलती एक मुलगी. त्यामुळे ती वडिलांची खूप आवडती होती. तिला इंजीनियर झालेले पहावे□हे वडिलांचे स्वप्न होते. परंतू दुर्देवाने कॅरल दहावीला असताना तिच्या वडिलांचे अपघातात निधन झाले. तिची आई एका कंपनीत मोठ्या पदावर काम करीत होती. मोठ्या कष्टाने आईनी तिला वाढविले.

रजेवर असताना कॅरलने दोन□तीन मुलगे पाहिले होते. त्यातला एक मुलगा तिला आवडला होता. तो उंचपुरा□देखणा व सुस्वभावी होता. बी. कॉम. होऊन एका बॅंकेत कामाला होता. त्याच्याशी लग्न करायला तिची तयारी होती. त्यासाठी भारतात रहायलासुद्धा ती राजी झाली होती. परंतु कॅरल इंजीनियर आहे हे कळल्यावर त्याने नकार दिला. आपल्यापेक्षा जास्त शिकलेली मुलगी त्याला ‘सहचारिणी’ म्हणुन नको होती. ‘चांगल्या सुखी संसाराला स्त्री काकणभर तरी कमी भरावी या जुन्या संस्कारी विचाराचा तो होता. ती हे सगळे निराश होऊन कातरलेल्या स्वरात सांगत होती.

इतक्यात कॅलीफॉनियाला जाणारे फ्लाइट लागल्याची अनाउंसमेंट झाली. त्यामुळे आमचे बोलणे तेथेच थांबले. मी तिचा हात हातात घेतला, प्रेमाने थोपटला व सर्वकाही ठीक होईल असे म्हणुन तीचा निरोप घेतला.

मी विमानत बसलो. डोळे मिटले. पण मन अस्वस्थ झाले होते. कॅरलबदलचे विचार डोक्यातून जात नव्हते. ते विमानच्या वेगापेक्षाही जास्त वेगाने धावत होते.

घरी आलो. दुस□या दिवशी कामावर जायचे होते म्हणुन आंघोळ करून लगेच झोपी गेलो. कामाच्या नंतर मी कॅरळला विसरून गेलो. चार□पाच महिन्यांनी कॅरलचा फोन आला.तेव्हा तिची एअरपोर्टवर झालेली भेंट आठवली.

“हॅलो□किंगस्टन मी कॅरल बोलते□कसा आहेस तू□

“अग, मी छान आहे. तू काय म्हणतेस?”

"मी काय म्हणणार किंगस्टन? पण आता जाणवायला लागले की जीवन फार सुंदर आहे. जीवन म्हणजे खूप आनंद, खूप मजा, खूप धमाल!" तीचे बोलणे खूप उत्साही व आनंदी वाटत होते. तिच्या प्रत्येक शब्दात अवखळपणा जाणवत होता.

तिचे शब्द आनंदाच्या लाटेवर स्वार होऊन वादळासारखे माझ्या कानात धोगावत होते. पण एकाएकी त्या वादळाचा वेग कमी झाला व गंभीर होऊन ती म्हणाली "माझे तुझ्याकडे एक काम आहे. तीचा स्वर लाडीक झाला होता.

"अग म्हणजे तू कुणाच्या प्रेमात पडलीस की काय?"

"हो रे किंगस्टन. मी लग्न सुद्धा करायचे ठरवले आहे.

"म्हणजे अखेर तुला राजकुमार भेटला"

"हो! तो खरोखर राजकुमारासारखाच आहे." ती उल्हासीत होऊन बोलत होती.

"पण एक अडचण आहे रे"

"कसली अडचण? मी आहे ना, अडचण दूर करायला. तू फक्त सांग मला."

"अरे माझी मम्मी लग्नाला सम्मती देत नाही."

" काऽऽ? आणी कोण आहे तो राजकुमार? कुठला आहे तो?" मी अधीरतेने एकामागून एक प्रश्न विचारले.

"तो अमेरिकन बॉर्न कॅनेडीअन आहे. केवीन डग्लस त्याचे नाव. आमच्याच कंपनीत काम करतो तो टिम लीडर आहे. खूप खूप प्रेमळ व सुस्वभावी आहे. आम्ही एकमेकांना खूप आवडतो. मला तो सुखी ठेवेल याची मला पूर्ण खात्री आहे पण माझ्या आईला परदेशी जावई मान्य नाही. त्याच्याशी लग्न केले तर आत्महत्या करेल म्हणाली. काय करू मी□तूच उपाय सुचव.

"ठीक आहे घाबरू नकोस. धीर धर. मी तुझ्या आईशी बोलतो. तो पर्यंत सांभाळ स्वतःला."

"मला तुझ्याकडून हीच अपेक्षा होती. खरच तू माझा बेस्ट फ्रेंड आहेस." असं म्हणून तीने फोन ठेवून दिला.

दुस□या दिवशी रविवार होता. मी संध्याकाळी कॅरलच्या मम्मीला फोन लावला.

"हेलो!" पलीकडून तीच्या मम्मीचा आवाज आला.

"मम्मी□मी कॅरलचा मित्र किंगस्टन बोलतो. ओळखलं ना□"

"होना पोरा. तू कॅरलला सेऊलला भेटल्याचे तीने मला फोनवर सांगितले होते."

"काय म्हणतोस तू. लग्न बिग्न केलंस की नाही."

"हो. मम्मी."

"मग, आम्हाला विसरलास वाटते."

"नाही मम्मी. पण पाच सहा दिवसांचीच रजा मिळाली होती म्हणून घाईघाईने लग्न उरकून कामावर रूजू झालो. जवळच्या माणसाला देखील आमंत्रण देता नाही आले."

"ठीक आहे, फोन कसा काय केलास!"

"कॅरलचा काल फोन होता. तिने मुलगा पसंत केल्याची गोड बातमी दिली." मुद्यालाच हात घातला.

"कसली गोड बातमी? आपण पापभिरू, साधे-भोळे वसईकर रोज चर्चला जाणारे. धर्म, प्रथा सणवार नित्यनेमाणे पाळणारे. या उलट ते स्वछंदी व स्वैर जिवन जगणारे. भिन्न आचार विचार□भिन्न

खाद्य संस्कृती, भिन्न भाषा, भिन्न देश या सगळया भिन्नतेत माझी कॅरल कशी काय एकरूप होणार. त्यांच्याबरोबर आपली उठ-बस कशी काय शक्य आहे?"

"मग मम्मी तू वसईचा मुलगा का नाही शोधत?" मी माझा मुद्या पुढे रेटला.

"खूप प्रयत्न केला, पण तिला साजेशा मुलगा आढळला नाही."

"तसं नाही किंगस्टन, तिचे वडील गेल्यावर मी तिला 'लाडाने' वाढविले.

तिच्या वडिलाचे स्वप्न होते तिला इंजीनिअर करायचे. ते मी पूर्ण केले. याचा मला अभिमान वाटतो. पण कॅरलने परदेशी मुलाशी लग्न करावे हे मी कधीही मान्य करणार नाही."

"मम्मी लहानपणापासून तू तिला वाढविलेस तू तुझ्या मर्जीप्रमाणे. तिला शिक्षण दिले ते तुमच्या स्वप्नपूर्तीसाठी. आता ती वयात आली आहे तिला तिचे बरे वाईट काय आहे ते कळायला लागले आहे तिच्या आयुष्याचा निर्णय आता तिलाच घेऊ दे. आज पर्यंत आयुष्यात काय करावे हे तूच ठरवलेस. आता तिला ठरवू दे तिने आयुष्य कसे जगायचे ते तू तिच्या जीवनामध्ये ढवळाढवळ करू नकोस. नाही तर आयुष्यभर ती तुला दोष देत राहिल." "त्यामुळे तुझा "होकार" तिला कळव." "किंगस्टन पोरा तू म्हणतोस ते मला पटते. पण माझं आईचं हृदय तिळ तिळ तुटते. तिने परदेशातील मुलाशी लग्न करावे हे स्विकारायला माझं मन धजत नाही. कॅरल माझी एकूलती एक मुलगी ती सुखात, ऐश, आरामात रहावी हीच माझी इच्छा असणार. मी तिच्या लग्नाला "होकार" कसा देऊ?"

"मम्मी आता जग खूप जवळ आले आहे. देश, भाषा, आचार, विचार न संस्कृती यांच्या सीमा धूसर होत चालल्या आहेत. एक नवी संस्कृती उदयास येत आहे. आज समाजात खूप स्थित्यंतर होत आहे. अन् स्थित्यंतर हा निसर्गाचा नियम आहे तो आपण बदलू शकत नाही म्हणून मम्मी घट्ट कर व कॅरलला स्वतःचा जोडीदार शोधण्याचे स्वातंत्र्य दे कारण ती आता प्रगल्भ झाली आहे. ती योग्य निर्णय घेऊ शकते याची मला खात्री आहे."

"किंगस्टन पोरा, तू माझे डोळे उघडलेस. आजपर्यंत कॅरल माझं विश्व होतं. माझ्या पतीच्या निधनानंतर माझ्या जगण्याचा केंद्रबिंदू फक्त कॅरलच होती. त्यामुळे तिचही स्वातंत्र्य विश्व आहे हे मी विसरूनच गेले होते. आता तिला तिच्या विश्वात रमू दे, जगू दे तिला तिच्या इच्छेप्रमाणे जड अंतःकरणाने व डबडबलेल्या डोळयाने का असेना, मी तिला तिच्या नवीन समरस होण्यासाठी निरोप देईन. माझा आणि माझ्या दिवंगत पतीचा आशीर्वाद सतत तिच्या पाठीशी असेल. तिच्या पाठीशी असेल. आजच मी माझा "होकार" तीला कळवते असे म्हणून तिने फोन ठेवून दिला."

मम्मीचा "होकार" ऐकून मी खूप खुश झालो होतो. माझा आनंद हृदयात भावत नव्हता. मी खिडकी उघडली. बाहेर स्वच्छ व उबदार उन्हं पडले होते. वारा अवखळ होऊन बागडत होता. रात्री झालेल्या हिमवर्षाचा बर्फ आता वितळू लागला होता. त्या वितळणाऱ्या बर्फाचे टपोरे थेंब उन्हात मोत्यासारखे चमकत होते. दूरवर खटयाळ वाऱ्यामुळे शेजारी शेजारी असलेल्या वृक्षांच्या फांद्या एकमेकांना स्पर्श करून प्रेमगुंजन करीत होते. ते बघून माझे मन हर्षोन्मुदाने भरून आले. आनंदातिशयाने डोळे ही काठोकाठ भरून आले. कारण... दूरवर असलेले दोन जीव माझ्यामुळे एकत्र येणार होते. आपापसात प्रेमगुंजन करणार होते...!! अन् विवाहाच्या प्रेमळ बंधनात एकरूप होणार होते...!!!

# टाइमबँकेच्या निमित्ताने. . . .

- सॅबी परेरा, sabypereira@gmail.com

वेळेचे महत्व सांगताना आपण बऱ्याचदा इंग्रजीतील Time is Money ही म्हण वापरतो. वेळ कधी सांगून येत नाही आणि वेळ कुणासाठी थांबत नाही असेही आपण म्हणतो. पण आपल्याकडे असलेला मोकळा वेळ आपल्याला खरोखरीच्या पैशात रूपांतरित करता आला किंवा भविष्यातील वापरासाठी साठवता आला तर?? ही कल्पना काहीशी अशक्य कोटीतली वाटत असली तरी काही प्रमाणात ती 'टाईम बँके'च्या रूपाने प्रत्यक्षात उतरली आहे. हे टाईम बँक प्रकरण काय आहे हे जाणून घेण्यापूर्वी आपण ही संकल्पना सर्वात प्रथम जिथे उगम पावली आणि वापरली गेली त्या स्वित्झर्लंड विषयी थोडी माहिती घेऊ या ...

स्वित्झर्लंड हा तसा अत्यंत विरळ लोकवस्ती (४१,००० चौरस किमी मधे जेमतेम ८५ लाख लोक) असलेला देश. आज स्वित्झर्लंड मध्ये प्रत्येक सहा व्यक्तीपैकी एक व्यक्ती ६५ वर्षे किंवा अधिक वयाची (जेष्ठ नागरिक) आहे. अशा अनुत्पादक वयोवृद्धांची, (ज्यांची विशेष काळजी घ्यावी लागते) वाढती संख्या हे स्वित्झर्लंडच्या स्थानिक स्वराज्य संस्थांपुढील मोठे आव्हान आहे.

स्वित्झर्लंडच्या फेडरल स्टॅटिस्टिक्स ऑफिसने २०१० साली केलेल्या सर्वेक्षणानुसार त्यांच्या नागरिकांचे सरासरी वयोमान ८३ वर्षे असून, एकूण लोकसंख्येच्या १६.९०% इतके लोक ६५ वर्षाहून अधिक वयाचे आहेत. याउलट लोकसंख्येतील २० वर्षाखालील मुलांचा टक्का दिवसेंदिवस घसरत चालला आहे. जेष्ठ नागरिकांपैकी ७०% हुन अधिक लोक स्मृतीभंश किंवा डिप्रेशनचे शिकार आहेत. खाणे, पिणे, नैसर्गिक विधी करणे, कपडे बदलणे अशी कामे देखील ही लोकं इतरांच्या मदतीशिवाय करू शकत नाहीत.

या पार्श्वभूमीवर, स्वित्झर्लंडच्या पूर्वोत्तर भागात जर्मनीच्या सीमेला लागून असेलेल्या साधारणतः ७५,००० लोकसंख्येच्या सेंट गॅलेन या शहरात २०१२ मध्ये जगातील पहिली टाईम बँक सुरु झाली. पूर्वीच्या काळी (आणि काही प्रमाणात आजही) खेडेगावातील लोक जसे आपल्या आजूबाजूला असणाऱ्या माणसांची, मग ते त्यांचे कुटुंबीय असोत, शेजारी असोत, नातेवाईक असोत किंवा मित्र असोत, अडीअडचणीच्या वेळी काळजी घेत तशा प्रकारची एक औपचारिक व्यवस्था आणण्याचा प्रयत्न म्हणजे हे टाईम बँक. ही अनोखी बँक सुरु करण्यापूर्वी चार वर्षे म्हणजे २००८ पासून नागरिकांना सेवेच्या बदल्यात सेवा देणारी एक व्यवस्था सेंट गॅलेनची स्थानिक स्वराज्य संस्था स्वीस रेडक्रॉस च्या मदतीने चालवीत होती.

टाईम बँक या व्यवस्थेमध्ये, उत्तम आरोग्य आणि मोकळा वेळ असलेली एक व्यक्ती (ठेवीदार) त्याच्या सभोवतालच्या परिसरातील एखाद्या वयोवृद्धाला मदत करण्यासाठी आपला काही वेळ देते. त्या व्यक्तीने दिलेला हा वेळ नोंदवून ठेवण्याची एक व्यवस्था असते. टाईम बँकेच्या शब्दात त्याला ठेव किंवा डिपॉझिट

म्हटले जाते. आणि हे डिपॉझिट जेव्हा त्या ठेवीदाराला गरज असेल तेव्हा त्या टाईम बँकेकडून सेवेच्या स्वरूपात परत केले जाते.

हे सर्व आज आठवण्याचं कारण म्हणजे 'टाईम्स ऑफ इंडिया'च्या स्पिकिंग ट्री या स्तंभात आलेलं पुढील अनुभव कथन ...

स्वित्झर्लंडमधे अभ्यास करीत असतांना मी एका भाड्याच्या घरात राहत होतो. त्या घराची मालकीण श्रीमती क्रित्सीना ही ६७ वर्षांची बाई शिक्षिका म्हणून ररिटायर्ड झाली. खरं म्हणजे तेथले पेन्शन इतकं मोठं असतं की तिला तिच्या उत्तरायुष्यात खायची, प्यायची काही ददात नव्हती. तरीसुध्दा आश्चर्याची गोष्ट म्हणजे तिने एका  ८७ वर्षांच्या महिलेची सेवा करण्याचे काम पत्करले काळजीवाहक म्हणून. मी तिला विचारले अधिक पैशाच्या मोहाने तू हे स्वीकारले आहेस कां? तर तिने दिलेले उत्तर मला संभ्रमीत करणारे होते. ती म्हणाली, नाही, मी पैशांसाठी नाही हे करीत. मी माझा हा कामाचा वेळ *टाइमबँक* मध्ये टाकते. आणि मी जेंव्हा म्हातारी होईन तेंव्हा मी ह्या टाईमबँकमधून मला सेवेचा वेळ काढून घेईन.

मला टाईमबँक असं काही असतं, हे ऐकूनच आश्चर्याचा धक्काच बसला. मी तिला विस्ताराने या संकल्पनेची माहिती विचारली. ती म्हणाली, स्वीसच्या शासनाने एक कल्याणकारी कार्यक्रम म्हणून याची सुरुवात केली. त्याचं असं आहे की जेंव्हा व्यक्ती सुद्रुढपणे तारुण्यात असते तेंव्हा ती आपल्यापेक्षा व्रुध्दाची सेवा करतात आणि ती जेंव्हा व्रुध्द होते तेंव्हा अशा सेवेची तिला आवश्यकता भासते. तेंव्हा अशा पूर्वी सेवा केलेल्या वेळेची परतफेड म्हणून तिला सेवा मिळते. अशी सेवेकरी व्यक्ती सुद्रुढ, संवेदनशील आणि प्रेमळ स्वभावाची असावी. ज्या व्रुध्दांनासेवेची अपेक्षा असते अशा अनेक संधी त्या तरुण व्यक्तीला मिळू शकतात. अशी त्यांची सेवेची वेळ त्यांच्या सेवा खात्यात जमा होते. त्याच्यि घराची मालकीण आठवड्यातून दोन वेळा दोन दोन तास व्रुध्दांना त्यांच्या काही गोष्टी खरेदीसाठी किंवा त्यांच्या घरकामासाठी किंवा त्यांच्याशी गप्पा मारण्यासाठी, वाचनासाठी अथवा बाहेर फिरण्यासाठी व्यतीत करीत होती. अशाप्रकारे एक वर्षापर्यंत सेवा दिल्यावर तिच्या सेवेची गणना करुन तिला *टाइमबँक कार्ड* दिलं जाईल. त्यात त्या सेवेची वेळ नमूद केलेली असेल. जेंव्हा सेवेकरी व्रुध्द होईल, तेंव्हा तिला तिच्यासाठी त्या टाइमबँक कार्डाव्दारे सेवा मिळू शकेल. तिच्या टाइमकार्डाची तपासणी होऊन *टाइमबँक* तिच्यासाठी सेवेकरी तिच्या घरी अथवा हॉस्पिटलमधे पाठवून देईल.

एके दिवशी मला माझ्या घरमालकीणीचा फोन आला. ती म्हणाली, काही गोष्टी काढण्यासाठी ती स्टुलावर उभी होती. तोल जाऊन ती पडली आणि तिच्या मांडीचे हाड मोडले आहे. मी ऑफिसमधून रजा घेतली आणि तिला हॉस्पिटलमधे पोहोचवली. मी तिच्या सेवेसाठी रजा टाकत होतो. पण ती म्हणाली, तशी काही जरुरी नाही. मी माझ्या टाइमबँकेतून सेवेसाठी टाइम विड्राव्हल फॉर्म भरला आहे. आणि टाइमबँक आता माझी काळजी घेईल. आणि खरेच दोन तासात टाइमबँकेतून सेवेकरी हजर झाले. त्यानंतर महिनाभर त्या सेवा स्वयंसेविकेने माझ्या घर मालकिणीचे घर सांभाळले. तिच्यासाठी स्वयंपाक करुन जेवू घातले. तिच्याशी गप्पा मारुन आनंदी ठेवले. सेवेकरीच्या सहाय्याने घरमाकीण लवकरच पूर्ण बरी झाली. बरी झाल्यावर लगेच ती

आपल्या सेवाभावी कार्याला लागली. तिचे म्हणणे असे की, ती जोपर्यंत कार्यक्षम आहे तोपर्यंत ती जास्तीत जास्त वेळ टाइमबँक मध्ये टाकू इच्छिते.”

यावरून कुणी निष्कर्ष काढील की, स्वित्झर्लंडमधे आणि एकूणच पाश्च्यात्य जगतात बंधुभाव, शेजारप्रीती ही कमी होत चाललीय त्यामुळे तिथे अशा बँकेची गरज असेल. परंतु हा दावा स्वित्झर्लंड सरकारला मान्य नाही. त्यांच्या मते आज सगळीकडे विभक्त कुटुंब पद्धती प्रचलित आहे. नोकरी धंद्यासाठी लोक मोठ्या प्रमाणात स्थलांतर करीत आहेत. त्यामुळे प्रत्येक वेळी तुम्हाला मदत करण्यासाठी तुमचे कुटुंबीय, तुमचे नातेवाईक तुमच्या जवळ असतीलच असे नाही. अशा वेळी गरजां भागविण्यासाठी आपल्याला आपल्या कौटुंबिक परिघाबाहेर पडण्याची गरज आहे. आणि ती गरज टाईम बँक सारखी संस्था भागवू शकते .

स्वित्झर्लंड सरकारने केलेल्या पाहणीनुसार बाजारहाट, प्रशासकीय कामे, वैयक्तिक आणि घरादाराची स्वच्छता इत्यादी सारखी दैनंदिन कामे करण्यासाठी तेथील जेष्ठ नागरिकांना इतरांच्या मदतीची गरज लागते. या कामांचा भार सरकारच्या डोक्यावर न येता टाईम बँकेसारख्या अभिनव सामाजिक व्यावसायिक संस्थेमार्फत करण्याचा स्विस सरकारचा प्रयत्न आहे. या मुख्य उद्दिष्टाबरोबरच खालील उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून स्वित्झर्लंड सरकारने हा टाईम बँकेचा प्रयोग केला आहे ...:

१) जेष्ठ नागरिकांना स्वतःच्या घरात स्वतंत्रपणे जास्तीत जास्त काळ सुखाने राहता येईल.

२) या योजनेमुळे जेष्ठ नागरिकांना आपल्या एकटेपणावर मात करता येईल आणि विविध प्रकारची लोकं एकत्र येतील.

३) उपलब्ध असलेल्या मानव संसाधन (Human Resource) साधनांचा वापर करणे इतकेच नव्हे तर विरळ होत चाललेले सामाजिक समरसतेचे बांध अधिक दृढ करता येतील.

या टाईम बँकेच्या योजनेत सामील होणे न होणे हे जरी नागरिकांसाठी ऐच्छिक असले तरीही सेंट गॅलेनच्या स्थानिक प्रशासनाने, या प्रकल्पाच्या वेबसाईटचा तसेच प्रशासकीय आणि प्रशिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी सुमारे १५०,००० स्विस फ्रँक इतक्या बीज भांडवलाचा एक ट्रस्ट स्थापन केला आहे. भविष्यात काही कारणाने जर हा प्रकल्प चालू ठेवणे अशक्य झाले तर ज्यांनी ह्या प्रकल्पात आपला वेळ गुंतवलेला आहे त्यांना पैशाच्या स्वरूपात मोबदला देता येईल अशीही तरतूद या ट्रस्ट ने केलेली आहे.

गरजवंताला मदतीउत्सुक व्यक्तीपर्यंत पोहोचवणे, एखाद्याने केलेल्या मदतीचा हिशेब ठेवणे, त्या मदतीचे योग्य चलनात रूपांतरण करणे आणि दात्याला जेव्हा गरज भासेल तेव्हा त्याच्या खात्यातील मदतीच्या शिलकीप्रमाणे त्याला मदत मिळवून देणे हे पूर्वीच्या काळी खूप कठीण असलेले काम आता तंत्रज्ञानांतील प्रगतीमुळे (विविध प्रकारचे सॉफ्टवेयर, मोबाईल अँप) खूपच सोपे झाले आहे.

सेवानिवृत्त झालेल्या परंतु शारीरिक आणि आर्थिकदृष्टया सुदृढ असलेल्या अनेक स्वीस नागरिकांना आपला मोकळा वेळ वाया घालविणे हा सामाजिक गुन्हा वाटतो आणि व्यस्त राहण्यासाठी, केवळ कुठलातरी छंद जोपासण्यापेक्षा इतरांच्या आयुष्यात आनंद निर्माण करील अशा एखाद्या कामात स्वतःला जोडून घेणे त्यांना

जास्त संयुक्तिक वाटते. अशी विचारसरणी असलेले लोक असणे आणि त्यांची संख्या वाढणे ही टाईम बँकेसारखा प्रकल्प राबविण्यासाठी महत्वाची गरज आहे.

आपण भारतीय लोक एका महान संस्कृतीचा भाग असल्याने, आपल्या कौटुंबिक आणि सामाजिक संबंधात अजूनही ओलावा आहे. गरजवंताला मदत करणे, त्यांच्यासाठी वेळ देणे हा आपल्या सामाजिक उत्तरदायित्वाचा भाग आहे. निदान तसा आपला दावा आहे. त्यामुळे केलेल्या मदतीचा हिशेब ठेवणे आणि त्याबदल्यात आपल्याला गरज असताना हक्काने मदत घेणे हे आपल्याकडे सुसंस्कृतपणाचे लक्षण समजले जात नाही. म्हणूनच आपल्याला अशा भावनाशून्य कोरड्या संस्थेची गरज नाही असा बऱ्याच लोकांचा सूर दिसतो. परंतु कितीही निरपेक्ष भावनेने केलेले पुण्यकर्म असो त्याबदल्यात, आता लगेच नाही तर आपल्या गरजेच्या वेळी तरी आपल्याला काहीतरी मिळावे अशी सुप्त इच्छाही नसलेले किती जण भेटतील ? अगदी कसलीच अपेक्षा न करणारा इसम देखील आपल्या पुण्यकर्माबद्दल मृत्यपश्चात आपल्याला स्वर्गात जागा मिळावी अशी अपेक्षा करतोच करतो. आज आपण आपल्या भविष्याची आर्थिक तरतूद करून ठेवतोच की तशीच ही भविष्यात लागणाऱ्या सेवांची तरतूद समजायला हरकत नाही.

हे केवळ स्वित्झर्लंड मधेच होऊ शकते, भारतासारख्या देशात नाही असे आपल्या सारखेच मलाही वाटत होते पण मध्यंतरी वाचनात आले कि केरळमधल्या कोची शहरात १६ तरुण व्यावसायिकांनी एकत्र येऊन HourWorld या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या सहकार्याने प्रायोगिक तत्वावर कोची टाईम बँकेची स्थापना केली आहे आणि सध्या ते त्या बँकेचा विस्तार करत आहेत. ह्या कोची टाईम बँकेची उद्दिष्टे स्वित्झरलँडच्या टाईम बँकेपेक्षा वेगळी असली तरी मूळ संकल्पना मात्र तीच आहे.

जग बदलत आहे आणि त्याबरोबर जगाच्या गरज बदलत आहेत. कुठल्याही परतफेडीची अपेक्षा ना करता गरजूंना मदत करणे हे कितीही उद्दात्त आणि आदर्श असले तरी अशा सेवाभावी लोकांचा टक्का गरजू लोकांच्या तुलनेत नेहमीच अत्यल्प राहिलेला आहे हे सत्य अमान्य करता येणार नाही. त्यामुळे भविष्यात आपल्याला गरज भासेल तेव्हा काही मिळण्याच्या अपेक्षेने आज कुणी सेवा देऊ करीत असेल तर ते स्वागतार्हच मानले पाहिजे. आपल्या सर्व कौटुंबिक, सामाजिक, राजकीय समस्यांसाठी नेहमी सरकारनेच काहीतरी करावे अशी अपेक्षा करण्यापेक्षा जितके जमेल तितके योगदान आपणही द्यावे हेच योग्य आहे. आपणही पुढे व्रुध्द होणार आहोत आणि सध्या न्यूक्लीअर कुटुंबाच्या काळात आपल्या व्रुध्दत्वी काळजीवाहक म्हणून आपल्याला कोणी साथी उपलब्ध होऊ शकेल ह्या भावनेने आजच्या तरुणाईने व्रुध्दांशी सेवाभाव ठेवावा हा विचार केल्यास भारतीय व्रुध्दांचे भवितव्य उज्वल असेल.

आपण एखादा मेडिकल इन्शुरन्स किंवा लाईफ इन्शुरन्सचा टर्म प्लॅन घेतो. दरमहा किंवा दरवर्षी ठराविक रक्कम त्यासाठी भरतो. परंतु, शक्यतो ह्या इन्शुरन्सचा फायदा घ्यायची (म्हणजेच आजारी पडून हॉस्पिटल मध्ये दाखल होण्याची किंवा अकाली मरण्याची) वेळ आपल्यावर येऊ नये अशीच आपली इच्छा असते. अशाच ' नेकी कर और दर्या मे डाल' या दृष्टीने टाईम बँक या संकल्पनेकडे पाहण्याची गरज आहे असे मला वाटते.

# ख्रिश्चन विवाह नोंदणी – आशिष लोपीस, निर्मळ

**महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या ख्रिश्चन विवाह नोंदणी निबंधक यांच्याकडे कोर्ट मॅरेज करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती आहे.:-**

1. चर्चमध्ये लावण्यात येणाऱ्या विवाहापूर्वी विवाह इच्छूक वधु-वरांनी महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या ख्रिश्चन विवाह नोंदणी निबंधक यांच्यासमोर नोटीस देवून कोर्ट मॅरेज करता येते.
2. वधु-वरापैकी किमान एक पक्ष हा धर्माने ख्रिश्चन व महाराष्ट्राचा नागरीक असावा. अन्य पक्ष कोणत्याही जाती धर्माचा व भारतातील कोणत्याही राज्यातील असला तरीही त्यांना विवाह करण्यासाठी मॅरेज रजिस्ट्रार समोर नोटीस देता येते.
3. विवाह इच्छूक एखादा पक्ष अन्य देशाचा नागरीक असल्यास अशा विवाह इच्छूक उमेदवारांना देखील नोटीस देता येते. मात्र त्यासाठी काही अतिरिक्त कागदपत्रे त्या नागरीकाला त्याच्या स्वत:च्या देशातील शासकीय यंत्रणेकडून प्राप्त करुन सादर करावी लागतात.
4. विवाहाची नोटीस देण्यासाठी नोटीसच्या दिनांकाला वधूचे वय किमान १८ वर्षे व वराचे वय किमान २१ वर्षे असणे आवश्यक आहे.
5. एकदा नोटीस दिल्यानंतर ६० दिवसांच्या आत कोर्ट मॅरेज होणे आवश्यक आहे. अन्यथा अशी नोटीस रद्द होते.
6. नोटीस देण्यासाठी दोन्ही पक्षाकडून खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

| | |
|---|---|
| 1. फोटो (अलिकडे काढलेले पासपोर्ट साईझ प्रत्येकी एक फोटो) | 2. बॅप्टीझम सर्टिफिकेट(अलिकडे चर्चमधून प्राप्त केलेले) जो पक्ष धर्माने ख्रिश्चन नाही त्याचा जन्म दाखला. |
| 3. रेशनकार्ड | 4. आधारकार्ड |
| 5. पॅन कार्ड | 6. पासपोर्ट |
| 7. ड्रायव्हींग लायसन्स | 8. निवडणूक ओळखपत्र |
| 9. घटस्फोटीत असल्यास त्यांच्या घटस्फोटाबाबत न्यायालयाचे आदेश व डिक्री | 10. विधवा किंवा विदूर असल्यास त्यांच्या पूर्वीच्या विवाहाचे प्रमाणपत्र व मयत जोडीदाराचा मृत्यू दाखला. |
| 11. एक पक्ष परदेशी नागरीक असल्यास त्याच्याबाबतीत त्या देशातील सक्षम शासकीय अधिकाऱ्याकडून प्राप्त केलेले<br>1. Marital status certificate व<br>2. No Legal Impediment Certificate<br>3. भारतात अधिकृतरित्या येण्यासाठी प्राप्त केलेल्या Visa चा पुरावा. | 12. एक पक्ष जर अनिवासी भारतीय किंवा परदेशस्थ भारतीय असल्यास त्यांच्याकडून Non Resident Indian Card किंवा Overseas Citizen of India Card |

7. वरीलप्रमाणे कागदपत्रांसह Indian Christian Marriage Act 1872 नुसार विहित केलेल्या फॉर्ममध्ये विवाह इच्छूक उमेदवारांनी मॅरेज रजिस्ट्रारसमोर उपस्थित राहून नोटीस देणे आवश्यक आहे.
8. वरील सर्व मूळ कागदपत्रे व त्याआधारे नोटीसमध्ये उमेदवारांनी दिलेली माहिती याची मॅरेज रजिस्ट्रार यांनी खात्री केल्यानंतर नोटीस स्विकारली जाते. त्यानंतर कोर्ट मॅरेजसाठी तारीख निश्चित केली जाते.
9. कोर्ट मॅरेजच्या निश्चित केलेल्या दिनांकाला वधू-वर यांच्यासह दोन्ही बाजूने एक-एक साक्षीदार यांच्यासह विवाह निबंधकाच्या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहावे लागते.
10. साक्षीदाराची ओळख पटविण्यासाठी त्यांचा फोटो, स्वाक्षरी, पत्ता व जन्मदिनांक असलेले मूळ ओळखपत्र व त्याची प्रत घेऊन येणे आवश्यक आहे. यासाठी पासपोर्ट किंवा पॅनकार्ड व आधारकार्ड दोन्ही किंवा ड्रायव्हींग लायसन्स ही ओळखपत्रे साक्षीदारानी बरोबर घेऊन येणे आवश्यक आहे.
11. कोर्ट मॅरेजच्या दिनांकाला वधू-वर यांना साक्षीदाराच्या उपस्थितीत मॅरेज रजिस्ट्रार यांच्यासमोर कायदयाने निश्चित केल्याप्रमाणे शपथ घेऊन त्यावर सही करावी लागते. त्यानंतर कोर्ट मॅरेज रजिस्टर व मॅरेज सर्टिफिकेट यावर वधू-वर यांच्या व साक्षीदारांच्या सहया घेतल्या जातात. त्यावर मॅरेज रजिस्टर यांनी त्यांना शासनाने दिलेले अधिकृत सील उमटवून व सही केल्यानंतर असे Marriage Certificate वधू-वरांना प्रत्येकी दिले जाते. त्याचबरोबर अशाप्रकारे कोर्ट मॅरेज करण्यासाठी अवलंबिलेली विहित पध्दतीबद्दल Certificate Of Notice याची एक प्रत देखिल दिली जाते.
12. शासनाने नियुक्त केलेल्या मॅरेज रजिस्ट्रार यांनी अशा प्रकारे सही, शिक्यानिशी दिलेले मॅरेज सर्टिफिकेट हे भारताच्या कोणत्याही राज्यात कोणत्याही प्रयोजनासाठी तसेच परदेशातील वास्तव्यासाठी ग्राहय मानले जाते.

Authentication of Marriage Certificate issued by Church

**वरीलप्रमाणे कोर्ट मॅरेज केलेले नसेल परंतु चर्चमध्ये लग्न लावलेल्या विवाहीतांसाठी त्यांचे चर्चने दिलेले प्रमाणपत्र अधिकृत करुन घेण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती प्रचलित आहे.**

1. Indian Christian Marriage Act 1872 मधील तरतुदीनुसार चर्चेमधील नियुक्त धर्मगुरू यांनी विधीवत लावलेले विवाहाचे प्रमाणपत्र देताना त्याची नोंद विहित रजिस्टरमध्ये चर्चेने त्यांच्याकडे ठेवणे आवश्यक आहे. तसेच अशा रजिष्टरच्या अधिकृत प्रती महाराष्ट्र राज्याच्या नोंदणी महासंचालक, पुणे यांच्या कार्यालयाकडे वेळोवेळी पाठविणे आवश्यक आहे. नोंदणी महासंचालक यांच्या कार्यालयाकडे चर्चेने पाठविलेल्या रेकॉर्डच्या आधारे त्या कार्यालयाने प्रत्येक विवाहीत ख्रिश्चन नागरिकाला अधिकृत नोंदणीचे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.
2. प्राप्त परिस्थितीत अशा प्रकारचे रेकॉर्ड चर्चद्वारे वेळोवेळी नोंदणी महासंचालक यांचेकडे पाठविल्यानंतर त्यांच्याकडून प्रत्येक नागरिकाला प्रमाणपत्र घेण्यासाठी पुणे येथे जाऊन त्यासाठी अर्ज करावा लागतो

3. व त्यानंतर काही कालावधीनंतर हे प्रमाणपत्र प्राप्त होते. हा व्याप टाळून सोप्या मार्गाने चर्चने दिलेले विवाह नोंदणी प्रमाणपत्र अधिकृत करून घेण्यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या ख्रिश्चन विवाह निबंधक यांच्याकडून चर्चच्या विवाह प्रमाणपत्रावर प्रतिस्वाक्षरी करून घेतली जाते.
4. विवाहीत नागरिकांनी चर्चकडून घेतलेल्या विवाह प्रमाणपत्रावर संबंधित धर्मप्रातांचे बिशप किंवा आर्च बिशप यांनी नियुक्त केलेल्या Chancellor यांच्याकडून सदर प्रमाणपत्र भारतीय ख्रिश्चन विवाह अधिनियम 1872 खालील अधिकारानुसार देण्यात आल्याची नोंद प्रमाणित करून घ्यावी लागते.
5. या विवाह प्रमाणपत्रावर शासनाने नियुक्त केलेल्या Notary Advocate कडून Attestation करून घेतले जाते.
6. नोटरी योग्य असल्याचे महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाकडून प्रमाणित करून घेतले जाते.
7. विवाहीत व्यक्तीच्या ओळखपत्राच्या आधारे विवाह प्रमाणपत्रावर महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या ख्रिश्चन विवाह नोंदणी निबंधक यांच्याकडून प्रतिस्वाक्षरीत(Counter signature) केले जाते.
8. अशा प्रकारे प्रमाणित केलेले चर्च मॅरेज सर्टिफिकेट हे शासकीय कामकाजासाठी ग्राह्य मानले जाते. चर्चेने दिलेले विवाह प्रमाणपत्र प्रमाणित करून घेण्यासाठी खालील कागदपत्रे आवश्यक असतात.
    1. चर्चने दिलेले अलीकडच्या काळातील विवाह प्रमाणपत्र घेऊन त्यावर संबंधित धर्मप्रातांचे Chancellor यांचे कडून प्रमाणित करून घ्यावे.
    2. पती व पत्नी या दोघांचे ओळखपत्र जसे पासपोर्ट, पॅनकार्ड, आधारकार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स, इ.च्या आधारे नोंदी तपासल्यानंतर त्यावर नोटरी ॲडव्होकेट कडून ॲटेस्टेशन, महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाचे प्रमाणिकरण व महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या ख्रिश्चन विवाह नोंदणी निबंधक यांच्याकडून प्रतिस्वाक्षरीत (Countersignature) केले जाते.

चर्चने दिलेले विवाह नोंदणी प्रमाणपत्र वरीलप्रमाणे प्रमाणित करून न घेतल्यास किंवा नोंदणी महासंचालक महाराष्ट्र राज्य यांचेकडून प्रमाणपत्र प्राप्त न केल्यास केवळ चर्चने दिलेले Marriage Certificate हे बँका, विमा कंपन्या, नोकरीच्या कार्यालयातील नॉमिनेशन, पासपोर्ट तसेच मालमत्तेच्या वारसा हक्कासाठी हे प्रमाणपत्र स्विकारले जात नाही.

विवाह नोंदणीसाठी कायदयातील वरील तरतुदी विचारात घेता सर्व ख्रिश्चन विवाहीत नागरिकांनी चर्चने दिलेले विवाह प्रमाणपत्र वरीलप्रमाणे अधिकृत करून आपल्याजवळ बाळगणे आवश्यक आहे.

# वसईचे नाताळ संगीत व जागरण विधी

- विजय मच्याडो , गायक / संगीतकार

नोव्हेंबर महिन्यातच जगभरात ख्रिसमसची धामधूम सुरु होत असते. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, इटली, रोम, इंग्लंड इ पाश्चिमात्य देशात ख्रिसमसची खूप मोठ्या प्रमाणात धामधूम असते. आजकाल भारतातही ख्रिसमसचे सेलिब्रेशन मोठ्या उत्साहात साजरे केले जाते. वसईचा मराठी भाषिक ख्रिस्ती समुदाय हा सण मोठ्या थाटामाटात साजरा करत असतो. वसईत जवळ जवळ १ लाखाच्या घरात मराठी भाषिक स्थानिक ख्रिस्ती समाज राहतो. ख्रिसमसची सुरुवात येथे खऱ्या अर्थाने आगमनकाळ चालू होतो तेव्हा सुरु होते. आगमनकाळाच्या पहिल्या रविवारपासून "उठा प्रभूचे स्वागत करण्या" ह्या गायनापासून भाविकांना ख्रिस्त जन्माची चाहूल लागते. डिसेम्बर हा महिना खर म्हणजे वसईत लग्नसराईतीचा काळ परंतु त्यामुळे ख्रिसमसची धामधूम काही कमी होत नाही. वसईत मराठी नाताळ संगीत आणि जागरण विधी कधी व केव्हा सुरु झाला ह्याविषयी आपण विचारमंथन करणार आहोत.

१९६२ च्या दुस्र्या व्हॅटिकन धर्मपरिषदेत उपासनाविधि विषयावर आदेशनामा जाहीर झाला. त्यानुसार जगभर प्रादेशिक भाषेमध्ये मिस्साविधी व गायन साजरे व्हायला लागले. त्याअगोदर वसईतील बहुतांश चर्चमध्ये लॅटिन भाषेत गायन व मिस्सा होत असे. साधारण १९६४-६५ काळात वसईतही आपल्या माय मराठी भाषेत मिस्सा व संगीत अमलात आले. अंतरिम गद्य व गायन मसुदा तयार करण्यामध्ये फा. हिलरी फर्नांडिस ह्यांनी प्रमुख भूमिका बजावली. त्यावेळी फा. हिलरी ह्यांनी रचलेल्या व स्वरांकित केलेल्या प्रभू करी, परम ईशाला इ. मिस्सागीत पाठांचा त्यात समावेश होता. मराठी समितीने तेव्हा "वंदना" नावाचे गीतपुस्तक नोटेशनसाहित प्रसिद्ध केले होते. फा. हिलरी ह्यांनी शब्दबद्ध व स्वरबद्ध केलेले "वंदन तव चरणी माते" हे प्रथम मराठी उपासना भक्तीगीत ठरले. १९६४ मध्ये वसईतील काही प्रमुख चर्च मध्ये नाताळ प्रसंगी मराठी संगीत अमलात आले व फा. हिलरी ह्यांच्या "नवे गीत गा" ह्या उपासना गीतपुस्तिकेतील गीतांचा हळूहळू वापर होऊ लागला. त्यांनतर १९८० मध्ये मराठी रोमन मिस्साग्रंथ, वाचनग्रंथ व "मला गाऊ दे" हे उपासना गीतपुस्तक उपलब्ध झाले. त्यात अनेक नाताळ गीतांचा समावेश होता.

ख्रिसमस कॅरोल सिंगिंगचा उगम इतिहास : कॅरोल संगीत हजारो वर्षांपासून युरोपियन देशामध्ये सुरु होते. इसवी सन १२९ साली प्रथमतः ख्रिसमस कॅरोल गायिले गेल्याचा उल्लेख इतिहासात आढळतो. हिवाळी वर्षाच्या छोट्यातल्या छोट्या दिवशी लोक एका भव्य दगडाला मध्ये उभे करून त्याभोवती फेर धरून नृत्य गायन करीत असत. तो दिवस २२ डिसेम्बरचा असे. हा एक मुर्तीपुजेचा भाग असे व त्याला त्याकाळच्या अभिजनांनी

ख्रिसमसला जोडले होते. ह्या प्रकारची गीत गाण्याची प्रथा १२०० शतकापर्यंत चालू होती. पुढे हळू हळू ती बंद पडली.

मला गाऊ दे मधील बहुतांश नाताळ गीते फा हिलरी फर्नांडिस ह्याची आहेत. त्याची शब्दरचना व स्वररचना त्यांचीच आहे. पुढे मराठी कॅरल सिंगिंग वसईतही सुरु झाले. कॅरोल ह्या शब्दाचा अर्थ उत्साहनृत्य व गायन असा आहे. ख्रिसमसचा उत्साह संचारण्यासाठी २५ डिसेम्बरच्या काही दिवस अगोदर कॅरोल सिंगिंग गायिले जाते. इतिहासात संत असिसी ह्यांनी इटलीमध्ये कॅरल सिंगिंग ची प्रथा चालू केली व ती आजपर्यंत कायम आहे. आपल्या वसईत त्याची सुरुवात १९६४ साली फा. हिलरी ह्याच्या माध्यमातून सुरु झाली. सुरुवातीला नाताळकीर्तन व नंतर मराठी भाषेतून गावागावात कॅरोल सिंगिंग सादर होऊ लागले. जगाचा मालक जगती आला, उठा उठा हो तारक आला, उंटांचा तांडा निघाला, जय बोला जय बोला हो, बाळ जन्माला ख्रिस्त जन्मला  अशी अनेक प्रचलित गाणी नाताळ गीते म्हणून सगळीकडे निनादू लागली. फा हिलरी नंतर फा सॉलोमन रॉड्रिग्ज ह्यांची "बाळ जन्मला ख्रिस्त जन्मला" हि ध्वनिफीत खूप गाजली. त्यावेळी फा.सॉलोमन ह्यांच्या द्वारे दूरदर्शनवर सुद्धा अनेक वर्षे नाताळ गीते प्रसारित केली जात असत. प्रीत माझी युगे युगे ह्या नाट्यातील " ग्लोरिया - स्वप्न देवाचं आज हो साकारले" हे गीत आजही प्रसिद्ध आहे. विजय मच्याडो ह्यांनी पुनर्रप्रकाशित केलेली "प्रभू जगाचा ट्रॅक आला" हि धवनिफीत आजही गावागावात वाजत असते. हिंदी मध्ये फा. चार्ल्स वाझ ह्याची ख्रिस्तजयंती हि ध्वनिफीत खूप गाजली "चरवाहे नाचे झुमके" "आदी मी था" "मॅरियम का लाल जनमा" हि गीते खूपच गाजली. अनेक इंग्रजी कॅरोल गाण्यांचाही आजच्या काळात मोठया प्रमाणात वापर होत असतो.

ख्रिस्तजयंती रात्रीचा जागरण विधीचा इतिहास : अनेक ख्रिस्ती धर्मप्रदेशात मध्यरात्रीचा नाताळ मिस्साबली नाताळ संध्येला साजरा केला जातो. सर्वप्रथम येरुसलेममध्ये चवथ्या शतकाच्या अंतापर्यंत नाताळ उतरावं ६ जानेवारीला साजरा होत असे असा इतिहासात उल्लेख आहे. कारण पश्चिमेकडील देशातील कॅलेंडरची २५ डिसेम्बर हि तारीख पूर्वेकडे पोहोचली नव्हती. इ .स. ४३० साली पोप पॉल सिकटस तिसरे ह्यांनी ख्रिस्तजयंतीची तारीख आणि उत्सव २५ डिसेम्बरच्या मध्यरात्रीच्या मिस्सावर साजरा करण्याचा आदेश जाहीर केला, १२ व्य शतकापर्यंत हि प्रथा जगभर पसरली. २००९ पर्यंत हि प्रथा चालू राहिली व जगातील काही राष्ट्रात ती अजूनही मध्यरात्री साजरी केली जाते. आता हाच विधी १२ वाजण्याच्या अगोदर ९ किंवा १० वाजता साजरा करण्याची परवानगी आहे. वसईतही सगळीकडे हीच प्रथा आहे व मिसळबळी साधारण १० वाजता कॅरोल सिंगिंग द्वारे सुरु होतो.

# बदलते पावसाचे स्वरूप आणि वसई विरार

- सचिन मर्ती. भुईगाव

पावसाळा हा पिण्याच्या पाण्यासाठी शाश्वत स्वरूपाचा एकमात्र नैसर्गिक स्त्रोत आहे. परंतु मागील काही वर्षांपासून पावसाच्या प्रमाणात अचानक बदल झालेला आहे. वसई विरार हा भाग मागील दहा वर्षांपासून विकासाच्या घोडयावर आरूढ होऊन प्रंचड वेगाने धावत आहे. परंतु या पावसाळयात झालेल्या पुरस्थितीमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले. पावसात झालेला बदल व त्याचे परिणाम हयाविषयी या शोधनिंबधात प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

**पावसात झालेला बदल - 2009 ते 2018**

हया मागील दहा वर्षात वसई विरार भागात नोंद झालेल्या पावसानुसार काही निरिक्षणे मी आपणा समोर मांडत आहेत.

1) 2009 ते 2018 हया दहा वर्षात सरासरी 2449.8 मिमी इतका पाऊस सरासरी 86.7 इतक्या दिवसात पडल्याची नोंद आहे. त्यामध्ये 2017 मध्ये सर्वात जास्त म्हणजे 3368 मिमी इतका पाऊस तर 2015 साली 1640 मिमी पावसाची नोंद करण्यात आली. हया वरील नोंदीनुसार सर्वात जास्त व सर्वात कमी पावसाच्या नोंदीमध्ये 50% इतकी तफावत असल्याचे जाणवते.

2) 2009 ते 2018 हया दहा वर्षात प्रत्येक दोन वर्षांनंतर पावसाचे प्रमाण 900 ते 1000 मिमी कमी झाले आहे.

3) हया दहा वर्षात सरासरी 86.7 इतके दिवस प्रत्येक वर्षी पाऊस पडल्याचे आढळून येते. परंतु प्रत्येक वर्षानुसार नोदीं पाहिल्यास 2013 साली 106 दिवस एकूण 2395 मिमी इतका पाऊस पडला तर 2009 साली फक्त 51 दिवस 2091 मिमी इतका पाऊस पडल्याची नोंद करण्यात आली.

4) जून ते सप्टेंबर हे पावसाचे महिने म्हणून ओळखले जातात. परंतु मिळालेल्या माहितीनुसार प्रत्येक वर्षी 200 ते 250 मिमी इतका पाऊस ऑक्टोंबर ते डिसेंबर हया हिवाळयाच्या महिन्यात पडल्याचे दिसून येते. फक्त 2018 साली 2029 मिमी इतका पाऊस जून ते सप्टेंबर हया महिन्यात पडल्याची नोंद आहे. हयावरून पावसाला ऋतू आता चार ऐवजी पाच महिन्याचा झाल्याचे आढळून येते.

5) जुलै व ऑगस्ट हया दोन महिन्यात मागील दहा वर्षापासून सरासरी 26.8 दिवसात 989.7 मिमी इतक्या पावसाची नोंद करण्यात आली. ऑगस्ट महिन्यात दहा वर्षाच्या सरासरीनुसार 25 दिवसात 522.3 मिमी इतक्या पावसाची नोंद आढळून येते. हयावरून जुलै व ऑगस्ट हे दोन महिने पावसाचे प्रमाण प्रत्येक दिवशी खात्रीलायक आहे असे सांगू शकतो.

6) जून महिन्यात मागील दहा वर्षापासून सरासरी 14.4 दिवस 457.1 मिमी इतका पाऊस मिळाला. परंतु प्रत्येक 1 वर्षानंतर जून महिन्यात 8 ते 10 दिवस पाऊस कमी पडत असल्याचे दिसून येते.

7) महिन्याच्या 3 ते 4 दिवसात सरासरी 70 ते 80% पाऊस पडत असल्याची नोंद आहे.त्यामुळे कमी वेळात जास्त पाऊस पडल्याने आपल्याकडे भविष्यात पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता दिसून येत आहे.

पावसाचे बदलते स्वरूप म्हणजे कमी दिवसात जास्त पाऊस पडणे हे वसई विरार सारख्या 100% भूजलावर अवलंबून असलेल्या भूभागासाठी खूप धोकादायक आहे.

**त्याची कारणे पुढीलप्रमाणे**

1) भूजलाच्या पातळीवर परिणाम :- वसईविरारमधील लोकसंख्या पिण्याच्या पाण्यासाठी व इतर गरजांसाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या 100% भूजलावर अवलंबून आहेत. पावसाळा हा एकमात्र पाण्याचा स्त्रोत असल्यामुळे पावसाच्या ऋतूचक्राच्या भूजल पुनर्भरणावर परिणाम होऊन भूजलाची पातळी खालावू शकते. त्यामुळे विहिरी, बोअरवेल सुकून जाणे असे प्रकार होऊ शकतात.

2) भौगलिक दृष्टया होणारे परिणाम :- पूर्वेकडून पश्चिमेकडे भौगलिकदृष्टया असलेला उतार व पश्चिमेकडील असलेला अरबी समुद्र हयामुळे वसईविरार भूभागाचे भौगलिकदृष्टया एक वेगळेपण दिसून येते. 1 ते 2 दिवसात मोठयाप्रमाणात येणारा पाऊस जमिनीत न मुरता उतारामुळे समुद्रात निघून जातो व पिण्यायोग्य पाणी पिण्यास अयोग्य होऊन जाते. हयाचा मोठा परिणाम भूजलावर होतो.

3) सरंक्षिक भिंत व कॉंक्रिटमय जमीन :- स्वच्छता व सुरक्षा हया नावावर लोकांनी आपल्या घराभोवती व घराजवळील जागेवर सरंक्षित भिंत व पेवरब्लॉक लावून जमिनीत पावसाचे पाणी मुरण्यास मज्जाव केला आहे शिवाय घराभोवती सरंक्षित भिंतीमुळे पाणी जाण्याचे

नैसर्गिक मार्ग अरूंद किंवा बंद करून टाकले आहे.त्यामुळे मुसधार पावसात पूर परिस्थिती निर्माण होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

4) शेतीवर होणारे दुष्परिणाम ः- आज वसईविरार भूभागातील 20 ते 30ट लोकसंख्या आजही पूर्णपणे शेतीवर अवलंबून आहे. आज वसईतील भात शेती पूर्णपणे पावसावर अवलंबून असल्यामुळे पावसात होणा-या बदलामुळे शेतक-याचे फार मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. उदा. जूनमध्ये पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे शेतात पेरलेले धान्य पक्षी खाऊन टाकतात किंवा पाण्याअभावी सुकून जातात. त्यामुळे भविष्यात भात शेती धोक्यात येऊ शकते.

आज वसईतील भाजीपाला व फुलशेती ऑक्टोबरपासून ते मार्चपर्यंत सिंचनावर केली जाते. परंतु पावसात झालेल्या बदलामुळे ऑक्टोबर महिन्यात पाऊस पडत असल्याचे दिसून येते. त्यामुळे कांदे, भाजीपाला व फुलशेती यांना अवकाळी पावसामुळे कीड लागणे किंवा सुकून जाणे हयासारखे प्रकार दिसून येतील.

5) पूर परिस्थिती ः- हयावर्षी पडलेल्या पावसामुळे वसईत पूरस्थिती निर्माण झाली. वसई विरार भागात विकासाच्या नावाखाली चाललेले अनधिकृत बांधकाम, बंद करण्यात आलेले नैसर्गिक पाणी निच-याचे मार्ग, मोकळया जागेवर झालेले अतिक्रमण, तलावाचे सुशोभिकरण हया सर्व कारणांमुळे पावसाचे पाणी तुंबून राहून वसई पूरस्थिती निर्माण होत आहे. असा कॉंक्रिटमय विकास झाला तर प्रत्येक वर्षी पूरस्थितीला तोंड दयावे लागणार आहे.

**उपाय ः-**

1 छतावरील पाणी विहिरीत अथवा बावखालात सोडणे.

2 पावसामधील बदलानुसार शेतीचे नियोजन करणे.

3 तलावाचे सवंर्धन करून पाणी जाण्याचे नैसर्गिक मार्ग मोकळे करणे.

4 उघडी गटारे बांधण्यास पुढाकार घेणे.

5 पूरस्थितीच्या काळात सुरक्षिततेच्याबाबतीत लोकांमध्ये जागृती निर्माण करणे.

**संदर्भ ः-** वसई विरार महानगर पालिका पर्जन्यमान केंद्र माणिकपूर 2009 ते 2018

# महात्मा गांधीजी (बापूजी)

**---** मोहन हिराजी पाटील, पारनाका, वसई.

प्रिय बापूजी, पूज्यनीय महात्मा गांधीजी,

साष्टांग नमस्कार, विनंती विशेष

भारत देशाचे राष्ट्रपिता, तुमच्या प्रेरणेत सत्य वंदा, सुंदर बघा, श्रवणीय ते ऐका. अहंकार, लोभ, मत्सर, द्वेष बाजूस ठेवून, प्रेम वर्षावीत, नम्रता अंगी ठेवून, गोड बोलून समाजात वावरा. न्याय, हक्कासाठी झगडा. श्रीमंत, गरीब, लहान, मोठे, गोरा, काळा, धर्म, जात, पुरूष, स्त्री यांत भेदभाव करू नका. गोरगरीब, दुबळयांन आर्थिक, सामाजिक, अन्न, वस्त्राची मदत करा. त्याच्यावर अन्याय होऊ देऊ नका. परदेशी वस्तूला दूर ठेवा, स्वदेशी मालाचा जास्तीत जास्त वापर करून आपल्या देशेची आर्थिक परिस्थिती बळकट करा, शेतकरी, सैनिक यांना मानाचे स्थान द्या. सारे एकजुटीने राहून, भारत देशाचे शत्रू पासून रक्षण करा. रोग, दुर्गंधी, घाण होणार नाही याची दक्षता घेऊन, सुका, ओला इ. कचऱ्याची व्यवस्थित विल्हे वाट लावून, वाहनांच्या प्रदूषणास आळा घालून, आपला परिसर, देश स्वच्छ ठेवा. पाणी, वीज, अन्न, निवारा, उद्योग, रोजगार यांचा कृषि, उद्योग, बांधकाम, शैक्षणिक, विज्ञान क्षेत्रांपून मोलाचा वाटा उचलून त्याचा योग्य तेथे उपयोग करून, भारत देश सुजलाम्, सुफलाम् ठेवा, बनवा.

बापू तुम्ही देशाच्या स्वातंत्र्याकरीता सर्व प्रकारचा त्याग करून, देशाच्या प्रगती करीता, स्वतःला सामाजिक कार्यात झोकून दिले.

या तुमच्या कार्याने कार्याने, प्रेरणेने मला प्रेरीत करून, वरील सारे अंगी बाळगून, भारताचा प्रामाणिक नागरिक बनविले. आपल्या देशाची सेवा करण्यास, त्यास प्रगती प्रथावर आणण्याची प्रेरणा दिली.

परंतु बापूजी मला तुम्हाला सांगण्यास अतिशय दुःख होते की, आपला भारत देश स्वतंत्र होऊन या पंधरा ऑगस्तल 71 वर्षे पूर्ण झाली, तरी देश कृषी, आर्थिक, शैक्षणिक, औद्योगिक, विज्ञान, युद्ध क्षेत्रांत पाहिजे तेवढा पाहिजे तेवढा प्रगतीशील झाला नाही.

उचचशिक्षीत मुलांना योग्य त्या नोकऱ्या मिळत नाहीत. मध्यमवर्गीयांना राहण्यास घर, निवारा नाही. छोट्या खेडेगावांत वीज, पाण्याचा पुरवठा नाही. आदिवासी पाड्यात मागासलेल्या समाजात शिक्षणाची सोय नाही. देशात अजूनही अशिक्षीत, बेकार, बेघर गरीब समाज मोठ्या प्रमाणात आहे. दुबळा, गरीब शेतकरी कर्जाने दबूज जाऊन मोठ्या प्रमाणात आत्महत्या करतो. भापावर आपल्या लग्नाचे, हुंडाबळीचे ओझे नको, म्हणुन तरूणी आत्महत्या करतात. तरूण मुलगे, मुली, शेती, उद्योग न करता, ऐशो, आरामाचे जीवन जगण्यास अधिक भर देतात. ते शेतकरी व सैनिक बनण्यास नाखूश आहेत. जवान, सुशिक्षीत पिढी, मोबाईल, बाईक, मोटारगाडीचे अधिक वेड लावून कपडयांची फॅशन करण्यात दंग असतात. मुलींचे अंगदर्शन, राहणीमान बदलल्यामुळे त्यांच्यावर जास्त प्रमाणात बलात्कार होतात.

शाळा□महाविद्यालय□कॉलेज मधील विद्यार्थी□विद्यार्थीनी सिगारेट□चरस□मद्याच्या आहारी जाऊन□ आपले मजेशीर चैनी जीवन पसंद करतात.

एकलकोंडा□बेकार□चैनी जीवनामुळे मुलांवर विपरीत परिणाम होऊन ते वाईट रस्ता अवलंबून चोरी□डाके□खून□मारामारी करण्यात तरबेज झाले आहेत. मोबाईल गेम व सेल्फी काढताना□तरूण□तरूणींचा बळी जाण्याची प्रथा वाढली आहे. गेल्यावर्षी राजकराणात रामजन्मभूमि□गोहत्या बंदी□वंदे मातरम□ गणेश उत्सवात टिळक□रंगारी असे अनेक वाद□विवाद वाढत होते. गोरखपुर येथील हॉस्पीटलमधील डॉक्टरामधील डॉक्टरांच्या हलगर्जीपणाने **63** निष्पाप बालकांचा बळी गेला होता. समाजातील वृद्ध आई□बाप□परदेशांत व दूरवर राहणा□या मुलगा□मुलगीपासून दुरावले आहेत. त्यांना उरलेले जीवन जगण्यास कठीण होत आहे. नात्याच्या गोडव्यात कडवटपणाची चव वाढली आहे.

आजच्या युगात कोणी कुणाचाही नसतो□ही सांगण्याची वेळ आली आहे. सर्व क्षेत्रात भ्रष्टाचार□लाचलुचपत□खोटेपणा बळावला आहे. डॉक्टर□वकील□आहेत. सरकारी बैंक□दवाखाने□ ऑफिस□शाळा□कॉलेजेस□आर्थिक घोटाळा काला बाजाराने नाव लौकिक झाली आहेत. सर्व क्षेत्रात संपाचे हत्यार पुकारून सहकारला कोंडीत पकडून आपली पोळी भाजण्यात हुशार झाले आहेत. सरकारी नोकर वर्ग□अधिकारी□मंत्री□संपत्तीने आपले खिसे भरून जनतेस लुबाडत आहेत.

आजच्या भारतवासियांनी स्वातंत्र्यदिनाकरीता□काडीमात्रही कुठलाच त्याग□काम केले नाही. ते त्याचा उपभोग घेत राहिले. त्यांना स्वातंत्र्याच्या किंमतीच्या विसर पडत चालला आहे. आजच्या घडीला त्यांना आपल्या देशाचे स्वातंत्र्य टिकविणे खूप अवघड होत आहे. बापूजी तुम्ही दिलेली प्रेरणा□शिकवण□कार्य धुळीस मिळण्याच्या मार्गावर म्हणून महात्मा गांधीजी बापूजी भारतमातेच्या रक्षणासाठी तुम्ही पुन्हा भारतात जन्म घेऊन□देशास वाचवा ही माझी तुम्हांस कळकळीची नम्र विनंती.

तुमच्या **2** ऑक्टोबर **2018**च्या **150**व्या जयंतीदिना प्रित्यर्थ माझ्या व भारतीयांकडून हार्दिक शुभेच्छा □

जय बापूजी □जय भारत □

"प्रिय बापूजी यह मेरा खत जा जानीये, ढाई अक्षर

रक्षा करेन भारतमाता, फिर से लीजिए नया अवतार"

आपला विश्वासु सेवक

मोहन हिराजी पाटील

पारनाका□वसई.

मो.न. **9764132903**

# परिपूर्ण भेट

- फा. आसिस रॉड्रिग्ज, तलासरी

अनीताच्या वडीलांना एका मोठ्या कंपनीत मोठ्या पगाराची नोकरी होती. परंतु कामाचा व्याप खूप असल्याने ते नेहमी व्यस्त असत. पैश्याची काही कमी नव्हती परंतु वेळेची कमी मात्र नक्कीच होती. ते अगदी थोडाच वेळ आपल्या कुटुंबासाठी देवू शकत होते. तरी प्रत्येक रात्री झोपी जाण्याअगोदर आपल्या वडिलांनी एक गोष्ट सांगून आपल्याला त्यांच्या मांडीवर झोपवावे असा अनिताचा नेहेमीचा आग्रहाचा हट्ट असायचा. वडिलांचा नाईलाज होता म्हणून ते रोज तिला एक गोष्ट सांगत, गोष्ट ऐकता ऐकता ती त्यांच्या मांडीवर आपले डोके टेकून झोपी जाई. हे असेच काही दिवस चालले होते. अनिताच्या ह्या रोजच्या आग्रहातून तिच्या वडिलांना स्वतःची सुटका करून घ्यायची होती.

काही दिवसाने तिचा वाढदिवस होता तेव्हा वडिलांनी एक शक्कल लढवली. अनिताच्या वाढदिवशी तिचे वडील तिला एक टेपरेकॉर्डर बक्षीस म्हणून देतात. ह्यात खूप नवनवीन गोष्टी रेकॉर्ड केलेल्या असतात. बटन दाबले कि गोष्ट सुरु. नवलाईचे नऊ दिवस संपताच अनिताने टेपवर कथा ऐकण्यास नकार दिला. वडिलांच्या कारणमिमांसाला तिने उत्तर दिले, "टेप तुमच्यासारख्या खूप छान छान कथा, चांगल्या गोष्टी वाचतो पण........... पण मी त्याच्या मांडीवर बसू शकत नाही, त्याच्या कुशीत झोपू शकत नाही.!"

ख्रिसमस हा “देण्याचा” सण आहे. Christmas is the Feast of Giving. वर्षातील एक असा दिवस जेव्हा आपण गिफ्ट्स देतो व आपल्याला गिफ्ट्स दिली जातात. आपल्या कुटुंबियांना उत्तम व उपयुक्त ख्रिसमस भेटवस्तू देण्यासाठी लोक खूप वेळ आणि पैसा खरेदी करतात.

ख्रिसमसच्या सणावेळी आम्ही देवाने आम्हाला त्याच्या एकमेव पुत्राद्वारे दिलेल्या अनमोल व अतिपवित्र प्रेमाचे रहस्य साजरे करतो. "देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे" (जॉन 3:16). देव स्वतः आम्हासाठी एक भेटवस्तू म्हणून ह्या जगात आला. जेव्हा आम्ही इतरांसाठी भेटवस्तू बनतो तो खरा नाताळ असतो. ख्रिसमस हा भेटवस्तू देण्याचा उत्सव आहे म्हणून काय द्यावे आणि कसे द्यावे हे खूप महत्वाचे आहे.

लुकच्या शुभवर्तमानात (1: 3 9 -45) आम्ही एलिझाबेथला भेट देत असलेल्या मरीयेची कथा वाचतो. मरीयेने एलिझाबेथला कोणती भेट दिली? शुभवर्तमान आम्हास असे सांगत नाही की तिने अन्नधान्य आणले, कपडे आणले किवा काही खाऊ आणला. शुभवर्तमान आम्हास स्पष्ट सांगते की तीने फक्त एक गोष्ट आणली. तिने स्वतःच्या उपस्थितीची भेट एलिझाबेथला दिली.  जी सर्वोकृष्ट, सर्वात दुर्मिळ व सर्वात कठीण अशी भेट आहे.

आजकाल सहजपणे ऑनलाइन भेटवस्तू बुक करणे, फुले पाठविणे, पार्सल पाठविणे अगदी सोपे झाले आहे, परंतु स्वतःच्या उपस्थितीची भेट, स्वतःची वेळ देण्यासाठी आम्ही कमी पडतो. अनिताच्या वडिलांनी आपल्या मुलीला एक महाग टेपरेकॉर्डर दिला पण त्याने तिला स्वतःच्या उपस्थितीची भेट, स्वत:चे अस्तित्व, त्याचा वेळ दिला नाही. आणि अश्याने कितीतरी कुटुंब उध्वस्त होत आहेत. वेळेअभावी खंगलेली जीवने, निराशमय कुटुंबे, नातेसंबंध बिघडलेला समाज आज आपण अनुभवत आहोत.

इंग्रजीत एक म्हण आहे, **parents are too busy earning their salt (daily bread), that they are forgetting their sugar.** पालक आपली रोजची मीठ भाकर मिळविण्यात इतके व्यस्त आहेत कि आपल्या साखरेवजा मुलाबाळांचा त्यांना विसर पडत चालला आहे. पालक व्यस्त नी मुलं त्रस्त.

फुले आणि पार्सल व्यतिरिक्त, आपली उपस्थिती, आपला वेळ आणि आपल्या स्वत:ला देणे आवश्यक आहे. आपल्याला आपल्या कुटुंबासमवेत वेळ व्यतीत करण्यासाठी वेळ शोधणे आवश्यक आहे. वेळ ही सर्वात मोठी भेट आहे कारण तिचे मूल्य पैशाच्या स्वरूपात मोजले जाऊ शकत नाही. Life is not lost by dying. Life is lost, minute by minute day by day in all those unloving, uncaring and unforgiving ways.

एलिझाबेथला मरीयेच्या वेळस्वरूप भेटवस्तूतून आपण आणखी एक गोष्ट सांगू शकतो की आपण स्वतःच्या सोयीनुसार/सवडीनुसार नव्हे तर **गरजूंना गरजूंच्या गरजेनुसार** दिले पाहिजे. मरीयेला गालील प्रांतातून यहूदाच्या डोंगराळ, धोकादायक रस्त्यापर्यंत जाणे सोपे नव्हते. हे निश्चितपणे तिच्यासाठी एक आव्हानात्मक काम होते. परंतु एलिझाबेथला मदतीची गरज होती.

ती सहा महिन्याची गरोदर असल्याने विहिरीवरून पाणी भरून आणू शकत नव्हती, तसेच आपल्या पिकांकडे, गुराढोरांकडे लक्ष देवू शकत नव्हती. अश्या वेळेला तिला मरीयेच्या उपस्थितीची व वेळेची आवश्यकता होती. म्हणूनच, मरीयेला जेव्हा कळले की एलिझाबेथ सहा महिने गरोदर आहे तेव्हा ती लगेच घाईघाईने निघून गेली आणि तिचे बाळंतपण होईपर्यंत म्हणजेच तीन महिने तिच्याबरोबर राहिली. मरियेने एलिझाबेथला स्वतःचा वेळ दिला. वेळ जी एक परिपूर्ण भेट आहे.

आज आपल्या कुटुंबातील प्रत्येकाला कसली गरज आहे हे आपल्याला माहिती आहे का? प्रत्येकाला प्रोत्साहन पाहिजे. पवित्र मरीयेच्या भेटीने एलिझाबेथला प्रेरणा मिळाली. जेव्हा आपण या ख्रिसमसच्या सणावेळी लोकांना भेट देवू, तेव्हा आपण त्यांच्या जीवनात प्रेरणा आणण्याचा प्रयत्न करूया, आपण त्यांना देवाच्या जवळ आणण्याचा प्रयत्न करूया.

# तू क्रोध की मशाल बन .......

--- डॉ .नेन्सी विन्सेंट डिमेलो, गास
(इतिहाससंशोधिका व कायदेअभ्यासिका)

सकाळचे अकरा वाजले होते. ती अंगणात खेळत होती, वय वर्षे पाच. अचानक तिचा आवाज बंद झाला. घरकामात व्यस्त असलेल्या आईच्या लक्षात मुलगी गायब झाल्याचे तासाभरानंतर आले. शोधाशोध सुरु झाली, शेजारी पाजारी चारी दिशेने धावले. पण व्यर्थ, काही केल्या ती मिळाली नाही. संध्याकाळच्या संधीप्रकाशात जंगलातून येणाऱ्या दोन व्यक्तींना झुडुपातून 'प ऽऽप्पा... प ऽऽप्पा' असा क्षीण आवाज ऐकायला आला. आवाजाच्या दिशेने ते दोघे गेले, परंतु मुलीची अवस्था पाहून ते माघारी फिरले.

गावभर वार्ता पसरली, सगळे त्या दिशेने धावले. अखेर जन्मदात्याने तिला आपल्या दोन बाहूत उचलले. त्याच्या परीचे गाल लालमलाल व रक्तबंबाळ झाले होते. गळ्यापासून छातीपर्यंत ओरखडल्याच्या खुणा होत्या. कमरेच्या खालील भागातील सुकलेले रक्ताचे डाग तिच्या वेदनांची साक्ष देत होते. पोरगी वाचावी म्हणून दवाखान्याकडे धाव घेतली. सर्व दवाखान्याचे दरवाजे 'नस्ती आफत नको' म्हणून बंद झाले. रात्री एक वाजता मृत्यूशी झुंज देत त्या पिल्लाने दृष्ट जगाचा निरोप घेतला, तिची झुंज संपली होती. आणि दुसऱ्या दिवशी तिच्या क्रियाकर्मासाठी म्हणून गावाला गेलेले तिचे आईवडील परत कधीच द्रुष्टिस पडले नाहीत.

दुसरी घटना. सात वर्षाची ती रडत रडत आईच्या दिशेने येत होती, तिच्या मांड्यावरून ओघळणाऱ्या रक्ताच्या धारा पाहून आईच्या काळजातून तलवार आरपार गेली. सतरा वर्षाच्या मुलाने त्या बालिकेवर बलात्कार केला होता. आईने स्वतःला लगेच सावरले, मुलीला उचलले. तिला स्वच्छ अंघोळ घातली, जणू तो प्रसंग तिच्या जीवनपटलावरुन आईने धुवून टाकला. ममतेने तिला छातीशी कवटाळले, जणु काही झालेच नाही. सगळीकडे सामसूम. संध्याकाळी कामावरून परतलेल्या पित्याने थंड उसासा टाकून एकच उदगार काढला "नसीब, इसकी जान तो बची".

तिसरी घटना- इयत्ता सहावी अ चा वर्ग. शिक्षिका हजेरी घेत असताना एका नावावर थबकली. ती एका आठवड्यानंतर शाळेत आली होती. काहीशी सुजलेली आणि पूर्णतः निस्तेज दिसत होती. शिक्षिकेने तिला जवळ बोलवून विचारले "कहाँ थी इतने दिन ?" ती हळूच शिक्षिकेच्या टेबलापाशी आली आणि हळू आवाजात म्हणाली "टीचर, मेरा बच्चा गिराया" शिक्षिकेने टेबलाच्या कडा गच्च पकडल्या. तेरा वर्षाच्या मुलीने जे सहन केले ते ऐकून शिक्षिकेला घेरी आली.

तो वडिलांचा मित्र होता, आई-वडील कामावर फॅक्टरीत गेले की तो घरी यायचा. गुंगीचे औषध असलेले पान खायला दयायचा. नंतर त्याचा वासनेचा खेळ सुरू व्हायचा. शुध्दीवर आल्यावर अंगभर वेदना असायच्या परंतु त्यांच्या धमकीला घाबरून तिने तोंड बंद ठेवले. हे सत्र चालूच राहिले आणि एके दिवशी

पोटात दुखते म्हणून आई तिला डॉक्टरपाशी घेऊन गेली. डॉक्टरांना जबरदस्त धक्का बसला, ती तीन महिन्याची गरोदर होती. पोलिस केसशिवाय गर्भपात शक्य नव्हता त्यामुळे पोलीस केस झाली.

शाळेतून तिच्या वयाचे साक्षी पुरावे सादर करण्यात आले. गर्भपातानंतर सगळे व्यवस्थित झाले असं समजून आई-वडिलांनी कटकट नको म्हणून केस मागे घेतली. न्यायव्यवस्थेसह सर्वांनी डोळ्यांवर पट्टी बांधली. गांधीजींच्या तीन वानरांची संकल्पना नव्या रूपात प्रचलित झाली आहे. ती म्हणजे वाईट वा अन्याय पहायचा नाही, इतरांच्या वेदना ऐकायच्या नाही आणि त्याबाबत कोठे वाच्यता करायची नाही. पण घोर लागलेली शिक्षिका मात्र आणखी एखादी बळी पडू नये म्हणून रोज प्रत्येक मुलींच्या मनाची चाचपणी करीत असते.

वरील तिन्ही घटना सत्य असून, पीडितांच्या वेदना, शील, चारित्र्य, मानवी हक्क सगळं कवडीमोल का ? त्यांचे संरक्षण ही कोणाची जबाबदारी आहे? आज अल्पवयीन मुलीचे मोठ्या प्रमाणात लैंगिक शोषण होत आहे. आपल्याला न्याय मिळणारच नाही उलट आपल्या इज्जतीचे धिंडवडे निघतील अशी एक असुरक्षित भावना पालकांत आज निर्माण झाली आहे. अन्यायाला वाचा फुटत नाही, तोंड बंद ठेवण्यात शहाणपण समजले जात आहे. परिणामी लैंगिक शोषणाचे कितीतरी गुन्हे दडपले जात आहेत आणि गुन्हेगार लोकलाजेच्या आड निर्ढावत आहे. शोषणाच्या कथा कुजबुजल्या जातात आणि हवेत विरून जातात. जेथे माणसाच्या जिवाचे मूल्य कवडीमोल झाले आहे, तिथे स्त्रीचे शील, चारित्र या बाबी तर गौण बनल्या आहेत. आजही स्त्रियांना आसुरी वागणूक दिली जात आहे.

आज 99% लोक एखाद्या मुलीवर बालपणी झालेल्या बलात्कारामुळे तिला लग्नाच्या बाजारात स्वीकारायला स्पष्ट नकार देतात. दुसरीकडे समाजात "लिव्ह इन रिलेशनशिप" नावाखाली दिमाखात अनैतिकता बोकाळत आहे. ह्यात अनेक वेळा जोडीदार बदलला जातो पण नविन जोडीदार व त्याचा परिवार मागील भूतकाळ सहज स्वीकारतो. स्वतःच्या मर्जीने उघड वा चार भिंतीतील स्वैर बाबी समाजाच्या अंगवळणी पडल्या आहेत. घटस्फोटित, विधवा यांचे पुनर्विवाह होतात. परंतू जिच्यावर इच्छेविरुध्द जाणत्या, अजाणत्या वयात बलात्कार झालेला असतो ती मात्र अशुद्ध व लग्नास अपात्र ठरविली जाते. अथवा एखादी मोठी तडजोड करून मनाविरुद्ध विवाह करावा लागतो. बलात्कारास ती स्त्रीच जबाबदार असते, तिचे वागणे, पेहराव, चारित्र्य, मोकळीक, आधुनिकता इ .बाबी ह्यासाठी जबाबदार आहेत अशी मते समाजातील प्रतिष्ठित लोक व्यक्त करतात व त्यावर चर्चा केली जाते. तिच्याच बरोबर असे का झाले ? असा प्रश्न कपाळावर अनेक आठ्या आणत विचारणारे महाभाग आहेत.

जोपर्यंत पिडित महिलेस अपराधीपणा आणि न्यायप्रणालीतील विक्रूत चौकशीच्या तोंडी देण्याच्या जन्मभराच्या क्लेशापासून आपण तिला वाचवू शकत नाही तोपर्यन्त न्यायप्रणालीतील पळवाटा चोखंदळत बलात्कारी सुरक्षीत राहणार. थोडक्यात चुकीची सामाजिक मूल्ये व न्यायप्रणालीतील निष्क्रीयता पीडितांवर अधिक अत्याचार करणारी आहे. बलात्काराला बळी पडलेल्या पीडितांचा जर समाजाने सहज स्वीकार केला तर त्याचे पुनर्वसन सहज होईल. पीडितांच्या मानसिक व भावनिक जखमा या शारीरिक जखमांपेक्षा भरावयास अधिक कठीण असतात. तिचे सामजिक जीवन पुर्णपणे उध्वस्त होते. एक प्रकारे तिच्या व्यक्तिमत्वाची, स्त्रीत्वाची ती हत्याच होय. पीडित हा प्राथमिक बळी असतो तर तिचे कुटंब हे सुध्दा झाल्या प्रकाराचे दुय्यम

बळी ठरते. बलात्कारीत व्यक्तीचे आई, वडिल, भावंडे, पती, मुले आणि सासर ह्यांना एकतर समाजाच्या अवास्तव, फाजील चौकशीनां सामोरे जावे लागते किंवा मुकाटपणे टोमणे ऐकावे लागतात. परिणामी आप्तस्वकीयांपुढे पीडितांचे पुनर्वसन करणे  व सामजिक इभ्रत कायम राखणे ह्यासाठी ही गुन्हा लपवणे हाच एक मार्ग सर्वांच्या हिताचा उरतो.

आपण कित्येक केसेस पाहतो की स्त्रीला कोंडून तिच्यावर सतत महिना, दोन महिना.स्त्री जिथे जाईल तिथे तिचे स्त्रीत्वच तिच्यासाठी शाप ठरत आहे .मग ती काळी असो वा गोरी असो, बालिका असो वा व्रृध्द असो. पापी नजरा, वासनेने बरबटलेले हात तिची पाठ जगाच्या कोपऱ्यात कोठेही गेली तरी सोडत नाहीत. राक्षसी व्रुत्ती तिचे हालहाल करणार आणि तिला क्षणोक्षणी जाणीव देणार की तुझे स्त्रीत्व हाच तुझा शाप आहे. देवाची भीती बाळगणाऱ्या ह्या नराधमावर देव शस्त्र का ऊगारत नाही ?

स्त्रीच्या वेदना समजण्यासाठी देवालाही स्त्री जन्मचक्रातून जावे लागेल का ? बलात्कारीत स्त्रीचे पुनर्वसन ही अव्यक्त पण अत्यावश्यक समस्या सद्यस्थितीत आहे. एखाद्या मुलीवर वा महिलेवर बलात्कार झाला की तिचे संपूर्ण आयुष्य त्या एका घटनेमुळे उध्वस्त होते. जीवन हे एक ओझे बनते, ताठ मानेने जगण्याचा हक्क जणू तिच्यापासून हिरावून घेतला जातो. समाज अशांना सामावून घेत नाही आणि सामावून घेतले तरी योग्य आदर देत नाही. बलात्काराच्या निषेध मोर्चात सामील होणे सोपे आहे पण बलात्कारीत मुलीला पत्नी वा सून म्हणून स्वीकारण्याचे धाडस किती लोकांत आहे ?

पोलीस यंत्रणा, प्रशासन, NGO, सामजिक कार्यकर्ते या सर्वांचे स्त्री शील रक्षणार्थ प्रयत्न असफल होत आहेत. परिस्थिती कोणच्याही आवाक्यात राहिलेली नाही. अपराधी येतो, गुन्हा करतो आणि गायब होतो. पोलीस यंत्रणा कोठवर शोध घेणार ? कोणा कोणाचा शोध घेणार ? अगणित प्रकरणे आणि तितकेच जगावेगळे गून्हेप्रकार. सगळीकडे आसुर राज्य निर्माण झाले आहे ? किती ठिकाणी, कोणाकोणाला आपण वाचवणार ? आपली मानवी हक्काची शक्ती अपुरी आहे ह्या अमानवी वस्तीत.

स्त्री शोषणावर मूक मोर्चे काढून मेणबत्ती लावण्यापेक्षा स्त्रीला मशाल बनवणारी व्यवस्था हवी. आत्मसंरक्षणाचे धडे शालेय जीवनापासून देण्यात आले तर स्त्री शोषणाला बळी तर पडणार नाहीच पण दहा असुरांचा वध मात्र नक्की करेल. स्त्रीला पुरातन काळापासून सुरक्षाकवचात ठेवले जात आहे त्यामुळे कोणीतरी येईल व आपले रक्षण करेल ह्याची ती नेहमी वाट पाहते .आपण स्वतःच स्वःताचे रक्षण करू शकतो हा आत्मविश्वास स्त्रीत निर्माण करणे ही काळाची गरज बनली आहे. अमिताभ बच्चन ह्यांची एक कविता आठवते "तू आरती की लौ नही, तू क्रोध की मशाल है !"

# "कोकरू"

--- राकेश परेरा, आगाशी

अहो फादर, तुमचा हा पांढरा झगा तुम्ही तुमचं काळं काम दडवण्यासाठी पांघरलाय ! शिक्षण प्रसाराच्या नावाखाली तुमचा विदेशी धर्म तुम्ही बराच पसरवलात आमच्या देशात. आम्ही सहिष्णुभाव ठेवणारी लोकं म्हणून तुमच्या सारख्या असहिष्णू लोकांना सोसतोय,पण तुम्हाला अशा धडाधड शाळा खोलायला परवानगी देऊन आम्ही आमच्या पायावर कुऱ्हाड नाही मारून घेणार. शिक्षणमंत्र्याची ही सगळी वाक्ये सेवाभावी फादरांच्या मनावर एकावर एक असे वार करत होते, तरीही आपल्या चेहऱ्यावर हास्य अन मन शांत ठेवून फादरांनी टेबलावरील आपली फाईल उचलत शिक्षणमंत्र्यांना आशीर्वाद दिला, "देव तुमचं भलं करो!'

नवरात्री उत्सवात सामील झालेले फादर,आजूबाजूला प्रचंड कोलाहल सुरू असूनदेखील अगदी शांतपणे काही महिन्यापूर्वी घडलेल्या या प्रसंगात परत गुंतून गेले होते. आठवणीचा अजगर काही केल्या फादरांच्या मनाचा विळखा सोडण्यास अजिबात तयार नव्हता. फादर आपल्यापरीने सहिष्णू - असहिष्णू ह्या शब्दांचा अर्थ शोधण्यात व्यस्त असतानाच, अचानक कुणातरी आपल्याला हाताला धरून ओढतंय ह्या जाणीवेने भानावर आले. आपले काही विद्यार्थी आपल्याला दांडियाच्या संगीतावर थिरकण्यास विनंती करत आहेत हे बघून, आपल्या अंगावरील व्रतस्थ जीवनाचा झगा आठवून फादर थोडे बावचळले, परंतु आपल्या लेकरासमान असलेल्या त्या विद्यार्थ्यांचे मन खट्टू होऊ नये म्हणून फादर त्या मुलांसोबत ," तेनू मै लव करदा"ह्या गाण्यावर ठेका धरू लागले. नाचत नाचत आजूबाजुच्या लोकांच्या डोळयातील आश्चर्यचकित भाव बघून फादरांना येशूची क्रुसाची वाटचाल आठवली.

" अरे फादर क्या मस्त नाचता है" ह्या वाक्यावर ," सफेद कपडा पहना तो क्या फादर हो गया क्या, रहेगा कोई फॅन्सी ड्रेस वाला!" ही प्रतिक्रिया ऐकून फादरांना आपण देखील पहिल्या खेपेस क्रुसाखाली पडलो आहोत अशा वेदना जाणवल्या. त्या शब्दांवर दुर्लक्ष करत फादर आपले लक्ष त्या गाण्याकडे देत आपले पाय अन गाण्याचा ठेका जुळवून ठेवण्याचा प्रयत्न करू लागले. तिथे जमलेली काही तरुण मंडळी आपल्या मोबाइलवर आपले नृत्य चित्रित करत आहेत हे पाहून फादरांच्या काळजाचा ठोका चुकला. क्रुसाखाली उभा असलेला ख्रिस्त वस्त्रहीन अवस्थेत लज्जेच्या कोणत्या अग्नीत जळाला असेल ते फादरांनी त्या वेळी अनुभवले. जशा क्रुसावरील यातना असहाय्य झाल्याने ख्रिस्ताने आपला प्राण आपल्या पित्या हाती सोपविला तसाच हे गाणे संपवून आपण हे मंडपातून, ह्या लोकांच्या नजरेतून आपण कधी बाहेर पडतोय ह्या काळजीत फादरांचे पाय लटपटू लागले.

देवळात पोहोचताच फादरांनी थंड पाण्याने अंघोळ केली अन आपले शरीर अन मन शांत करण्याचा प्रयत्न करत फादर अंथरुणावर आडवे झाले. शरीराच्या हालचाली थांबवता येतात पण मनाला आवरता येतं का कधी? फादरांचे मन परत परत त्यांना त्या नवरात्री मंडपात अन त्या कॅमेऱ्याचे चित्रीकरण ह्या दृश्यापाशी घेऊन जात होते. अन अचानक फादरांच्या मोबाईलवर व्हाट्सअप्प मेसेजची घंटी वाजली. फादरांच्या एका पॅरिशनरने व्हिडिओ पाठवल्याचा तो मेसेज होतो. आपल्या मनाची थोडी करमणूक करावी,मनाला

आठवणीतून बाहेर काढावे ह्या विचाराने फादरांनी तो व्हिडिओ डाउनलोड केला अन ती व्हिडिओ पाहताच फादरांचा धीर खचला. तो व्हिडिओ दुसऱ्या तिसऱ्या कुणाचा नसून आपलाच आहे हे पाहताच फादर बेचैन झाले. आपल्या मोबाइलचे network बंद करून फादरांनी आपला मोबाइल आपल्या उशाशी ठेवला. विचाराधीन फादरांना आपला डोळा कधी लागला ते कळलेच नाही. सकाळच्या पाचच्या अलार्मने फादरांना ह्या मर्त्य जगात परत जिवंत केले.

आपली प्रातकर्मे आटपून फादर आपल्या रोजच्या मिस्सासाठी वेदीवर चढले. आज भाविक आपल्याकडे काही वेगळ्याच नजरेने पाहत आहेत असा भास फादरांना होऊ लागला. मिस्सा आटपून आज नेहमीप्रमाणे देवळाबाहेर लोकांना न भेटता फादर गुपचूप आपल्या खोलीत परतले. हिम्मत करून फादरांनी आपल्या मोबाईलचे नेटवर्क सुरू केले. पुढच्या मिनिटभरात त्यांच्या व्हाट्सअप्पवर भराभर एक पन्नासेक व्हिडिओ मेसेज आलेले आढळले. हा आपलाच रात्रीचा व्हिडिओ असे समझून त्यांनी त्यातला एकही मेसेज खोलून पाहिला नाही. पण त्यांच्या मोबाईलवर रात्री साडेबाराच्या दरम्यान आलेला कार्डिनल साहेबांचा चुकलेला फोन पाहून त्यांना सरसरून घाम फुटला. येशू ख्रिस्ताचे नाव घेत त्यांनी त्या नंबरवर फोन केला. कार्डिनल साहेबाचे हॅलो हे शब्द त्यांच्या कानातून शिरून हृदयामार्गे पूर्ण शरीरातून फिरून आले. त्यांना प्रतिक्रिया म्हणून उच्चारलेले हॅलो हे शब्द ऐकताच कार्डिनल साहेबांनी फादरांच्या मनाची नाडी जाणली. " मी व्हिडिओ पाहिला आहे, तू काहीही घाबरू नकोस!" कार्डिनल साहेबांचे हे आश्वासक शब्द ऐकताच फादरांच्या डोळ्यात आसवं जमली, थरथरत्या आवाजात ," थँक यु " इतके बोलून फादरांनी फोन ठेवला. आपल्या मनाला आधार लाभावा म्हणून फादर बायबलच्या शरणी गेले. येशूच्या दुखसहनाचा उतारा वाचत असताना," तू जर देवाचा पुत्र आहेस, तर स्वतःला वाचवून दाखव" ह्या वाक्यापाशी फादर थबकले.परत परत ते वाक्य वाचत येणाऱ्या काळात आपली देखील अशीच निंदा नालस्ती होणार ह्याची खूणगाठ त्यांनी आपल्या मनाशी बांधली.

'जगत मे समय बडा बलवान', ह्या उक्तीप्रमाणे काही दिवसांनी तो नवरात्रीचा रंग लोकांच्या अन फादरांच्या मनावरून फिक्कट झाला. एकदिवस आपल्या ऑफिस मध्ये बसून शाळेचे काम पाहत असताना फादरांच्या मोबाईलवर फोर्ट विभागातील असलेला एक ऑफिस नंबर झळकू लागला. फोन उचलतात, शिक्षण मंत्री आपल्याशी बोलू इच्छितात असा निरोप देऊन, पुढच्याच क्षणाला फोन मंत्र्यांच्या फोनला जुळवून देण्यात आला.

" फादर नमस्कार", सर्व प्रथम त्या दिवशीच्या माझ्या वागणुकीबद्दल तुमची माफी मागतो. ते जे काही शब्द होते ते एका राजकारण्याचे होते, तुमचा व्हिडिओ पाहिला अन इतके दिवस ज्या वादळातून तुम्ही प्रवास केला ते पाहून एक माणूस म्हणून विचार केला, तेव्हा माझ्या ढोंगीपणाचा बुरखा गळून पडाला. हृदयाने अक्कलेवर मात केली म्हणून तुम्हाला फोन केला आज. तुमची फाईल मी सही करून ठेवली आहे, माझा माणूस ती तुमच्याकडे घेऊन येईल.  माझ्या शब्दांकरिता क्षमा मागत नाही कारण ती तुम्ही त्या क्षणीच केली असेल , पण तुमच्या कार्याला शुभेच्छा जरूर देईन." मंत्र्यांचे ते शब्द ऐकून फादरांना ती नवरात्रीची रात्र, ते व्हिडिओ चित्रण परत आठवले. आपल्या मनात त्या प्रसंगाला अन त्या व्यक्तीला धन्यवाद देत फादर आपल्या ऑफिसच्या भिंतीवर टांगवलेल्या पुनरूथत्तीत ख्रिस्ताच्या तसबिरीसमोर नतमस्तक झाले.

# तोत्तोचान -- पुस्तक परीक्षण

--- सुनिता बर्नड परेरा, गास, मदर तेरेजा शेजोळ

करील मनोरंजन जो मुलांचे

जडेल नाते प्रभूशी तयाचे ||

भूत, वर्तमान व भविष्यकाळात बालमन विहार करत असताना भूतकाळातील घटनांची वर्तमानकाळाशी सांगड घालून भविष्याचे स्वप्न रंगविण्याचे बाळबोध काम बालके सतत करत असतात. बालकांच्या निष्पाप, निरागस मनावर एखादी वाईट घटना त्यांचे मन दुखावून जाते, तर सहजपणे उमलणाऱ्या कळ्यांना फुलवणारा माळी त्यांचे मन सुखावतो. मुलांच्या मनोदेवतेचे दर्शन, निसर्गाचे प्रेम आणि बागेतील माळ्यासोबत फुलणारे कोवळे मन यांचा त्रिवेणी संगम साधला आहे, जपानमधील एका सुंदर, विदयार्थीकेंद्रित शाळेत! चला जाऊया या शाळेत.....

आपल्या बहुप्रसव, सिद्धहस्त व कलासक्त लेखणीतून जपानमधील एका चिमुकल्या व अवखळ मुलीचा शालेय जीवनाचा प्रवास "तोत्तोचान" या कादंबरीतून लेखकाने मांडला आहे. लेखक श्री. तेत्सुको कुरोयानागी यांनी 130 पृष्ठांत व 62 उपशीर्षकात ह्या चिमुकलीच्या जीवनघटनांचा उहापोह केला आहे. श्रीमती चेतना गोसावी यांनी सुरेख व ओघवत्या शैलीत अनुवाद करून मराठी भाषिकांना अलौकिक असा नजराणा बहाल केला आहे.

पुस्तकाचे मुखपृष्ठ खूप बोलके आहे. मुखपृष्ठावरूनच पुस्तकाचा आशय चटकन लक्षात येतो. एक लहान चिमुरडी हातात रंगीबेरंगी फुलांचा गुच्छ घेऊन जणू जगाला ह्या फुलांसारखे प्रसन्न, टवटवीत आणि आनंदी राहावे असा संदेश देत आहे. 'मुलांना फुलांप्रमाणे जगू द्या, त्यांना कुस्करु नका, तर त्यांना त्यांच्या क्षमतेनुसार उमलू द्या', असें आर्जव ती करत आहे. तिच्या दुसऱ्या हातातील जळणारे कागद तिच्या मनातील खंत प्रकट करत आहेत. पुस्तकाच्या मलपृष्ठावर तोत्तोचानचे बालपणापासूनचा प्रवास रेखांकित केला आहे. हे पुस्तक नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया यांनी प्रकाशित केले आहे.

तोत्तोचान हे केवळ पुस्तक नसून एका चिमुकलीच्या तोमोई विदयालयातील प्रवास आहे. आधीच्या शाळेत रस्त्यावरील बँडवाल्याना शोधणारी, डेस्कची उघड झाप करणारी, वळचणीला घरटं बांधणाऱ्या चिमण्यांशी बोलणारी छोटी तोत्तोचान तिच्या आधीच्या शाळेतून काढून टाकल्यानंतर तोमोई विद्यालयात तिला मुख्याध्यापकांचा लाभलेला प्रेमळ स्पर्श, विचारांचे स्वातंत्र्य आणि स्वावलंबनाचे मिळालेले धडे यातूनच अवखळ तोत्तोचानपासून दूरदर्शनवरील लोकप्रिय कलाकार हा प्रवास ह्या पुस्तकात अंतर्भूत केला आहे.

तोत्तोचानच्या चंचल मनोवृत्तीचे दर्शन जागोजागी घडते. कधी तिला बँडवाली बनावे असे वाटते, तर कधी तिकीट तपासनीस व्हायचे आहे. कधी तिला नर्तकी तर कधी गुप्तहेर बनायचे आहे. ह्या तिच्या

वागण्यामुळे नियमबाह्य ठरलेली तोत्तोचान तोमोई शाळेतील मुख्याध्यापकांच्या 'तू एक चांगली मुलगी आहेस' या एका वाक्याने सुखावते आणि तेथूनच तिला सुप्त गुणांची जाणीव होते.

तोमोई शाळा म्हणजे जणू दुसरा निसर्गच! विध्यार्थांना निसर्गाच्या सानिध्यात अभ्यासाचे धडे दिले जात असत. मुख्याधापक सोसाकू, कोबायाशी हे अतिशय कल्पक, प्रगल्भ आणि स्वातंत्र विचारसारणाचे होते. मुलांना निसर्ग सखा सोबती वाटत असतो, म्हणूनच निसर्ग शिक्षण देणे ही त्यांची धारणा होती. विध्यार्थांना विशिष्ट प्रकारच्या अभ्यासाची सक्ती न करता त्यांला रुचेल पचेल असे शिक्षण ते देत असत. अभिनयगीत आणि संगीताद्वारे ते अवघड गोष्ट सहज सोप्पी करून सांगत. संगीतावर आधारित कवायत घेऊन मुलांचा शारीरिक विकास करण्याकडे त्यांचा ओढा होता. अर्थातच मुलांचा सर्वांगिण विकास साध्य होत असे.

तोत्तोचानच्या विविध गुणांचा उल्लेख विविध प्रसंगातून मांडला आहे. ही चिमुरडी चंचल असली तरी ती संवेदनशील होती. रोकी वरील तिचे प्रेम, तिच्या जवळील पक्ष्याच्या मृत्यूसमयी तिच्या भावूक मनाचे दर्शन घडते. तोत्तोचानचे आईवडीलदेखील नकळतपणे तिच्यावर संस्कार करत असतात. ह्याच संस्कारातून तोत्तोचानचे व्यक्तिमत्व घडत जाते. तिच्या जीवनातील तीन प्रसंग मनाला स्पर्शून जातात. पोलियोमुळे अपंगत्व आलेला यासुकीचान जेव्हा देवाघरी जातो, तिचा लाडका कुत्रा नाहीसा होतो आणि तिच्या शाळेतील चौकीदारला युद्धावर जाण्याचा सरकारी आदेश येतो... हया तिन्ही प्रसंगी तिच्या संवेदनशील मनाचे दर्शन घडते. पण ह्या वेदना मनात साठवून पुन्हा ती फिनिक्स पक्ष्याप्रमाणे उंच आकाशात भरारी मारते.

बेंचची सतत उघडझाप करणारी, शिक्षकांना सतावणारी तोत्तोचान पुढे एक मोठी दूरदर्शन कलाकार 'तेत्सुको कुरोयानागी' या नावाने ओळखली जाते. तसेच तिच्या तोमोई शाळेतील तिचे वर्गमित्रदेखील उच्च पदावर कार्यरत होतात. काही स्वयंघोषित उच्च शाळांनी कच्ची ठरविलेली ही मुले व त्यांची प्रगती पाहून 'थ्री इडियट्स' या सिनेमातील एका डायलॉगची आठवण येतें". काबील बनने के लिये पढो, कामयाबी अपने आप पीछे आयेगी"

'तू फार चांगली मुलगी आहेस' ह्या एका वाक्याने आमूलाग्र सुखावलेली तोत्तोचान! तिचा हा प्रवास मनाला स्पर्शून गेला. हे जपानी पुस्तक विश्वाला संदेश देते...

हजारो फुले फुलू दे

विचारधारांचा संघर्ष होऊ दे..

विश्वाला नवजीवन मिळू दे...

हाच अनमोल विचार आपणही आपल्यामध्ये रूजवूया व आपल्या विध्यार्थांना घडवूया. एक कविता या ठिकाणी म्हणावीशी वाटते...

माझं मूल तुमचं मूल
मुलासारखेच असते मूल
उल्हासाचा जिवंत धागा
नसतो भास नसते हूल

सगळीच मुले नसतात गुणी
प्रत्येकाला घास हवा
अंधाराच्या हातामध्ये
आनंदाचा ध्यास हवा.

# देवमाणूस

--- सचिन मेंडिस, विरार

आज धार्मिक दिवस. संध्याकाळी देवळात जायचं ठरलं होतं. त्यामुळे बायकोने कामावरून लवकर निघायची सक्त ताकीद दिली होती. असं असूनही आज त्याला ऑफीसवरून निघायला उशीर झाला. धावतपळत त्याने स्टेशन गाठलं. विरार ट्रेन यायला अवघे काही सेकंद बाकी होते. ही गाडी सुटली तर मग गर्दीचा सामना. सगळा बेतच मग फिस्कटला असता.

पुलावरून त्याला विरार लोकल फलाटाकडे येताना दिसली. आता जर धाव घेतली नाही तर गाडी मिळणे अशक्य होते. त्याने लगबगीने जिना उतरायला सुरूवात केली. एव्हाना ट्रेनचा पहिला डबा फलाटाला लागला होता. तो गर्दीतून वाट काढत कसाबसा फलाटावर पोहोचला. धावपळीमुळे लागलेला दम सावरत असतानाच समोरून आलेल्या अंध व्यक्तीचा त्याला हलकेच खांदा लागला.

आपली नजर थांबत असलेल्या ट्रेनकडे रोखत त्याने त्या अंध व्यक्तीला न पाहताच ‘सॉरी’ म्हटले. ट्रेनच्या दिशेने तो कूच करणार इतक्यात ती अंध व्यक्ती म्हणाली, ‘दादा, मला ब्रिजपर्यंत सोडता का?’ हे शब्द ऐकून तो थोडासा गोंधळला.

ट्रेनवर रोखलेली नजर त्याने क्षणार्धात त्या अंध व्यक्तीकडे फिरवली. त्या अंध व्यक्तीच्या गॉगलमध्ये त्याला त्याचा चेहरा दिसत होता. तो क्षणभर जागीच थांबला. डोळ्यासमोरून ट्रेन पुढे चालली होती. त्याने हलकेच त्या अंध व्यक्तीचा हात पकडला अन ट्रेनकडे पाठ फिरवली. ट्रेन फलाटावरून हळू हळू दूर जात होती अन त्याचा हात त्या अंध व्यक्तीच्या हातात अधिक घट्ट होत होता.

अंध व्यक्तीला घेऊन ब्रिज वर चढत असताना त्याचा मोबाईल खणखणला. अपेक्षेप्रमाणे बायकोचाच फोन होता. ‘अरे, कुठे पोहोचलास, आपल्याला देवळात जायचयं ना?’. बायकोने नाराजीचा सूर लावला. त्याने अंध व्यक्तीकडे पाहून मंद स्मित केले अन बायकोला म्हणाला, ‘मी देवळात पोहोचलोय. देवासोबतच आहे.' हे ऐकून त्या अंध व्यक्तीने त्याच्याकडे नजर फिरवली अन म्हणाला, 'तुम्हाला माझ्यात देव सापडला अन मला तुमच्यात देव दिसला.'

# जिंदगीका सफर

- सिरिल मिनेझीस, आगाशी

त्याची कार कितीतरी वेळ सारखी पळत होती. आजूबाजूला काय चालंलय, याचं त्याला अजिबात ध्यान नव्हतं. आपल्याला कुठ जायंच, हेही ठरलेलं नव्हतं. चेतन नुसता वेगान गाडी हाकत होता. हिरवी गार झाडी मागे सोडत वाट फुटेल तिथे तो जात होता. अन अचानक त्याने करकचून ब्रेक दाबला. त्याची आय टेन गाडी थांबली, खिडकीच्या काचा खाली गेल्या, चेतनने सभोवतार नजर फिरवली. आसपास चिटपाखरु सुध्दा दिसत नव्हतं. सभोवतार नुस्ती हिरवळ व उंच आकाशाला गवसणी घालणारे डेरेदाखल व्रुक्ष.

तो कासवाच्या गतीन चालत राहिला. पन्नासेक पावलं चाल्यावर तो थांबला. पुढे वाट संपली होती, होती ती खोल दरी, नजरेला चकवा देणारी ती दरी, तुम्हा आम्हाला गर्भगळीत करणारी असली तरी, चेतनला ती भितीदायक वाटत नव्हती. त्याला आज त्याच्या जिवाचा अंत करायचा होता. स्वत:ला त्या दरीत ढकलून, कडेलोट करण्याचा त्यांचा ठाम निश्चय झाला होता. तरीही स्वत:ला त्या खोल दरीत झोकून देण्याची हिम्मत मात्र त्याला होत नव्हती. सारखी त्याची एकुलती एक लाडकी लेक प्रिया, त्याच्या डोळयासमोर दिसत होती. तिसरीत तर होती ती. त्या खोल दरीत डबडबलेल्या डोळयांनी नको नको म्हणारी प्रिया त्याला आत्महत्येपासुन परावृत करत होती.

चेतन राणे एक नामंवंत बिल्डर होते. रागीणी जोशीबरोबर प्रेम विवाह केल्यानंतर प्रियासारखी गोंडस कन्या त्याच्या संसारवेलीवर ऊगवली होती. विवाहानंतर तब्बल तेरा वर्षानंतर, चेतन आणि रागीणीला अपत्य प्राप्ती झाली होती.

चेतनचं बालपण अत्यंत हलाखीचं असंच होतं त्याचे आई- वडील मोलमजुरी करायचे,आयुष्यभर कष्ट उपसुन त्यांनी चेतनला शिकवले. इंजीनियर केले. चेतनने गरीबीचे चटके सोसले. श्रीमंत माणसाबद्दल त्याच्या मनात प्रचंड चिड होती. पण एक ना एक दिवस आपण खुप श्रीमंत होण्याचा ध्यास त्याने ऊरी बाळगला होता. इंजिनिअर झाल्यानंतर नोकरी न करता तो व्यावसायिक बनला. स्वत:ची कंस्ट्रक्शन कंपनी सुरु केली. नशिबाने जोरदार साथ दिली. लक्ष्मी त्याच्या घरी पाणी भरु लागली. अजून श्रीमंत होण्याचा त्यांचा अट्टहास होता. रात्रन दिवस पैसे कसे कमावता येतील या एकाच विचाराने तो पछाडला होता. पत्नीसाठी त्याच्याकडे वेळ नव्हता. आपल्या लाडक्या लेकीला तो वेळ देऊ शकत नव्हता. घरात अंथरुणाला खिळलेले आई-बाबा आहेत याचाही त्याला विसर पडला होता. पैसाच पैसा त्याला दिसत होता.

काळाची चक्रे वेगाने फिरत होती. त्याचा व्यवसाय डबघाईला आला होता. कर्जाचा डोंगर नकळत आकाशाला गवसणी घालत होता. पुढे वाढून ठेवलेले नियतीचे ताट त्याला अस्वस्थ करत होते. यावर जिवनाचा शेवट हा एकमेव मार्ग चेतनला दिसत होता. पहाटेच त्याने आपली कार काढली होती आणि तो निघाला होता अंतिम प्रवासाला. पोहचला होता शेवटच्या मुक्कामावर, मात्र अंजाम देताना तो कचरत होता. आपली लाडकी छकुली त्याच्या डोळयासमोरुन हटतच नव्हती.

चेतन असं काही करेल याची पुसटशी कल्पना रागीणीला नव्हती. तीला आपण फसवतोय अस त्याला राहुन राहुन वाटत होतं आणि आपले आई-बाबा ज्यांनी आपलं संपूर्ण जीवन माझ्यासाठी वेचलं त्याना मी असा वाऱ्यावर सोडून चाललोय.....नाही. तो मागे फिरला, झपझप पावले टाकत तो कारपाशी आला. दरवाजा उघडून आत बसला. कितीतरी वेळ तो तसाच विचार मग्न होता.

पुन्हा एकदा आत्महत्येचे पिशाच्छ त्याला सतावू लागले.आपले पिस्तुल काढून त्याने कानशिलावर ठेवले पण चाप ओढण्याची ताकद त्याच्या बोटात येत नव्हती. अचानक त्याला जाणवलं कुणीतरी साईड ग्लासवर टकटक करत आहे .त्याने पुन्हा काचा खाली खेचल्या. समोर एक जख्खड म्हातारा आशाळभूत नजरेने पहात होता. तो खुपच अशक्त दिसत होता मात्र आपल्या खप्पड चेहऱ्यावर ओढुन ताणून हास्य आणण्याचा तो प्रयत्न करत होता. खुणेने तो काहीतरी मागत होता. चेतनने आपल घड्याळ काढून त्याला देऊ केलं पण त्याने ते नाकारलं. त्याला काहीतरी खायला हवं होतं.

" बाबा माझ्याकडे खाण्यासाठी काहीच नाहीये."

म्हातारा प्रसन्नपणे हसला व खुणेनेच चेतनला बाहेर येण्यास खुणवले. चेतन बाहेर आला. लटपटनारं आपलं शरिर काठीच्या भारावर तोलत म्हातारा म्हणाला,

"बाळ, मला फक्त खायला हवय ,तुझं ते घड्याळ मला काय कामाचं ?"

"बाबा तुम्ही या अशा निर्जन स्थळी कशाला आलात ?"

"बाळ, मी इथेच राहतो.पलीकडे माझी झोपडी आहे."

"आणखी कोण आहे झोपडीत ?"

"कुणीच नाही, गेली कित्येक वर्ष मी इथंच राहतो. कुणी इथं आलं तर मला जेवायला मिळतं नाहीतर इथली फळे खाऊन मी राहतो. खरं सांगू, गेल्या कित्येक दिवसात इथं कुणीच आलं नव्हतं.आज तु दिसलास वाटलं काहीतरी खायला मिळेल, पण तुझ्याकडे काहीच नाही तू तर माझ्यासारखा कफल्लकच दिसतोय."

क्षणभर चेतनला ओरडून सांगावस वाटलं की मी कफल्लक नाही, श्रीमंत आहे. माझ्याकडे बंगला आहे,गाडी आहे. पण त्याने स्वत:ला सावरले,

"बाबा, तुम्ही इथं कधी आलात ?"

पुन्हा एकदा आपल्या बोळक्या तोंडाने तो हसला. म्हणाला,

"किती वर्ष झाली ते ठाऊक नाही,पण आलो होतो तेव्हा तुझ्यासारखा तरुण होतो मी, तू कार घेऊन आलास, मी मात्र चालतच आलो आणि इथंच राहीलो."

"घराकडे परत जावं असं तुम्हाला इतक्या वर्षात कधीच नाही का वाटलं ?"

"कुठलं घर कुणाचं घर ?" म्हातारा शुन्यात नजर घालत म्हणाला.

" माझं घरच जमीनदोस्त झालय, बायको होती. एक पोरगी होती. वयात आली होती. आम्ही मजुरीसाठी गेलो होतो. एका लांडग्यानं पोरीची शिकार केली. पोरीनं आढ्याला लटकाऊन घेतलं स्वत:ला, हाय खाऊन महिन्याभरात कारभारीन गेली माझी. साहेब एकटा पडलो मी.

एक दिवस पहाटेच उठलो, चालत राहीलो, इथं पोहचलो, मुक्कामच केला. साहेब, तेव्हा पासून इथंच राहतो. पण साहेब तुम्ही तर तालेवार दिसता, मग असा वंगाळ विचार का आला तुमच्या मनात ?"

"वंगाळ ?"

"पोरा मला ठाऊक हाय, तू कशाला आला होता इथं ते. जीव द्यायला आला होतास ना. पण नाहीना झाली हिम्मत."

"हा बाबा खरं हाय ते. लहानपणी मी गरीबीचे चटके खुप सोसलेत. खुप कष्ट करुन मी श्रीमंत झालो पण समाधान नाही. खुप पैसा कमावण्याचं भूत माझ्या मानगुटीवर बसलं होतं. बाबा, आता मी कर्जात पार बुडालोय. जीव नकोसा झालाय पण मुलीसाठी,बायकोसाठी आणि म्हाताऱ्या आई-बाबासाठी जीव तिळतिळ तुटतोय. जीव द्यायची हिम्मतच होत नाही."

"पोरा परत फिर, मागे फिर, ज्या गरिबीत तुझं बालपण गेलं त्या गरिबीला आठव, तुझ्या पोरीसाठी, कारभारनीसाठी आन ज्या माय-बापानं तुला जन्माला घातलं त्यांच्यासाठी परत फिर. त्यांना तुझी गरज आहे. तू श्रीमंत झालास आणि गरिबाला विसरलास, श्रीमंत लोकात वावरला. कधी गरिब लोकात जाऊन पाहिलं. जा त्यांच्यासाठी काही कर. खरं समाधान लाभेल तुला. पुन्हा आत्महत्येचा विचार करु नको. तुझ्यात धमक आहे. पुन्हा प्रयत्न कर. मला विश्वास आहे, तु यशस्वी होशील. जा बाळ माझा आशिर्वाद आहे तुला"

"हा बाबा मी आता आत्महत्येचा भेकट विचार मनातून काढून टाकलाय. मला जगायचय, तुम्ही सुध्दा चला माझ्या बरोबर."

"नाही बाळ, मला इथून जाऊन कसं भागेल ? तुझ्यासारखे मनाने भरकटलेले इथं येतंच असतात, त्यांना थांबवायला कुणी नको का इथे?"

म्हातारा काठी टेकीत टेकीत दाट झाडीत निघूनही गेला.

चेतन एकटक त्याच्या पाठमोऱ्या आकृतीला बराच वेळ न्याहाळत राहीला. नंतर तो आपल्या गाडीकडे फिरला. गाडी स्टार्ट केली. रेडीओ सुरु केला, एफएम वर गाणं सुरु होतं.

"जिंदगीका सफर है ये कैसा सफर,कोई समझा नही कोई जाना नही,"

# ऋतूबद्ध

--- डॉ. रिबेका  दोडती, निर्मळ

शिवारं फुललिऐत...

भाताचं पातं उगाच वर वर डोलतंय ...पुढेपुढे केल्यासारखं...

भाताचं कणीस मात्र लवलंय खाली ...एकलव्य  द्रोणाचार्यांपुढे नतमस्तक झाल्यासारखा...किंवा कदाचित त्या माय मावलीचे आभार मानायला...

'भरभरून दिलंस ग माये...आता खाणारी तोंडं भरीन मी'..असलं काहीबाही असेल त्याच्या मनात...

मान वर करून बघेल तर शपथ...

तसं त्याच्या दाण्यात मऊसर दूध भरलेलं असतं ना तोवर त्याचा आपला तोरा असतो...जवानीचा...वार्यावर मनसोक्त डोलायचं...पावसाच्या सरींनीं धुंदबेधूंद व्हायचं....

पण एकदा पोक्तपणा आला ना की झूकून जायचं...सारं त्राण गळल्यागत...सारा माज उतरल्यागत...

तसं त्याचं एकच काम उरलेलं असतं...

त्याला झोडतात...भरडतात...कांडतात...

पण त्याची तक्रार नाही...मातीतून सत्व मिळवायचं आणि खाणारी पोटं भरायची..

कधी तत्प जलात स्वतः हून उडी घ्यायची आणि मऊशार होऊन जायचं...

कधी दोन फत्थरात चेंगरून निघायचं...आणि विरघळून जायचं...

कधी साप भूगा व्हायचं...लाटलं जायचं..चटके खायचे...मिष्टान्न बनायचं...

त्याला कसल्याही वेदणेचं सोयरसुतक नसतं...

त्याला स्वच्छ , निर्मळ शुभ्र राहणं कळतं....

एकच ध्येय असतं...

मातीतून सत्व मिळवायचं आणि खाणारी पोटं भरायची..

मला कमळ आवडतं..अगदी प्रचंड आवडतं...

त्याला विशेष असा काही गंध नसतो...

स्वतःचाही नाही आणि चिखलाचाही नाही...

तसं त्याचं विशेष जीवनही नसतं.

चिखलासोबतच ते उमलतं आणि चिखल संपला की संपून जातं..

तसं त्याच्या आणि चिखलाच्या अस्तित्वात दोन ध्रुवांचं अंतर...

पण त्याला चिखलाला एकटं सोडणं जमत नाही...

चिखलात वाढतं...त्याच्या असंख्य नलिका चिखलातनं जीवनरस शोषून घेतात...अगदी कोळून कोळून...नितळ शुद्ध जीवनरस...

चिखलाला कळतं चांगलं ते शोषलं जातंय...पण चिखल थांबवत नाही थोपवत नाही...

कमळ चिखलातनं वर येतं... वार्यावर डुलत राहतं...आतमात्र खोलवर चिखलातच आपले पाय पसरून बसलेलं असतं...

त्याला चिखलच आवडतो...

माती नको,

पाणी नको...

त्याला चिखलच लागतो...

कारण चिखल घट्टही पकडत नाही आणि सहज सैलही सोडत नाही...

म्हणूनच चिखलापासनं तोडलं की कमळ कोमेजतं ...त्याच्या नाजूक मनाला पाण्याची अतिकाळजी मानवत नाही...

कारण चिखलानं त्याला जीवनरसासोबत जीवनशास्त्र शिकवलेलं असतं ...

भगवंताच्या चरणी कमळ विसावतं ...एकट्या चिखलाला करमत नाही...तो ही शुष्क होतो...

कमळही निर्माल्य बनतं...

दोघंही सोबतच अनंताच्या प्रवासाला...

सोबतच येतात मग जन्माला ....कमळ चिखलाच्या कुशीतनं जन्मतं पून्हा नव्यानं...

गतवर्षाच्या चिखलाच्या अंतरंगात खोल दडवलेल्या बीजातनं....

उमलतं...वार्यावर डोलत राहतं...आत मात्र चिखलातच आपले पाय घट्ट रोऊन बसलेलं असतं....

# सत्य हाच परमेश्वर

--- मॅक्सवेल ॲण्ड्र्यु लोपीस, बावखाल, नंदाखाल

'ॐ असतो मा सद्गमय | तमसो मा ज्योतिर्गमय |

मृत्योर्माऽमृतं गमय |'

उपनिषदातील ही सर्वज्ञात प्रार्थना मनुष्य प्राण्याची असत्यातून सत्याकडे, अंधारातून प्रकाशाकडे आणि मृत्यूतून अमरत्वाकडे असलेली सहजप्रवृत्त आत्मिक ओढ प्रकट करते. मनुष्यात असलेली ही नैसर्गिक जिज्ञासा नक्की कधी कार्यान्वित होत असावी? मला वाटते ज्यावेळी मातेच्या उदरात त्याची गर्भधारणा होते अगदी त्यावेळीच!... एका अंधाऱ्या परंतु मायेच्या उबेने व्याप्त अशा पोकळीत तो जीव सुरक्षित असतो; तरीही एक दिवस त्याला प्रकाशाचे वेध लागते व तो जीवन मरणाशी झुंज देत या पृथ्वीतलावर जन्म घेतो. ही झाली त्याची 'प्रकाश जिज्ञासा. 'जन्म घेतल्याक्षणीच त्याच्यात जगण्याची तीव्र ओढ निर्माण होते. त्यासाठी तो कुणीही न शिकवता आपल्या शारीरिक पोषणासाठी मातेचे दूध पिण्यास सुरुवात करतो. ही त्याची 'जगण्याची जिज्ञासा'. आणि मग त्याच्या बौध्दिक विकासाच्या आरंभापासून त्याला स्वतःचे मत अथवा स्वतःची कुठलीही गोष्ट खरी सिद्ध करण्यात रस उत्पन्न होतो. अगदी ती कितीही चूक असली तरीही त्याचे मत असत्य ठरवले तर ते त्यास कदापि रुचत नाही! ही असते त्याची 'सत्याबद्दल जिज्ञासा'.

या सर्व प्रकारच्या जिज्ञासेत सत्यासंबंधी असलेली जिज्ञासा विशेष महत्त्वपूर्ण ठरते. कारण तिचा थेट संबंध त्या मनुष्याच्या नीतीशी आणि त्याद्वारे त्या मनुष्याशी संबंधित सर्व सजीव व काही अंशी निर्जीव घटकांशी असतो. त्यामुळे ही जिज्ञासा त्याच्या सर्वांगीण जडणघडणीशी त्याच्याही नकळत एकरुप झालेली असते. ज्या क्षणी त्याला या जिज्ञासेची प्रत्यक्ष जाणीव होते; त्या क्षणी त्याची खऱ्या अर्थाने सत्य शोधनाला सुरुवात होते. अगदी याच वेळी त्याच्यात ईश्वर नावाच्या एका गूढ शक्तीचे कुतूहल देखील जागृत होते आणि त्याचा ईश्वर शोध देखील सुरू होतो.

मुळात त्यावेळी त्याला थांगपत्ताही लागत नाही की त्याचा सत्य आणि ईश्वर यांचा शोध हा एकाच वाटेने जात आहे.कारण त्याच्यासाठी या दोन्हीही वेगवेगळया संकल्पना असतात. आणि जर हा प्रवास काहीसा सकारात्मक झाला, तर कालांतराने त्याची धारणा होते; 'ईश्वर सत्य आहे'. आणि मग बहुधा तो त्याचा प्रवास तिथेच थोपवू पाहतो. मात्र हे सत्य सापेक्षी असते. ते जगन्मान्य सत्य नसते. आणि खचितच हा प्रवास इथपर्यंत संपणारा नसतो. ही यात्रा गतिजन्य जीवनाबरोबर चालूच राहते. अगदी विश्वाच्या अतर्क्य परिघात पदन्यास करीत मार्गक्रमण करीत असलेल्या लक्षावधी आकाशगंगा, सौर्यमाला आणि त्यातील ग्रहांप्रमाणे! फक्त त्याची अनुभूती आणि दर्शन घेण्याचे महाभाग्य काही सत्प्रेमोन्मत्त पुण्यात्म्यांनाच लाभते आणि जिथे या ईश्वरनिष्ठ मंडळींचा प्रवास संपतो, तिथे आस्तिक-नास्तिक वादांच्या बंधनांपलीकडील एका सुंदर, विशुद्ध आणि परम मंगल तत्वाचे दर्शन त्यांना घडते. 'सत्य हेच ईश्वर आहे' हे ते सनातनी तत्त्व !

सत्य आणि ईश्वर यांचे हे सायुज्य स्वरूप मुळात मनुष्याच्या अंतःकरणातच दडलेले असते .... मृगाच्या कस्तुरीप्रमाणे.. सरोजाच्या मकरंदाप्रमाणे… चंदनाच्या सौरभाप्रमाणे! इतक्या जवळच्या गोष्टीचा बोध सर्वांनाच होत नाही, हा मानवी जीवनाचा विरोधाभासच असावा आणि त्याच्या पराधीन जीवनाची दारूण शोकांतिका देखील !....परंतु तसा बोध होण्यासाठी अवघे आयुष्य वेचावे लागते... त्यासाठी बदलता येणाऱ्या सर्व अनुचित परिस्थितींस बदलण्याचे धैर्य संपादित करावे लागते. बदलता न येणाऱ्या परिस्थितीस स्वीकारावे लागते आणि या दोन्ही परिस्थितींतील भेद जाणण्याचे ज्ञान प्राप्त करावे लागते.

जनक राजाला ज्यावेळी आपल्या राज्याच्या पतनाचे स्वप्न पडले, त्यावेळी स्वप्नातून जागे झाल्यावर ते पूर्णतः गोंधळून गेले. 'ते स्वप्न सत्य की हे जीवन सत्य?' या संभ्रमावस्थेत ते फक्त इतकेच पुटपुटत बसले, "ते सत्य की हे सत्य?". महाराजांच्या या वेडेपणाचा अर्थ कुणासच लागेना!...त्यावेळी अष्टावक्र मुनींनी राजाला विचारले, "महाराज तुमच्या राज्यावर आलेली एखादी आपत्ती तुम्ही अनुभवलीय का?" "हो"- " आता तुम्ही तुमची सत्ता आणि वैभव अनुभवत आहात का?" " हो". "मग महाराज काल जे तुम्ही पाहिले ते सत्य नव्हते व आज जे पाहत आहात ते देखील सत्य नाही." अत्यंत कष्टी होऊन राजा जनकने विचारले, " मग मुनीवर सत्य काय आहे?" अष्टावक्रमुनी त्यावर म्हणाले "महाराज तुमच्यातील स्वत्व  हेच खरे सत्य आहे".

खरं आहे, मनुष्याच्या स्वत्वाचा शोध हेच त्याच्यातील सत्यस्वरूपी ईश्वराचे प्रकटीकरण असते. परंतु मुळात मनुष्याची जागृत अवस्था, अंतर्जागृत अवस्था आणि निद्रिस्थ अवस्था ओळखणारे ते स्वत्व म्हणजे नक्की काय?.... माझा वर्ण? जन्मजात लाभलेला सौंदर्य आणि बुद्धिमत्तेचा नजराणा? माझा संप्रदाय? माझे कुटूंब? आणि जे जे माझे असल्याच्या आविर्भावात आपण असतो ते?.... नाही. स्वत्व म्हणजे जे माझे आहे ते मान्य….परंतु वरील सर्व गोष्टी तर भौतिक आहेत. आज त्या माझ्या आहेत उद्या त्या माझ्या  नसणार!.. मग कुठल्या सिद्धांतावर त्या माझ्या असल्याच्या बढाया मारतो आपण ?... माझे तर हे शरीर देखील स्वतःचे नाही…. माझा आहे तो फक्त आत्मा!.. त्या आत्म्याची ओळख हीच परम ज्ञानाची पायरी आहे.

भौतिकतेची कुठलीही शक्ती ज्यास नष्ट करू शकत नाही, तो माझा आत्मा हे माझे खरे अस्तित्व आहे. हा आत्मा परमात्म्याचाच अंश आहे याची जाणीव आणि प्रचिती जोपर्यंत मनुष्याला येत नाही ;तोपर्यंत त्याचा आत्मा परात्परात विलीन होत नाही आणि तो मृत्यूलोकात जन्म घेतच राहतो…. नव्हे, सत्य आणि ईश्वर यांच्या शोधनाची त्याची सत्वपरीक्षा तोपर्यंत  चालूच राहते.

एका त्रिकालदर्शी गुरुचे कर्म, अर्थ, धर्म आणि मोक्ष असे चार प्रिय शिष्य होते. त्यांच्या सत्यशोधनाची कसोटी पाहण्यासाठी गुरुंजींनी त्यांना एका नवख्या प्रांतात पूर्ण स्वातंत्र्यानीशी पाठवले आणि परम सत्याचा शोध घेण्याचे आव्हान दिले. शिष्यांनी एका गावात आसरा घेतला. गावातील लोक फारच आतिथ्यशील होते. त्यांच्या स्नेहमय सहवासात  योग्य तसा मेळ जुळल्यावर त्यांनी त्या गावातील चार कन्यांशी विवाह केला. त्यात कर्माचा आपल्या पत्नीवर फारच जीव जडला. 'तिच्या प्रेमातच परम सत्य आहे', अशा रजोगुणात तो बांधला गेला आणि त्याने आपल्या शोध मोहीमेला विराम दिला. अर्थ, धर्म आणि मोक्ष यांनी मात्र आपल्या पत्नींना मागे सोडून पुढचा रस्ता धरला.

मजल दरमजल करीत ते नगरीत पोहोचले. त्यांच्या ज्ञानाची चर्चा ऐकून नगरीच्या राजाने त्यांना आपले राजअतिथी म्हणून राजवाड्यात ठेवले. दरम्यान अर्थ आणि महालातील राजकन्येचा परिचय वाढला. अर्थाच्या मोहक रुपावर आणि चित्ताकर्षक व्यक्तिमत्त्वावर राजकन्येचा जीव जडला आणि तिने त्याच्याकडे विवाहाची

मागणी केली. एव्हाना राजवाड्यातील सुखासीन आणि वैभवशाली जीवनाने अर्थाला देखील अशी काही भुरळ घातली होती, की त्याला आपली पत्नी, गुरुंचा आदेश सर्वांचाच विसर पडला होता. भोगवाद आणि तमोगुण यांत त्याला सत्य दिसू लागले होते. त्याने राजकन्येचा विवाह प्रस्ताव स्विकारला व महालातील चैनबाजी अन् धनाचा गुलाम बनून राहिला तो!

धर्म आणि मोक्ष पुढे पायपीट करीत राहिले. काही काळासाठी त्यांनी एका साधूच्या आश्रमात आश्रय घेतला. साधूच्या सहवासात त्यांना जाणीव झाली की मुनी सर्वज्ञानी आहेत. शिवाय कुठल्याही मुद्द्यास प्रमाण सिद्ध करण्याचे एक अनोखे कसब त्यांस ज्ञात आहे. धर्माने त्यांचे शिष्यत्व पत्करण्याचे ठरवले. मोक्षाने त्याची खूप मनधरणी केली. मुळात एक परमश्रेष्ठ गुरु असताना आणि स्वयंशक्तीवर सत्याचा शोध घेण्याची त्यांची आज्ञा असताना इतर कुणास गुरू बनवण्याची काय गरज आहे? परंतु मोक्षाचे मत धर्मास काही पटले नाही. त्याला गुरुंनी दिलेले स्वातंत्र्य दिसत होते; ते स्वातंत्र्य देणाऱ्या गुरुंचाच त्यास विसर पडला होता. धर्माने मोक्षास पुढची वाट धरण्यास सांगितले व स्वतः त्या गुरुंचे शिष्यत्व पत्करुन त्यांनी दाखवलेल्या पथावर तो सत्य शोधू लागला.

मोक्ष पुढे पुढे जातच राहिला. अनेक पर्वत त्याने ओलांडले. कित्येक मार्ग त्याने चोखाळले. अनेक नद्या त्याने पार केल्या. काट्याकुट्यांच्या,सिंहावाघांच्या भयावह अरण्यांतून तो वणवण फिरला.अठरा विश्वे दारिद्र्याचे संसार त्याने न्याहाळले. स्वतःचा मानसन्मान कुणाच्या तरी कृत्रिम ताठ्यात कुस्करताना त्याने पाहिला. पापपुण्याच्या असंख्य आव्हानांना तो सामोरे गेला. एक दिवस त्याला कळून आले की तो फिरता फिरता पुन्हा त्याच गावी आला होता, जेथून त्याने ही सत्यशोधनाची वारी आरंभलेली होती.

परंतु ते जग त्यास आज वेगळे दिसत होते. त्याच्यातील सुरवंटाचे फुलपाखरात रुपांतर झाले होते. एका दिव्य दृष्टीचा अनभिज्ञपणे त्याच्यात विकास झाला होता. सत्त्वगुणाने त्याचा आत्मा तेजमंडीत झाला होता. त्याच्याकडे जीवनाच्या प्रत्येक समस्यांचे निराकरण करण्याचे कसब उगम पावले होते. त्याला आपल्या पत्नीची आठवण झाली. अनवधानात वा अज्ञानात का असेना, त्याने तिच्याशी लग्न केले होते. तिच्यावर काही अंशी प्रेम देखील केले होते. तिची पूर्ण जबाबदारी त्याच्यावर होती, या वास्तवाची त्याला जाणीव झाली. त्याने लगेच आपले घर गाठले व पत्नीला आपल्या यात्रेत आपल्या सोबत घेतले. त्याची शक्ती द्विगुणीत झाल्याची त्यास जाणीव झाली.

पुढे त्याला कर्म भेटला. अत्यंत भाराक्रांती आणि पिडीत दिसू लागलेल्या कर्माने आपली व्यथा त्याच्यापुढे मांडली. नगरीच्या राजाच्या मृत्यूपश्चात राजाचा जावई बनलेला अर्थ सत्तारुढ झाला होता. मानवी नातेसंबंध, भावभावना, सुखदुःखे यांबाबत त्याच्या भावना याआधी बोथट झालेल्या होत्याच. आता महत्वाकांक्षेच्या धगधगत्या चितेत तो दीनदलित रयतेचा बळी देऊ लागला होता. अनेक अनिर्बंध करांचा आणि कर्मठ धोरणांचा बोजा त्याने सर्वसामान्यावर लादला होता. वंशविद्वेषाला तर त्याच्या राज्यात कमालीचा रंग चढला होता. मोक्षाला कर्माच्या आणि तमाम जनतेच्या समस्यांचे मूळ सापडले. त्याने त्यांना संघटित करुन त्यांना स्वावलंबन, असहकार आणि अहिंसा अशा मुल्यांचा परिपाठ देण्याचा सत्याग्रह सुरु केला.

सर्वप्रथम त्यांना उद्योगी बनवून त्याने अर्थप्राप्तीचा दरवाजा त्यांच्यासाठी खुला केला. हे आंदोलन संपूर्ण प्रांतात पसरले. त्याला सत्ताधीशांकडून तीव्र विरोधदेखील झाला. असंख्य निष्पाप जीव अन्याया विरुद्धच्या त्या लढ्यात, त्या ध्वंसाच्या जीवनसंग्रामात कामी आले. परंतु सत्याचा पाया असलेल्या त्या लढ्यापुढे असत्याच्या

सत्तेची काय तग! सत्य पाषाण असते; असत्य मातीचा घडा असतो. त्यांची टक्कर झाली, तर फुटायचे मातीच्या घड्याला असते. पाषाण तर अखंड असतो. शेवटी अर्थाला आपले मतपरिवर्तन करणे भाग पडले व त्या प्रांतात एक नवा क्रांतीसूर्य उदयास आला. अर्थाचे कर्म आणि मोक्षा बरोबरचे सख्य देखील पूर्ववत जडले गेले.

तिथे धर्म आता खूपच विद्वान झाला होता. कुठल्याही गोष्टीला आपल्या वाक्चातूर्याने सिद्ध करण्याची हातोटी त्याला संपादित झाली होती. मात्र स्वतःच्या तत्त्वज्ञानचे अश्व स्वच्छंदीपणे आणि स्वैरपणे उधळवीत असलेला तो खोट्याचे खरे कधी करु लागला आणि धर्माचा अधर्म कधी झाला हे त्याचे त्यालाच कळले नाही. त्याच्या विवेक बुद्धीला देखील तमोगुणाचे ग्रहण लागले होते. मोक्षाचे सत्य अहिंसेचे तत्त्व त्यास पटत नव्हते. त्याला ते देशाच्या हितात बाधक वाटत होते.सर्वत्र होत असलेला मोक्षाचा उदोउदो त्यास असह्य होऊ लागला होता. त्याचे 'मोक्षास संपवणे म्हणजे त्याच्या तत्त्वास संपवणे' असे दृढ मत झाले होते.

एक दिवस त्याने डाव साधला. मोक्ष आपल्या स्वप्राबल्यावर कुठलीही यातना सहन करण्यापत सोशीक आणि कुठल्याही संकटाला निशस्त्र तोंड देण्याइतपत निडर बनला होता. त्यामुळे सर्व प्रकारच्या संकटांची जाण असूनदेखील त्याने ना संरक्षक तैनात ठेवले ना स्वतःला कुठे कोंडून घेतले. एकेदिवशी मोक्ष एका प्रार्थनासभेचे नेतृत्व करत होता. ग्लानी चढलेला धर्म त्या ठिकाणी पोहोचला व त्याने भर सभेत एका मागोमाग तीन तीक्ष्ण बाणांनी मोक्षास विंधीले. मोक्ष रक्ताच्या थारोळयात कोसळला. त्याच्या मुखातून शब्द उमटले 'हे ईश्वर'....

अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम्|

यः प्रयाति स मभ्दावं याति नास्त्यत्र संशयः||

(अंतकाळी केवळ माझे स्मरण करीत जो आपला देहत्याग करतो, तो तात्काळ माझ्या प्रकृतीची प्राप्ती करतो.यात मुळीच संशय नाही.)

...आणि त्याचे गुरू त्या क्षणी तिथे प्रकटले. गुरुंनी म्हटले, 'वत्सा तुझे सत्य शोधन सार्थ झाले. तुझा परमसत्याचा शोध पूर्ण झाला. तू कर्माला जागलास, अर्थ प्राप्तीचा धर्माचे अधिष्ठान असलेला रस्ता तु पददलीतांना दाखवलास. तू तर कर्म अर्थ, धर्म आणि प्रत्यक्ष मोक्षाच्याही पलिकडे पोहोचलास. त्यामुळे आजपासून तुला 'पुरुषार्थ' या नावाने जग ओळखेल. ये आता माझ्या कुशीत चिरंतन विसावा घे. मोक्षाने हलकासा हूंदका दिला आणि आपला अभेद्य,अदाह्य,अक्लेप्य,अशोष्य आत्मा परात्पर सत्यात समर्पित केला…... सारे जग स्तब्ध झाले.... अगदी क्षणभरासाठी त्या अधर्माने देखील नकळतपणे आपले हात जोडले. पुरुषार्थ बनलेल्या मोक्षाचा हा सारालंकार(climax) सत्याचा परम आविष्कार होता.

पुरुषार्थाच्या त्या 'हे ईश्वर' या शेवटच्या शब्दांत काय नव्हते ?..... त्यात परम श्रद्धा होती…. क्रुसावर तडफडणाऱ्या ख्रिस्ताचे आपल्या मारेकऱ्यांसाठी मागितलेले क्षमेचे पसायदान होते त्यात….. प्रेषित महंमदाचे विजिगिषा साहस होते त्यात…. बुद्धाच्या निर्विकार डोळयातील शांती होती त्यात…. आणि महावीराची अहिंसा होती त्यात… संत पौलाने सांगितलेली सर्वश्रेष्ठ प्रीती होती त्यात… संत मीराबाईंची सगुणातून

निर्गुणाकडे प्रयाण करणारी निस्सीम भक्ती होती त्यात.... नरसिंह महेताची परदुःख आपलेसे करण्याचे वैष्णव तत्त्व होते त्यात... आणि अनेक लोकोत्तर महानायकांना प्रेरित करणारा सेवेचा महामंत्र होता त्यात!

सर्वात महत्वाचे म्हणजे त्यात परम सत्य होते. निरपेक्ष सत्य जे भगवद् स्वरूप होते. नव्हे ते स्वतःच परमेश्वर होते. त्यात साऱ्या नीतींचा समावेश होता. ईश्वर म्हणजे तरी काय?... सर्व नीतींचा एक असीम महासागरच ना आणि त्या सर्व नीतींनाच संयुक्तपणे म्हटले जाते सत्य. तसे पाहता सर्व नीतींत सत्याइतकेच दया, क्षमा, शांती, प्रीती यांचे महत्त्व आहे. परंतु यांपैकी कुठल्याही मुल्याचा अंगिकार करायचा असेल तर 'चराचरातील अद्वैत' या तत्त्वाचा स्वीकार करावा लागेल. त्यासाठी वैश्विक ज्ञानप्राप्तीची गरज आहे. पुन्हा हे ज्ञान म्हणजेच तर असते परिपूर्ण सत्य! 'सत्यम् ज्ञानम् अनन्तम ब्रह्म्' ही वैदिक धारणा आहेच. ज्यास हे सत्य समजले त्यास सत्याच्या ज्ञानात दडलेले अनंत ब्रह्मांड समजले. म्हणून सत्य हेच जीवन आहे. सत्य हाच परमार्थ आहे आणि सत्य हाच परमेश्वर आहे.

'सत्यमेव जयति नानृतं सत्येन पन्था विततो देवयानः|

येनाक्रमन्त्यृषयो ह्याप्तकामा यत्र तत्सत्यस्य परमं निधानम्||'

( सत्याचाच विजय होतो; असत्याचा नव्हे. पूर्णकाम ऋषीगण ज्या मार्गावरुन गमन करुन सत्यस्वरुप परमेश्वराच्या परमधामी जातात तो देवयानमार्ग देखील सत्याने व्याप्त आहे.)

(टिप- सदर मुक्तचिंतनात सांगितलेली मध्यवर्ती कथा हे परमपुज्य महात्मा गांधी यांच्या जीवनावरील माझे वैयक्तिक चिंतन आहे. यातील गुरु हे सत्यस्वरुप ईश्वराचे रुप आहे. 'कर्म' हे दीन गरीब भारतीय जनतेचे प्रतीक आहे. 'अर्थ' ही ब्रिटिश सत्ता आहे. अधर्म बनलेला 'धर्म' बापूजींना संपवण्याचा भ्याडपणा करणाऱ्या प्रवृत्तीं आहेत. आणि 'मोक्ष' म्हणजे महामानव गांधी असून 'पुरुषार्थ' हा सत्यशोधक आणि सत्यप्रदिप्त 'गांधीवाद' आहे..... जो अमर आहे.

# जतन

--- पेट्रेशिया गोन्सालवीस (मराडी-बोरीवली)

अगं आई, काय हा कचरा गोळा केलाय ड्रॉँवरमध्ये,... सुकलेला गजर्याचा धागा सुद्धा ठेवलाय... आणि हि कधीची greetingcards...,काय हे...

कशाला हा भरणा....फेकून दे... तुझी जुनी सवय गं, सगळं जतन करून ठेवण्याची... त्यामुळे नवीन काय आणलं की जागाच उरत नाही ठेवायला...

हाताने ड्रॉँव्हर साफ करता करता शामलची अखंड बडबड चालू होती.. कौतुकभरल्या नजरेने तिला न्हाह्याळत होती. शामल, जसा सुकलेल्या गजर्याचा धागा कचरापेटीत टाकणार ,तोच जवळजवळ हिसकावत आईने तो धागा तिच्या हातातून घेतला,

"हा कचरा वाटतो तुला, माझी प्रेमळ आठवण आहे गं... तुझे पप्पा, मला मोगरा आवडायचा म्हणून कितीही महाग असला तरी दररोज मोगर्याचा गजरा आणायचेच...

गेल्या वाढदिवसाला आणलेला गजरा आहे हा. कोमेजला तरी आठवण म्हणून मी तो जपून ठेवलाय गं..."

नकळत डोळे पाणावले... आईला असं हळवं होताना शामलने गेल्या वर्षेभरात कितीदा पाहीले आहे.. हल्ली तिला त्याची सवयच झाली आहे.

आईला मिठीत घेत शामल म्हणाली,"आई,हे असं किती दिवस चालणार? किती कुढत बसणार ? आठवणी काय मरेपर्यंत सोबत सोडणार नाहीत.पण त्यांने त्रास होतो ना...तुला पण आणि मलाही...

छातीत दुखते म्हणून पप्पा रात्री उठले...घरात आपण दोघीच.. मी पाणी आणायला किचनमध्ये गेले आणि तू बाम शोधून त्यांच्या छातीला लावत होतीस.

पाण्याचा एक घोट घेतला आणि पप्पांनी मान टाकली ती पुन्हा न उठण्यासाठी...शामलनेही अश्रुंना वाट करून दिली.

जाऊ दे...पप्पा देवबापाकडे आपल्यासाठी चांगले मागत आहेत असा आपला विश्वास आहे ना... मग रडत, कुढत, आठवत बसायचं नाही.

खरं आहे गं शामल...पण काही माणसे ,त्यांच्या आठवणी, जीवनाचा एक भाग बनल्या आहेत. त्यांच्या वस्तू पाहील्या नं की त्यांचे असणे खरे वाटते.
तेव्हढीच मनाची समजूत होते...येतील। कुठेतरी गेले आहेत ते येतील...
जीवन जगताना किती नातीगोती ,मायेची माणसे आपण जोडत,असतो.मित्रमैत्रिणी,नातलग,शेजारीपाजारी ..

त्यांची माया,ममता,भल्याबुर्या आठवणी किती जपणूक करत असतो.भावनांची जपणूक तशी काही वेळेला वस्तूंची जपणूक करीत असतो.

शेजारच्या मेरीआत्याकडे तिच्या आजीने तिला दिलेला जांभळ्या रंगाचा काचेचा ग्लास अजून आहे. मेरीआत्याला नातवंडे आहेत. 50वर्षे जुना ग्लास तिने आजीची आठवण म्हणून आजही जपून ठेवला आहे. पहील्या बाळंतसणाला आणलेले बाळतुले(मांडुले)उशीदादीच्या कपाटातील गाठोड्यात अजून जपून ठेवले आहे.त्या बाळतुल्यावर तिची पाच मुले व पुढे तिची आठ नातवंडे वाढली...
अशा कितीतरी जतनेतल्या वस्तू आपणा प्रत्येकांकडे असतातच पुस्तके,पुस्तकातले मोरपिस,खास माणसांनी दिलेली भेटवस्तू,पेन,पर्स,कपडा,दागिना,काहीवेळेस वस्तू जास्त मोलाची नसते पण त्यामागच्या आठवणी,भावना खूप लाखमोलाच्या म्हणून जपून ठेवलेल्या मग एखाद्या ओळीचं पत्र का असेना..पण जीवापाड जपलेले...त्या जपणूक करण्यामागे त्या माणसांवरील अतूट प्रेम असते.मानसिक समाधान असते.भेटवस्तू दिलेली माणसे हयात अस़ो वा नसो..त्या जतन केलेल्या वस्तूंतून ती रोज भेटत असतात.मौनातले हितगुज करीत असतात.

कुणा कवीची चारोळी इथे सांगावीशी वाटते

तू ये अथवा येऊ नकोस,
आठवणीचे मोरपिस ,
जपून ठेवलंय काळजात
शेवटचा श्वासापर्यंत.

# "मोल" करीन .????

--- रॉबर्ट फर्नांडिस, मोब -८००७२०५०१६

आईचं हृदय आकाशाएवढं असून त्यात प्रेम हे कधीही कमी न होता नेहमी फुलत असते, त्या प्रेमाची जाणीव लेकरास कधीच होत नाही, पण ज्यांना जाणीव झाली त्यांचं जीवन सार्थक झाले. आणि ज्या मुलांना कळले नाही त्यांना मग उतारवयात प्रेमासाठी त्याची सुद्धा "जैसी करणी वैसी भरणी" अशी  झाली.

ती प्रेमरुपी माऊली जन्मापासून ते मरेपर्यंत आपल्या त्या लेकरूवर प्रेम करते. मुलगा कितीही मोठा झाला तरी तिच्यासाठी लहान असतो. एकच अशी व्यक्ती कि ती आपल्या मुलाचे सर्व गुन्हे माफ करते व त्याला सुधारण्यास संधी देते,

पण आताच्या ह्या धगधगीच्या/विकसित काळात मुलांना आई-वडिलांचे कष्ट, प्रेम, त्याग ह्याचा विसर पडलेला दिसतो, मुलांना पुढच्या जीवनात ठेच लागू नये, ते सफल व्हावे म्हणून आपली ऐपत नसताना सुद्धा पोटाला चिमटा मारून, वेळ प्रसंगी कर्ज काढून त्यांना चांगले शिक्षण देतात, आपली आयुष्याची सर्व पुंजी त्यात ते पणाला लावतात व म्हातारपणीचा विचार करीत नाही मग पुढे त्यांचे काय ? मग मुलं चांगली शिक्षण घेतली की पुढच्या शिक्षणास परदेशी जातात व कालांतराने तिथेच कायम होतात मग कामाची ती धावपळ, वेळेअभावी, तसेच  ह्या स्पर्धेच्या युगात त्यांना जर टिकून राहायचे असेल तर मनाची खूप इच्छा असूनसुद्धा आपल्या जन्म दात्याला भेटावयास येता जमत नाही.

पण इथे असलेल्याची गत सुद्धा तशीच आहे, एकदा का मुलांची लग्न झाली कि आपले अलग कुटुंब असावे म्हणून स्वतंत्र घर बांधली जातात, एका खोलीत झोपणारे चार भाऊ, त्यांची चार टुमदार अशी घर होतात,मग मायेने एकाच खाटेवर व आई-वडिलांच्या मायेत राहणारी , नवीन घरं झाल्यावर त्यांना आई-वडिलांची अडचण होते, एका ताटात खाणारे भाऊ एकमेकांचे वैरी होतात, मग आपल्या जन्मदात्याला कोणीही आपल्या घरी घेण्यास तयार होत नाही, ज्या आई -बापानी ५-७ पोरं कमी मिळकत असून ,वेळप्रसंगी पोटाला चिमटा घेऊन हि वाढवलेली असतात पण  मुलांना मात्र त्यांच्यासाठी घरात राहावयास जागा नसते, ती त्याना जड होतात.

तसे पाहता स्त्री ही - मुलगी,नात, सून, बायको ,आई, आजी ह्या सर्व नात्यामधून जगापुढे वावरते तिला स्त्रीची दुःख, वेदना, त्याग ,कष्ट ह्यांची पूर्ण कल्पना असते, परंतु एक स्त्री दुसऱ्या स्त्रीवर अत्याचार करते मग ती "सून असो वा सासू".  असेपण होते एखादी मुलगी जी आई -वडिलांची लाडकी, ती लग्न करून सून म्हणून गेली की तिला सासू-सासरे आपले वैरी वाटतात मग ती त्यांच्याशी जवळीक ना करता, त्रास देण्याचा निर्णय घेते (काही ठिकाणी सासू ही सुनेला आपली वैरी समजून अत्याचार करते हे पण आहे ) त्यामुळे ती सून नवर्याच्या आई-वडीलास दूर सारून आपल्या आई-वडीलास जवळ करते. (खरं तर आई-वडिलांनी आपल्या मुलां-मुलींच्या संसारात लक्ष न दिलेले बरे कारण ती आता मोठी झालेली असतात. )

कालांतरानं नवऱ्याकडील पाहुण्यामंडळींचे नाते संबंध कमी होतात. मुख्य म्हणजे त्यात नवरावर्ग गुरफटला जातो व त्याला कोणास साथ द्यावी हे समजत नाही पण ही जीवनरुपी नौका बुडू नये म्हणून बायकोला साथ द्यावी लागते.

आता तर " हम दो ओर हमारे दो" असे त्या घरात राहिल्यानी या महागाईच्या जमान्यात, आपले चांगलं शिक्षण असल्यानी त्यांना नोकरी करणे भाग असते मग प्रश्न मोठा निर्माण होतो की त्याच्या मुलांना सांभाळणार कोण ? मग त्यांना मोलकरीण ठेवावी लागते ते सुद्धा ८-१० हजार ₹.देऊन, पण मोलकरणीचा रूबाब फार लई, तिच्या अटी तर सांगूच नका. पगार,रजा वेळेवर पाहिजे, वर्षाला एक -दोन गिफ्ट, पण हे सगळं नाय-ईलाजास्तव कबूल करतो व त्या अनोळखीच्या हाती लाखमोलाची पोरं,तो बंगला हवाली करतो पण आपल्या जन्म दात्यावर आपण विश्वास ठेवत नाही ज्यांनी आपल्या नातवाला तळहातावर जपले असते, ज्यांनी आई-वडीलावर विश्वास ठेवला ते जोडपं बिनधास्त कामाला गेली व मुलांचा सांभाळ सुद्धा चांगला व सुरक्षित झाला.

आपल्याकडील अशा सुद्धा घटना आहेत की त्या जन्मदात्या आईच्या अंतिम दर्शनासाठी मुलगा बाजूला घरी असूनसुद्धा तो रागापोटी आला नाही कारण त्याचे असे म्हणणे होते की आमच्या चार भावंडात आईनी मला कमी हिस्सा दिला, दुसरं महत्वाच म्हाताऱ्या माणसास लहान मुले फार आवडतात व त्यातच त्याचे उतरवायचे टाईमपास होते पण असे सुद्धा घडले आहे कि एके ठिकाणी आपल्या नातवाचे तोंड पहावयाची खाटेला खिळलेल्या मातेची इच्छा होती pण ती इच्छा सुनेने पूर्ण होऊ दिली नाही व ती माता मनाची पुर्णता न होता देवाघरी गेली.

एकदा का म्हातारं झालं की ती व्यक्ती एकलकोंडी होते. त्यांना सहवासाची खूप गरज असते, पण आपण आपल्या मनातील राग, मत्सर, अट्टाहास मुळे आपण हे विसरून जातो, त्यानां त्यांचे जुने दिवस आठवत असतात, कारण ती माणसे भल्या मोठया कुटुंबात जगलेली असतात, पहिल्या काळी आपली भली मोठी घरे, एकत्र कुटुंब पद्धती होती व ह्यात ते वावरलेली असतात त्यामळे एकटेपणा त्यास जगू देत नाही मग आतल्या आत जिझुन जीवन एकदाचे कधी संपेल ह्याची ते वाट पाहात असतात, त्याचे मन नेहमी विचार करीत असते कि आपण निःसंतांन असते तर या म्हातारपणी हे दिवस भोगावे लागले नसते. पण इतके असूनही त्याचं मुलांवरील प्रेम काही कमी होत नाही.

ह्या ख्रिसमसच्या दिवशी मारिया मातेच्या पोटी ख्रिस्त जन्माला आला व जगाचा त्याने उद्धार केला, जगाला एक तारणारा मिळाला ,आपणही या नव्या पिढीचे नात-नातनी त्या ख्रिस्ताला वचन देऊ या आणि एक नवी कांती घडविण्यासाठी शपथ घेऊ कि आम्ही आता सुशिक्षित झालो ह्यात आमच्या आजी-आजोबाचा सिहाचा वाटा आहे, कारण त्याच्या पोटी माझे वडील जन्माला आले नसते तर हे सुंदर जग बघण्याचे भाग्य मला कोठून लाभले असते म्हणून त्या आजी-आजोबाच्या कष्टच्या, त्यागाचे, प्रेमच हे जीवन मी व्यर्थ जाऊ देणार नाही, त्याच्या उतारवयात त्यांच्या डोळयातून एकही अश्रू सुद्धा येणार नाही व त्याच्या कडून मिळालेल्या ह्या पृथ्वीवरील जीवनाचं मी "मोल"करीन, हा बदल मी माझ्याकडून सुरवात करुन , एक नवीन आदर्श बनून लोकापुढे येईन.

# स्वामी तिन्ही जगाचा.... आई विना भिकारी #

# आपण कोण - आलेक्स डाबरे, निर्मळ

आपण कोण□तर वसईतील ख्रिस्ती-अख्रिस्ती भूमिपुत्र समाज. सुमारे ३०-३५ वर्षापूर्वी ज्यांची गणना मध्यमवर्गात वा कनिष्ठ मध्यम वर्गात होत असे असा वसईतील समाजाचा घटक. गेल्या २०-२५ वर्षात या वर्गाचे रूपांतर उच्चमध्यम किंवा श्रीमंत वर्गात झालं आहे आणि त्याची जीवनशैली बदलून गेली आहे. पूर्वी कौलारू घरांमध्ये कारवीच्या कुडाच्या भिंतीत किंवा बिना प्लास्टरच्या चूण्याच्या भिंतीमध्ये चार□पाच भावांचे कुटुंब शेतमजूरी करून शेती बागायती बरोबर दूधाचा व्यवसाय करून कसेबसे आयुष्य घालवणारा हा वसईतील समाज□आता मार्वल ग्रेनाईटच्या चार चार बेडरूमच्या प्रशस्त बंगल्यामध्ये राहतात तर काही कुटुंब वसई बाहेर दोन बेडरूमच्या स्वतःच्या प्रशस्त फ्लॉटमध्ये राहायला गेले आहेत काही कुटुंबातील मुल परदेशी त्या देशाचे ग्रिन कार्ड घेऊन कायम स्थायिक झाले आहेत.

गेल्या २५-३० वर्षात उच्च शिक्षणा मुळे पती आणि पत्नी दोघांनी नोकरी करण्याचं प्रमाण वाढत आहे. घरात एक सायकल किंवा एखादी स्कूटर या ऐवजी आता प्रत्येकाची मोटर सायकल अथवा चार चाकी वाहन खरेदी करण्याइतका पैसा त्याच्या हातात खुळु खुळु लागला आहे. कुटुंबाच्या सोयीसाठी दोन दोन टीव्ही सचं घेणे त्याला सहज पडू लागले आहे. घरातल्या प्रत्येकाकडे महागडा स्मार्टफोन असणे हा जणू अलिखित नियमच बनून केला आहे. पूर्वी केवळ हिन्दी चित्रपटात पाहिलेली अमेरिका□युरोप□ इस्त्रायल तो आता प्रत्यक्ष तिथे जाऊन पाहू लागला आहे. आपल्या मुलांना परदेशी शिक्षणासाठी पाठवणं ही आज सामान्य बाब बनली नंतर मुलांनी तिथे स्थायिक होणे□आईवडिलांनी वर्षाआड अमेरिका□ ऑस्ट्रेलिया□लंडन□कॅनडा वा दुबईला जाणं मुलीच्या सूनेच्या बाळंतपणासाठी पाचसहा महिने राहणं ह्या गोष्टी नवलाईच्या राहल्या नाहीत.

परंतु या २५-३० वर्षाच्या काळातच आपल्यात इतरही अनेक बदल झाले आहेत. त्या बदलांचे परिणाम विघातक आणि दूरगामी आहेत. लग्न समारंभामध्ये श्रीमंतीचे ओंगळ प्रदर्शन सुरू झाले. स्वागत समारंभात नुसत्या स्टेजवरच्या सजावटीसाठी लाखो रूपये उधळले जाऊ लागले. पॅकेज म्हणजे कॅटरींग हा परवलीचा शब्द बनला. नवरा नवरीची नेआण करण्यासाठी भारी कारची व्यवस्था प्रतिष्ठीत मानली जाऊ लागली. चार दिवसाच्या लग्न सोहळयात जेवणामध्ये असंख्य पदार्थ उपलब्ध करून येऊ लागले. स्वतःला खूपच आधुनिक समजून विदेशी दारूच बार उपलब्ध करून देण्यात येऊ लागला. लहान मुल जसं शेजाराच्या घरातल्या मुलाचं नविन खेळणे बघितल्यावर तशाच खेळणाचा हट्ट धरतात तसंच वडिलधारी माणसाचं होऊ लागलं. दुस□याच्या श्रीमंती जीवनशैलीच अंधानुकरण सुरू झाल आहे.

मध्यम वर्गातील आपल्या ख्रिस्ती समाजाला चगळ वादानं जबरदस्त विळखा घातला आहे. अश्या ह्या श्रीमंती जीवन जगण्यासाठी साहाजीकपणे अधिकाधिक पैशांची जरूरी असते. त्यासाठी भाग मध्यमवर्गी

य ऊर फुटेपर्यंत पैशाच्या मागे धावू लागला. आता कोणी म्हणेल की□अधिक पैसा मिळवण□श्रीमंत होण्याची अपेक्षा बाळगणे गैर आहे का□नक्कीच नाही पण त्यात तारतम्य हवे पैसा प्रामाणिकपणे मिळवलेला हवा. कुसुमाग्रज एका लेखात म्हणतात पृथ्वी सूर्याभोवती फिरत नाही तर ती रूपयाच्या नाण्याभोवती फिरते. त्यांच्या या विधानाचा विदारक प्रत्यय ठायी येतो आहे. त्यातून वैयक्तिक□कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात फार मोठे ताण तणांव निर्माण झाले आहेत.

पूर्वी नोकरीची वेळ ठराविक होती ताण ही तुलनेत कमी असे. त्या काळी नोकरी व्यक्तीसाठी होती□ आता व्यक्ती नोकरीसाठी झाली आहे. व्यक्तीचे स्वातंत्र□कौटुंबिक जीवन फुरसरतीचा वेळ छंद या सगळया गोष्टी फार आकळून गेल्या आहेत. आयटी उद्योगामध्ये चांगला पैसा मिळत असल्याने सगळया तरूणाना त्याच क्षेत्रात जायचं वाटत आहे. "पॅकेज" हा या तरूणाईचा केंद्रबिंदु झाला आहे. मग कामाचे तास किती का असेनात. व्यक्तिगत आवड□निवड□कौटुंबिक स्वास्थ्य□शारीरिक मानसिक क्षमता या कशाच्याही विचार न करता केवळ अधिकाधिक पॅकेज मिळवणं हेच आजच्या तरूणपिढीचं जीवन ध्येय बनले आहे. माणसाचं रूपांतर यंत्रमानवात झालं आहे. नोकरीच्या निमित्ताने १६-१८ तास लग्नाच्या जोडीदारापासून दूर राहिल्याने आणि तेवढाच वेळ दुस□या सहकारी तरूण□तरूणीच्या सहवासात राहिल्याने विवाहबाह्य संबंधाच प्रमाण वाढत आहे. अनेक प्रकरणे घटस्फोटापर्यंत जात आहेत. अगदी तरूण वयात मधुमेह□उच्च रक्तदाब आणि हृदयविकाराचे प्रमाण वाढताना दिसून येत आहेत. अनेकदा तर हा पैसा उपभोगण्यासाठी माणसाकडे पुरेसा वेळ आणि उर्जा ही नसते. तरीही ऊर फुटेपर्यंत पैश्याच्या मागे धावणे सुरूच राहते.

वसई समाजरचनेचं वैशिष्ट असलेली एकत्र कुटुंब व्यवस्था ढासळून गेली आहे. आता एकत्र कुटुंब पाहिल तर आश्चर्यजवळ वाटते. एकेकाळी आजी□आजोबा व आई□वडील या केवळ कुटुंबातल्या एक आदरणीय व्यक्ती नव्हत्या तर जणू आध्यात्मिक□सामाजिक संस्था होत्या. आता त्या केवळ गरजेपुरत्या वापरण्याच्या व्यक्ती बनल्या आहेत. त्याची राहण्याची व खाण्यापिण्यासाची वाटणी होत असून□घरातून बाहेर जाता येताना साधी विचारपुस सुद्धा होत नाही. याला काही अपवाद असतीलही पण ते केवळ अपवादचं आहेत. ह्या वृत्तीमुळे नात्यातळे तेज□ऊर्जा मोहकता ओसरत जाऊन ते केवळ औपचारिकता व कर्तव्य म्हणून रेटलं जाते.

आपल्या आयुष्यात "त्या" व्यक्तीने केलेल्या योगदानाचा विसर पडु न देणे ह्याचा विचार आजच्या पिढीने कारावयास हवा. ह्या करीता आध्यात्मिकतेची साथ आवड□सवड ठेवावयास हवी. आजच्या आधुनिक जगाचा विचार करता आपल्या वसईतील संस्कृतीची जपवणूक करण्यासाठी आजच्या पिढीने मागील पिढी कमी शिकणे की असताना सुद्धा प्रेम स्नेह आदर व सलोखा ह्यांचा संगम ठेवून आप परिस्थीतीत आर्थिक व मनाच्या गरिबीचे जीवन आध्यात्मिकेत सुखा समाधानाने जगले. ह्याचा आदर्श आजच्या पिढीने घेऊन त्यातील चांगल्या संस्कृतीची जपणूक करून आपल्या संस्कृतीचा विसर पडू देऊ नये अशी मागील पीढीची व माझी अपेक्षा आहे.

# कन्यादान

- सौ. रेश्मा सुनिल परेरा (वटार)

पहाटेचा मंद वारा वाहत होता. आकाशात सुर्याने अद्याप हजेरी लावली नव्हती. कोंबडयाने बांग देण्यापुर्वीच 'शांती' उठली. रात्रभर तिला झोपच कुठे लागली होती. आज १२ वाजुन २५ मिनिटांनी सुमतीचा म्हणजेच तिच्या मुलीच्या लग्नाचा मुहुर्त होता. शांतीचे सख्खे किंवा जवळचे असे नातेवाईक कुणीच नव्हते, होते ते सर्व शेजारी. सकाळचे प्रार्तविधी आटपून सर्व आवरा-आवर करण्यास शांती गुंतली होती. इतक्यात वरात आल्याची बातमी शेजारील 'सोनाने ' दिली तशी ती घाई करु लागली आणि सुमतीला तिने हाक मारली. आज आपली सुमी आपल्याला सोडून सासरी  जाणार ह्या विचाराने तिच्या मनाची चलबिचल वाढत चाललेली होती. बघता-बघता तिचे मन भूतकाळात थेट तिच्या बालपणात गेले.......

"किती वेळा सांगितलं एवढं पित जाऊ नका म्हणून, एक मूलगी आहे आपल्याला, आता तरी पिणं कमी करा, पण ऐकतील तर शप्पथ ". सावित्री रागा-रागाने केर काढीत नव-याला म्हणाली.  हं, तूझ्या 'बा' ची पितो की काय? असं म्हणत 'लडकू' नं सावित्रीच्या कंबरेत लाथ हाणली. सावित्री विव्हळली. नवरा असून नसल्यासारखा होता. २४ तास दारुच्या नशेत असायचा. बोलण्याची सोय म्हणून नव्हती. तोंड उघडले की मार खाण्याशिवाय दूसरे काही वाटयाला यायचे नाही. आता मुलीसाठी आपण सर्व सहन करायचं असं ठरवलं होतं तिने.

सावित्री दूस-या घरची धुणी-भांडी करुन कसाबसा चरितार्थ चालवत होती. एक दिवस तिचा नवरा दारु पिऊन जो झोपला तो पुन्हा कधी उठलाच नाही.

" आई, बाबा गेले ते लई बरं झालं बघ."

" अग, असं बोलू नये ".

" आई, तू घरी नसायचीस ना तवा मला बाबांचं लई भ्या वाटायचं बघ."

" कशाला गं?"

" त्यांचे डोळे किनई लई लाल असायचे , त्या डोळंय़ाकडे पाहिल्यावर मला लई भ्या वाटायचं.

" ए आई, पण तू नाही ना मला सोडून जाणार?"

"नाही गं माझे राणी , तूला मी कधी सोडून नाही जाणार" सावित्रीने शांतीला छातीशी कवटाळले होते. आत्ता देखील तो प्रसंग शांतीला जस्साच्या तस्सा आठवला. त्या आठवणीच्या डोहात पुरती बुडाली.

" आई, लई भुक लागलीय बघ मला ".

" तांद्ळाचं पीठच तेवढं घरात आहे. थांब तूला पटकन भाकरी करुन देते हं चालेल? सावित्रीचा कातर आवाजातला प्रश्न !

" चालेल की ".

" अगं, चुलीसाठी लाकडं संपलीयेत, थांब हं ! मी पटकन परसात जाऊन लाकडं घेऊन येते हं". असं म्हणत सावित्री लाकडं आणायला परसात गेली होती. सरपण गोळा करत असताना तिला पायाला काहीतरी टोचल्यासारखं वाटलं म्हणून पळत-पळतच घरात आली. एव्हाना तिच्या तोंडाला फेस आला होता. सावित्री मुर्छा येऊन दारातच पडली होती. काळाने तिच्यावर झडप घातली होती. चिमुकल्या शांतीला काय झाले ते कळलेही नव्हते. जीवाच्या आकांताने टाहो फोडला होता.

"आई sssss उठ ना गं आई, काहीतरी बोलना". तिचा आवाज ऐकून आजुबाजुचे सर्व लोकं गोळा झाले होते. तिची आजी बाजुच्याच गावात राहत होती. कुणीतरी तिच्या आजीला कळवले. आजी धावत-पळतच आली होती. अवघ्या बारा-तेरा वर्षाची पोर आई-बापा विना एकटी पडली होती. "रडू नकोस पोरी", आजी नातीला सांगत होती व पदर डोळ्याला लावत होती. शांती आजीला बिलगून धाय मोकलून रडली होती. शेजारी-पाजारी शांतीचे व तिच्या आजीचे सांत्वन करित होते. चार दिवस राहुन आजी नातीला घेऊन गावी गेली.

" शांती ए शांती ,चल दोन घास खाऊन घे",

" आजी, आई आता कध्धीच परत येणार नाही का गं ? शांती आजीला विचारते.

" अगं , देवाकडे गेलेलं माणूस कधी परत येते का ?

" मला आईची खुप आठवण येते गं ".

" तूझी आई ती माझी एकूलती एक लेक होती गं मला सुध्दा तूझ्याएवढंच दु:ख आहे ". आजीने आपल्या नातीला समजावलं होतं. कसे बसे दोन-तीन घास खाऊन झाल्यावर चौथा घास शांतीच्या काही घशातून उतरला नव्हता.

कुणीतरी आवाज दिल्याने शांती तंद्रीतून जागी झाली. नकळतपणे तिला तिचे कन्यादान ही आठवले व त्याचबरोबर तिच्या आईसारखाच झालेला तिचा संसार- दारुडया नव-याबरोबरचा. आज तिलाही एकटीलाच कन्यादान करावे लागणार होते. पण यापुढ हेच असं आयुष्य तिच्या मुलीच्या सुमतीच्या वाटयाला येऊ नये याबाबत ती दक्ष राहणार होती.

# एक शिवार

--- फ्रँक मिरांडा, उमराळे

निसर्गाच्या अद्भूत आणि उद्धात किमयाची वैभवता शब्दात स्पष्ट करणे अशक्य आहे, पण अशा भव्य आविष्काराचे एखादे छायांकन पाहिले, की मग अल्प सारांश लिहिण्यास मन प्रवृत्त होते.

स्वर्ग आणि नर्क ह्या पोकळ/श्रध्दाळू कल्पनेवर मी कधीच विश्वास ठेवत नाही, पण युरोप आणि मुख्यतः बर्फाळ प्रदेशातील हिरवाई आणि निसर्गसौंदर्याविषयी मी बालपणापासून ऐकत आलेलो आहे आणि तिच भावना मलाही येते जेव्हा मी गावामागच्या शिवारात सहज फेरफटका मारतो. गावाच्या पाठीमागे उंच - ठेंगण्या ताडांच्या सहवासात/कुशीत वाढणारे आमचे गाव. उन्हाळ्यात सबंध दिवसाच्या उन्हाने रखरखीत होणारे आमचे शिवार, रात्री मात्र एकदम सौम्य होते, पावसाळ्यात पाण्याखाली स्वतःचा जीव गुदमरून घेणारे आमचे शिवार, उगवणाऱ्या भातपिकांसोबत कोणतेही वैर ठेवत नाही, इतकेच काय, हिवाळ्यात रात्री थंडीची आणि दवेची चादर अंगावर पांघरलेले हे शिवार दिवसा मात्र एकदम उबदार राहते. इतकी दशके सरली, ह्या आमच्या शिवाराने कित्येक पिढ्या तिच्या उदरात वाढताना, खेळताना, भांडताना आणि सणासुदीला रात्री प्रासंगिक पार्ट्याही करताना पहिल्या आणि पुढे पाहणार आहे...

सुट्टीच्या दिवशी प्रातकाळी उठून शेतात फिरण्याची मजा कशाशीही एक करता येऊ शकत नाही. सूर्याच्या दर्शनासाठी आतुरतेने वाट पाहणारे शिवार, सर्वत्र धुके आणि थंडावा, हवेत हलकेच पसरलेले धुके, दूरवर कोठेतरी पेंढ्याच्या भार्यापासून  बनवलेला डोंगर (उडवा), अनवाणी चालताना गवताच्या छोट्याशा तणावर साचलेल्या दवबिंदूंचा पायाला होणारा गार स्पर्श, उंच-उंच ताडांवर चढणारे भंडारी आणि त्यांच्या कमरेला लटकणारे मातीपासून बनलेले ताडीचे मडके आणि औत, शिवाराच्या मध्यभागी विस्तीर्ण चिंचेच्या झाडाखाली शुद्ध हवेचा आणि ताज्या ताडीचा आस्वाद घेत बसलेली गावातली ज्येष्ठ मंडळी, झाडांच्या फांद्यावर बसून निरनिराळे आवाज काढणारे विविध पक्षी, तर सूर्यप्रकाशविरहित गगनात उत्तुंग भरारी मारून चिवचिव करणाऱ्या चिमण्या, सबंध शिवारावर पांघरलेले गवताचे हिरवे शालू; त्यातून पुढे मार्गक्रमण करणारी छोटीशी पाऊलवाट, निळेभोर नभ आणि वाऱ्याशी खेळणारे/स्पर्धा करणारे शुभ्र मेघ, प्रसन्न वातावरण, शांत परिसर असे हे शिवार. शिवाराच्या प्रवेशद्वाराशी आदरातिथ्य करण्यासाठी ताठ मानेने (२४×७) उभे असलेले दोन ताड म्हणजे जोसघर गावचा एक निराळा इतिहासच आहे.

एखाद्या तणावग्रस्त व्यक्तीला कौन्सेलरकडे घेऊन जाण्यापेक्षा जर का ह्या शिवारात पहाटे घेऊन आले, तर त्याची तणावमुक्त होण्याची शक्यता ही दाट आहे. कितीतरी पिढ्या आल्या आणि  ह्या शिवारादेखत काळाआड गेल्या, कितीतरी पिढ्या येणार आणि नष्ट होणार, पण हे शिवार मात्र असेच राहणार, फक्त आणि फक्त आपण त्याला जर बिल्डरास्वाधीन केले नाही तर....

आपल्या वसईतील प्रत्येक गावाला असे एक शिवार आहे हे आपल्या सर्वांचे भाग्य आहे.

# डिजीटल युगासाठी पालकांना टिप्स.

--- सुनील सायमन डिमेलो. गास वाडी.

नमस्कार मुंबईतील सुप्रसिध्द मानसोपचार तज्ञ. श्रीमती. पर्विन दादाचांजी यांनी त्यांना आलेले काही अनुभव व त्या अनुषंगाने समस्येवरील उपाय आपल्यापुढे मांडले आहेत.

१. सौ.दिप्ती पै ३५. आपली मुलगी रीट हिच्याविषयी खूप जागरूक आहे. ति तिचा स्मार्टफोन रीटच्या हाताला न लागेल असाच ठेवत आली आहेम्हणून रीट लहान असल्यापासून ती मोबाईलजवळ जात नव्हती . पण जसजशी ती मोठी होत गेली तशी ती फोन " मागून " वापरू लागली. दिप्तीचे म्हणने आहे की मुलांना इलेक्ट्रीक गँझेटपासून खूपच लांब ठेवलं तर ती दुसरा मार्ग शोधतात... म्हणजे जर मी रीटला फोन दिला नाही तर ती TV किंवा iPad लावून बसेल किंवा मैत्रिणीकडे जाऊन तिच्या आईचा मोबाईल वापरेल.

बरयाच पालकांचे म्हणने असते की मुलांचा मेंदू मजबूत करायचा असेल तर त्यांना इलेक्टॉनिक गँझेट (मोबाईल आयपँड कंप्युटर ) पासून ४ हात लांबच ठेवावे... पण सौ. पै म्हणतात त्याप्रमाणे हे योग्य नाही. ऊलट आपला मुलगा किंवा मुलगी किती वेळ मोबाईल वापरतात त्यावर अंकुश ठेवायला हवा.

पालकांनी हे लक्षात ठेवावे की त्यांच्या लहानपणीही टी.व्ही. पाहीला जायचा. मुलांसाठी Discovery Quiz Context वगैरे माहीतीपूर्ण कार्यक्रम पहायला काहीच हरकत नसावी ऊलट त्याद्वारे मुलांच्या ज्ञानात भर पडते.

हिमाशू जैन ३३ हे उद्योगपती आहेत. त्यांना ४ वर्षाची एक मुलगी आहे. श्री. जैन ह्यांनी एक प्रयोग केला Virtual Personal Assistant. (VPA). आपण मोबाईलवर Search करताना मायक्रोफोन सारखे एक छोटे चिन्ह असते. आपल्याला एखाद्या गोष्टींचे स्पेलिंग ठाऊक नसेल किंवा Type करण्यासाठी वेळ नसेल तर हे चिन्ह Press करून आपण आपल्या आवाजात हवी असलेली गोष्ट बोलून त्या गोष्टीचा शोध घेऊ शकतो. जैन ह्यांची मुलगी हे VPA सहज वापरू लागली. किती वेळ झाली ? तिला नर्सरीत शिकवलेली बडबडगीते ती बोलून ऐकू लागली. डॉ. पर्विन म्हणतात तंत्रज्ञान काही तुमचा शत्रू नाही तो जर योग्य प्रमाणात वापरले तर खूप फायदा आहे.(संदर्भ : मुंबई मिरर)

त्या पुढे असही म्हणतात की जर या गँझेटमूळे आपली मुलं मोकळया हवेत फिरणे, पालकांशी संवाद साधणे, पुरेशी झोप घेणे यापासून वंचित होत असतील तर तो येणारया पिढीसाठी खूप मोठा धोक्याचा ईशारा आहे. पूर्वी मुलांना काही प्रश्नांची ऊत्तरे हवी असायची तेव्हा ही मुलं वाचनालयातून पुस्तके आणून त्यात शोधायची त्याद्वारे वाचन व्हायचं..पण आता Readymade ऊत्तरं मिळायची सोय झाल्याने मुलांमधील वाचन, विचारशक्ती कमी होत चाललीय.

श्री. जैन हे  एक फॉर्म्युला वापरतात जो  डॉ.पर्विन यांनी सूचविलाय. ते त्यांच्या मुलीला त्यांचा स्मार्ट फोन वापरायला देतात दिवसातून फक्त 40 मिनीटे..पण 35 मिनीटे झाल्यावर ते तिला एक Warning देतात. "बेटा आता फक्त 5 मिनीटेच हं"त्यामूळे काय होतं मुलीला तिचा Game किंवा video आटोपता घ्यायची सूचना मिळते.

लहानपणी मराठीच्या प्रश्नपत्रिकेत निबंधाचे विषय असायचा विज्ञान शाप की वरदान ?? आजच्या आधुनिक युगात भ्रमणध्वनी शाप की वरदान अया विचार करायची वेळ आलीय.खरे पाहता मोबाईल या इंग्रजी शब्दाला "भ्रमणध्वनी " हा चपखल शब्द आहे. घराबाहेर असताना किंवा प्रवासात भ्रमण करताना संपर्काचे साधन म्हणजे भ्रमणध्वनी. परंतु ह्या भ्रमणध्वनीचा अतिवापर "बैठ्या" स्थितीतच होतोय.

मुले अभ्यासासाठी प्रोजेक्टसाठी म्हणून मोबाईल मागतात आणि प्रोजेक्ट बाजूली राहतो यांचे online game सुरू होतात.

मुले जेव्हा मोबाईल मागतात तेव्हा अगदी कडवा विरोध न करता त्यांच्या कलेने घ्या . अतिवापराने होणारे दुष्परिणाम  त्यांना समजावा. एखादा चांगला inspirational video कधी एखादा funny video त्यांच्यासोबत पहा.

आपला मुलगा किंवा मुलगी १० वी पास झाल्याशिवाय त्यांना Smart (! ?1 फोन देऊच नये. मुलांना वाचण्याची आवड लावा बागेत काम करणे मोकळया हवेत खेळणे घरात छोटी छोटी सफाईची कामे करणे मैदानी खेळ खेळणे ह्या सर्वांची आवड निर्माण केल्यास मोबाईलचा अतिवापर टाळायचा प्रयत्न करता येईल. चला ह्या समस्येवर उपाय शोधून नवीन पिढी बौध्दीकदृष्ट्या  सशक्त बनवू या.

## चारोळया -कु. सबिना थॉस फोस(गास)

आली वादळे कितीही तरी

वावटळ नेईल तेथे जावे

परी रहावे धेयास चिकटून सदा

जीवनावर प्रेम करावे शतदा

***

हृदयाये ह्या प्रकार किती हो

कुणाचं दगडायं अन् कुणाचं काचेचं

आताश्या एक नवीनच निघालंय

हृदय असतं प्लास्टीकचं

रुततो तेव्हाच कळतो

की काटा आहे

काटे ठेऊन फुले उधळतो

तोच राजा आहे

***

वेदन तुझी कवेत घेताना

काळीज नव्याने जळले होते

जरी आधीच तुझ्या नजरेतून

सारे काही कळले होते.

# कविता / चारोळ्या विभाग

# आमच्याही घरात बाळ जन्माला आलयं – सायमन मार्टिन, भुईगाव

कठीणच होऊन बसलंय
बाळाच जन्माला येणं
होता
आम्ही कुंपण घातलंय
आमच्या जगण्याला .
कुणी येऊ नये आत
म्हणून जागता पहारा ठेवलाय
आणि तू तर कधीचा
थांबलेला आहेस
आमच्या अंगणात
तुला यायचं आहे
घर करायचं आहे
आम्हाला
आमच्या मोडकळीस
आलेल्या घरात .
जाते
दरवाजे आणि खिडक्या
बंद आहेत आमच्या घराचे
आणि मनाचे देखील .
हा कितवा नाताळ असेल□
तुझी भेटच नाही
आणि आमच्यासाठी
जन्म दूरच राहिलाय
आम्हाला हेदेखील कळत नाही की
बाळ पावला विना
आमच्या घराला□
घरातील ऐश्वर्याला अर्थच नाही .
तुझे बोबडे बोल
म्हणजे जन्ममृत्यूच्या फे□याला
अर्थ देणारे
संजीवन मंत्रच तर आहेत .
तुझ्या बाळलीला म्हणजे
आनंद उल्हासाचा वर्षाव आहे□
जेथून सुरू होतो प्रवास
जीवनाचा .
घरी यावं तर उंबरठ्याआत
दोन हात आसुसलेले असतात
आपण वेंगेत घ्यावं म्हणून .
बाळाचा तो नाजूक मुलायम स्पर्श

आपल्या टणक□ठ झालेल्या
अंगाला होतो

आणि गळून पडतो आपला
कठीणपणा
ही सारी किमया बाळाचीच तर आहे .

कधीतरी आपल्या घरात
बाळ जन्मला आलेलं असेल
आठवून पाहू तो दिवस
दिवसाची ती घटका
ज्या क्षणी बाळाने नऊ महिन्यांच्या

गर्भातील अंधारानंतर
आपल्याला दर्शन दिलं होतं .

तो आनंद आपण कसा
वर्ण शकतो शब्दांत□
तीच वेळ होती ज्या क्षणी
जन्मदात्रीच्या सर्व वेदना संपून
गेल्या होत्या
कारण बाळ जन्माला आलेलं होतं
तोच क्षण होता
जेव्हा संपून गेली होती प्रतीक्षा
कारण बाळ जन्माला आलेलं होतं .
कालपर्यंत दोघे होते
आज पाहुणा आलेला होता
माणूस सर्व काही विसरू शकतो
पण बाळ जन्माची वेळ तो
विसरू शकता नाही कदापि .

काय वर्णावा तो आनंद□
बाळ आलेलं होतं
आणि अतीव कृतज्ञतेनं
ईश्वरा तुझं स्मरण केलेलं होतं .
कारण प्रभू
तू कधीच माणसाला
अस्पृश्य ठरवल नव्हतं
आमच्या पापामुळे नव्हे

तर तुझ्या विशाल प्रेमामुळे
आमच्या घरावर तारा उगवला

ऊन वारं सोसत
झाड उभं असते उन्हात
ते नाही करीत भेद
हा आपला□ी परका
त्याचा धर्म बदलत नाही
आमच्या वागण्यामुळे .
सावली सदैव गारवाच देते
चांदणं शीतलता
आणि प्रभू तू सदैव करतोस

करूणेचा स्पर्श
पण आमची कृतज्ञता सरून

विसर पडतो आम्हाला
तुझ्या अपार दयेचा .
आम्हीच ईश्वर बनतो
म्हणून सर्व दरवाजे बंद करून
तुला घराबाहेर ठेवतो .

## तरीही... - जोसेफ तुस्कानो, बोरीवली

नोकर चाकर नव्हते तुझ्याकडे
तरी ते तुला धनी म्हणायचे
पदव्या नव्हत्या तुझ्याकडे
तरी ते तुला ज्ञानी पुकारायचे
दवापाणी करीत नव्हताच तू
तरी ते तुला योगी म्हणायचे
सैन्यबळ तर तुझ्याकडे नव्हते
तरी राजेमहाराजे तुला शरण यायचे

युद्धाबिद्धाच्या भानगडीत तु पडला नाहीस
तरीही तु जग जिंकलेस
कुठलाही गुन्हा केला नाहीस
तरीही तुला क्रूसी खिळिले
खोल गुहेत दफन झाले तुझे
तरीही तु पुन्हा उठलास
हृदयात आमच्या 'शब्द' कोरून
विश्वात साऱ्या अमर झाला

## बाबेलच्या टॉवरचं बांधकाम

- इग्नेशियस डायस. भुईगाव

बांधकाम
टॉवरचं बांधकाम
बाबेलच्या टॉवरचं बांधकाम

वर्षानुवर्ष बाबेलच्या टॉवरचं बांधकाम
मजल्यावर अत्यूच्च मजला
इश्वरापासून दोन बोटांवर ओपन टेरेस

एकमेव इश्वराची बोबडी वळली
सांडल्या एकापाठोपाठ बोबडीतून
असंख्य भाषा

आता निवडा तुमच्या आवडीची भाषा
आता बोला तुमच्या आवडीच्या भाषेत
आता बांधा टॉवर तुमच्या आवडीच्या भाषेत
आता बांधा टॉवरचे आपापले वर्जन्स आपापल्या
आवडीच्या भाषेत

थोडक्यात बांधकाम
टॉवर्सचं बांधकाम
बाबेलच्या टॉवर्सचं
बांधकाम कंटीन्यू

# नोहाचे तारू

-फेलिक्स डिसोजा. भुईगाव

*एक होडी*

एक होडी
तरंगतेय पाण्यावर

जिच्या आत सगळी पृथ्वी
आहे सुरक्षित

जिच्यात सुरक्षित आहे
निर्मितीचं गुपित

या पृथ्वीचा समुद्र होईल
तेव्हा हेलकावे खात तरंगत राहिल
ही होडी अंडयासारखी
असंख्य जीव घेऊन

पृथ्वीसारखीच तरंगत
राहील पृथ्वीवरच्या पाण्यावर

*प्रलय*

महाजलाशयाचे सर्व झरे फुटले आणि
आकाशाची द्वारे उघडली गेली
वाहू दिलं अभूतपूर्व नाशाचं पाणी
ऐकू येऊ लागली जलप्रलयाची गाणी

ही पृथ्वी धुवून स्वच्छ करायची म्हणजे
आकाशातून वाहणारा पवित्र झरा
वाहत येऊ दे इथल्या साचलेपणातून
जेथे सगळीकडेच आहे घाण

पावित्र्य आणि स्वप्न
यांचा एकत्रीत विध्वंस होत असताना
पाण्याने जगाचा नाश करण्याची तुझी
पद्धत जुनी असली तरी वाहून ये

पाणी पाणी करून टाक या पृथ्वीचं

सर्वनाशाकडे जाणारी ही पृथ्वी
जीवाश्मांच मोठ स्मशान म्हणून उरु दे

*विध्वंस*

आध्यात्मिक म्हातारा
चघळत राहिला म्हातारं आध्यात्म

स्वप्नांची वाळवंट
ओलांडताना
चालत राहिलो
हातातल्या दिव्याचा
भीतीने थरथरणारा उजेड घेऊन
आणि येऊन थांबलो या भरभर वाहणा-या
नदीपाशी
नदीचा हा काळ नाही ओलांडता आला
ही धावपळीत असलेली नदी
मला नाकारून ओलांडून गेली
या नाकापर्यंत आलेल्या पाण्यात
घसा ओला व्हावा म्हणून
घोटभर पाण्यासाठी तडफडावं लागलं
इतकं विनाशी पाणी वाहत राहिलं
या पृथ्वीवर

शुद्धीकरणासाठी शिंपडलेलं
हे पवित्र पाणी आहे
या प्रलयी प्रवाहाचा एखादा घोट
आपली तहान  नाही भागवू शकत

नाकातोंडातून आत शिरतं पाणी तुडुंब
आणि नाकातोंडातून बुडबुडयासारखं
वरवर येत असते पाणी
ती  नाहीए नुसती हवा
तो आहे  नाकपुड्यातला  श्वास
जीव बनून शरीरात खेळत असलेला

बुड ...बुड ....बुड .....बुड ..
मिठासारखा पाण्यात विरघळणारा

......भीतीच्या असंख्य हालचाली
न पाण्यावर तरंगणारी जडशील शांतता

आध्यात्मिक म्हातारा
चघळत राहिला म्हातारं आध्यात्म...

*निर्मितीचा भ्रमनिरास*

काय उगवून आलेलं आवडेल
नुकताच अनेक जीवाश्माचं
स्मशान झालेल्या मातीतून

पाण्यात विरघळलेल्या श्वासाने
आधीच अशुद्ध झालेले हे पाणी
कधीच बाटणार नाही कुणाच्या स्पर्शाने
इतका जलप्रलयावरचा  तुझा ठाम विश्वास

तरी  जलप्रलयाची ही हुकमी कल्पना
तुला हवं तसं जग बांधण्यासाठी
कामी  आली  नाही

तू हतबलतेने पाहत   राहिलास
विध्वंसानंतरचा विध्वंस

सुंदरतेसाठींचा विनाश
वाया गेल्याचा अपराध
लपवता आला नाही तुला

तू माणसाच्या निष्ठुरतेपुढे टेकलेस हात आणि
ओल्या बाळंतिणीला सोडून जावा तिचा
बेजबाबदार  नवरा  अगदी तसा
पृथ्वी सोडून निघून गेलास कायमचा
तुझ्याविषयीची भीती मागे ठेवून

*निर्मिती*

रोज सुरू होतय नवं पर्व
रोज कशाचा तरी अंत

भाषेची बोटं खुडून
बागेत घोंगवणारा  भाषेचा
प्लास्टिक थवा
जो गुणगुणत नाही कुठलीच धुन
दाखवतो धाक भाषेचं बोट सुटलेल्या
एकाकी संस्कृतीला
जगाएवढी एकच जत्रा बसविणाऱ्या हे महाकाय
राक्षसा तुझा शेवटचा घास कोणता असेल की
नव्या  जगाला सुरवात होईल आणि थांबेल
इथला विध्वंस

साबण फुग्याच्या वया एवढं तुझं सृजन

चमकणा-या काचेचा पाणीदार फुगा
आत सप्तरंगी प्रकाश

उजेडाचा गोल
हातात यावा म्हणून अधाशी धडपड

हात लागताच
क्षणार्थात ठू स ...

मातीचा हिरवा कुंकू पुसून
हे कोणाचे शुक्राणू ढकलले गेलेयत
की तरातरून येऊ लागलीय
एकसमान निर्मिती

एकसमान पिकांची एकसमान शेती
एकसमान मातीतील एकसमान इमारती
एकसमान पोशाखातील एकसमान माणसे
एकसमान भाषातील एकसमान भावना

जन्माला येणारी एकसमान बालकं
मारण्याच्या एकसमान पद्धती

एकसमान यंत्राच्या एकसमान हालचाली
एकसमान संवादासाठी एकसमान इमोजीस
एकसमान पाण्याचा एकसमान रंग

एकसमान बातम्यातील एकसमान फुटेज
एकसमान नेत्यांच्या एकसमान सूचना
एकसमान धर्माच्या एकसमान प्रार्थना
एकसमान लोकांच्या एकसमान अस्मिता
एकसमान स्फोट .....ठो....
पसरणारी एकसमान भीती ...

*सुरवात की अंत*

ए म्हाता-या जग बुडत होतं
तेव्हा जिवंत राहू नये भाषा
म्हणून तु गायलेली स्तोत्र कोणत्या
नदीत बुडवलीस
गाथा बुडवल्या तरी अक्षरं बुडत नसतात
हे ठाऊक आहे आम्हाला

आणि तुला तर ठाऊक होतं
माणसं बुडाली तरी क्रुरता
नाही बुडवता येत

स्वप्न बुडतानाचा आवाज ऐकत
आणि तरंगणारी सुखदुःखाची गाठोडी पाहत
जीवंत नरमादीच्या मेंदूत
साचून राहिलीय तुझ्याविषयीची भीती
पुरानंतर मागे राहिलेल्या गाळासारखी

आत्मीक शुद्धीकरणासाठीच्या
प्रार्थना पुटपुटता आल्या नाहीत

जग जिंकण्याच्या आकांक्षेने

जीवंत राहावी भीती म्हणून
माणसे मारण्याच्या युक्त्या
गिरवत राहिलो पिढ्यानपिढ्या

म्हाताऱ्या तू वाचवत होतास एकेक नरमादी
आणि त्याच वेळी त्यांच्या ठायी
वाचवून ठेवलीस

भीती आणि अधिराज्यासाठीची
आवश्यक निष्ठुरता

जी कामी येतेय आज
पुन्हा पुन्हा
विध्वंसाच्या युक्त्या आखण्यासाठी
पुन्हा पुन्हा
सुंदर जगाचं स्वप्नं पाहण्यासाठी

एक होडी अंडयासारखी
असंख्य जीव घेऊन तरंगतेय

तुका म्हणे
दगडाची नाव आधींच ते जड ।
ते काय दगड तारू जाणे ।।
......

कुठल्यातरी स्वप्नातून जागे होऊन
आपण पाहतो
नव्या जगात लोक आनंदाने गाणी गातायेत ,
संगीत वाद्य वाजवतायेत आणि
जीवनाचा आनंद लुटतायेत

त्याच पहाटे उघडले जाईल
आपल्यासाठी कसलंतरी द्वार....

तेव्हा कसे कळणार
की आपण
आत शिरतोय की
पडतोय बाहेर
ही सुरवात आहे की
कसलातरी अंत

# फायनल खिमा

--- महेश लीलापंडित

तुला सर्वजन पाहतायत
तू कोणालाच पाहात नाहीयेस
तू गजब पचवी गिनीज बुकीय
पचवत राहिलीस
शिव्या मारहाण अपमान सारं काही
जन्मजात तोंडावर स्मायली
अदृश्य झाली आज जन्मजात गोंदलेली स्मायली
शहर नेहमी सारखे आहे बीजी
काम नाही म्हणून लोक देखील शहरगावात आहेत व्यस्त
व्यस्त डोकी झाली आहेत जमा

असंख्य अथक उगवायच्या तुला फांद्या
पाहताच लोकांना मुलांना नातेवाईकांना

तू कौतुक प्रेम नि कुतूहलाचे डेन्स्ट व्हर्जन
ब्लॅकहोल सारखीच घेणारी खेचून
आज कळून नाही फायदा
फांद्या नाहीशा
मेलय ब्लॅकहोल

व्यस्त डोकी झाली आहेत जमा
लागलीय सगळ्यांची शर्यत
तुझं कानतळं भरण्याची
कौतुक स्तुती आठवणी पाऊस
कान तुझे राहिले नसताना

सांधल्या तू मरेपर्यंत चपला
घातल्या सगळ्यांच्या पायात

आश्चर्याने मी घामाघूम
उगवायचीस कशी तू एव्हडी कातडी
छिलून कशी घ्यायचीस तू स्वतःला

पोस्ट मॉर्टम साठी ठेवलंय तुला
वेटिंग तास चौदा
टळली नाही तुला मरणानंतर देखील वेटिंग
कापली जावून तू आज
उभी नि आडवी
शिवून काढलीय तुला
सुंदर सांधलेल्या चपलेत
बदलली गेलीय तुझी बॉडी
कामलेस व्यस्त डोकी करतायेत घाई
पण
वेटिंग तुझी कायम अजूनही

मेली सवाशीण तू
यशोगाथा त्यांनी गाऊन
मैलोमैल कपाळभर कुंकू नि तांदूळ लेपून उपकार
माझ्या डोळया नाका स्पर्शाने
डेटा केलाय मेंदूत रजिस्टर
कपाळाचा तुझ्या फायनल खिमा

अरे लवकर करा गाडी भेटणार नै बरं
ह्या गावात मौतेला जायचं म्हन्लं ते अंगावर काटाच यस
अय नेम्मन लाकडे रचा रे
हा भटूभो नुसत्या ऑर्डरी सोडतो
तमाकू हे का
दहा वाजून गेले अजून लाकडे रचाना बाकी शेतस
जेवनना वांधा
धाव्व निस्त का तेराव्व बी?
पाच दिन मा उरकाई ल्या भो पोरेस्न्या परीक्षा हेत
केळांचे तेवीस हजार आडकून पडेल हेत निस्त्या फेर्यावर फेर्या
त्यानी साली नांदायले गई का?

जिवंत होतीस जो पर्यंत तू
चपला तुझ्याकातड्याच्या
पाय त्यांचे गुलमोहरलेले
नि आता
पाय त्यांचे तुझ्या खिम्याने माखलेले
पसरतोय मिसळतोय तुझा खिमा गाव मातीत
दंतकथांचे उघडतायत असंख्य कारखाने
ज्याला जसे जमेल आवडेल तसे प्रोडक्शन्
पसरवला जाणारा नदीकाठ ते गावभर धूर
कढ आणतोय डोळ्यात माझ्या चिरत
चिरत
चिरत
चराचर चिरत

**माणूस म्हणे (आगामी कविता संग्रह), भाग - एस माया**

# कविता - फा. वेन्सी डिमेलो, नाशिक

## तारा!

हेरोदाहून अधिक!
पुरोहित हादरले होते
तो पुर्वे कडला तारा पाहून!
धर्म राजनीतीची मसलत
चालू आहे तेव्हा पासून!

आजचेही चित्र काही
वेगळे नाही!
जो तो तारे तोडत आहे
आकाशातले शापित भूमीवर!
प्रकाश नष्ट करण्यासाठी!

कारण प्रश्न त्यांच्या
पोटा पाण्याचा नि
भोगाचा आहे!

## देव!!

जगात देव नाही
ह्यात नवीन काय?

श्रमिकाच्या घामात
आणि मिशनरीच्या रक्तात
लपला देव कसा सापडेल
वातानुकूलित विज्ञानात?

मूर्ती पूजा करू नकोस
ह्या पहिल्या आज्ञेतही तो
नाकारला आहे पूर्वजांनी
मग नवीन काय सांगितले?

चर्च मधील मूर्तीत
तो बंदिस्त आहे
कारण इथे पुरोहितांच्या
पोटापाण्याचा प्रश्न आहे!

विज्ञान पांगुळते नि धर्म अंधारतो
तो असा!

सत्यही ही ईश्वर है
विज्ञानही ईश्वर है
सोनाराने टोचले
म्हणून हा◌ॅकींगही
सत्य है!

## गर्भ परीक्षा !

मरियेच्या गर्भाला
एरवी वंदन करणारे
नख लावताहेत
घरच्या गर्भाला!

मरियेचे पोटीही
गर्भ राहिला तोही
पुत्राचा!
इथेही हस्तक्षेप
पुल्लिंगी देवाचा!
नि त्याहून अधिक
पुरूष प्रधान संस्कृतीचा!

नाही तर विधात्यानेही
निर्माण केली असती
आदामा आधी एवा!

## **जगायचे कसे ? -** आयवन क्रास्टो , उमराळे , 9987787056

आत्ममग्न समाजाचा,
अंश होऊन जगण्यापेक्षा,
मरणानेच दंश करावा.
त्यानेच सुटका होईल.
परिस्थितीचा रेटा दोन्ही खांद्यांना,
फक्त झुकवत नाही;
खच्चीकरणातून कडेलोटाचीच वाट बघतोय.

आजूबाजूस .......
एखाद योनीतुन जन्मलेला स्वार्थ,
एकजात सगळ्यांच्या शरीरात,
पोसतोय स्वार्थाचा अजून एक किडा.
अन पोखरत जातोय मन,
त्यातला विवेक इत्यादी इत्यादी...
सुखासाठी की अस्तित्वासाठी,
हे करावं लागतं म्हणे !

पण !
दुःखाला थोडंच असं वळवता येईल !
धावाधाव ज्या सुखासाठी ,
जे आजचंच आहे,
आजच कोणीतरी ते,
हिरावूनही घेईल.
उद्या मात्र दुःखाचे भिक्षापात्र,
हाती येणारच आहे,

स्वार्थाचं लटाम्बर मग,
टांगले राहील मलूल होऊन,
भिंतीवर पणतीसह फ्रेमच्या कडेसुरीस.

ज्या अंतिम सुखासाठी झगडतोय,
ते याच शरीरातून आत्मा निघून,
गेल्यावरच तर मिळणार आहे.

## **हायकू**

वसुंधरा ही
हिरवीगार दिसे
स्वर्गच भासे

समुद्र असा
निळा हा थोडासा
अफाट जसा

मजला दिसे
नभी चंद्र रात्रीचा
शितलतेचा

गगनझेप
पक्ष्यांच्या भरारीची
आस उंचीची

पावसाळ्यात
अवनी माझी नटली
छान सजली

मेल्सीना तुस्कानो,
नंदाखाल

## **ती मावली -** फ्रँक मिरांडा, उमराळे

खाटेवर बसून
हसत होती ती मावली,
तिच्या सदैव पाठीशी होती
तिचीच गडद सावली.

झिजलेले शरीर
सुकलेले गाल,
त्या मावलीचे
होत होते हाल.

शिकलेली मुलं
घरात तीन सुना,
पण कोणालाही नव्हती
थोडी करुणा.

घरात पाळीव प्राणी
त्यांनाही खोली,
ती मावली मात्र
जिन्याखाली अबोली.

घरातील जणावरं
कायम तुपाशी,
खाटेला खिळलेली ती
मावली मात्र उपाशी.

पाण्याच्या घोटासाठी
तिचा प्राण सुकायचा,
डोळ्यातुन वाहणारे पाणीच
मग तिची तहाण तृप्त करायचा.

## **प्रवाहपतित** --- संगीता वाझ, निर्मळ

त्याच्या प्रेमळ सहवासातही
कसा राहिलास तू
बनुनि एक रुक्ष हिशेबनीस
दगडासारखं हृदय तुझं
का नाही बनलं मांसल
का बनलास इतका कठोर

आंधळेपांगळे.....मुकेबहिरेही
जिथे होऊनि व्याधीमुक्त
झाले हर्षोल्लसित
तो परिसस्पर्श तुझ्या हृदयाला
कसा नाही झाला
निदान एक साधासुधा माणूस
का नाही बनू शकलास तू

कपाळी कृतघ्नतेचा शिक्का
नि गळ्याभोवती फास
प्राक्तनात हे सारं मिळवून
कुठे गेलास तू
आत्महत्येनंतरचा तुझा तो
विव्हळणारा आत्मा
नि आजही काही प्रश्न
ऊभे माझ्यासमोर.....

तू असावंस एक लहानसं कडं
विश्वासघाताच्या आरोपाबरोबर
तारणाची साखळी पुर्ण
करणारं.....
बेचाळीस पिढ्या आधी

वर्तविलेलं भाकीत
खरं ठरावं म्हणून
निवडलेलं एक अभागी
प्यादं.....

तू नसतास तर कुणी घेतलं
असतं
जगातील सर्वात घातक चुंबन
कुणाची होती शामत
देवपुत्रावर हात टाकण्याची....

हे प्रवाहपतित जुदासा !
तू नसतास तर कदाचित
तारणाचा हिशेबही
अधांतरीच राहिला असता....

## जा रे पाखरा – जिम (फिलिप) रॉड्रिग्ज, बोळींज

उडूनी जा पाखरा
दूर देशी
या दुष्ट नगराच्या
ओलांडूनी वेशी
जा पाखरा जा रे.. !
असलास तु निष्पाप
कितीही, तरी
ही दुनिया अपराध्यागत
चढविल तुला सुळावरी
आता येथे थांबूही नको रे
जा पाखरा जा रे.. !
तुझ्या प्रीतीची अनोखी रीत
कळणार कुणा मुळीच नाही

तुझ्या मृत्युत अश्रु ना फुले
वाहणार कुणीच नाही
विसर रे विसर सारे
जा पाखरा जा रे.. !
अध:पतीतांच्या अंधकाराची
ही क्रूर छाया
क्षणिक दुंनियेची चंदेरी
ही क्षुद्र मोह माया
आशा व्यर्थ काही धरू नको रे
जा पाखरा जा रे.. !
सोबतीला स्वप्न माझे देतो मी घेउनी जा !
माझिया मनात आठवण तुझी ठेवून जा !
उडूनी जा पाखरा उडूनी जा
तेथेच आहे तुझा मित्र खरा.

## अभंग – आई - मेल्सीना तुस्कानो , नंदाखाल

आई ती लाडाची। त्या चार पुत्रांची।
कूस ममतेची। उबदार। ॥१॥

अपार कष्टाने। शिकवले त्यांस।
सुशिक्षित ध्यास। मातेअंगी। ॥२॥

ज्ञान संपादिले। पुस्तके शिकूनी।
नोकरी लागूनी। सावरले। ॥ ३ ॥

बांधिले बंगले। सुना आल्या घरी।
ममतेच्या दारी। उभी राही। ॥ ४ ॥

म्हातारी ती माय। नकोशीच झाली।
बदलली गेली। चार पुत्र। ॥ ५ ॥

चढूनी पायरी। वृद्ध आश्रमाची।
खोटं नशिबाची। आईसाठी। ॥ ५ ॥

रडुनी पडूनी। आसवे गाळूनी।
एकटी राहुनी। जन्मदाती। ॥ ६ ॥

कोंडला तो श्वास। त्या चार भिंतीत।
आस ही मनात। पुत्रभेट। ॥ ७ ॥

उभी दारापाशी। नयन लावूनी
लेकरे येऊनी। मायप्रेम। ॥ ८॥

थकुनी ती गेली। श्वास अडकला।
विरह राहिला। एक आई। ॥ ९ ॥

## "तो "आणि " ती" - नीलम दळवी

वाटेत चालताना वाटेकरी म्हणून "ती""भेटली

प्रत्येक क्षणाचा सांगाती झाली

सुख दुःखाचे अदलाबदली झाली

काही झाले कि पहिले सांगण्याचा मान तिला मी दिला

सोबतीने तिच्या आयुष्य सुकर वाटू लागले

पण हळू हळू "ती "चे रूपांतर "त्या "च्या मध्ये होऊ लागले

तिच्या जवळ जवळ जात असताना तिची जागा पूर्णतः त्याने घेतली

त्याला काहीही करून आपलेसे करायचे हा अट्टाहास लागला

आयुष्यातील गुलाबी रंग खुलू लागला

अवकाशात झेप घेण्याइतकी धुंदी माजली

जमीनीच्या १ इंच वरचा प्रवास होता माझ्यासाठी

शेवटी ती आणि तो एकमग्न झाले

दोघांसोबतच्या एकत्रित प्रवासाने मन कधी कधी भरून यायचे

ह्या पेक्षा अजून काही नको देवा असे मागणे असायचे

बेधुंद अशी बहरत असताना अचानक तो नाहीसा झाला

कुठे गेला? का गेला? कसा गेला ?

खूप शोधले पण परत नाही आला

सर्व हरवले होते आता

कारण त्याच्या सोबत ती सुद्धा गेली होती

जी खूप घट्ट होती विश्वासू होती

खूपच सवय झाली होती मला तिची

क्षणभंगुर आनंदासाठी मी "ती' ला गमावले

आता खूप त्रास होतो आहे मला "ति"चा न असण्याचा

कारण अशीच होती  जिवलग "माझी मैत्री "

घट्ट आणि विश्वासू||.....

## माणूस - नीलम दळवी

जन्म घेताना माझ्या अंशाने ,ना पाहिला कधी कोणता देश,
निसर्गाच्या गाठींनी मग बनला माझा वेश
मग देशप्रेमी-देशद्रोही असा का भेद
माणूस म्हणून जन्मले माणूस म्हणून जगूद्यात ॥

मनुष्यरूपी वेशात झाला अखेर जन्म,

नाहीतर जनावरांनाहि असतात हात-पाय ....हेच आपले भाग्य..

जन्म देताना आईने ना कधी पुसला "दिवा आहे कि वात ?"
अहो वातेला झिजुनंच दिवा जळतो
मग कशाला हा मूला मुलीचा वाद ?

कधी जन्म माझा लाखमोलाचा ,ना पहिला कधी
धर्म ,वंश ,जात
आपण एकाच मातीतून आलो आहोत ,ह्याची
आहे का भ्रांत ?

कणादांनी दिला माझ्या अंशाचा संकेत
प्रत्येक कणात तो एकाच आहे , तरीही त्यावरूनहि
भेद ..

देवाची रूपे अपरंपार ,द्रुश्य पहिली नेहमी सारी
कधीहि न पहिली त्याचे गुण,हि अंधश्रद्धा सारी

श्रीमंत भेटला , गरीब भेटला ,सुखी भेटला , दुःखी
भेटला,
पण पहिला ना कधी  माणूस
प्रगतीच्या शिखरावर जाताना हरवली आहे
निसर्गाची कूस

जगण्याच्या वाटेवर जाताना शोधते आहे
माझ्यासारखा माणूस
पण आजकालच्या टेकनोविश्वात  हरवला ,खाऊन
भ्रस्टाचाराचा ऊस
माणूस म्हणून जन्मले माणूस म्हणून जगूद्यात

जाता जाता एकच ध्यास
जगत आयुष्य आहे माणूस म्हणून
माणुसकीचा सर्वांशी  बंध बंधूनी मरेन ,माणूस
म्हणून ॥

## प्रेमांकुर - ग्रिनल फरगोज.

जवळून जेव्हा पाहिले तुला
आयुष्य तेव्हाच हवेहवेसे वाटू लागले

प्रेम सरीं हलकेच बरसत राहील्या
श्वासात प्रेमाकुंर अलगद उमलले

तुझ्या येण्याने आसमंत गंधाळला
खुळे मन माझे  तेव्हाच भुलले

तू फक्त हसताना दिसत राहिली
तरी स्वप्न मला दररोज गाठू लागले

मौनाच्या भाषेत तू बोलत राहिली
तुझ्या  मौनाचे बोल मलाच कळले

हलकेच दुर निघून गेलीस तू
हुंदके माझ्या मनात दाटू लागले

आठवणीचे पारडे  जेव्हा जड झाले
हळूवार एकांतातले क्षण  लगेच आठवले

प्रेमाचे मला काहीच ना समजले
जग मात्र फसवे भासत राहिले .

## शमुवेल - सौ. रेश्मा सुनिल परेरा (वटार)

मंदीरात होता एक याजक
‘एली‘ ऐसे त्याचे नाव
जवळी होता एक बालक
‘शमुवेल’ ऐसे त्याचे नाव
होता स्वभावाने सात्विक
अत्यंत लाडका असा तो भाविक
एके दिवशी निद्रेच्या कवेत
असताना हाक येई कानी

कोणी न दिसे लोचनी
उठुनी जाई ‘एली‘ पाशी
‘ तू दिलीस का हाक मजसी’
ऐसे पुसुनी एलीसी
तव एली समजोनी जाई
ही हाक नाही साधी
ही हाक आहे परमात्म्याची
जाणीव करुन देता तयाची
‘शमुवेल’ तव शरण जाई प्रभुपाशी.

## मी - एडवर्ड डिसोझा

मी श्वासतोय
म्हणजे मी जिवंत आहे

मी रडतोय
म्हणजे मी संवेदनशील आहे

मी हसतोय
म्हणजे मी भावनिक आहे

मी हिंडतोय
म्हणजे मी प्रयोगशील आहे

मी वाचतोय
म्हणजे मी ग्रहनशील आहे

मी बोलतोय
म्हणजे मी संवादशील आहे

मी सहभागतोय
म्हणजे मी क्रियाशील आहे

मी पाहतोय
पण अबोल आहे
मी समजतोय
पण अव्यक्त आहे

बांधून टाकतो गाठोडं
मेंदूत प्रसवणाऱ्या विचारांचं
अन ढकलतोय
आला दिवस
असंच जगतोय मी

## **ते आणि आम्ही** – सुनिल सोकाळकर

ते गेले, कितीतरी चिरडले
काही चेंगरले, होर्डिंगात अडकले,
कित्येक बुडालेही
आणि आम्ही अडकले सेल्फीत

आधी मरा, मग बघू
सरकारने वेळीच सांगितले
बळी गेल्याशिवाय आजकाल
गांभीर्यच कसं कळत नाही

प्रेताच्या टाळूवर लाखाची बोली
कमावता हात निकामी,
त्याला कागदपत्रांची रांग
सात-आठ दिवस ईकडे-तिकडे बोंबाबोंब
मग परत सगळे शांत निवांत
पुढची घटना घटेपर्यंत...

आणि बरं का…
"RIP"च्या पोस्टी सोशल मिडियावर धडाधड धडकल्या नाहीत
भावपूर्ण श्रद्धांजलीचे बॅनरही नाक्यावर दिसले नाहीत
सेलिब्रिटींच्या ट्विटर हॅंडलचे
हॅशटॅग सिम्बॉल वाईप आऊट झाले

आम्हीच तेवढे बरे चुतीया भेटलो
रोज इथे कोंबड्या-बकऱ्या कापाव्यात
चिकन-मटणासाठी
तशी पायलीला पासरीभर माणसं मरतात
आमच्या बापाचं काय जातंय
भोसड्यात गेली दुनियादारी म्हणत
आमचं कुढणं चालूच राहतंय.

# कलाकुसर :-

**पॉल डिमेलो:-**





रॉजर सेरेजो :-





**केल्विन लोपीस :-**





**जोनस पांबूजा:-**



